नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुर्नर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	ले.प.वर्ष	परिच्छेद क्रमांक	शेरा
1	2011-2012	3, 4, 5, 37, 39, 82, 85, 96, 110, 132, 142, 146, 156, 175, 176, 177, 179, 180, 200, 201, 210, 234	

Part II

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

1 अर्थसंकल्प व महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहे. प्रत्यक्षात मागील 3 वर्षातील जमा रकमा खुप कमी आहेत त्या तुलनेत आयुक्तांनी अंदाज करतांना काही अशी वाढ केलेली असून स्थायी समितीने व महासभेने त्यात मोठ्या प्रमाणात वाढ केलेली आहे. पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण नसून अर्थसंकल्पात त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजीत जमा रकमा या वास्तववादी न दर्शविता मोठ्या प्रमाणावर वाढ करुन दर्शविलेल्या आहेत व त्याआधारे अपेक्षित खर्च हा त्या प्रमाणात जादा दर्शविला गेला असल्याने महापालिकेच्या दायित्वात वाढ झालेली आहे. काही बाबतीत सुधारित अर्थसंकल्पात मंजूर तरतुदी पेक्षा जास्त खर्च करण्यात आलेला आहे. स्वउत्पन्नाशी बांधील खर्चाचे प्रमाण 64.23 टक्के इतके आहे. महिला व बाल विकास, अपंग कल्याण, मागासवर्गीय कल्याणकरी योजना, क्रीडा इत्यादी बाबींवर शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी खर्च करण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014 - 2015 या वित्तिय वर्षाच्या लेखापरीक्षणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केले सन 2014 - 2015 या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प, सुधारित अर्थसंकल्प व प्रत्यक्ष सन 2014 - 2015 मधील जमा व खर्च याची तपासणी करता त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन 2014 - 2015 च्या मूळ अर्थसंकल्पास मान्यता

1. स्थायी समिती ठराव क्र. 858 दि. 18.02.2014
2. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1337 दि. 08.07.2014

सन 2014 - 2015 जमा व खर्चा बाबत केलेली तरतुद व प्रत्यक्ष झालेली जमा व खर्चाची आकडेवारी

(रु.लाखात)

जमा तरतूद (सु.शिल्लक वगळून)	प्रत्यक्ष जमा	खर्च तरतूद (अ.शिल्लक वगळून)	प्रत्यक्ष खर्च

मूळ	सुधारित		मूळ	सुधारित	
304251.65	103503.81	91152.37	303962.14	108704.19	89784.87

अर्थसंकल्पीय रकमा, प्रत्यक्ष जमा व खर्च खालीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.

सन 2014 - 2015 (रु.लाखात)

अंदाजपत्रक	मा.आयुक्तांनी शिफारस केलेले अंदाज	मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज	मा. महासभेचे मूळ अंदाजपत्रक	सुधारीत अंदाजपत्रक	प्रत्यक्ष जमा व खर्च
अ) जमा					
प्रारंभिची शिल्लक	117.34	117.34	117.34	5551.33	5551.33
अंदाजपत्रक अ	165123.15	270023.15	277823.15	85786.59	79917.57
अंदाजपत्रक क	11611.50	15611.00	15611.00	7361.5	5711.37
अंदाजपत्रक प	332.00	332.00	332.00	224.00	118.00
एकूण	177066.65	285966.65	293766.65	93372.09	85746.95
इतर उचल परत जमा	10385.00	10485.00	10485.00	10131.72	5405.43
एकूण एकंदर जमा	187451.65	296451.65	304251.65	103503.81	91152.37
प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा	187568.99	296568.99	304368.99	109055.14	96703.70
ब) खर्च (महसुली) अ,क,प	96712.42	105975.19	107793.89	60209.95	55989.60
भांडवली खर्च अ,क,प	82884.37	182187.79	188069.25	39315.58	30140.15

इतर उचल जमा	7699.00	8099.00	8099.00	3806.36	3646.80
19% खर्च बाबी	00	00	00	5372.29	8.32
एकुण एकंदर खर्च	187295.79	296261.98	303962.14	108704.19	89784.87
अखेर शिल्लक	273.2	307.01	406.85	350.95	6918.83
एकुण एकंदर	187568.99	296568.99	304368.99	109055.14	96703.70

मागील तीन वर्षातील मा.आयुक्त, मा.स्थायी समिती, मा.महासभा यांचे अंदाज तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीमध्ये)

वर्ष	मा.आयुक्त	मा.स्थायी समिती	मा.महासभा	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च
2011-12	1030.85	1030.85	1244.64	835.96	788.28
2012-13	1170.85	1810.82	2030.82	1004.20	968.56
2013-14	1556.80	2359.95	2755.90	914.57	859.05
एकूण	3758.50	5201.62	6031.36	2754.73	2615.89
सरासरी	1252.83	1733.87	2010.45	918.24	871.96

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत.अर्थसंकल्प वास्तववादी होण्यासाठी मागील तिन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत धरली पाहिजे. परंतु उपरोक्त तक्त्यावरुन दिसुन येते की, मागील 3 वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा खुप कमी आहेत. त्या तुलनेत आयुक्तांनी अंदाज करतांना काही अंशी वाढ केलेली दिसते. मात्र स्थायी समितीने व महासभेने त्यात त्यांचे अधिकारात भरमसाठ वाढ केलेली आहे. मागील तीन वर्षाची जमेची सरासरी 918.24 असतांना सन 2014 - 2015 या वित्तीय वर्षात मूळ अंदाजपत्रका नुसार रु 3043.69 कोटी एवढी जमा रक्कम अंदाजित केलेली होती. तथापि प्रत्यक्ष रुपये 914.56 कोटी जमा झाली आहे. तसेच मागील तीन वर्षांची खर्चाची सरासरी

871.96 असतांना मूळ अंदाजपत्रका नुसार खर्च रुपये 3039.62 कोटी अंदाजीत केलेला होता. प्रत्यक्षात रुपये 897.85 प्रत्यक्ष खर्च केला आहे. म्हणजेच अंदाजपत्रकातील रकमा या वास्तववादी नसल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय रकमा व प्रत्यक्ष रकमा यात मोठी तफावत असल्याचे दिसून येते.

2. सन 2014 - 2015 मध्ये मालमत्ता कराची अंदाजीत जमा रुपये 125 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पात व सुधारीत अर्थसंकल्पात 55.00 कोटी रुपये दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात जमा मात्र 34.23 कोटी रुपये एवढी झालेली आहे. सन 2011-12 ते 2013-14 ची सरासरी जमा (31.55+31.02+34.08) = 32.21 कोटी एवढी आहे .विकास शुल्काची अंदाजित रक्कम रु.110 कोटी असतांना प्रत्यक्ष जमा 23.43 कोटी आहे. याप्रमाणेच इतर जमा रकमांचे अंदाजात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. म्हणजे मूळ अंदाजपत्रकामध्ये जमा रकमांचे अंदाज अवास्तव प्रमाणावर वाढवुन दर्शविले आहेत.

3. मूळ अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजीत जमा रकमा या वास्तववादी न दर्शविता मोठ्या प्रमाणावर वाढ करुन दर्शविलेल्या आहेत व त्याआधारे अपेक्षित खर्च हा त्या प्रमाणात जादा दर्शविला गेला आहे. परंतु प्रत्यक्षात त्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त न झाल्यामुळे अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या कामांना निधी उपलब्ध होत नाही व पर्यायाने कामे अपूर्ण राहून मोठ्या प्रमाणावर दायित्व (स्पिल ओव्हर) निर्माण झाले आहे. सन 2014 - 2015 च्या मूळ मंजूर अर्थसंकल्पासोबत जोडलेलेया याद्यांनुसार अशा स्पिल ओव्हर कामांचे रुपये 1217.97 कोटी एवढे दायित्व दर्शविले आहे. सदरचे दायित्व हे महानगरपालिकेच्या सन 2014 - 2015 मधील प्रत्यक्ष उत्पन्ना पेक्षा च्या (रु. 967.04 कोटी) 126% आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते.दर वर्षी या स्पिल ओव्हर च्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते.

4. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक 1मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत अर्थसंकल्पापेक्षा वेगवेगळ्या लेखाशिर्षाअंतर्गत एकूण रक्कम रुपये 26370.68 लक्ष एवढी कमी व रक्कम रुपये 4760.34 लक्ष एवढा जास्त खर्च केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 86 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 28 नुसार अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. सबब अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा जादा केलेला खर्च रुपये 4760.34 लक्ष हा नियमबाह्य ठरतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 101 ते 104 नुसार, सदर कमी व जादा खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

5. सन 2013 - 2014 मध्ये महानगरपालिकेचे स्वत:चे उत्पन्न रु. 832.82 कोटी असून या वर्षाचा बांधील खर्च रु.559.89 कोटी आहे. स्वउत्पन्नाशी बांधील खर्चाचे प्रमाण 67.23 टक्के इतके असून हे प्रमाण कमी होण्यासाठी उपाययोजना होणे आवश्यक आहे.

6. मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील एकूण सरासरी जमा रुपये 64.18 कोटी असताना सरासरी खर्च रुपये 104.41 कोटी एवढा झाला आहे. सन 2014-15 या वर्षी जलदाय व्यवस्थेची एकूण जमा रु. 57.11 कोटी असून खर्च रु.123 कोटी आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/ न.वि.20 मंत्रालय, मुंबई दिनांक 2.8.2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पात त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

7. शासन आदेशातील तरतुद

अ) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1093/325 /प्र. क्र.24नवि-32,दि .17.04.93 व नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन - 1093/1198/नवि-14, दि. 14.07.93 अन्वये महिला व बालविकास कल्याण यासाठी - 5%,

ब) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन - 1655/प्र. क्र.46/नवि - 33,दि. 14.02.2002 अन्वये अपंग कल्याणासाठी - 3%,

क) नगर विकास विभाग आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई 32 दि. 3 जुलै,1982 अन्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना - 5%

ड) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. जीईएन 1098/प्र.क्र. 21/98/नवि-24/मंत्रालय, मुंबई 32, दि. 09/03/1998 अन्वये क्रीडा क्षेत्रासाठी 5%

याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013 - 2014 चे स्वत:चे उत्पन्न रु. 832.82 कोटि असून बांधील खर्च रु.559.90 कोटी आहे. सन 2016-17 च्या अर्थसंकल्पात या बाबींवरील खर्च स्वतंत्र नमूद करण्यात आला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे : लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन 13-14 आवश्यक तरतुद	सन 13-14 केलेला प्रत्यक्ष खर्च
1	महिला बाल व कल्याण कार्यक्रम 5 टक्के	1364.61	00
2	अपंग पुनर्वसन 3 टक्के	818.77	00
3	मागासवर्ग कल्याण 5%	1364.61	4.67
4	क्रीडा 5%	1364.61	2.72

उपरोक्त बाबींवर महानगर पालिकेने प्रत्यक्ष खर्च कमी केलेला असल्याने शासन आदेशांचे पालन झालेले नसून संबंधित घटकांच्या कल्याणाचा उद्देश साध्य होत नाही.

8. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 अन्वये झाडे तोडण्याचे नियमन करुन राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतुद करण्यासाठी आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नवीन झाडे लावण्याची तरतुद करणे अंर्तभुत करण्यात आलेले आहे. या अधिनियमातील कलम 2 (क) मध्ये झाडांचे जतन करणे म्हणजे केवळ नवीन झाडे लावणे आणि झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होणे करिता इतर कामे करणे असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण सहा कलम 15 अन्वये एकूण जमा रकमेच्या ½ % रक्कमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतुद करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तथापी वृक्ष निधी अंशदान खाती मूळ अंदाजपत्रकात रक्कम रु. 6.16 कोटी व सुधारीत अंदाजपत्रकात रु.0.01 कोटीची तरतुद केलेली असतांना प्रत्यक्षात अजिबात रक्कम वर्ग करण्यात आलेली नाही.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014 - 2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये अर्धसमास पत्र क्रमांक 13 दिनांक 05.01.2016 अन्वये विहित नमुन्यात महानगरपालिकेचे दिनांक 31.3.2015 अखेरचे मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी करण्यात आली होती. तसेच वेळोवेळी तोंडी मागणी करुनही सदरचे विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या दिनांक 31.3.2015 अखेर असणारी मत्ता व दायित्व यांची पडताळणी करता आलेली नाही.

तथापि सन 2014 - 2015 मधील प्रत्यक्ष जमा, गुंतवणूका, घेतलेली कर्जे, अग्रीम अनामत, इतर पडताळणी केलेल्या अभिलेखे इ.वरुन महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नाशिक महानगरपालिकेस येणे असलेली सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 4 नुसार मालमत्ताकराची थकबाकी रक्कम रुपये 5752.31 /- लक्ष तसेच पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम रुपये 2911.31/- लक्ष इ. रकमा पूर्णत: वसूल झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने मत्ता म्हणता येणार नाहीत. अर्थसंकल्पासोबत जोडलेल्या स्पिल ओव्हर कामांच्या यादी नुसार दि.31/03/2014 अखेर कार्यादेश दिलेल्या पण अपूर्ण असलेल्या कामांसाठी लागणारी

रु. 1049.08 /- कोटी तसेच थकीत बिलांच्या रकमा इत्यादीचा विचार करता प्राप्त उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे .प्रत्यक्ष प्राप्त उत्त्पन्नापेक्षा मागील दायित्वाचे प्रमाण जास्त आहे.

2. घरकुल योजना व इतर शासन अनुदानीत योजनांमधून हाती घेतलेल्या कामांसाठी महानगरपालिका हिस्सा व जादा दराने निविदा स्वीकृत केल्याने करावयाचा अतिरिक्त खर्च यासाठी महानगरपालिकेस मोठया प्रमाणात तरतूद करावी लागणार आहे.

3. महानगरपालिकेस जमा असलेले सुरक्षा व इतर ठेवींची सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 6 नुसार रक्कम रुपये 6919.62 /- लक्ष असून ती रक्कम मागणीनुसार प्रदान करावी लागणार आहे.

4. नाशिक महानगरपालिकेने खालील नमुद केलेल्या रकमा अनुसुचीमध्ये नसलेल्या सहकारी बँकेत ठेव म्हणुन ठेवल्या आहेत व मनपाने वारंवार मागणी करुनही सदरच्या ठेवी बँकेच्या नाजुक आर्थिक परिस्थितीमुळे अदयाप पर्यंत परत मिळालेल्या नाही, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	बँकेचे नाव	ठेवीचा प्रकार	मुळ रक्कम रुपये
1	श्रीराम को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	मुदत ठेव (सन 2001 पासुन)	8,68,90,098/-
2	श्रीराम को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	चालु खाते	2,65,35,362/-
3	बालाजी को ऑपरेटीव्ह बँक,नाशिक	मुदत ठेवी सन 1996-97 पासुन	40,00,000/-
		एकुण रक्कम रु.	11,74,25,460/-

वरील प्रमाणे रु.11,74,25,460/-एवढी रक्कम व त्यावरील व्याज बँकांना वारंवार पत्रव्यवहाराने मागणी करुनही परत मिळु शकलेली नाही.

श्रीराम सहकारी बँकेच्या बँकिंग परवाना रिझर्व्ह बँकेचे पत्र क्रमांक युबीडी/सीओ/ एनएसबी/ एलसी/91/12-22-357/2005/06 रद्द केला आहे व बँक अवसायनास घेण्यात आली असल्यामुळे बँकेस डीआयसीसी कायदा कलम 2182 व नियम 22 (अ) अन्वये डीआयसीजीसी यांनी बँकेस क्लेम पोटी दिलेली रक्कम संपुर्ण परत केल्याशिवाय ठेवीदारांना रक्कम परत देता येणार नसल्याचे कळविले आहे. तसेच बालाजी को ऑपरेटीव्ह बँकेची आर्थिक स्थिरता सन 2000 मध्ये डबघाईस आल्याने राज्य शासनाने सदर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्या ठिकाणी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली आहे. बँकेची आर्थिक स्थिती नाजुक असल्यामुळे सन 1996-97 पासुनची ठेवींची रक्कम वारंवार मागणी करुन मनपास मिळालेली नाही. वरील वस्तुस्थिती पाहता मनपाचे रु.11,74,25,460/- एवढी रक्कम पुस्तकी शिल्लक म्हणून दिसत असली, तरी जोपर्यंत प्रत्यक्षात सदरहू रक्कम प्राप्त होत नाही तोपर्यंत म.न.पा.स वापरण्यास उपलब्ध होणार नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही असमाधानकारक असल्याचे दिसून येते

महानगरपालिकेने आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना अत्यंत तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

1. मागील दायित्व व प्राप्त होणारे उत्पन्न यांचा विचार करून काटेकोर नियोजन करणे.

2. अनुत्पादक व भांडवली खर्चात काटकसर करणे.

3.. प्रशासकीय खर्च कमी करणे, आस्थापना खर्चात काटकसर करणे.

4. मालमत्ताकर रक्कम रुपये 5752.31 /- लक्ष तसेच पाणीपट्टी कराची रक्कम रुपये 2911.31/- लक्ष एवढी सन 2014 - 2015 अखेर थकबाकी असून ती वसूल करणे आवश्यक आहे.

5. महानगरपालिका आकारु शकते असे सर्व कर आकारणी करुन वसूल करणे, त्यासाठी करदात्या नागरीकांचा असंतोष होवू नये, म्हणून दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधांचा दर्जा अत्यंत समाधानकारक होईल, यादृष्टीने प्रशासनात कार्यक्षमता व व्यावयायिकता निर्माण करणे.

6. भांडवली स्वरुपाच्या विकास योजना राबविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या विविध नागरी विकास कार्यक्रमांमध्ये पुरेपूर सहभाग घेणे.

7. मालमत्ता कर आकारणी करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 267(अ) नुसार अवैध बांधकामांवर मालमत्ता कराची दुप्पट एवढी शास्ती आकारण्यात यावी.

8. मालमत्ता कराची आकारणी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केल्यांनतर त्वरीत करणे आवश्यक असून अशी आकारणी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासून करणे आवश्यक आहे.

9. पाणीपुरवठा योजनेमध्ये पाण्याचा अपव्यय टाळावा. पाण्याची गळती, चोरी न होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होणाऱ्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

10. स्थानिक संस्था कराअंतर्गत व्यापारांनी भरणा केलेल्या करांचे सहामाही व वार्षिक निर्धारण विहित मुदतीत करावी व स्थानिक संस्था करांची वसूली परिणामकारक होईल, यादृष्टीने उपाययोजना करावी.

11. वाहनाचा वापर व प्रवास काटकसरीने करावा. अतितातडीच्या प्रसंगी विमान प्रवासाचा अवलंब करावा.

12. म.न.पा.चे मालमत्तेपासून मिळणाऱ्या उत्पन्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

2 वार्षिक लेखे प्रमाणिकरणाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9अ

शासन निर्णय दिनांक 6 जुलै 2005 नुसार नाशिक महानगरपालिकेने राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेवर आधारित व्दीनोंद लेखा पध्दती नुसार सन 2014-2015 चे ताळेबंद इ. वार्षिक लेखे तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त केलेली नसल्याने प्रमाणीकरण करता येवू शकले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 94 नुसार म.आयुक्त यांनी प्रत्येक एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील वर्षातील वार्षिक लेखे मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण विभागाकडून प्राप्त माहितीनुसार स्थायी समितीने एकेरी नोंद पध्दतीवर आधारीत सन

2014-2015 या आर्थिक वर्षातील वार्षिक लेख्यांच्या (जमा-खर्च पत्रक) तपासणी अहवालास ठराव क्र. 667 दि.14/01/16 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.लेखास-102004/71 प्र.क्र. 5/04/ नावि-31, दिनांक 6 जुलै, 2005 नुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उपार्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दती लागु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेवर आधारित व्दीनोंद लेखा पध्दती नुसार सन 2014-2015 चे ताळेबंद इ. वार्षिक लेखे तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त केलेली नाही. सबब, नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 च्या वार्षिक लेख्यांचे प्रमाणिकरण करता येवु शकले नाही.

DATDTBM7001 (Ref No : 133, Hmm No : 174)

3 उपार्जित तत्वावर आधारित - दुहेरी नोंद पद्धतीची अंमलबजावणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9अ

नाशिक महानगरपालिकेने दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयाप्रमाणे रोज किर्द, खतावणी इत्यादी वित्तीय लेखे राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका प्रकरण 5 मधील नमुन्यात ठेवलेले नाहीत. महानगरपालिका निधीचे लेखे एकेरी नोंद पध्दतीने हस्तलिखित तसे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. तसेच इतर सर्व निधी व शासन अनुदानाचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. महानगरपालिकेतील सर्व व्यवहारांचे नियमित स्वरूपात उपार्जित तत्वावर आधारित दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवणे आवश्यक आहे.

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासं--10/2004/71 प्र.क्र.-5/04 निवि-3 दिनांक 06/07/2005 नुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक 01/04/2005 पासुन उपर्जित पध्दतीवर आधारीत व्दीनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करावयाची आहे.

अर्धसमास पत्र क्र.2 दिनांक 05/01/2016 नुसार व्दीनोंद पध्दतीने तयार केलेले वार्षिक लेखे उपलब्ध करून देण्याबाबत मागणी करण्यात आली असता, महानगरपालिका निधीचे लेखे एकेरी नोंद पध्दतीने हस्तलिखित तसे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. तसेच इतर सर्व निधी व शासन अनुदानाचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने टॅली स्फॉटवेअर मध्ये ठेवलेले आहेत. उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्यांची पडताळणी

केली असता खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयान्वये राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेचा (National Municipal Account Mannual) उपयोग करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका प्रकरण 5 मध्ये रोज किर्द, खतावणी इत्यादी वित्तीय पुस्तकांचे नमुने विहित करण्यात आलेले आहेत. नाशिक महानगरपालिकेने रोज किर्द, खतावणी इ. वित्तीय लेखे टॅली स्फॉटवेअर च्या नमुन्यात ठेवलेले आहेत.

2) दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयातील सुचनेनुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांनी पुर्वीची रोख तत्वावर लेखे ठेवण्याची पध्दत व दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे ठेवण्याची पध्दती या दोन्ही समांतर लेख्यात स्वतंत्र ठेवावयाचे आहेत. व सदरची दुहेरी नोंद लेखा पध्दतीने लेखे व्यवस्थीत ठेवणे शक्य आहे. अशी महानगरपालिकेची खात्री झाल्यास ती पध्दत मा.आयुक्त तथा संचालक, नगर विकास संचालनालय यांचे सहमतीने पुर्ण पणे कार्यान्वित करावयाची आहे. अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. नाशिक महानगरपालिकेने नियमित स्वरूपात उपार्जित तत्वावर सर्व व्यवहारांच्या नोंदी दुहेरी नोंद लेखा पध्दतीने ठेवुन या पध्दतीची पुर्णपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

3) दि. 31/03/2015 अखेरचा ताळेबंद, आप-व्यय पत्रक, रोख प्रवाह (Cash-Flow) पत्रक लेख्यावरील टिपण्णी इ. वित्तिय लेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

4) नाशिक महानगरपालिकेत उपार्जित तत्वावरील व्दीनोंद लेखा पध्दतीवर आधारीत दि.31/03/2015 अखेरचा ताळेबंद तयार करून त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अशी कार्यवाही केलेली नाही.

DATDTBM7001 (Ref No : 142, Hmm No : 02)

4 JNNRUM अंतर्गत चुंचाळे व पंचवटी येथील घरकुल योजनेच्या कामामधील अनियमितते बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 13

लेखा शीर्ष :JNNRUM घरकुल योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 84429224.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 84261982.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 167242.00/-

मक्तेदाराने वेळीस साहित्याची उपलबधता न केल्याने कामास विलंब झालेला असूनही विनादंड मुदतवाढी

मंजूर केल्या आहेत. वाढीत मुदतीतही कामाची गती राखण्यात आलेली नाही. कामातील विलंबामुळे चुंचाळे येथिल 2240 सदनिकांचे काम रदद करावे लागले असून योजनेच्या लाभापासून लाभार्थी वंचित राहिले आहेत. 2240 सदनिकांचे काम रदद करावे लागल्याने सपाटीकरण केलेल्या कामावरील खर्च वाया गेलेला आहे. मोबिलायझेशन अग्रिमाची वसूली ठराविक कालमर्यादेत करण्यात आलेली नाही. रदद करण्यात आलेल्या सदनिकांसाठी दिलेला मोबिलायझेशन अग्रिम एकरकमी वसूल करण्यात आलेला नाही. स्थायी समितीच्या ठरावानुसार लाईन आऊट दिल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीतच स्थर रेट फरक देय असतांना त्यापुढील कालावधीत झालेल्या कामातील सिमेंटच्या दरातील फरक देय करण्यात आलेला आहे. गौण खनिज रॉयल्टी वसूल करण्यात आलेली नाही. सदनिकांचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष लाभार्थ्यांना सदनिका वितरीत करण्यात मोठा कालावधी लागत असल्याचे दिसते. सर्व लाभार्थ्यांची अंतिम निश्चिती करून लाभार्थी हिस्सा जमा करून घेण्यात आलेला नाही. जमा लाभार्थी हिस्सा विनावापर पडून आहे. योजना पूर्ण होण्यास प्रदिर्घ विलंब झालेला असून लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

नाशिक महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियानांतर्गत (केंद्र शासन 50 टक्के, राज्य शासन 30 टक्के, लाभार्थी हिस्सा 11 टक्के व उर्वरित 9 टक्के मनपा हिस्सा) नाशिक शहरात शहरी गरिबांसाठी मुलभूत सुविधा पुरविणे व घर बांधणे (घरकुल योजना) साठी योजना हाती घेतली आहे. त्यासाठी वेगवेगळया ठिकाणांच्या घरकुल योजनांसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवुन कार्यादेश देण्यात आले. स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाच्या सन 2011-2012 व सन 2012-2013 च्या लेखापरीक्षणात यांवर अभिप्राय देण्यात आलेले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेचे ठिकाण	मगील लेखा परीक्षणाचे वर्ष	परिच्छेद क्रमांक	समाविष्ट धावते देयक क्रमांक
1)	चुंचाळे टप्पा क्र.1 ते 3	सन 2011-12	142	टप्पा क्र.1 --1 ते 18 टप्पा क्र.2 --1 ते 18 टप्पा क्र.3 --1 ते 14
2)	आडगांव, पाथर्डी वडाळा	सन 2011-12	177	1 ते 28
3)	पंचवटी	सन 2011-12	215	1 ते 18
4)	सातपुर	सन 2012-13	18	1 ते 9
5)	नाशिक (पुर्व)	सन 2012-13	17	1 ते 15

मागील लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट उपरोक्त कामांच्या धावत्या देयकांव्यतिरीक्त सन 2013-14 व सन 2014-15 या वित्तीय वर्षात चुंचाळे (टप्पा क्र.2) व पंचवटी येथील घरकुल योजनांवर नोंदविण्यात आलेल्या खर्चाचा तपशिल

1) चुंचाळे - धावते देयक क्र.19 खर्च रक्कम रू.3,31,81,871 (टप्पा क्र.2)

2) पंचवटी- धावते देयक क्र.19 ते 23 एकूण रक्कम रू.5,12,47,353

यावर नमुद कामांची मोजमाप पुस्तिका, देयक इत्यादींची तपासणी करण्यात आलेली असून मार्च 2015 अखेर वर नमुद धावत्या देयकांव्दारे नोंदविण्यात आलेला खर्च रक्कम रू.8,44,29,224/- यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. चुंचाळे येथील योजनेसाठी ॲल्युमिनियम सेट्रींग पध्दतिने करावयाच्या कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. ॲल्युमिनियम फ्रेम वर्कचे पुरेसे सेट उपलब्ध होत नसल्याने मक्तेदाराने पारंपारिक आर.सी.सी. फ्रेम वर्क पद्धतीने काम करण्यास परवानगी मागितली. महापालिकेने या संदर्भात महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडे मार्गदर्शन मागविले. प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक 26/05/2011 च्या पत्रात " मुळ सविस्तर प्रकल्प अहवालात आर.सी.सी. फ्रेम वर्क पध्दतीने काम करणे नमुद असतांना काम जलदगतीने पुर्ण होण्यासाठी महासभेच्या परवानगीने ॲल्युमिनियम सेट्रींग पध्दतीने वापरुन काम करण्याचे कार्यादेश दिलेले आहे," असे नमुद केले आहे. प्रत्यक्षात ॲल्युमिनियम सेट्रींग पध्दत वापरल्याने कामास विलंब झालेला आहे. मक्तेदारास ज्या इमारतींचा लाईन आऊट सुरूवातीपासून देण्यात आलेला होता त्या इमारतींचे कामही वेळेत पुर्ण झालेले नाही. नस्तीतील अहवालावरून कामाचा विलंब हा मुख्यत: मक्तेदाराने कामाच्या व्याप्तीनुसार पुरेशा संख्येत ॲल्युमिनिअम फार्म वर्क चे सेट उपलब्ध न केल्याने झालेला दिसुन येतो. असे असुनही मक्तेदारांस विनादंड मुदतवाढी मंजुर केलेल्या आहेत. तथापि, वाढीव मुदतीतही कामाची गती राखण्यात आलेली नाही.

2. चुंचाळे येथील कामाच्या मक्तेदाराने दि.24/09/2013 च्या पत्रान्वये काम सुरू न केलेल्या 28 इमारतींचे काम भाववाढ झाल्याने निविदा अट शर्त क्र.15 नुसार काढून घेण्यास अर्ज केला. महासभा ठराव क्र.1104 दि.05/02/2014 नुसार 28 इमारतींचे काम मुळ मक्तेदार यांचेकडून काढून घेण्यास व या इमारतींची स्वतंत्र निविदा काढणेस मंजुरी देण्यात आली. त्यानुसार एकूण 17 इमारतींच्या कामासाठी दि.04/03/2014 रोजी निविदा मागविण्यात आला. तथापि, केंद्र शासनाकडील सी.एस.एम.सी. बैठक क्र.158 दि.11/11/2014 अन्वये अद्याप कामे सुरु न झालेल्या इमारतींचे कामे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महासभा ठराव क्र. 334 दि. 18/03/2015 अन्वये काम सुरू न झालेल्या 28 इमारतीतील 2240 सदनिकांचे कामे व त्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा रद्द करण्यास मान्यता देण्यात आली. महापालिकेकडे चुंचाळे शिवारातील जागा प्रथम पासुन उपलब्ध असुनही मक्तेदाराने कामात विलंब केल्याने व महानगरपालिकेच्या चुकीच्या नियोजनामुळे एकूण 2240 सदनिकांचे काम रद्द करावे लागले असुन घरकुल योजनेच्या लाभापासुन 2240 लाभार्थी वंचित राहीले आहेत.

3. चुंचाळे येथील मक्तेदारांस कार्यादेश दिल्यानंतर काही ठिकाणी सपाटीकरण करणे आवश्यक झाल्याने रक्कम रू.6.30 कोटीचे जमीन सपाटीकरणाचे काम अतिरीक्त बाब म्हणून देण्यात आले. तथापि, सपाटीकरण केलेल्या जागेतील 2240 सदनिकांचे काम रद्द करण्यात आल्याने सपाटीकरण केलेल्या कामावरील खर्च रू.6.30 कोटी वाया गेलेला आहे.

4. चुंचाळे येथील टप्पा क्र.1,2,3 आणि 2000 सदनिकांच्या प्रत्येक टप्प्यासाठी कार्यादेश रकमेच्या 10 टक्के प्रमाणे प्रति टप्पा रू.5.20 कोटी याप्रमाणे एकूण रू.15.60 कोटी रक्कम मोबिलायझेशन अग्रिम मक्तेदारांस प्रदान करण्यात आला आहे. टप्पा क्र.1 मधील 880 सदनिकांचे तर टप्पा क्र.3 मधील 1360 सदनिकांचे काम रद्द करण्यात आलेले आहे. म्हणजेच प्रत्येक टप्प्यातील सर्व इमारतींचा लाईन आऊट दिलेला नसतांनाही

मक्तेदारांस कार्यादेश रकमेच्या 10 टक्के प्रमाणे देय संपुर्ण अग्रिम प्रदान करण्यात आलेला आहे. या सदनिकांचे काम रद्द करण्यात आल्यानंतर उर्वरित अग्रिमाची एक रकमी वसुली करण्यात आलेली नाही. टप्पा क्र.1 चे रू.95,00,000/- तर टप्पा क्र.3 चे रू.3,75,00,000/- अग्रीमाची वसुली अदयाप करण्यास आलेली नाही. केंद्रीय दक्षता आयोग यांचे मागदर्शक सुचना दि.10/04/2007 नुसार अग्रीमाची वसुली ही कामाच्या प्रगतिशी निगडीत न ठेवता ती ठराविक कालमर्यादेत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

5. पंचवटी येथील घरकुल योजनेसाठी मक्तेदारांस 21 व्या धावत्या देयकान्वये सिमेंटच्या स्टार रेट फरकाची रक्कम रू.22,79,756/- प्रदान करण्यात आलेला आहे. या कामाची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक 926 दि. 15/02/2010 अन्वये स्वीकृत करण्यात आलेली आहे. या ठरावात " उपरोक्त ठिकाणी घरकुल योजनेचे काम सुरु करतांना काही तांत्रिक अडथळे निर्माण झाल्यास उपलब्ध जागेऐवजी अन्य ठिकाणी काम करावे लागणार आहे. त्यामुळे सदर योजनेस दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधी लागल्यास त्यापुढील कालावधीस स्टार रेट देता येणार नाही. मक्तेदार यांनी स्टाररेट ची माडणी करणार नाही याबाबत संमती दिलेली आहे.तसेच जागा जसजशी उपलब्ध होईल त्याप्रमाणे मक्तेदारास लाइन आउट देण्यात येईल.त्यास सुध्दा मक्तेदार यांनी संमती दिलेली आहे." असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, उपरोक्त ठरावाशी विसंगत स्थायी समिती ठराव क्र.560 दि.29/10/2013 अन्वये प्रत्यक्ष इमारतीस लाईन आऊट दिल्याच्या दिनांकापासुन त्या त्या इमारतींकरीता स्वतंत्रपणे दोन वर्षांचा कालावधी धरण्यास व त्यानुसार मक्तेदारांस स्टार रेट फरक देणेस मंजुरी देण्यात आली. त्यानुसार लाइन दिल्यापासून दोन वर्षांच्या कालावधी साठी स्टार रेट फरक देय करण्यात आलेला आहे.

तसेच स्थायी समितीच्या क्र.560 दि.29/10/2013 च्या ठरावानुसार लाईन आऊट दिल्याच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या कालावधीतच स्टार रेट फरक देय असतांना त्यापुढील कालावधीत झालेल्या कामातील सिमेंटच्या दरातील फरक देय करण्यात आलेला आहे. मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या 16 व्या धावत्या देयकांतील 46.337 MT सिमेंट परिमाणासाठी रू.32,725/-, 17 व्या धावत्या देयकांतील 76.303 MT परिमाणासाठी रू.52,071/-, 18 व्या धावत्या देयकातील 71.572 MT परिमाणासाठी रू.49,213/- व 19 व्या धावत्या देयकातील 54.697 MT सिमेंटच्या परिमाणासाठी रू.33,333/- असे एकूण रू.1,67,342/- स्थायी समितीच्या दरान्वये देय नसतांनाही मक्तेदारांस देय करण्यात आलेले आहेत.

6. पंचवटी येथील बांधकामासाठी मक्तेदारांस सिमेंटच्या दरातील फरक रक्कम रू.22,79,759/- प्रदान करण्यात आलेली आहे. निविदेतील तारांकित दर फरक प्रदाना बाबतच्या अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने साहित्य खरेदीबाबत पुरेसा पुरावा म्हणुन खरेदीचे मुळ देयक, चलन अथवा जकातीची पावती सादर करणे आवश्यक आहे. तथापि, असे अभिलेखे नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाहीत.

7. उपरोक्त दोन्ही कामांसाठी कामाच्या प्रगतीनुसार निश्चीत केलेल्या टक्केवारी प्रमाणे प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वापरलेल्या गौण खनिजाचा तपशिल उपलब्ध होत नाही. या कामांसाठी वापरलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची परिगणना करून रक्कम शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8. नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन/ 1098/ 1357/ प्र.क. 166/98 नवि-24 दि.03/11/2003 नुसार कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. या कामाच्या मुळ मुदतीनंतर मक्तेदारांस वेळोवेळी मुदतवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत. या वाढीव मुदतीसाठी ग्राहय कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधी कडे उतरविलेला दिसुन येत नाही.

9. बँक गॅरंटीच्या प्रती नस्तीसोबत जोडण्यात आलेल्या नसल्याने मक्तेदाराने वेळोवेळी सादर केलेल्या बँक गॅरंटीचे नुतनीकरण केल्याची खात्री करता आली नाही.

10. या घरकुल योजनेच्या कामांतील PART-B इन्फ्रास्टक्चर सर्व्हिसेस व PAET-C तात्पुरते ट्रान्झीट कॅम्प या कामाचे ॲबस्ट्रॅक देयक मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले आहे. PART-B व PART- C चे सविस्तर मोजमापे नोंदविलेली मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणांस उपलब्ध झाल्या नाहीत.

11. सदनिकांचे काम पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडुन लाभार्थ्यांना सदनिका वाटप करण्यासाठी महानगरपालिकेच्या झोपडपट्टी विभागास कळविले जाते. त्यानंतर या विभागाकडुन लाभार्थ्यांची अंतिम निवड करून लभार्थी हिस्सा भरून घेवुन सोडत काढून लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येते. सदनिकांचे काम पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांना सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा देण्यात मोठा कालावधी लागत असल्याचे दिसुन येते. या विलंबामुळे तयार सदनिकांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

12. घरकुल योजनेसाठी पात्र सर्व लाभार्थ्यांची अंतिम निश्चिती झालेली नाही. योजनेनिहाय अंतिम निश्चित केलेल्या लाभार्थ्यांची संख्या व वसूल केलेला लाभार्थी हिस्सा याची माहिती उपलब्ध झाली नाही. लाभार्थ्यांकडून प्राप्त हिस्सा स्वतंत्र बँक खात्यात जमा केला जात असून लेखा विभागाकडून प्राप्त माहितीनुसार सन 2013 - 2014 मध्ये एकूण रु.10239045, सन 2014 - 2015 मध्ये रु.9673884, सन 2015 - 2016 मध्ये रु.9931074 असा एकूण रु.2984400 इतका लाभार्थी हिस्सा जमा आहे. सदर रक्कम सन 2013 - 2014 पासून विनियोगाअभावी पडून आहे. या रकमेवर बँकेने व्याज जमा केलेले दिसून येत नाही.

13. एप्रिल 2016 पर्यंत चुंचाळे शिवारातील काम सूरु असलेल्या 3760 सदनिकांपैकी केवळ 1360 सदनिका वाटपासाठी तयार असुन 978 सदनिका वाटप करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी फक्त 268 सदनिकांचा लाभार्थ्यांना ताबा देण्यात आलेला आहे. पंचवटी विभागातील 1120 सदनिकांपैकी 1019 सदनिका वाटप करण्यात आलेल्या असुन 828 सदनिकांचा लाभार्थ्यांना ताबा देण्यात आलेला आहे. मक्तेदारांस वेळोवेळी विनादंड मुदतवाढी देवुनही कामाची आवश्यक गती राखण्यात आलेली नाही. योजना पुर्ण होण्यास प्रदीर्घ विलंब झालेला असून लाभार्थी योजनेच्या लाभापासुन वंचित राहिले आहेत. केंद्र शासनाने घरकुल योजनेच्या कालावधीस दि.31/03/2017 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. महासभा ठराव क्र.906 दि. 12/01/2016 अन्वये उपरोक्त कामांना दि.31/03/2017 पर्यंत मुदतवाढ दिलेली असुन वाढीव मुदतीत योजना पुर्ण होणे आवश्यक आहे.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	167242
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	84261982
एकूण	:-	रु.	84429224

DATDTBM7001 (Ref No : 127, Hmm No : 115)

5 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुननिर्माण अभियानाअंतर्गत भूमिगत गटार योजना पॅकेज-2 अंतर्गत आगरटाकळी येथे 40 द.ल.मि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र बांधणे व 36 महिणे देखभाल दुरूस्ती करणे या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष : भुयारी गटार टप्पा क् शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 129220128.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 129220128.00/-

मोबीलायझेशन अग्रिम दोन हप्त्यांत प्रदान करणे आवश्यक असताना एकरकमी प्रदान करण्यात आला आहे. मोबीलायझेशन अग्रिमाची वसूली ठराविक मुदतीत करण्यात आलेली नाही. मोबीलायझेशन अग्रिमाच्या वसूल केलेल्या रकमेचा व शिल्लक कामाचा फेर हिशेब करून वाढीव अग्रिम प्रदान करण्यात आला. धावत्या देयकांतून वेळोवळी आकरण्यात आलेली दंडाची रक्कम मक्तेदारांस परत करण्यात आली. वाढीव मुदतीतही प्रकल्प पूर्ण झालेला नसल्याने निविदा अटी व शर्तीप्रमाणे दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. गौण खनिजासाठीची रॉयल्टीची आकारणी व वसूली करण्यात आलेली नाही.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुननिर्माण अभियानाअंतर्गत भूमिगत गटार योजना पॅकेज-2 अंतर्गत आगरटाकळी येथे 40 द.ल.मि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र बांधणे व 36 महिणे देखभाल दुरूस्ती करणे या कामाचा तपशिल खालील प्रमाणे.

1	कामाचे नाव	आगरटाकळी येथे 40 द.ल.मि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र बांधणे व 36 महिणे देखभाल दुरूस्ती करणे.
2	प्रशासकिय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 1331 दिनांक 11/08/2009 एकत्रित भुमिगत गटार योजना टप्पा 2 ला मान्यता.
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्रमांक व दिनांक नमूद नाही. रु.2809.72 लक्ष (दरसूची 2008-09)
4	अंदाजपत्रकीय रक्कम रूपये	रु.2809.72 लक्ष/-
5	लेखाशिर्ष	भुयारी गटार योजना (JNNURM अंतर्गत)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी - 1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	उपलब्ध झाले नाही

8	निविदा विक्री कालावधी	दि. 28/04/2010 ते दि.05/06/2010 मुदत दि.29/07/2010
9	ई-निविदा	निविदा क्र.1/2010-11
10	निविदा उघडल्याचा दि.व प्राप्त निविदा	दि.13/08/2010 प्राप्त निविदा (07)
11	न्यूनतम निविदा	मे.दोधियान व्हियोलीया वॉटर सोल्युशन्स, प्रा.लि. अहमदाबाद रू.23.60 को.
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 963 दि.25/11/2010
13	मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर	मे.एस.एस.दास पर्यावरण लि.दिल्ली. रू.26.56 कोटी
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	जा.क्र./नामनपा/भुगयो/02/2010 दि.01/12/2010
15	कामाची मुदत	15 महिने दि.29/02/2012 पर्यंत
16	मुदतवाढ	31/12/2015
17	काम पुर्ण दिनांक	अपुर्ण
18	मोजमाप पुस्तिका क्रमांक व पा.क्रमांक	क्र. (पा.क्र ते)
18	कामावर झालेला एकुण खर्च (रूपये)	रु. 129220129
19	प्रदानाचा तपशिल	स्थापत्य धावते देयक क्र. 1 ते 18 र. रू.115757300/- यांत्रिकी धावते देयक क्र. 1 ते 5 देयक र. रु.13462828/-

नस्तीतील अहवालानुसार कामाचे प्राकलन सविस्तर प्रकल्प अहवालानुसार ASP तंत्रज्ञानावर आधारित सन 2008-2009 चे जिल्हा दर सुचीनुसार व बाजारभावानुसार तयार करण्यात आले. परंतु तदनंतर मनपा सल्लागार मे.एम.डब्ल्यु.एच. इंडिया प्रा.लि. मुंबई यांच्या सल्ल्याने ASP (Activated Sludge Process), SBR (Subequertical Batch Reactor) व USAB followed by aerobic treatment (VASB) या तंत्रज्ञानावर आधारित निविदा मागविण्यात आल्या. निविदेत मक्तेदारामार्फत सादर केलेला आर्थिक देकार तसेच मलनि:स्सारण केंद्र चालविणेसाठी लागणारा विदयुत खर्च, क्लोरीनवर होणारा खर्च, देखभाल दुरूस्तीवर येणारा खर्च त्याचप्रमाणे मलनि:स्सारण केंद्रातुन तयार होणारा बायोगॅस या सर्वांचा विचार करून त्यानुसार निविदेत अटी-शर्ती समाविष्ट केल्या व त्या पध्दतीने निविदेचे Evaluation करण्याचे निकष ठरविण्यात आले.

या कामासाठी एकूण 7 निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी 6 निविदा पात्र ठरल्या (त्यात ASP तंत्रज्ञानावर आधारीत 3, SBR तंत्रज्ञानावर आधारीत 1 UASB + Aeration tank तंत्रज्ञानावर आधारीत 1 व UASB +

MBBR तंत्रज्ञानावर आधारीत 1 निविदा प्राप्त झाली. त्यापैकी निव्वळ भांडवली खर्चाचा विचार करता मे.दोशियान व्हियोलीया वॉटर सोल्युशन प्रा.लि. अहमदाबाद यांची र.रू.2360 लक्षची निविदा न्युनतम होती. मनपा सल्लागारांनी आर्थिक देकार, त्याचप्रमाणे विदयुत खर्च, क्लोरीन खर्च व तयार होणारा बायोगॅस या बाबींचा विचार करून मे.एस.एस.एस.पर्यावरण लि. दिल्ली यांनी दिलेली UASB followed by MBBR पध्दतीनुसार सादर केलेली निविदा सर्वात फायदेशीर देकार असल्याची शिफारस केली. मे.एस.एस.एस. पर्यावरण लि.दिल्ली यांचा आर्थिक देकार रू.26,67,00,000/- रक्कमेचा होता. वाटाघाटी अंती त्यांनी सदरचे काम रू.26,50,00,000/- पर्यंत करण्यास मान्यता दिली. स्थायी समिती ठराव क्र.763 दि.25/11/2010 नुसार निविदा स्वीकृत करून कार्यादेश देण्यात आला. निविदा प्रक्रीयेतील जाहीरात प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्रांच्या प्रती, प्राप्त निविदा , त्यासोबतचे अनुषंगिक कागदपत्रे इ. उपलब्ध झाले नाहीत.

या कामाचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांआधारे लेखापरीक्षण् करण्यात आले असुन मार्च 2015 अखेर स्थापत्य कामावर 1 ते 18 धावते देयकांव्दारे रू.115757300 /- व यांत्रिकी कामावर 1 ते 5 धावत्या देयकांव्दारे रु 13462828. असा एकूण रक्कम रू.129220128 /- इतका खर्च नोंदविण्यात आलेला असून त्यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महानगरपालिकेने निवेदेपुर्वी किफायतशीर तंत्रज्ञान ठरवून त्या आधारे निविदा मागविल्या नसून भांडवली आर्थिक देकार व प्रकल्पास येणारा विद्युत खर्च, क्लोरीन खर्च,तयार होणारा बायोगॅस या आधारे निविदा मदविण्यात आल्या. प्राप्त निविदांपैकी मी. दोशियान व्हीयोलीया वॉटर सोल्युशन प्रा. ली. अहमदाबाद यांची निविदा (23.60 कोटी) न्यूनतम होती. तथापि निविदेत मक्तेदारांनी दिलेले आर्थिक देकार व नमूद विद्युत खर्च, क्लोरीन खर्च, तयार होणारा बायोगॅस या बाबींचा विचार करून निविदेत दिलेल्या सूत्रानुसार मी.एस.एम.एस. पर्यावरण ली.दिल्ली यांची निविदा (26.67 कोटी) सर्वात फायदेशीर देकार ठरली. निविदेत मक्तेदाराने नमूद केलेले quaranteed power consumption व performance parameter साध्य न झाल्यास त्या प्रमाणात दंड आकारण्याची निविदा अट क्र.20 नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे.

2. मक्तेदारांस निविदा अट क्र. 31 नुसार मंजुर निविदा रकमेच्या 10 टक्के प्रमाणे रू.2.60 कोटी इतका मोबीलायझेशन अग्रिम एकरकमी प्रदान करण्यात आलेला आहे. केंद्रीयदक्षता आयोगाकडील परिपत्रक दिनांक 10/04/2007 नुसार मोबीलायझेशन अग्रिम हे किमान दोन हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि, त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3. निविदा अटी व शर्तीप्रमाणे मोबीलायझेशन अग्रिमाची वसुली निविदा रकमेच्या 10 टक्के काम पुर्ण झाल्यापासुन व 50 टक्के काम पुर्ण होईपर्यंत करावयाची होती. तथापि, मक्तेदार यांच्या विनंतीनुसार 80 टक्के काम पुर्ण होईपर्यंत करण्यास आयुकत यांनी मान्यता दिली. केंद्रीय दक्षता आयोगाकडील दि.10/04/2007 च्या परिपत्रकान्वये मोबीलायझेशन अग्रिमाची वसुली ही कामाच्या प्रगतीशी निगडीत न ठेवता ठराविक मुदतीत करणे आवश्यक असतांना मक्तेदारांस अग्रिम वसुलीसाठी प्रथम अतिरीक्त मुदत व पुढील मुदतवाढ देण्यात आली आहे.

4. मक्तेदारांस दि.05/05/2014 रोजी रू.63,61,806/- इतका मोबीलायझेशन अग्रिम प्रदान करण्यात आला होता. मक्तेदारास स्थापत्य कामाचे 16 वे धावते देयकाअखेर व यांत्रिकी कामाचे 4 थे धावते देयकाअखेर वसुल झालेली अग्रिमाची रक्कम व शिल्लक राहीलेली कामाची रक्कम या आधारे रू.63,61,806/- इतका

मोबीलायझेशन अग्रिम पुन्हा मंजुर करण्यात आला. मक्तेदारास निविदा अटी शर्ती प्रमाणे देय संपुर्ण निविदा रकमेच्या 10 टक्के अग्रिम सुरूवातीलाच प्रदान करण्यात आल्याने वसुल केलेल्या रकमेचा व शिल्लक कामाचा फेर हिशोब करून वाढीव अग्रिम प्रदान करणे निविदा अटी व शर्तीचे उल्लंघन करणारे आहे.

5. मक्तेदारांस दि.15/10/2012 पर्यंत विनादंड मुदतवाढ तसेच 16/10/2012 ते 15/01/2013 पर्यंत प्रतिदिवस रू.1000/- व दि.16/01/2013 ते दि.31/05/2013 पर्यंत प्रतिदिवस रू.2000/- दंड करण्यास दि. 13/06/2012 च्या टिपण्णीव्दारे मान्यता देण्यात आली. तदनंतर मक्तेदार यांनी दि.07/06/2013 च्या पत्रान्वये विनादंड मुदतवाढ देण्याची मागणी केली असता, मक्तेदार यांनी मुदतवाढीच्या पत्रात नमुद केलेली कारणे दिशाभुल करणारी असल्याचे नमुद करून दि.01/06/2013 ते दि.15/11/2013 पर्यंत प्रतिदिवस रू.5000/- व दि.16/11/2013 ते दि.30/12/2013 पर्यंत प्रतिदिवस रू.6000/- या प्रमाणे दंडात्मक मुदतवाढ देण्यास आयुक्त यांनी दि.06/09/2013 च्या टिपण्णीव्दारे मान्यता दिली.

तथापि, आयुक्त यांचे आदेश क्र.1893 दि.24/03/2014 च्या आदेशान्वये कामाची गती वाढविण्यासाठी व आर्थिक नियोजनाच्या दृष्टिने धावत्या देयकांतुन वेळोवेळी आकारण्यात आलेली दंडाची रक्कम रू.13,51,000/- मक्तेदारांस परत करण्यात आली व विलंबापोटी एकरकमी रू.150000/- इतका दंड आकारण्यात आला. सदर आदेशात मक्तेदार यांना दि.31/03/2014 पर्यंत 50 टक्के व दि.30/06/2014 पर्यंत प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित करण्यास मुदत देण्यात आली तथापि, लेखापरीक्षण कालावधी पर्यंत काम अपुर्ण असुन ज्या उद्देशाने दंडाची माफी देण्यात आली तो उद्देश सफल होवु शकला नाही.

6. महसुल व वनविभाग शासन परिपत्रक क्रमांक गोखनि-10/2001/ प्र.क.308/ख दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातुन उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहीत दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. जिल्हा खानिकर्म अधिकारी, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक खनिकर्म/स्वा.धन/463/2008 दिनांक 22/05/2008 नुसार उपरोक्त दिनांक 15/12/2003 चे परिपत्रक स्पष्ट केले आहे. सबब महसुल व वनविभाग शासन अधिसुचना दि.11/02/2010 नुसार रूपये 70.67 दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या गौणखनिजासाठीची रॉयल्टी आकारणी व वसुली करण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तिकेत कामाचा तपशिलवार नोंद नसुन टप्पे निहाय कामाची नोंद केलेली असल्याने वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाची परिगणना करून रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

7. या कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

8. 13 व्या धावत्या देयकाद्वारे रु. 1391021 स्टार रेट फरकाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि मोजमाप पुस्तिका , साहित्य खरेदीच्या पावत्या इत्यादी लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने त्या बाबत आवश्यक ती तपासणी करता आली नाही.

9. नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन/ 1098/ 1357/ प्र.क. 166/98 नवि-24 दि.03/11/2003 नुसार कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.विमापत्राची प्रत नस्तीस जोडलेली नाही अथवा कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात आलेली नाही.

10. महारष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश

क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180 (3) नुसार जेंव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेंव्हा मोजणी पुस्तकातील संबंधित नोंदींवर कात मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात त्याचा प्रतिसंदर्भ नमूद करण्यात यावा असे असतांना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

11. . महारष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 182 नुसार प्रपत्र 139 मध्ये कामची नोंदवही ठेवून त्यात कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

DATDTBM7001 (Ref No : 128, Hmm No : 119)

6 उंटवाडी येथे 28 द.ल.लि. क्षमतेचे मलनिस्सा:रण पंपिंग स्टेशनची यांत्रिकी विषयक कामे करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

लेखा शीर्ष :भुयारी गटार टप्पा क् शासकीय निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 49738133.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 49738133.00/-

कामावरील देखभाल व दुरूस्तीच्या खर्चास महासभेची प्रशासकीय मान्यता प्राप्त नाही. मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालापेक्षा जादा येणारा खर्च महानगरपालिकेस स्वत: च्या निधीतून करावा लागणार असून या जादा होणाऱ्या खर्चास महासभेची मान्यता घेतलेली नाही. सदोष अंदाजपत्रक व निविदा तयार झाली असून सल्लागार व इतर यांचेवर करवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. विनादंड मुदतवाढ मंजूर करताना विभागाने संयुक्तीक कारणे नमूद केलेली नाहीत. कंत्राटी कामाच्या विम्याचे नुतणीकरण केलेले नाही. त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.

1	कामाचे नाव	उंटवाडी येथे 28 द.ल.लि. क्षमतेचे मलनिस्सा:रण पंपिंग स्टेशनची यांत्रिकी विषयक कामे करणे.
2	प्रशासकिय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रं.1593 -दि. 10 /12 /2010 रक्कम रू. 338.84 लक्ष (एकत्रित र.556.55 लक्ष)
V3	तांत्रिक मान्यता क्रमांक	अधिक्षक अभियंता क्रमांक व दिनांक नमूद नाही. रु.364.84 लक्ष (दरसूची 2007-08)

4	अंदाजपत्रकीय रक्कम रूपये	रु.364.84 लक्ष
5	लेखाशिर्ष	JNNRUM अंतर्गत भुयारी गटार टप्पा क्र.2
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी - 1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	इंडियन एक्सप्रेस दि.14/03/2011, दै.लोकमत दि.12/03/2011
8	निविदा विक्री कालावधी	दि. 02/03/2011 ते दि.13/04/2011 मुदत दि.25/04/2011
9	ई निविदा	निविदा सुचना क्र.17/2010-11 दि.06/07/2011
10	निविदा उघडल्याचा दि.व प्राप्त निविदा	दि.16/07/2011 प्राप्त निविदा (03)
11	न्यूनतम निविदा	मे बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक रू.63482160/-
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 1030 दि.22/09/2011
13	मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर	मे बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक रू.61100000/- 67.47 टक्के जादा दर (चालू डी.एस.आर.नुसार 6.30 टक्के जादा दर)
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	जा.क्र.मनपा/पापुवि/400/11 दि.08/12/2011 सुधारित दि. 29/08/2012
15	कामाची मुदत	12 महिने दि.07/12/2012 पर्यंत सुधारित दि. 28/08/2013
16	मुदतवाढ	प्रथम दि. 28/11/13 व्दितीय दि. 28/01/14
19	मोजमाप पुस्तिका क्रमांक	3016
20	कामावर झालेला एकुण खर्च (रूपये)	रु. 49738133 मार्च-15 अखेर
21	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्रमांक 1 ते 8

जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत भुयारी गटार योजना पॅकेज-2 अंतर्गत उंटवाडी येथे 28 द.ल.लि. क्षमतेचे मलनिस्सारण स्टेशन यांत्रिकी विषयक कामे करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या. प्रथम जाहिरात क्र.3/2010-11 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. निविदा विकी, स्वीकृती तसेच निविदा पुर्व बैठक यांच्या कालावधीत वेळोवेळी शुध्दीपत्रक प्रसिध्द करून 3 वेळा मुदतवाढ देण्यात आली. तथापि, पाणीपुरवठा विभागाच्या अभिप्रायानुसार प्राकलने तयार करण्यात काही चुका असल्याने सिव्हील कामे सुरू

केल्यानंतर 4/6 महिन्यात सविस्तर अभ्यास करून आवश्यक दुरूस्त्या करून निविदा मागविणेस व प्रसिध्द केलेल्या निविदा रद्द करणेस मा.आयुक्त यांनी दि.26/07/2010 च्या टिपणीव्दारे मान्यता प्रदान केली. निविदा क्र.9/2010-11 अन्वये फेरनिविदा प्रसिध्द केली. तथापि, सदर पंपींग स्टेशनच्या स्थापत्य विषयक कामे करण्याची निविदा मंजूर झाली नसल्याने व नगरसेवकाच्या मागणीपत्रानुसार सदर निविदा रद्द करण्यात आली (टिपणी दि.15/11/2010) या दोनही निविदांच्या निविदा डॉक्युमेंट, अनुषंगिक कागदपत्रे, वृत्तपत्रांच्या प्रती इ. लेखापरीक्षणांस उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.

पुन्हा निविदा सुचना क्र.17/2010-11 दि.12/03/2011 व दि.14/03/2011 रोजी वृत्तपत्रत प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्री कालावधी, निविदा पूर्व बैठक, निविदा स्वीकृती यांच्या कालावधीत वाढ करण्यात आली. दि.05/04/2011 रोजी झालेल्या निविदा पुर्व बैठकातील चर्चेच्या अनुषंगाने पुन्हा निविदा विक्री व स्वीकृतीच्या कालावधीत वाढ करण्यात आली. मनपातील ई-टेंडर प्रणाली काही दिवस बंद असल्याने पुन्हा निविदा विक्रीच्या कालावधीत वाढ करण्यात आली. निविदा स्वीकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत ऑन लाईन तीन निविदा प्राप्त झाल्या.

नस्तीतील अहवलावरून सदरच्या कामातील इलेक्ट्रीक कामाची डी.पी.आर. मधील संपुर्ण रक्कम प्राकलनात समाविष्ट असुन प्रत्यक्षात निविदेतील कामांच्या स्कोप ऑफ वर्क मध्ये त्यातील डी.जी. सेट चा पुरवठा करणेचा समावेश निविदेत आढळून येत नसल्याचे व त्यामुळे प्राकलनाची रक्कम ही कामाच्या स्कोप पेक्षा जास्त असल्याचे विभागाच्या निदर्शनास आले. मक्तेदारांना पत्राने डी.जी. सेटचा पुरवठा झालेल्या निविदा दरात करून शकतात अथवा कसे याची विचारणा करून लेखी संमती मागविण्यात आली. तथापि, प्रत्यक्षात डी.जी. सेटची आवश्यकता नसल्याने मुळ प्राकलन रक्कम व प्राप्त निविदा दर यांचेनुसार मक्तेदाराच्या देयकातुन डी.जी.सेट रकमेची निविदा ऑफर प्रमाणे वसुली करण्याची संमती मागविण्यात आली. मक्तेदारांनी संमती दिल्याचे नस्तीत नमुद आहे.

प्राप्त निविदांपैकी मे.बडगुजर अॅन्ड कंपनी, नाशिक यांची रक्कम रू.63482160/- ची निविदा न्युनतम ठरली. सदरचा दर प्राकलन दरापेक्षा 74 टक्के जादा येत असल्याने मनपा सल्लागार मे.एमडब्ल्युएस प्रा.लि. मुंबई यांचे कडुन करंट डीएसआर/ बाजारभाव/ मुळ उत्पादक यांचे दराशी तुलना अहवाल मागविण्यात आला. त्यानुसार सदरचे दर 16.62 टक्के जादा आले. तर विभागाने स्वतंत्रपणे तुलना केली असता सदरचे दर डी.एस.आर/बाजारभाव/ मुळ उत्पादक यांचे दरापेक्षा 10.44 टक्के जादा आले. मक्तेदाराने वाटाघाटी अंती रू.61100000/- या प्रमाणे काम करण्यास संमती दिली हा दर मुळ प्राकलन दरापेक्षा 67.47 टक्के जास्त तर विभागाच्या गणनेनुसार करंट मार्केट रेट /डी.एस.आर. दराप्रमाणे 6.30 टक्के जादा ठरतात. स्थायी समिती ठराव क्र.1030 दि.22/09/2011 अन्वये निविदेस मान्यता देण्यात येवुन दि.08/12/2011 अन्वये मक्तेदारांस कार्यादेश देण्यात आला.

या कामाचे मक्तेदाराने सादर केलेले पंप्सचे ड्रॉईग तपासणीसाठी मनपा सल्लागार यांचेकडे सादर करण्यात आले. स्थापत्य कामांचे जी.ए.ड्रॉइंग व पाईप लाईन एल.सेक्शनशी सदर पंप ड्राईंगची तुलना करून तपासणी करता पंपाचे हेड व एचपी मध्ये बदल होत असल्याचे सल्लागारांनी कळविले. पंपींग स्टेशन उंटवाडी व मानुर येथील पंपाचे हेड व एचपी मध्ये बदल होत असल्याने दोन्ही पंपींग स्टेशन मधील पंप्स, ट्रान्सफॉर्मर इ. प्रमुख साहित्य अदलाबदल करून बसविणे शक्य असल्याने त्यातील बदलास व दोन्ही प्रकल्पाच्या एकत्रित खर्चात बदल होत नसल्याने उंटवाडी व मानुर येथील प्रकल्पाच्या होणा-या खर्चाच्या बदलास मा.आयुक्त यांची

मान्यता घेण्यात आली. त्यानुसार उंटवाडी येथील कामाची रक्कम रू.61100000/- ऐवजी रू.57015898/- अशी झाली. त्यानुसार मक्तेदाराशी पुन्हा करारनामा करून जा.क्र. मनपा/पापुवि/99/12 दि.29/08/2012 अन्वये (रिवाईज) वर्क ऑर्डर देण्यात येवुन काम पूर्ण करण्यास दि.28/08/2013 पर्यंत मुदत देण्यात आली.

या कामाचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले असुन मार्च 2015 अखेर धावते देयक क्र. 1 ते 8 अन्वये झालेल्या रक्कम रू. 49738133 /- च्या खर्चावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येंत आहेत.

1) जवाहरलाल नेहरू नागरी पुननिर्माण अभियानांतर्गत भुमिगत गटार योजना मास्टर प्लॅन व त्या अंतर्गत भुयारी गटार योजना सविस्तर प्रकल्प अहवाल भाग-2 यासाठी एकुण रक्कम रू.183.22 कोटी (देखभाल व दुरूस्ती खर्चासह) यास महासभा ठराव क्र.1331 दि.11/08/2009 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. या सविस्तर प्रकल्प अहवालात उंटवाडी येथे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे या कामाचा समावेश नव्हता. मनपाने शासनास सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट असलेल्या काही कामांमध्ये मंजुरीच्या वेळी तांत्रिक व भौगोलिक स्थितीमुळे बदल झाला. त्यात उंटवाडी येथे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे या कामाचा समावेश आहे. त्यास महासभा ठराव क्र.1593 दि.10/12/2010 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर प्रशासकीय मान्यता देखभाल व दुरूस्तीचा खर्च वगळुन देण्यात झालेली आहे. उंटवाडी येथे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे या कामावरील देखभाल व दुरूस्तीच्या खर्चास महासभेची प्रशासकीय मान्यता प्राप्त केलेली नाही.

2) महासभेच्या दि.10/10/2010 च्या ठरावान्वये उंटवाडी येथे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे या कामासाठी 556.55 लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यात स्थापत्य कामांना रू.217.67 लक्ष व यांत्रिकी कामांना रू.338.89 लक्ष (देखभाल व दुरूस्ती खर्च वगळून) या प्रमाणे कामांचा समावेश दिसतो. विभागाने यांत्रिकी कामासाठी देखभाल व दुरूस्ती खर्चासह रू.364.84 लक्ष रूपयाची निविदा प्रसिध्द केली. प्राकलन दरापेक्षा 67.47 टक्के जादा दराप्रमाणे रू.611 लक्ष (सुधारीत रू.570.16 लक्ष) या प्रमाणे निविदा मंजुर करण्यात आली. मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालपेक्षा जादा येणारा खर्च महापालिकेस स्वत:च्या निधीतुन करावा लागणारा असुन या जादा होणा-या खर्चास महासभेची मान्यता घेण्यात आलेली नाही.

3) अधिक्षक अभियंता यांनी रू.364.84 लक्ष रकमेस तांत्रिक मान्यता (मान्यता क्रमांक व दिनांक नमुद नाही.) प्रदान केली आहे. त्यात यांत्रिकी कामे 251.86 लक्ष,विदयुत विषयक कामे रू.87.03 लक्ष व देखभाल दूरूस्ती रू.25.95 लक्ष चा समावेश आहे. तांत्रिक मान्यतेसाबतचे Detailed sheet अधिक्षक अभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही. देखभाल व दुरूस्ती वरील खर्च Detailed sheet मध्ये रू.47.40 लक्ष प्रतिवर्ष नमुद करण्यात आलेला आहे. तथापि तांत्रिक मान्यतेत 3 वर्षाचा देखभाल व दूरूस्तीचा एकूण खर्च रू.25.95 लक्ष गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर तफावतीचा कोणताही तपशिल नमूद करण्यात आलेला नाही.

4) तांत्रिक मान्यतेच्या Detailed sheet नुसार देखभाल व दुरूस्तीचा अंदाज तयार करतांना a) cost of power b) cost of manpower c) maintaince cost या तीन बाबींवर येणा-या खर्चाचा अंदाज गृहीत धरण्यात आलेला आहे. तथापि, निविदा उघडल्यानंतर मक्तेदाराने सादर केलेल्या दरपृथ्थकरणात cost of power गृहीत धरण्यात आलेली नाही. निविदे सोबतच्या Volume-II नुसार देखभाल व दूरूस्तीच्या scope of work मध्ये power महापालिकेकडून पुरविण्यात येणारा असल्याचे नमुद आहे. यावरून सदोष अंदाजपत्रक

तयार केलेले दिसून येते.

5) जाहीरात क्र.3/2010-11 अन्वये प्रथम वेळी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा रद्द करण्यात आली. यात्रिकी विभागाच्या "प्राकलने तयार करण्यात काही चुका असल्याने सिव्हील कामे सूरू केल्यानंतर आठ महिन्यात सविस्तर अभ्यास करून आवश्यक दरूस्त्या करून निविदा प्रसिध्द करता येतील" या अभिप्रायानुसार सदर निविदा रद्द करण्यात आली. या कामासाठी महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणुक केलेली असुन प्राकलने तयार करण्यात झालेल्या चुकांबद्दल सल्लागाराची जबाबदारी निश्चीत करण्यात आल्याचे दिसून येत नाही. प्रथम अंदाजपत्रकाची व सुधारित प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजपत्रकाची रक्कम समान असुन विभागाने अंदाजपत्रकातील कोणत्या बाबींमध्ये दूरूस्ती केली याचा तपशिल उपलब्ध झाला नाही.

6) निविदेची प्राकलन रक्कम निश्चीत करतांना विदयुत खर्चात डी.जी.सेटचा पुरवठा करणेसाठीचा खर्च गृहीत धरण्यात आलेला होता. तथापि, निविदा उघडल्यानंतर निविदेच्या स्कोप ऑफ वर्क मध्ये डी.जी.सेटचा पुरवठा करणेचा समावेश नसल्याचे विभागाच्या लक्षात आले. त्यामुळे प्राकलनाची रक्कम कामाच्या स्कोप पेक्षा जास्त ठरली.

निविदा मंजुरीनंतर उंटवाडी येथील कामाच्या पंपचे हेड व एचपी मध्ये बदल झाला. अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांनी सल्लागार यांनी दिलेल्या चुकीच्या आकडेवाडीमुळे पंप सिलेक्शन मध्ये बदल झाल्याचे टिपण्णीत नमुद केले आहे. मा.आयुक्त यांनी झालेल्या बदलास मान्यता देतांना दोषींवर कारवाई प्रस्तावित करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. त्यासंदर्भात मनपा सल्लागार व इतर यांचेवर केलेल्या कारवाईचे अभिलेखे नसतीसोबत जोडलेले नाहीत

यावरून अंदाजपत्रक, निविदा तयार करतांना सल्लागाराने पुरेशी काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच सल्लागाराने तयार केलेल्या निविदा कागदपत्रांची महानगरपालिकेच्या स्तरावर तपासणी झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे सदोष अंदाजपत्रक व निविदा तयार झालेली आहे.

7) प्राप्त निविदांची तांत्रिक छाननी सल्लागारा मार्फत करण्यात आलेली असून प्राप्त निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. तथापि, पात्र ठरविणा-या अधिका-याचे अभिप्राय दिसून येत नाहीत.

8) तांत्रिक छाननी वेळी सल्लागारांनी मे.बडगुजर अॅन्ड कंपनी नाशिक यांनी करारनामा करण्यापूर्वी PF registration सादर करणे आवश्यक असल्याचे कळविले होते. तसेच मे.बडगुजर अॅन्ड कंपनी यांनी दि.31/03/2008 ते 31/03/2010 पर्यंतचे Profit and Loss statement सादर केले नसल्याने सल्लागाराने निविदा पात्र ठरवितांना subject to satisfactory verification of profit & loss statement by NMC असे अभिप्राय नमूद केले आहेत. या बाबत महानगरपालिकेने खात्री केल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

9) प्रथम कार्यारंभ आदेश दि.08/12/2011 नुसार कामाची मुदत दि.07/12/2012 पर्यंत होती. सुधारीत दि.29/08/2012 च्या कार्यारंभ आदेशानुसार दि.28/03/2013 पर्यंत मुदत देण्यात आली. मुदतीत काम पुर्ण न झाल्याने प्रथम कार्यकारी अभियंता यांनी दि.28/11/2013 पर्यंत व दुस-यांदा अधिक्षक अभियंता यांनी दि.28/01/2014 पर्यंत विनादंड मुदतवाढ मंजुर केली. मुदतवाढी या टिपण्णीव्दारे मंजुर करण्यात आलेल्या असुन त्याचे स्वतंत्र आदेश निर्गमित केलेले नाहीत. मक्तेदाराचे मुदतवाढीचे अर्ज नस्तीसोबत नाहीत. निविदे नुसार कामाची मुदत 18 महिने होती. सुधारीत कार्यादेशामुळे मक्तेदारास कामाची मुदत 27 महिने मिळाली. तरीही मकतेदाराने मुदतीत काम पुर्ण केले नसतांनाही मुदतवाढ मंजुर करतांना दंडात्मक कार्यवाही करण्यात आली

नाही. विनादंड मुदतवाढ मंजुर करतांना विभागाने संयुक्तिक कारणे नमुद केलेली नाहीत.

10) करारनामा ऑर्डर दि.10/10/2011 नूसार मक्तेदारांस 7 दिवसाच्या आत करारनामा करून देण्यास कळविण्यात आले होते. तथापि, मकतेदाराने विलंबाने दि. 03/12/2011 रोजी करारनामा केलेला आहे.

11) मक्तेदाराने सुरक्षा अनामतीसाठी रू.1527500/- च्या सादर केलेल्या बँक गॅरंटीची मुदत दि. 07/12/2013 पर्यंत होती. त्यापुढील कालावधीसाठी बँक गॅरंटीचे नुतनीकरण केले किंवा कसे याची अभिलेख्यांअभावी खात्री करता आली नाही.

12) नस्तीतील अहवालानुसार या कामाचा देखभाल व दूरूस्तीचा कालावधी दि.01/05/2014 ते 30/04/2017 असा आहे. मक्तेदाराशी देखभाल व दुरूस्ती संदर्भात केलेला करारनामा लेखापरीक्षणामध्ये उपलब्ध झालेला नाही.

13) नगर विकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र.166/98/ नवि-24 दि.03/11/2003 नुसार कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. प्रथम कार्यारंभ आदेशानुसार मक्तेदाराने कंत्राटी कामाचा विमा उतरविला नसतांनाही 1 टक्का रक्कम कपात करून विमा निधीकडे भरणा केलेली नाही. सुधारीत कार्यारंभ आदेशान्वये मक्तेदाराने कंत्राटी कामाचा विमा सादर केला. सादर विम्याचा कालावधी दि.29/08/2012 ते 28/08/2013 पर्यंत होता. त्यापुढील कालावधीसाठीचा विमा प्राप्त केलेला नाही.

14) मोजमाप पुस्तिकेत कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी कंल्याचा शेरा नोंदविलेला आहे. तथापि, त्यांनी कोणत्या बाबींची तपासणी केली याच्या बाबीनिहाय व दिनांकानिहाय नोंदी घेतलेल्या नाहीत.

15) साहित्य चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आले नाहीत.

16) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्र.क्र./171/08/नवि.20 दि.02/03/2009 नुसार रू.50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे. या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.

17) महारष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

DATDTBM7001 (Ref No : 129, Hmm No : 148)

7 मनपा वाहनांसाठी बाहेरील पंपावरून इंधन पुरवठा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष : पेट्रोल /डिझेल खरेदी मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 15938526.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15889716.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 48810.00/-

इंधन खरेदी करणे बाबत सदर मंजूरीस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्याची व पेट्रोल पंपाची निवड कशाच्या आधारे केली याचा तपशिल नस्तीमध्ये आढळून आला नाही. सन 2014-15 या मधील उपलब्ध संबंधीत पेट्रोल पंपाधारकांच्या उप प्रमाणकांवर प्राधिकृत अधिका-यांचे इंधनपुरवठा बरोबर असल्याची प्रमाणपत्र नोंदविले नाही. लॉक बुक वर्षनिहाय परीरक्षित केलेली आहे. ते सलगरित्या तारखानिहाय नोंदी घेऊन संपेपर्यंत व नंतर दुसरे लॉकबुग चालू ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही. उपलब्ध लॉक बुकांवर प्राधिकृत अधिकारी यांच्या प्रत्येक नोंदी प्रमाणित केल्याबाबतची अदयाक्षरी व स्वाक्षरी केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या वाहनांसाठी लागणारा इंधन पुरवठा मनपाच्या डिझेल पंपावरून केला जात होता परंतु सन 2013-14 पासून मनपा वाहनांसाठी व इतर विविध प्रोजेक्टसाठी लागणारे इंधन नाशिक शहरातील 1) मे.पालेजा पेट्रोलियम, पंचवटी, नाशिक व 2) मे.जे.आर.मेहता ॲन्ड सन्स, नाशिक या पेट्रोल/डिझेल पंपावरून भरण्याबाबतचा आयुक्तांचा आदेश क्र.1460 दि.05/03/2013 अन्वये आदेशित केले आहे, तसेच इंधन खरेदीचे वेळोवेळी वाढ/ कमी होणारे बाजारभावा प्रमाणे खरेदी करणेस व सदर इंधनाचे 8 दिवसातुन होणारे देयक अदा करणेस मान्यता देण्यात आली असल्याने दोन्ही पेट्रोलपंपांना कामाचे आदेश क्र.मनपा/ मोदुवि./178/2013, दि.08/03/2013 निर्गमित केल्याप्रमाणे त्यानुसार इंधन खरेदी बाबत खालील प्रमाणे सन 2014-15 मध्ये एकूण रक्कम रू.1,59,38,526/- इतका झालेला आहे. सदरचा खर्च पेट्रोल/डिझेल खरेदी या सदरातून करण्यात आला आहे.

नस्ती मधील टिपणीव्दारे वेळोवेळी अदा केलेल्या देयकांचा तपशिल खालील प्रमाणे

टिपणीतील दिनांक	देयकाची रक्कम (रू.)	पेट्रोल पंपाचे नांव
28/04/2014	543890	---"----
05/05/2014	936976	---"----
17/05/2014	411969	---"----
23/05/2014	666561	---"----
12/06/2014	1033405	---"----
26/06/2014	642450	---"----
---"----	36401	मे.पी.जी.पालिजा

---"----	503838	मे.जे.आर.मेहता
---"----	524915	---"----
---"----	443065	---"----
30/07/2014	30187	मे.जी.जी. पाजिजा
---"----	389581	मे.जे.आर. मेहता
05/08/2013	419564	---"----
13/08/2014	483459	---"----
30/08/2014	418366	---"----
19/09/2014	516750	---"----
---"----	378000	---"----
---"----	309761	---"----
---"----	512004	---"----
---"----	314456	---"----
---"----	408781	---"----
---"----	335518	---"----
---"----	46233	---"----
---"----	426353	---"----
05/12/2014	335706	---"----
08/12/2014	40933	मे.पी.जी. पालिजा
19/12/2014	484087	मे.जे.आर.मेहता
23/12/2014	59282	मे.पी.जी.पालिजा
24/12/2013	433945	मे.जे.आर.मेहता
03/01/2015	52600	मे.जी.जी.पालिजा
07/01/2015	426326	मे.जे.आर. मेहता
---"----	472666	---"----
22/01/2015	49780	मे.पी.जी.पालिजा

27/01/2015	987789	मे.जे.आर.मेहता
---"----	15640	मे.पी.जी.पालिजा
---"----	33538	---"----
07/02/2015	373605	मे.जे.आर.मेहता
16/02/2015	323675	---"----
25/02/2015	31165	मे.पी.जी. पालिजा
---"----	284700	मे.जे.आर.मेहता
13/02/2015	34844	मे.पी.जी.पालिजा
---"----	328434	मे.जे.आर.मेहता
---"----	437328	---"----
सन 2014-15 मधील प्रदान रक्कम रू.	15938526	

उपरोक्त कामाची संचिका/नस्ती ई. उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणी केली असता, सन 2014-2015 मध्ये झालेला खर्च रक्कम रु.1,59,38,526/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. आयुक्त आदेश क्र.1460 दि.05/03/2013 नुसार मे.पालेजा पेट्रोलिअम, पंचवटी (H.P.) व 2) मे.जे.आर. मेहता ॲण्ड सन्स, नाशिक (H.P.) या पंपावरून मनपा वाहनांकरीता व इतर कामांकरीता इंधन खरेदी करणे बाबत आदेशित केले आहे. सदर मंजूरीस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते. तशी मंजूरी घेतल्याची व पेट्रोल पंपाची निवड कशाच्या आधारे केली याचा तपशिल नस्तीमध्ये आढळून आलेला नाही.

2. नस्ती मध्ये इंधन खरेदी बाबत संबंधीत पेट्रोल पंपधारकांना सन 2014-15 या कालावधीत रक्कम प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रकमांच्या देयकांच्या प्रती जोडण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधीत पेट्रोलपंपधारकाना लेखापरीक्षण कालावधीतील प्रदान झालेली रक्कम योग्य असल्याची पडताळणी करता आलेली नाही.

3. नस्ती मध्ये इंधन खरेदी बाबतची संबंधीत पेट्रोल पंपधारकांची सन 2014-2015 मधील मे.जे.आर मेहता यांची दि.01/08/2014 ते 10/08/2014 व दि.11/10/2014 ते 20/10/2014 या कालावधीतील उपप्रमाणके नस्ती मध्ये जोडण्यात आलेली नाहीत. तसेच सदर कालावधीतील विभागाने रक्कम प्रदान करण्यासाठी तयार केलेले देयकांच्या प्रती देखील नस्ती मध्ये आढळून आलेली नसल्याने उपरोक्त कालावधीत इंधन खरेदी बाबतची पडताळणी करता आलेली नाही.

4. नस्ती मधील उपलब्ध असलेल्या उपप्रमाणकां पैकी मे.पी.जी. पालिजा यांची उपप्रमाणांकावर वाहन क्रमांक नमूद केलेला नाहीत. त्यामुळे इंधन खरेदीबाबतची तपासणी करणेकरीता सदर उपप्रमाणकानुसार लॉकबुकांची पडताळणी करता

आलेली नाही.

5. सन 2013-2014 मध्ये मे.जे.आर. मेहता ॲन्ड सन्स यांनी सादर केलेल्या उपप्रमाणकांवर खाजगी वाहनाची नोंद करून त्याबाबतचा डिझेल खर्च नोंदवून त्यांची एकूण 849.5 लिटर डिझेल करीता एकूण रक्कम रू.50,107/- प्रदान झालेली आहे. खाजगी वाहनांसाठी इंधन खरेदीचा खर्च नोंदविण्यात आलेला आहे किंवा कसे याची विभागाच्या स्तरावर पडताळणी होणे आवश्यक आहे.

6. मे.जे.आर. मेहता ॲन्ड सन्स यांचे बील क्र. 59 दि.01/11/2014 अन्वये सादर केलेल्या दि.21/10/2014 ते 31/10/2014 या कालावधीचे उप प्रमाणकावरील अ.क्र.115 मध्ये नमूद वाहन क्र. MH-48-H-293 या मध्ये रू.65.02 प्रतीलिटर प्रमाणे एकूण 30 लिटर डिझेल टाकण्यात आले आहे. परंतु सदरचे वाहन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहीतीनुसार मनपातील एकूण वाहनां पैकी असल्याचे आढळून आलेले नाही. तरी सदरचे वाहन हे खाजगी वाहन आहे किंवा कसे याबाबत विभागाच्या स्तरावर पडताळणी होणे आवश्यक आहे. तथापि, मे.जे.आर.मेहता यांनी सादर केलेल्या सन 2014-15 या कालावधीतील उपप्रमाणकांची पडताळणी केली असता, खालील तपशिला प्रमाणे सदर वाहना मध्ये एकूण 840 लिटर डिझेल करीता एकूण रक्कम रू.48,810/- मनपा फंडातून प्रदान झालेली आहे. तरी याबाबत योग्य ती फडताळणी होऊन सदरची रक्कम वसुल हेणे आवश्यक आहे.

मे.जे.आर.मेहता पेट्रोल पंपाचा (उप प्रमाणक) देयक क्रमांक व दिनांक व कालावधी	उप प्रमाणकावरील अ.क्र.	दिनांक	वाहन क्रमांक	एकूण डिझेल लिटर मध्ये	डिझेलचा दर रू. पै.	एकूण प्रदान झालेली रक्कम
59/ दि.01/11/2014 21.10.14 TO 31.10.14	115	31/10/2011	MH-48 H 293	30	65.02	1950.60
57/ दि.13/10/2014 01.10.14 TO 10.10.14	16	02/10/2014	MH-48 H 293	30	68.79	2063.70
57/ दि.13/10/2014 01.10.14 TO 10.10.14	41	06/10/2014	MH-48 H 293	30	68.79	2063.70
60/	77	07/11/2014	MH-48 H 293	30	62.55	1876.50

दि.11/11/2014 01.11.14 TO 10.11.14						
61/ दि.21/11/2014 11.11.14 TO 20.11.14	13	11/11/2014	MH-48 H 293	30	62.55	1876.50
61/ दि.21/11/2014 11.11.14 TO 20.11.14	58	14/11/2014	MH-48 H 293	30	62.55	1876.50
61/ दि.21/11/2014 11.11.14 TO 20.11.14	128	19/11/2014	MH-48 H 293	30	62.55	1876.50
62/ दि.02/12/2014 21.11.14 TO 30.11.14	99	27/11/2014	MH-48 H 293	30	62.55	1876.50
63/ दि.11/12/2014 01.12.14 TO 10.12.14	39	02/12/2014	MH-48 H 293	30	61.62	1848.60
63/ दि.11/12/2014 01.12.14 TO 10.12.14	103	06/12/2014	MH-48 H 293	30	61.62	1848.60
64/ दि.22/12/2014 01.12.14 TO 20.12.14	11	11/12/2014	MH-48 H 293	30	61.62	1848.60
64/ दि.22/12/2014 01.12.14 TO	67	16/12/2014	MH-48 H 293	30	59.41	1782.30

20.12.14						
63/ दि.11/12/2014 01.12.14 TO 10.12.14	9	22/12/2014	MH-48 H 293	30	59.41	1782.30
63/ दि.11/12/2014 01.12.14 TO 10.12.14	76	26/12/2014	MH-48 H 293	30	59.41	1782.30
66/ दि.12/01/2015 01.01.15 TO 10.01.15	22	01/01/2015	MH-48 H 293	30.	59.41	1782.30
66/ दि.12/01/2015 01.01.15 TO 10.01.15	101	07/01/2015	MH-48 H 293	30	59.41	1782.30
67/ दि.21/01/2015 11.01.15 TO 20.01.15	74	15/01/2015	MH-48 H 293	35	59.41	2079.35
68/ दि.03/02/2015 21.01.15 TO 31.01.15	83	27/01/2015	MH-48 H 293	25	56.90	1422.50
68/ दि.03/02/2015 21.01.15 TO 31.01.15	132	30/01/2015	MH-48 H 293	30	56.90	1707.00
69/ दि.12/02/2015 01.02.15 TO 10.02.15	96	07/02/2015	MH-48 H 293	30	54.36	1630.80

70/ दि.21/02/2015 11.02.15 TO 20.02.15	38	13/02/2015	MH-48 H 293	30	54.36	1630.80
70/ दि.21/02/2015 11.02.15 TO 20.02.15	88	18/02/2015	MH-48 H 293	30	55.05	1651.50
70/ दि.12/03/2015 01.03.15 TO 10.03.15	77	05/03/2015	MH-48 H 293	30	58.47	1754.10
73/ दि.23/03/2015 11.03.15 TO 20.03.15	18	12/03/2015	MH-48 H 293	30	58.47	1754.10
73/ दि.23/03/2015 11.03.15 TO 20.03.15	95	18/03/2015	MH-48 H 293	30	58.47	1754.10
74/ दि.01/04/2015 21.03.15 TO 31.03.15	76	26/03/2015	MH-48 H 293	30	58.47	1754.10
74/ दि.01/04/2015 21.03.15 TO 31.03.15	109	29/03/2015	MH-48 H 293	30	58.47	1754.10
			एकूण	810	पुर्णांकात रू.	48810.25 48810.00

तसेच उपरोक्त खाजगी वाहनाव्यतिरीक्त इतर खाजगी वाहनांकरीता सन 2014-15 मध्ये इंधन खर्च मनपा फंडातून प्रदान झाले आहे किंवा कसे याबाबतची विभागाच्या स्तरावरुन योग्य ती पडताळणी होणे आवश्यक आहे

7. नस्ती मध्ये सन 2014-15 या कालावधीतील उपलब्ध असलेल्या संबंधीत पेट्रोल पंपाधारकांच्या उप प्रमाणकांवर प्राधिकृत अधिकारी यांनी सदरचा इंधनपुरवठा लॉगबुकानुसार बरोबर असल्याची तपासणी करून तसे प्रमाणपत्र नोंदविले

नाही.

8. प्राधिकृत अधिकारी यांनी मनपातील प्रत्येक वाहनचालकांस इंधन भरण्यासाठी पेट्रोलपंपांना दिलेल्या मागणीपत्रांची व त्यानुसार कर्मशाळा व्यवस्थापक यांच्या दैंनदिनी जमा / वाटपाच्या नोंदी तपासून त्या बरोबर असल्याचे खात्री करून ते प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र पेट्रोल पंपांनी सादर केलेल्या त्यांच्या उपप्रमाणकांवर नोंदविणे आवश्यक आहे. परंतु तसे प्रमाणपत्र नोंदविलेले नसतांना मक्तेदारास रक्कम प्रदान केलेली आहे. त्यामुळे मक्तेदारास प्रदान केलेली रक्कम योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

9. विभागाने मनपाच्या वाहनचालकांच्या इंधन मागणीनुसार पेट्रोल पंपास सादर करावयाच्या इंधनमागणीपत्रांच्या स्थळ प्रती लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नसल्याने त्याची पेट्रोलपंपाकडील प्राप्त उप प्रमाणकाशी पडताळणी करता आली नाही.

10. महानगरपालिकेकडील असलेल्या एकूण वाहनांपैकी किती वाहने नादुरस्त अवस्थेत असून ते विनावापर आहेत तसेच एकूण किती वाहनांचे निर्लेखन झाले याबाबतची माहीती उपलब्ध न झाल्याने त्याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

11. विभागातील निवडक लॉक बुकांची पडताळणी केली असता, सदरचे लॉक बुक वर्षनिहाय परीरक्षित केलेली आहे. लॉक बुक हे वाहनचालकांच्या ताब्यात असल्यामुळे ते सलगरित्या तारखानिहाय नोंदी घेऊन संपेपर्यंत चालू ठेवून ते संपल्या नंतर दुसरे लॉकबुग चालू ठेवणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

12. उपलब्ध लॉक बुकांवर प्राधिकृत अधिकारी यांच्या प्रत्येक नोंदी प्रमाणित केल्याबाबतची अदयाक्षरी व स्वाक्षरी केलेली नाही.

8 नाशिक महानगरपालिकेने पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन भाडे प्रतीपुर्ती भत्ता योजनेचा लाभ देवुन केलेल्या खर्चा बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 5

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4195912.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4195912.00/-

आयुक्त आदेश क्र. 118 दिनांक 12/02/2007 मधील अटींनुसार अधिकाऱ्यांच्या वाहन लॉगबुक, फिरतीबाबतचा दाखला, दैनंदिन्या इ.लेख्यां अभावि, प्रदान केलेला वाहन प्रतिपूर्ती योग्य असल्या बाबत पडताळणी करता आली नाही. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये

शासनाने खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापरण्याची योजना पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय असतांना उपरोक्त शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक बाब म्हणुन राज्य शासनाची मंजुरी घेतलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 19-अ.(मानधन, फी किंवा भत्ते) (1) अन्वये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अधिकारी/ पदाधिकारी यानां वाहन भाडे प्रतीपुर्ती योजने अंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने शासनाची परवानगी घेतली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे वाहन/यांत्रिकी विभागाचे लेखापरीक्षणात वाहन वपराबाबत प्रतिपुर्ती भत्ता धोरणात्मक निर्णय उपलब्ध संचिकांचे लेखापरीक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेने पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन भाडे प्रतीपुर्ती योजनेचा लाभ खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या तपशिलानुसार देण्यात आलेला आहे.

अ.क्र.	मनपाचे वाहना ऐवजी स्वतःचे वाहन वापरणाऱ्या पदाधिकारी / अधिकारी	वाहन वापरण्यास परवानगी दिल्याचा दिनांक व मंजुरी आदेश क्रमांक	प्रतीमहा दिलेला वाहनभाडे रक्कम व वर्षभरातील एकुण रक्कम
1	सन 2014-2015 मधील पदाधिकारी यांना वाहनप्रतिपुर्ती भत्ता अदा केले बाबत	मा. महासभा ठराव क्र.540 दि. 21/06/2010 अन्वये आयुक्त आदेश क्र.978 दि.25/08/2010 नुसार ज्या पदाधिकारी यांनी वाहन जमा करून स्वत:चे वाहन मनपा कार्यालयीन कामकाजासाठी वापरतील त्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली आहे.	उप महापौर यांना रू.40000/- प्रती महा प्रमाणे एका वर्षाभरातील होणारी रक्कम रू.480000/- प्रमाणे व इतर पदाधिकारी यांना दर महा रू.30000/- प्रमाणे वर्षभरात होणारी रक्कम रू.360000/- प्रमाणे वाहन प्रतीपुर्ती भत्ता अदा करण्यात येत आहे.
1	खाते प्रमुख व वर्ग-1 व त्यावरील अधिकारी यांचे करीता	मा. महासभा ठराव क्र.540 दि. 21/06/2010 अन्वये आयुक्त आदेश क्र.978 दि.25/08/2010 व स्थायी समिती ठराव क.576 दि.16/11/2013 मान्यतेने त्याअनुषंगाने आयुक्तांच्या वेळोवेळी निर्गमित झालेल्या आदेशान्वये व आयुक्त आदेश क्र.1212 दिनांक 02/12/2013 नुसार वाहन प्रतीपुर्ती भत्त्या केलेली वाढी नुसार प्रदान करण्यात येत असलेली रक्कम	खाते प्रमुखांना रू.30000/- प्रती महा नुसार वर्षभरात एकूण रक्कम रू.360000/- प्रमाणे व वर्ग-1 व त्यावरील अधिकारी यांना रू.25000/- प्रती महा प्रमाणे वर्षभरात रक्कम

			रु.300000/- प्रमाणे वाहन प्रतीपुर्ती भत्ता अदा करण्यात येत आहे.
2	वर्ग-2 व त्यावरील अधिकारी यांचे करीता	मा. महासभा ठराव क्र.540 दि. 21/06/2010 व स्थायी समिती ठराव क.576 दि.16/11/2013 मान्यतेने आयुक्त आदेश क्र.1212 दि.02/12/2013 नुसार वाहन प्रतीपुर्ती भत्त्या केलेली वाढी नुसार प्रदान झालेली एकूण रक्कम	वर्ग-2 व त्यावरील अधिकारी यांना रक्कम रू.17500/- प्रतीमहा प्रमाणे x 12 (महिने) = 210000/- नुसार प्रती वर्ष वाहन प्रतीपुर्ती भत्ता अदा करण्यात येत आहे.

उपरोक्त कामाची संचिका/नस्ती ई. उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणी केली असता, शासन निर्णय वित्त विभाग क्र.वाहन-1000/प्र.क्र.65/2001 विनियम, दिनांक 10/09/2001 आधार घेऊन महानगरपालिका नाशिक स्थायी समिती ठराव क्रमांक 1217 दिनांक 11/12/2006 व त्यास महासभा ठराव क्र. 158 दिनांक 19/05/2007 अन्वये वाहनप्रतिपूर्ती योजनेस मान्यता घेतली. शासन निर्णय दिनांक 25 मे 2005, 31 जुलै 2008 अन्वये शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये शासकीय वाहनांचे वापरा व्यतिरिक्त स्वतःचे खाजगी वाहन वापरण्यास परवानगी देवुन त्यापोटी अधिकाऱ्यांना वाहन प्रतीपुर्ती योजना लागु करण्यात आली आहे. महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये मा.आयुक्त आदेश क्र. 978 दि.25/08/2010 अन्वये सदर वर्ग-1 च्या अधिकाऱ्यांना प्रतिमाह रु.20000/- हजार व वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांना प्रतिमाह रु.12500/- वाहन प्रतीपुर्ती पोटी आर्थिक लाभ दिलेला आहे.

परंतु सदर योजना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये दिनांक 1 एप्रिल 2012 पासुन पूर्णपणे बंद केलेली आहे. त्यानुसार सदरची योजना मा. आयुक्त यांचे आदेश क्र.193 दि.31/03/2012 अन्वये सदर वाहन प्रतिपूर्ती योजना बंद केली होती.

शासन निर्णया अन्वये बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतांना मनपाने महानगरपालिका महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये पारीत केलेल्या ठरवानुसारच पुन्हा आदेश क्र. 5 दिनांक 13/04/2012 अन्वये पूर्वीचे मूळ आयुक्त आदेश क्र. 978 दि.25/08/2010 नुसार देय वाहन प्रतिपूर्ती भत्ता देण्यास मान्यता देउन सदरची योजना पून्हा चालु केली आहे.

त्यानंतर तसेच स्थायी समिती ठराव क्र. 576 दि.16/11/2013 व मा.आयुक्त आदेश क्र. 1212 दि.02/12/2013 च्या आदेशानुसार दि.01/12/2013 पासून सदर प्रतिपूर्ती भत्तात वाढ करून वर्ग-1 व त्यावरील

अधिका-यांना प्रती मा रू.25000/- व वर्ग -2 व त्यावरील अधिका-यांना प्रती महा रू.17500/- इतका प्रतिपुर्ती भत्त्यात वाढ करून त्याची अंमलबजावणी दि.01/12/2013 पासून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार लेखा विभागाकडील माहीतीनुसार सन 2014-15 मधील वाहनप्रतीपूर्वीसाठी (पदाधिकारी यांच्या

सह)झालेला खर्च रक्कम रु.41,95,912/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) लेखा विभागाकडील माहीती नुसार सदर अधिकारी व पदाधिकारी यांना सन 2014-2015 मध्ये एकूण रक्कम रू.41,95,912/- प्रदान करण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त यांचे आदेश क्र. 118 दिनांक 12/02/2007 मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाहन प्रतीपुर्ती मिळणे बाबत संबंधीत अधिकाऱ्यांनसाठी पुढील प्रमाणे अटी नमूद आहेत.

(1) कामाची डायरी व वाहन वापराबाबतचे लॉगबुक ठेवणे.

(2) बिलासोबत ठराविक नमुन्यात फिरतीबाबत दाखला खातेप्रमुख/विभागप्रमुखांनी दरमाह दयावा

(3) मुख्यलेखाधिकारी यांनी प्रत्येक देयाकाबरोबर दैनंदिनीची तपासणी करणेत यावी.

(4) एखादया महिन्यात संबंधीत अधिकारी सलग 10 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर राहिल्यास किंवा संपूर्ण महिन्यात एकूण 10 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त सर्व प्रकारची रजा झाल्यास त्या प्रमाणात मासिक प्रतिपूतीच्या रकमेतून रक्कम कमी करणेत येईल.

(5) संबंधीत अधिका-याचे वाहन कोणत्याही कारणामुळे नादुरूस्त असल्यास व त्याने त्या कालावधीत शासकीय वाहन वापरल्यास त्यांचे कडून प्रवासासाठी रू.8/- प्रति कि.मी. रक्कम वसुल करण्यात येईल.

(6) वाहन अपघातग्रस्त झाल्यास वा नादुरूस्त ते सुस्थितीत ठेवणे, विमा, कर भरणे, इत्यादी प्रकारची जबाबदारी संबंधित वाहनधारक अधिका-यांची राहील.

(7) संबंधित अधिकारी कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास करीत असतांना टोल भरावा लागल्यास त्याची प्रतिपुर्ती करण्यात यावी.

उपरोक्त अटींनुसार केलेली कार्यवाहीबाबत अधिकाऱ्यांच्या वाहन लॉगबुक, फिरतीबाबतचा दाखला, दैनंदिन्या लेखापरीक्षणात पहावयास न मिळाल्यामुळे प्रदान केलेला वाहन प्रतिपूर्ती योग्य असल्याबाबत लेख्याआधारे तपासता आले नाही. तसेच मनपामधील काही विभाग प्रमुखांना सदर योजनेचा लाभ दिला परंतु मनपाचे वाहन त्या विभागासाठी वापरात आहे किंवा कसे याबाबतची माहीती उपलब्ध न झाल्याने सदर अधिकाऱ्यानी दुहेरी फायदा घेतला नसल्याची पडताळणी करता आली नाही..

2. सदर योजना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वाहन 1/12/प्र.क्र.1/2012/विनियन दिनांक 29 फेब्रुवारी 2012 अन्वये शासनाने खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापरण्याची योजना पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. जे अधिकारी या योजनेचा सध्या लाभ घेत आहेत, त्यांना दिनांक 1 एप्रिल 2012 पासुन खाजगी वाहन शासकीय कामाकरिता वापराबाबतच्या धोरणाच्या अनुषंगाने कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. असे असतांना मात्र मनपाने उपरोक्त शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णया अन्वये बंद केलेली योजना चालु ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतांना मनपाने महानगरपालिका महासभा ठराव क्र. 540 दि.21/06/2010 अन्वये पारीत केलेल्या ठरवानुसारच सदरची योजना मा.आयुक्त यांचे आदेश क्र.193 दि.31/03/2012 अन्वये सदर वाहन प्रतिपूर्ती योजना बंद केली व पुन्हा आदेश क्र. 5 दिनांक 13/04/2012 अन्वये चालु केली. परंतु सदर योजना पुन्हा चालु करतांना धोरणात्मक बाब म्हणुन राज्य

शासनाची मंजुरी घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 19-एक-अ अन्वये सभागृह नेत्याला व 19-एक-अअ-(2) विरोधीपक्ष नेत्याला महापालिकेने केलेल्या विनिमाव्दारे तरतुद केल्यानुसार मानधन ,भत्ते व इतर सुविधा देण्याबात संदर्भात तरतुद आहे. उक्त अधिनियमातील कलम 19-अ.(मानधन, फी किंवा भत्ते) (1) अन्वये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने महानगरपालिकेस या कलमान्वये, महानगरपालिकेने केलेल्या नियामाव्दारे विहित करेल असे मानधन फी किंवा अन्य भत्ते देण्या संदर्भात तरतुद आहे. प्रत्यक्षात महानगरपालिकेने उपरोक्त अधिकारी / पदाधिकारी यानां वाहन भाडे प्रतीपुर्ती योजने अंतर्गत महानगरपालिका प्रशासनाने शासनाची परवानगी न घेता पदाधिकारी यांना वाहन प्रतीपुर्ती दिला. लेखा विभागाकडील माहीतीच्या आधारे सन 2014-15 मध्ये पदाधिकारी यांना वाहन प्रतीपुर्ती साठी एकूण रक्कम रू.17,64,863/- प्रदान केले असल्याने तेवढया रकमेचा महानगरपालिकेस आर्थिक भार सहन करावा लागत आहे. सदरची योजना 1 एप्रिल 2012 पासुन बंद झालेली असतांना पुढे चालु ठेवण्याचे असल्यास शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक होती.

4. यांत्रिकी विभागाने मनपा अधिकारी व पदाधिकारी यांना कार्यालयीन कामाकरीता मनपा मार्फत वापरण्यास दिलेल्या वाहनांची माहीती सादर करतांना ती सन 2013-14 व 2014-15 या कालावधीची वर्ष निहाय दिलेली नसल्याने लेखापरीक्षण कालावधी मध्ये अधिकारी व पदाधिकारी यांना मनपाचे वाहन पुरविण्यात आले असतांना त्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देखील प्रदान केला जातो किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत विभागाने आपल्या स्तरावर योग्य ती पडताळणी करणे आवश्यक आहे.

5. सन 2012-2013 च्या लेखापरीक्षणात याबाबत परीच्छेद क्रमांक 20 अन्वये आक्षेप नोंदविण्यात आला असतांना देखील सन 2014-2015 मध्ये रक्कम रू. 41,95,912/- खर्च नोंदविण्यात आला आहे.

HCDMGGM7001 (Ref No : 108, Hmm No : 96)

9 नाशिक महानगरपालिकेने जाहिरातीकरिता केलेल्या खर्चाबाबतची अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 935235.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 935235.00/-

महानगरपालिकेने जाहिराती या शासन दरापेक्षा जास्त व्यापारी दराने दिल्यामुळे रक्कम रू 8,58,062/- एवढया रकमेचे नुकसान झाले आहे. महानगरपालिकेला जाहिरात या अभिकरणामार्फत देता येत नसल्यामुळे

अभिकरणाला सेवाकर देण्याचे प्रयोजन नसताना रक्कम रू 77,173/- एवढी रक्कम मे.नाशिक जाहिरात अभिकरणाला सेवाकर रूपाने प्रदान केली आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे माहिती व जनसंपर्क विभागाने उपलब्ध करून दिलेल्या जाहिरात खर्चाच्या नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता मे. नाशिक ॲडव्हटायझींग या जाहिरात अभिकरणाला (एजन्सीला) जाहिरातीच्या रकमा अदा केलेल्या आहेत.

प्रशासकीय मान्याता :- मा. स्थायी समिती ठराव क्र.245 दिनांक 04/06/2005

(1) मे. नाशिक जाहिरात एजन्सी नाशिक.

(2) मे.पियुष जाहिरात एजन्सी नाशिक.

(3) मे.राका जाहिरात एजन्सी नाशिक.

(4) मे.ऑस्ट्रेल जाहिरात एजन्सी नाशिक.

उपरोक्त जाहिरात एजन्सी यांनी मनपाकडे जाहिरात मिळण्यासाठी अर्ज केले होते त्याअनुषंगाने उपरोक्त ठरावात नमुद केल्याप्रमाणे नाशिक महानगरपालिका सध्यस्थितीत जाहिरात प्रसिद्धीस देतांना जाहिरात एजन्सी मार्फत जाहिरातीचे आकारमान संगणकावर कमीत कमी आकारात सारखे प्रमाणात टाईप करून वृत्तपत्रांना देत असल्यामुळे कॉलम सेंटीमीटर मध्ये बचत होऊन मनपाचा आर्थिक फायदा होतो. तसेच राज्यस्तरीय वृत्तपत्रांना थेट जाहिरात देणे सोपे होते. त्यावर स्थायी समितीने मे.नाशिक जाहिरात एजन्सी व पियुष जाहिरात एजन्सी यांना व शहरात कार्यरत असलेल्या गोविंदा, साईकृपा ॲड सी-न्युज, वेध, नजर या इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या मार्फत चक्रीय पध्दतीने देण्यास मंजुरी दिली.

तदनंतर मा.स्थायी समिती ठराव क्र.502 दिनांक 17/10/2013 सभा क्र.23 विषय क्र.502 अन्वये नाशिक महानगरपालिकेच्या विविध वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिराती या मे.नाशिक ॲडव्हटायझींग अन्वये प्रसिध्द केल्यास त्यांचे मार्फत जाहिरात हया कमीत कमी साईजमध्ये बिनचुक व बरोबर प्रसिध्द होत असतात, त्यामुळे नाशिक महानगरपालिकेचा वेळ, पैसा व मनुष्यबाळाची बचत होते, तरी मनपाच्या विविध वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिराती या मे.नाशिक ॲडव्हटायझींग यांचेमार्फत नियमानुसार प्रसिध्द करणेबाबत मंजूरी दिली आहे.

सदर बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. मा. स्थायी समिती ठराव क्र.245 दिनांक 04/06/2005 देण्यात आलेल्या मंजुरीत कालमर्यादा नमुद नसल्यामुळे सन 2005 पासून मे. नाशिक जाहिरात एजन्सीला जाहिरात देणे चालू आहे. धोरणात्मक बाब म्हणून मा.महासभेची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक होती. प्रत्यक्षात मनपाने अशी मंजुरी घेतलेली नाही.

2. 'वृत्तपत्रात व नियतकालिकांच्या जाहिरात विषयक धोरणात तसेच जाहिरातीच्या दरात सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या मा. अनिल देशमुख समितीचा अहवाल' महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.

पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1 मे,2001. यातील जोडपत्र-अ मधील नियम-6 अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदा, शासन पुरस्कृत सहकारी संस्था आदी स्वायत्त संस्थाच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार या संस्थाना आहेत, तथापी त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी शासन मान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करून शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रामध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क सर्व सबंधीतांना अंमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करून देतील, असे नमुद असतांना नाशिक महानगरपालिकेने उक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. 'शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्याबाबत' महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31 ऑगस्ट,2009.मधील अनु.क्र.(9) अन्वये शासनाच्या कोणत्याही विभागांनी शासकीय जाहिरात अभिकरणामार्फत (एजन्सीमार्फत) देऊ नयेत. शासनाच्या सर्व जाहिरातींचे वितरण चक्रीय पध्दतीने (रोटेशन) करणे सर्व विभागांवर बंधनकारक राहील. फक्त जाहिरात तयार करण्याकरिताच (क्रिएटिव्ह) अभिकरणांची (एजन्सीची) मदत घेता येईल मात्र अशा अभिकरणाची यादी (एजन्सीचे पॅनल) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात यावे. असे नमूद असताना सुध्दा महानगरपालिकेने उपरोक्त स्थायी समितीच्या ठरावानुसार मे. नाशिक ॲडव्हर्टायझींग एजन्सीला <u>विववरणपत्र अ</u> मध्ये दर्शविल्याप्रमाणे शासन दरापेक्षा जास्त व्यापारी दराने जाहिराती दिल्या आहेत. उक्त शासन निर्णयानुसार जाहिराती या जाहिरात अभिकरणांमार्फत देणे बंद करावे व आवश्यक असल्यास फक्त जाहिरात तयार करण्याकरिता अभिकरणाची मदत घेता येईल. परंतू काही प्रकरणांमध्ये मे.नाशिक ॲडव्हर्टायझींग या जाहिरात अभिकरणाने व्यापारी दराने जाहिरात रकमेची आकारणी केल्यामुळे मनपा निधीचे विवरणपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजे रक्कम रू. 8,58,062/- एवढया रकमेचे नुकसान झाले आहे.

4) शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31 ऑगस्ट,2009.अनु क्र.(11) प्रमाणे शासनाची विविध मंडळे, महामंडळे,जिल्हा परिषदा,महानगरपालिका,नगरपरिषदा,शासन पुरस्कृत सहकारी संस्था, आदी स्वायत्त संस्थाना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी अंमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करून दिलेली आहे. तथापी सदर मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात, शासनाच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करीत नाहीत असे निदर्शनास आले आहे. म्हणून पुन्हा निदेश देण्यात येत आहेत की, मंडळे , महामंडळे स्थानीक स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देतांना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधीतांसमोर स्पष्ट करावे असे नमुद केले आहे परंतू महानगरपालिकाने उपरोक्त स्थायी समितीच्या ठरावानुसार नाशिक जाहिरात एजन्सीला जाहिरात अभिकरण (एजन्सी) ला कामकाज दिले तसेच सदर रकमेवर सेवाकराचे कोणतेही प्रयोजन नसताना <u>विवरणपत्र ब</u> मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजे रक्कम रु.77,173/- मे.नाशिक ॲडव्हटायझींग या अभिकरणाला सेवाकर रूपाने प्रदान केले आहे, प्रत्यक्षात नाशिक महानगरपालिका, मे.नाशिक ॲडव्हटायझींग एजन्सीला वृत्तपत्रात जाहिरात देण्यासाठी कोणतेच कमीशन देत नाही. सदर एजन्सीला वृत्तपत्रे त्यांच्या तर्फे 15% कमीशन देतात. सदर कमीशन वर 12.36% दराने सेवाकर

स्वतः एजन्सीने उपरोक्त प्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे. { सेवाकर कायदा 1996 व त्यातील सुधारणा, (वित्तीय कायदा 2006 , नोटिफिकेशन-1-5-2006) मधील 7.3.4 (ii) , चाप्टर 75 }

विवरणपत्रात नमूद रकमा या उदाहरणादाखल असून विभागाने जाहिरातीच्या सर्व नस्त्याची पडताळणी करून वसूली करणे आवश्यक आहे.

विवरणपत्र अ

सन 2014-2015 या कालावधीतील उदाहरणादाखल व्यापारी दराने जाहिरात दिल्याने जादा प्रदान रकमेचे विवरणपत्र

अ.क्र.	मा.आयुक्त मंजूरी आदेश व दिनांक	रक्कमेच तपशील				दैनिकाचे नाव	विभागाचे नाव	जाहिरात आकार स्के.से मी	दैनिकाचा व्यापारी दर चौसेमी	अदा रक्कम	दैनिकाचा शासकीय दर	देय रक्कम	जादा प्रदान फरक
		जाहिरात रक्कम	सेवाकर	DISCOUNT	एकूण रक्कम								
1	217,दि. 23/6/2014	90881	1684		92565	दै.नवभारत,मुंबई	आरोग्य विभाग	80	112.48	8998.4	39	3120	5878.4
2	217,दि. 23/6/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	लेखा विभाग	56	140.92	7891.52	58	3248	4643.52
3	1838,दि.4/3/2014	54608	1012		55620								
4	1653,ि्द.20/2/2014	62954	1167		64121	दै.नवभार, महा.	पाणीपुरवठा	48	213.21	10234.08	58	2784	7450.08
5	1652,दि.20/2/2014	91144	1689		92833	दै.नवभारत,महा	पाणीपुरवठा	88	213.21	18762.48	58	5104	13658.48
6	1652,दि.20/2/2014				0	दै.नवभारत,महा	पाणीपुरवठा	48	213.21	10234.08	58	2784	7450.08
7	206,दि.23/6/2014	59638	1106		60744	दै.नवभारत,मुंबई	उदयान	104	89.52	9310.08	38	3952	5358.08
8	486,दि.15/9/2014	142895	2650	1428	144117	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	यांत्रिकी वि	104	140.92	14655.68	58	6032	8623.68
9	486,दि.15/9/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	अग्नीशमन	156	140.92	21983.52	58	9048	12935.52
10	486,दि.15/9/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	156	140.92	21983.52	58	9048	12935.52
11	485,दि.15/9/2014	77663	1439	775	78327	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	152	140.92	21419.84	58	8816	12603.84
12	485,दि.15/9/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	56	140.92	7891.52	58	3248	4643.52
13	483,दि.15/9/2014	42088	780	421	42447								

14	481,दि.15/9/2014	96799	1796	968	97627	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	136	140.92	19165.12	58	7888	11277.12
15	484,दि.15/9/2014	43264	803	432	43635								
16	482,दि.15/9/2014	84884	1574	849	85609	दै.नवभारत,मुंबई	भुयारी गटार	152	140.92	21419.84	39	5928	15491.84
17	545,दि.5/12/2014	93351.68	1730	933.68	94148	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	उदयान	204	140.92	28747.68	58	11832	16915.68
18	543,दि.5/12/2014	99108	1836	992	99952								
19	544,दि.5/12/2014	186663.7	3459	1866.7	188256	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	विदयुत	504	140.92	71023.68	58	29232	41791.68
20	207,दि.23/6/2014	30976	574	0	31550								
21	564,दि.11/12/2014	95372.16	1768	955.16	96185	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	मोटार दुरूस्ती	376	140.92	52985.92	58	21808	31177.92
22	562,दि.11/12/2014	97214.04	1803	972.04	98045	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भांडार विभाग	120	140.92	16910.4	58	6960	9950.4
23	562,दि.11/12/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	192	140.92	27056.64	58	11136	15920.64
24	563,दि.11/12/2014	82618.6	1532	828.6	83322	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	अग्नीशमन	180	140.92	25365.6	58	10440	14925.6
25	563,दि.11/12/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	संगणक	88	140.92	12400.96	58	5104	7296.96
26	565,दि.11/12/2014	79487.52	1473	795.52	80165	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	अग्नीशमन	156	140.92	21983.52	58	9048	12935.52
27	1837,दि.4/3/2014	123733	2293	0	126026	दै.नवभारत,महा	यांत्रिकी वि	64	213.21	13645.44	58	3712	9933.44
28	208,दि.23/6/2014	106144	1968	0	108112								
29	215,दि.23/6/2014	147372	2732		150104	दै.नवभारत,मुंबई	यांत्रिकी वि	192	75.23	14444.16	39	7488	6956.16
30	1654,दि.20/2/2014	281598	5221		286819	दै.नवभारत,महा	अग्नीशमन	276	313.21	86445.96	58	16008	70437.96
31	9,दि.2/8/2014	15996	296	0	16292	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	झोपडपटटी सु.वि	40	140.92	5636.8	58	2320	3316.8

32	244,दि.2/7/2014	82308	1525	0	83833								
33	247,दि.2/7/2014	143081	2653		145734	दै.नवभारत,मुंबई	यांत्रिकी वि	120	75.23	9027.6	39	4680	4347.6
34	247,दि.2/7/2014					दै.नवभारत,मुंबई	आरोग्य विभाग	80	75.23	6018.4	39	3120	2898.4
35	247,दि.2/7/2014					दै.नवभारत,मुंबई	आरोग्य विभाग	88	75.23	6620.24	39	3432	3188.24
36	249,दि.2/7/2014	126716	2349	1267	127798	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	गटार योजना	144	140.92	20292.48	58	8352	11940.48
37	249,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	192	140.92	27056.64	58	11136	15920.64
38	243,दि.2/7/2014	265256	4919		270175	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सार्वजनिक बांधकाम वि	448	140.92	63132.16	58	25984	37148.16
39	243,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाटैबल टॉयलेट	104	140.92	14655.68	58	6032	8623.68
40	243,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	आरोग्य	80	140.92	11273.6	58	4640	6633.6
41	243,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	विदयुत विभाग	336	140.92	47349.12	58	19488	27861.12
42	243,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	208	140.92	29311.36	58	12064	17247.36
43	245,दि.2/7/2014	168488	3124		171612	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	उदयान	216	140.92	30438.72	58	12528	17910.72
44	245,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सार्वजनिक बांधकाम वि	104	140.92	14655.68	58	6032	8623.68
45	246,दि.2/7/2014	208241	3858		212099	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	अग्नीशमन	216	140.92	30438.72	58	12528	17910.72
46	246,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	आरोग्य	184	140.92	25929.28	58	10672	15257.28
47	246,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	यांत्रिकी वि	192	140.92	27056.64	58	11136	15920.64

48	248,दि.2/7/2014	248071	4599		252670	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सार्वजनिक बांधकाम वि	240	140.92	33820.8	58	13920	19900.8
49	248,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सार्वजनिक बांधकाम वि	232	140.92	32693.44	58	13456	19237.44
50	248,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	136	140.92	19165.12	58	7888	11277.12
51	248,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	झोपडपटटी सु.वि	80	140.92	11273.6	58	4640	6633.6
52	248,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	40	140.92	5636.8	58	2320	3316.8
53	248,दि.2/7/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सिवरेज डिपार्टमेंट	152	140.92	21419.84	58	8816	12603.84
54	209,दि.23/6/2014	83142	1541		84683	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	200	140.92	28184	58	11600	16584
55	209,दि.23/6/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	यांत्रिकी वि	120	140.92	16910.4	58	6960	9950.4
56	216,दि.23/6/2014	150623	2793		153416	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	सार्वजनिक बांधकाम वि	416	117.96	49071.36	58	24128	24943.36
57	210,दि.23/6/2014	75901	1407		77308	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	भुयारी गटार	232	140.92	32693.44	58	13456	19237.44
58	214,दि.23/6/2014	100081	1855		101936	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	88	140.92	12400.96	58	5104	7296.96
59	214,दि.23/6/2014				0	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	200	140.92	28184	58	11600	16584
60	205,दि.23/6/2014	168256	3119		171375	दै.नवभारत, मुंबई व नाशिक	विदयुत विभाग	324	140.92	45658.08	58	18792	26866.08
61	205,दि.23/6/2014					दै.नवभारत, मुंबई व नाशिक	पाणीपुरवठा	224	140.92	31566.08	58	12992	18574.08
62	561,दि.11/12/201	56407.68	1046	563.68	56890	दै.नवभारत, मुंबई व	विदयुत	204	140.92	28747.68	58	11832	16915.68

	4					नाशिक	विभाग						
						एकूण्							805862

विवरणपत्र ब

सन 2014-2015 या कालावधीतील उदाहरणादाखल सेवाकर अदा केलेल्या रकमेचे विवरणपत्र							
जाहिरात कंपनीचे नाव मे. नाशिक ॲडव्हरटायंझिंग							
अ.क्र.	मा.आयुक्त मंजुरी आदेश क्र. दिनांक	रक्कमेच तपशील					
		जाहिरात रक्कम	सेवाकर	DISCOUNT	एकूण रक्कम	प्रसिध्द जाहिरात संख्या	वसुलपात्र सेवाकर
1	217,दि. 23/6/2014	90881	1684		92565	30	1684
2	1838,दि.4/3/2014	54608	1012		55620	15	1012
3	1653,ि्दि.20/2/2014	62954	1167		64121	15	1167
4	1652,दि.20/2/2014	91144	1689		92833	25	1689
5	206,दि.23/6/2014	59638	1106		60744	18	1106
6	486,दि.15/9/2014	142895	2650	1428	144117	28	2650
7	485,दि.15/9/2014	77663	1439	775	78327	25	1439
8	483,दि.15/9/2014	42088	780	421	42447	11	780
9	481,दि.15/9/2014	96799	1796	968	97627	17	1796
10	484,दि.15/9/2014	43264	803	432	43635	14	803
11	482,दि.15/9/2014	84884	1574	849	85609	17	1574
12	545,दि.5/12/2014	93351.68	1730	933.68	94148	20	1730
13	543,दि.5/12/2014	99108	1836	992	99952	10	1836
14	544,दि.5/12/2014	186663.68	3459	1866.68	188256	25	3459

15	207,दि.23/6/2014	30976	574	0	31550	11	574
16	564,दि.11/12/2014	95372.16	1768	955.16	96185	16	1768
17	562,दि.11/12/2014	97214.04	1803	972.04	98045	16	1803
18	563,दि.11/12/2014	82618.6	1532	828.6	83322	22	1532
19	565,दि.11/12/2014	79487.52	1473	795.52	80165	16	1473
20	1837,दि.4/3/2014	123733	2293	0	126026	35	2293
21	208,दि.23/6/2014	106144	1968	0	108112	27	1968
22	215,दि.23/6/2014	147372	2732		150104	22	2732
23	1654,दि.20/2/2014	281598	5221		286819	39	5221
24	9,दि.2/8/2014	15996	296	0	16292	7	296
25	244,दि.2/7/2014	82308	1525	0	83833	27	1525
26	247,दि.2/7/2014	143081	2653		145734	31	2653
27	249,दि.2/7/2014	126716	2349	1267	127798	22	2349
28	243,दि.2/7/2014	265256	4919		270175	34	4919
29	245,दि.2/7/2014	168488	3124		171612	31	3124
30	246,दि.2/7/2014	208241	3858		212099	32	3858
31	248,दि.2/7/2014	248071	4599		252670	37	4599
32	209,दि.23/6/2014	83142	1541		84683	14	1541
33	216,दि.23/6/2014	150623	2793		153416	30	2793
34	210,दि.23/6/2014	75901	1407		77308	8	1407
35	214,दि.23/6/2014	100081	1855		101936	18	1855
36	205,दि.23/6/2014	168256	3119		171375	17	3119
37	561,दि.11/12/2014	56407.68	1046	563.68	56890	14	1046

	एकूण						77173

DGPVJTM8301 (Ref No : 16, Hmm No : 122)

10 नाशिक महानगरपालिकेसाठी ऑनलाईन युपीएस व बॅटरीचे 3 वर्षांसाठी देखभाल व दुरूस्ती करून घेणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 04

मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4047424.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4047424.00/-

मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र/ आदेश दिसून आले नाही, विभागीय स्तरावर इतिहास पुस्तिका ठेवण्यात आलेली नाही, निविदेसोबत Payment of Schedule जोडण्यात आलेले नाही, दंडात्मक रकमेची तरतूद केलेली आहे परंतू प्रत्यक्षात कारवाई मात्र केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेचे वापरात असलेल्या विविध क्षमतेच्या युपीएस च्या 3 वर्षांच्या सर्वसमावेशक पध्दतीने मे. आर डी डेटा सिस्टिम, नाशिक यांचेसोबत दरकरार करणेत आला असून या कामाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

1	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्रमांक 665, दि. 12.2.2013
2	अर्थसंकल्पीय तरतूद	नमूद नाही
3	निविदा कालावधी	1- 31.8.2012 ते 12.9.2012 2- 30.10.2012 ते 6.11.2012
4	कामाचा कालावधी	3 वर्षे
5	मक्तेदार	मे आर डी डेटा सिस्टीम नाशिक
6	कार्यादेश क्रमांक	11, दि.4.3.2013
7	निविदा रक्कम	रु.40,47,424/-
8	तांत्रीक मंजूरी	घेण्यात आलेली नाही
9	देयकाचा तपशिल	मार्च 2015- रु.187,593/- (8वे धावते देयक)

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे-

1) निविदेमधील Special Condition of Contract या भागातील अट क्रमांक 9 - Method for Carryout the work नूसार Officer In Charge हा मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार करून देईल, त्यानंतर

मक्तेदाराने सदरचे काम करणे आवश्यक राहील, असे नमुद आहे. परंतू नस्तीमध्ये Officer In Charge ने मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र / आदेश दिसून आले नाही.

2) निविदेमधील सर्वसाधारण शर्तीमधील अट क्रमांक 8 Liquidated Damages नूसार मनपाचे Engineer in charge हे मक्तेदाराचे काम हे अक्रियाशिल आणि असमाधानकारक असल्यास 10 दिवसाची कारणदर्शक सुचना मक्तेदारास बजावेल आणि त्यामध्ये सत्यता आढळल्यास मंजूर कामाच्या 10 टक्केपर्यंत रकमेचा दंड आकारू शकेल, असे नमूद आहे. सदर कामासाठी विभागीय स्तरावर इतिहास पुस्तिका ठेवण्यात आलेली नाही त्यामुळे मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही केली किंवा कसे? याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

3) सदर कामासाठी विभागीय स्तरावर इतिहास पुस्तिका ठेवण्यात आलेली नाही, संबंधित मक्तेदाराने दिलेल्या अहवाल्याच्या आधारे संबंधितांना अदायगी करणेत येते.

4) सदर निविदेसोबत Payment of Schedule जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे मक्तेदाराला कशाच्या आधारे कधी अदायगी करणेत आली, हे समजू शकले नाही.

CCFNKKM8401 (Ref No : 83, Hmm No : 134)

11 माध्यमिक शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे दोन सेवापूस्तके परीरक्षित करणेबाबतची व इतर अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 5

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

एका कर्मचा-यासाठी दोन मुळ सेवापूस्तके परीरक्षित करण्याबाबत कोणतीच तरतुद नसतांना नाशिक महानगरपालिका संचलित अनुदानीत माध्यमिक शाळेच्या आस्थापनेअंतर्गत असे दोन प्रकारची सेवापूस्तके परीरक्षित केलेले आहेत, मनपा स्तरावर सदर देयकांची तपासणी केली जात नाही, 6 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हप्तेसूध्दा रोखीने अदा केलेले आहेत, सेवापुस्तकामधील नोंदी अपूर्ण आहेत.

वित्त विभाग पत्रक क्रमांक सेवापु-1097/प्र.क्र.10/97/सेवा-6, दिनांक 11 नोव्हेंबर 1997 नुसार मुळ सेवापूस्तक परीरक्षित करणेची तरतुद आहे परंतु एका कर्मचा-यासाठी दोन मुळ सेवापूस्तके परीरक्षित करण्याबाबत कोणतीच तरतुद नसतांना नाशिक महानगरपालिका संचलित अनुदानीत माध्यमिक शाळेच्या आस्थापनेअंतर्गत असे दोन प्रकारची सेवापूस्तके परीरक्षित केलेले आहेत.

नाशिक महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळेच्या आस्थापने अंतर्गत परीरक्षित केलेल्या मुळ सेवापूस्तकात शासनस्तरावरून अदा होणारे व महानगरपालिका स्तरावर अदा होणारे वेतननिश्चीती बाबतच्या सर्व

नोंदी उदा.चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार केल्या गेलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी महानगरपालिका स्तरावर केलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना अदा होणारे वेतन हे बरोबर असल्याची खात्री करता येत नाही. प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) वेतनदेयके ही मुख्याध्यापक तयार करतात, परंतू मनपा स्तरावर सदर देयकांची तपासणी केल्याचे दिसून आलेले नाही. मनपा स्तरावर वेतन देयकांची तपासणी होणे आवश्यक आहे.

2) मनपाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना उन्नत वेतनश्रेणीत वेतन अदा करत असल्याने त्या अनूषंगाने 6 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हप्तेसूध्दा रोखीने अदा केलेले आहेत. याबाबत सन 2012-13 या कालावधीच्या केलेल्या लेखापरिक्षण अहवालामधील क्रमांक 203 अन्वये आक्षेप नोंदविण्यात आलेला होता.

3) त्याचप्रमाणे मनपाने सेवानिवृत्ती विषयक लाभ जसे अंशराशीकरण, निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्तीवेतन, रजा रोखीकरण हे सुध्दा उन्नत वेतनश्रेणीमध्ये अदा केलेले आहे.

4) ज्याअर्थी शिक्षक आणि कर्मचारी दरमहा दोनवेळेस वेतन घेतात, त्याअर्थी त्यांचे वेतनामधून आयकरसुध्दा वसूल होणे क्रमप्राप्त आहे. परंतू, महानगर पालिकेने आस्थापनेवरील कर्मचा-यांची आयकर, किंवा इतर कपाती वसुल केल्याचे दिसून येत नाही.

5) शिक्षक/शिक्षत्तेर कर्मचा-यांच्या वेतन देयकात घर बांधणी अग्रीमाचे हप्ते कपात केलेले आहेत. परंतु वेतन देयकात अग्रीमाचा कितवा हप्ता एकूण हप्ता संख्यामधून कपात केला याचा उल्लेख नसल्याने शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी किती घर बांधणी अग्रीम घेतले व ते कोणत्या वित्त संस्थेकडून घेतले याची खात्री करता आलेली नाही. वास्तविकता महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 मधील तरतुदी नुसार सेवेशी संबंधीत सर्व नोंदी सेवा पुस्तकात नोंदणे आवश्यक असतांना घर बांधणी अग्रीमाची महत्वाची नोंद सेवा पूस्तकात न घेण्याची अनियमितता केलेली आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 78, Hmm No : 103)

12 सन 2014-2015 मध्ये महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसूली उत्पन्नाच्या 5% तरतूद खर्च करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्याकरिता महसूली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम महानगरपालिकेने राखून ठेवलेली नाही तसेच मनपाने राखून ठेवलेली रक्कम गरजू व पात्र महिलांना सक्षम करण्याकरिता खर्च केली नसल्यामुळे शासनाचा गरजू व पात्र महिलांना या योजनेमार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्य सन 2014-2015 या कालावधीतील महिला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिला व बालकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.जिईम 1793/1198/नवि-14, मंत्रालय मुंबई दिनांक 14 जुलै 1993 नुसार एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या 5% रक्कम राखून ठेवून समितीच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

त्यानुसार मनपाचे सन 2014-2015 या कालावधीत एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम 272 कोटी 92 लाख असून महिला व बालकल्याण विभागासाठी 5 टक्के रक्कम 13 कोटी 64 लाख राखून ठेवणे आावश्यक असताना मनपाने 9 कोटी 7 लाख एवढी तरतूद केली आहे. तसेच महिला व बालकल्याण विभागास देण्यात आलेल्या तरतूदीतून खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

(रक्कम रूपयांत)

अ.क्र.	तपशील	केलेली तरतूद	झालेला खर्च	कमी झालेला खर्च
1	अंगणवाडी सकस आहार	20000000	10298081	9701919
2	महिला व बालकल्याण स्वयंरोजगार प्रशिक्षण व इतर कार्यक्रम	20000000	435500	19564500
3	अंगणवाडी फर्निचर व साहित्य खरेदी	500000	0	500000
4	आकस्मिक खर्च	100000	44787	55213
5	अंगणवाडी मानधन बील	44000000	40798104	3201896
6	समुपदेशन केंद्र चालविणे	100000	0	100000
7	महिला महोत्सव	6000000	198900	5801100
	एकूण	**90700000**	**51775372**	**38924628**

वरील तपशीलानुसार अंगणवाडी सकस आहार याकरीता 1 कोटी 3 तीन लाख व अंगणवाडी मानधन बील याकरीता 4 कोटी 7 लाख एवढा खर्च करण्यात आला आहे. परंतू महिला व बालकल्याण स्वयंरोजगार प्रशिक्षण व इतर कार्यक्रमाकरिता 2 कोटी एवढी तरतूद असताना केवळ 4 लाख 35 हजार एवढाच खर्च करण्यात आला आहे तसेच समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी 1 लाख तरतूद असताना खर्च निरंक करण्यात आलेला आहे व

महिला महोत्सव याकरिता 60 लाख तरतूद असताना केवळ 1 लाख 98 हजार एवढा खर्च करण्यात आलेला आहे. शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक संकिर्ण 2005/प्र.क्र. 255/05/नवि-20,मंत्रालय, मुंबई दिनांक 8/11/2010 नुसार मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे, महिलांसाठी समुपदेषक केंद्र चालविणे, हेल्पलाईन चालविणे, विधी केंद्र चालविणे, मुलींसाठी शाळेमध्ये क्रिडा स्पर्धा आयोजन करणे इत्यादी प्रकारच्या योजना हाती घेणे आवश्यक असताना महानगरपालिकेने सदर योजना प्रभावीपणे राबविलेल्या नाहीत, यामुळे शासनाचा गरजू व पात्र महिलांना या योजनेमार्फत सक्षम करण्याचा मुळ हेतू साध्य झालेला नाही तसेच 5 टक्के विहित करण्यात आलेला निधी केवळ योजना न राबविल्यामुळे शिल्लक राहिल्याचे दिसून येते, तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीप्रणे राबविणे आवश्यक आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 18, Hmm No : 126)

13 रमाई आवास (घरकुल) योजनेच्या अंमलबजावणीस होणारा विलंब व अखर्चित निधी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष : रमाई आवास योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 2100000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2100000.00/-

लेखापरीक्षणाच्या कालावधी पर्यत प्राप्त रूपये 256.20 लक्षापैकी केवळ 21 लक्ष निधी खर्च करण्यात आलेला असून उर्वरित रू 255.20 लक्ष निधी सन 2010-2011 पासून अखर्चित आहे. सन 2013-2014 पर्यत एकूण 509 लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उददीष्ट असतांना केवळ 21 घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. एकाही घरकुलाचे काम पूर्ण झालेले नाही. योजनेच्या अंमलबजावणीस प्रदीर्घ विलंब झालेला असून गरजू लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू न शकल्याने योजनेचा हेतू सफल झालेला नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/ प्र.क्र. 159/पावक-2, मंत्रालय, मुंबई दि.09/03/2010 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी रमाई आवास (घरकुल) योजना राबविण्यात येत आहे. नाशिक महानगरपालिकेस या योजनेसाठी वेळोवेळी उद्दीष्ट ठरवुन देण्यात आलेली असुन समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे दि.05/07/2014 च्या पत्रानुसार नाशिक महानगरपालिकेस सन 2009-2010 ते 2013-2014 साठी 509 उदिष्टे देण्यात आलेली आहेत. नस्तीतील अहवालावरून लेखापरीक्षणाच्या वेळी सदर योजनेची स्थिति खालील प्रमाणे आहे.

उद्दीष्ट	मंजुर घरकुले	पुर्ण घरकुले	प्रगती पथावर	अदयाप सुरू न झालेली	प्राप्त निधी रू.लक्ष	खर्च निधी रू.लक्ष	शिल्लक निधी रू.लक्ष
509	21	0	21	--	256.20	21	235.20

सदर योजनेसाठी लाभार्थ्यास रू.2 लक्ष इतके अनुदान दिले जाणार असुन घराचे बांधकाम सूरु करतांना 50 टक्के, 50 टक्के निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर 40 टक्के व घराचा ताबा घेतांना आणि सक्षम प्राधिका-यांनी पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर 10 टक्के निधी वितरीत करावयाचा आहे. लेखापरीक्षणाच्या वेळपर्यंत 21 लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मार्च 2015 पर्यंत एकाही लाभार्थ्यास लाभ देण्यात आलेला नाही. लेखापरीक्षणाच्या वेळपर्यंत प्राप्त निधी रू.256.20 लक्षापैकी केवळ रू.21 लक्ष निधी खर्च करण्यात आलेला आहे. उर्वरित रू.255.20 लक्ष निधी सन 2010-11 पासुन अखर्चित आहे.

2) नाशिक महानगरपालिकेस सन 2013-14 पर्यंत एकूण 509 लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दीष्ट असुन सध्या केवळ 21 घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. योजना सूरू होवुन प्रदीर्घ कालावधी उलटुनही एकाही घरकुलाचे बांधकाम पुर्ण होवु शकलेले नाही.

3) रमाई आवास योजनेच्या दि.12/09/2012 च्या बैठकीतील इतिवृत्तात प्राप्त 93 अर्जापैकी 15 अर्ज परीपूर्ण आढळल्याची नोंद आहे. तसेच दि.05/10/2013 च्या बैठकीत प्राप्त 345 अर्जापैकी शासन निर्णयाच्या निकषाप्रमाणे छाननी केली असता 27 लाभार्थी प्रात्र ठरले असल्याने नियमाप्रमाणे देय रक्कम लाभार्थ्यांना देणे बाबत निर्णय घेण्यात आला. तथापि, महानगरपालिके कडून मार्च 2016 मध्ये अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आला. यावरून पात्र लाभार्थ्यांनाही लवकर लाभ देण्यासंदर्भात महानगरपालिकेकडून पुरेशा गांभिर्याने कार्यवाही झालेली नाही.

4) शासन निर्णय दि.09/03/2010 मुद्दा क्र.4अ अन्वये "दिनांक 01/01/1995 या राज्यपशासन/ महानगरपालिका / नगरपालिका / स्थानिक स्वराज्य0संस्था / एम एम आरडीए/ शासनाचे उपक्रम यांच्या जमिनीवर अतिक्रमण करून राहत असलेले व दिनांक 01/01/1995 रोजी ज्यांचे घरकुल/ निवासस्थान उपरोक्त जमिनीवर असल्यांस आणि त्यांना संरक्षित झोपडपट्टीदार म्हणून संरक्षण प्राप्त असल्यास अशा लाभार्थ्यांना देखील या योजनेत समाविष्ट केले जाईल. भविष्यात झोपडपट्टीवासीयांचे पात्रता निकषात बदल झाल्यास त्याबाबत लाभार्थीची पात्रता निश्चित करून घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा. अशी तरतुद आहे. रमाई आवास योजनेच्या दि.05/10/2013 च्या बेठकीत, प्रत्यक्षात अर्जाची छाननी करतांना अन्य पात्र निकषांबरोबर हा निकष तपासल्याचे दिसत नाही त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांची संख्या वाढल्याचो दिसते असे नमुद करून झालेल्या 345 अर्जांची या निकषाचे आधारे परत तपासणी करून माहीती सादर करावी, असा निर्णय घेण्यात आला. तथापि, विभागाने उपरोक्त निकषाच्या अधारे तपासणी करून अहवाल समितीस सादर केलेला दिसत नाही.

नस्तीवरील अहवालावरून सदयस्थितीत एकुण 1216 अर्ज प्राप्त आहेत. या अर्जांचीही उपरोक्त निकषाच्या आधारे तपासणी होणे आवश्यक आहे.

5) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र क्र.रआयो/2014/प्र.क्र.-59/बांधकामे दि.01/07/2014 अन्वये रमाई आवास योजनेच्या खात्यात जमा असलेले व्याजाची रक्कम शासनास परत करण्यास कळविण्यात आले होते. त्यानंतरही सदर व्याज जमा करण्यास महानगरपालिकेस वेळोवेळी कळविण्यास आले. तथापि, महानगरपालिकेने दि.15/06/2015 पर्यंतचे व्याज रक्कम रू.50,33,667/- चलन क्र.782 दि.10/07/2015 अन्वये शासनास विलंबाने जमा केलेले आहे. त्यापुढील कालावधीत जमा असलेल्या व्याजाबाबत शासनाकडुन मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) शासन निर्णय दि.09/03/2010 च्या मुद्दा क्र.15 नुसार घरकुल निर्माण समिती दर महिन्याला किमान एकदा घरकुल योजनेचा आढावा घेऊन योजनेची अंमलबजावणी सुलभ रितीने होण्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करील अशी तरतुद आहे. तथापि, त्या नुसार दर महिन्याला बैठका झालेल्या दिसुन येत नाही.

7) लाभार्थ्याने यापर्वी आय.एच.एस.डी.पी, इंदिरा आवास योजना, आदिवासी विभागाची घरकुल योजना, गृह निर्माण विभागाची घरकुल योजना व शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा अशी अट आहे. त्यावर नियंत्रणासाठी महानगरपालिकेने लाभार्थी नोंद वही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. या योजनेसाठी प्राप्त अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रे नस्तीस संलग्न केलेली नाहीत.

योजनेच्या अंमलबजावणीस अक्षम्य दिरंगाई व विलंब होत आहे. सदयस्थितीत या योजनेचा रक्कम रू. 235.2 लक्ष निधी अखर्चित आहे. शासनाच्या प्राप्त अनुदानाचा मर्यादित कालावधीत विहीत प्रयोजनाचे विनियोग होणे आवश्यक आहे. योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबामुळे गरजु लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू न शकल्याने योजनेचा हेतु सफल झालेला नाही.

DATDTBM7001 (Ref No : 130, Hmm No : 163)

14 राजीव आवास योजनेची अंमलबजावणी न झाल्याने शासन अनुदान विना वापर अडकून राहिल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष : राजीव आवास योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 4900000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4900000.00/-

महानगरपालिकेस सन 2011 मध्ये निधी प्राप्त होवूनही मे 2015 पर्यत प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या कामास सुरूवात केली नाही. महानगरपालिकेस निधी खर्च करण्यास व निधीचा विनियोग होवू शकत नसल्यास परत करण्याबाबत शासनाकडून कळविण्यात आले असतांनाही महानगरपालिकेने निधी परत केला नाही अथवा त्याचा विनियोग केला नाही. प्राप्त निधी सन 2011 पासून विनावापर अडकून राहिला आहे.

केंद्र शासनाने झोपडपट्टी मुक्त शहर ही संकल्पना साकारण्यासाठी राजीव आवास योजना सूरू केली होती. सदर योजनेचा 1) शहर झोपडपट्टी मुक्त करून नागरी गरीबांना मुलभूत तसेच सामाजिक सुध्दा योजनेचा लाभ व योग्य निवारा मिळणे याची खात्री करणे. 2) शहरातील घोषित व अघोषित शासकीय, निमशासकीय, मनपा व खाजगी जागेवरील झोपडपट्टयांचा समावेश करणे. 3) भविष्यात पुन्हा झोपडपट्टया निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेणे. हे उद्देश होते. सदर योजना दोन टप्प्यात कार्यान्वित केली जाणार होती.

1) प्रथम टप्प्यात सर्वेक्षण, क्षमताबांधणी, तांत्रिक कक्ष स्थापना व डी.पी.आर. तयार करणे.

(कालावधी सन 2011 ते 2013)

2) दुस-या टप्प्यात प्रकल्पाची अंमलबजावणी करणे (कालावधी 2013 ते 2017.)

या योजनेसाठी महानगरपालिकेस शासन निर्णय राआयो-2010/प्र.क्र.240/गृनियो-2 क्षेत्र मंत्रालय, मुंबई दि.15/02/2011 नुसार रू.49 लक्ष चे अनुदान प्राप्त झाले आहे. महापालिकेचे सर्वेक्षण कामाचे रू.251.23 लक्ष रूपयांचे अंदाजपत्रक केंद्र शासनास सादर करण्यात आलेले आहे. सदर योजनेच्या सर्वेक्षण कामाच्या रू.2.51 कोटी खर्चास व तांत्रिक कक्ष स्थापन करण्यास महासभा ठराव क्र.335 दि.14/12/2012 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. महानगरपालिकेच्या BSUP योजनेत PIU काम करणारे श्री भावेश जोशी व संजय उनवणे यांची शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राजीव आवास योजनेच्या तांत्रिक कक्षात करार तत्वावर, मानधनवार समावेश करून नियुक्ती करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाच्या दि.19/05/2015 च्या पत्रान्वये राजीव आवास योजना थांबविण्यात आलेली आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिकेस फेब्रुवारी 2011 मध्ये या योजनेसाठी निधी प्राप्त होवुनही मे 2015 पर्यंत प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या कामाला सुरूवात केली नाही. या प्राप्त निधीतुन दोन कर्मचा-यांच्या मानधनावर खर्च झालेला असुन उर्वरित निधी व त्यावरील व्याज अखर्चित पडुन आहे.

2) तांत्रिक कक्ष स्थापन करण्यासाठी एकुण 6 पदांची जाहीरात प्रसिध्द करून 2,3 व 4 मे 2013 रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्याचे नस्तीतील अहवालावरून दिसून येते. त्यापुढील कार्यवाही झालेली नाही. सदरची भरती प्रक्रिया प्रलंबित ठेवण्याबाबत कोणतिही कारणामिमांसा नस्तीत आढळून येत नाही. तसेच त्यास आयुक्त यांची मान्यताही घेतलेली नाही. सदर तांत्रिक कक्ष वेळीच स्थापन झाला असता तर योजनेच्या कामास गती मिळू शकली असती.

3) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे दि.03/07/2012 चे पत्र , प्रधान सचिव गृह निर्माण विभाग यांचे दि.17/08/2012 चे अर्धशासकीय पत्र, महाराष्ट्र शासनाचे पत्र दि.08/03/2013 अन्वये तसेच वेळोवेळी महानगरपालिकेस निधी खर्च करण्यास व निधीचा विनियोग होवू शकत नसल्यास तात्काळ परत करण्यास कळविण्यात आलेले होते. तथापि, महानगरपालिकेने सर्वेक्षणाच्या कामास सुरूवात केली नाही अथवा निधी परत केला नाही. त्यामुळे केंद्र शासनाचा निधी फेब्रुवारी 2011 पासुन विनावापर अडकुन राहिला आहे.

4) महानगरपालिकेच्या BSUP योजनत PIU काम करणारे श्री.भावेश जोशी व श्री.संजय उनवणे यांची शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राजीव आवास योजनेच्या तांत्रिक कक्षात करार तत्वावर, मानधनावर समावेश

करून नियुक्ती करण्यात आली मा.आयुक्त यांनी दि.12/11/2012 च्या टिपण्णी अन्वये पुर्वीची सूरू झालेली निवड प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या होत्या. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्यानंतर पुन्हा मा.आयुक्त यांची मान्यता घेवून श्री.भावेश जोशी यांना समाज विकास तज्ञ व श्री. संजय उनवणे यांना क्षमता बांधणी व प्रशिक्ष्ण तज्ञ या पदावर दि.03/12/2013 पासून मानधनावर नियुक्ती देण्यात आली. या कर्मचा-यांशी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांची नेमणुक दि.03/12/2013 पासुन राजीव आवास योजनेच्या कालावधी पर्यंत होती. नस्तीतील अहवालावरून राजीव गांधी योजना दि.19/05/2015 पासुन थांबविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचा सबंधित पदाचा कार्यकाल संपुष्टात येतो. मार्च 2015 पासुन या कर्मचा-यांचे मानधन मनपा निधीतून गलिच्छ वस्ती विभागाच्या स्थायी आस्थापना या लेखा शिर्षातून अदा झाल्याचे नस्तीतील अहवालावरून दिसते. सदर कर्मचा-यांना दि.19/05/2015 पासून पुढील कालावधीसाठी कोणत्या पदाचे मानधन देण्यात येते आहे याचा बोध होत नाही.

5) या योजनेचे सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी दि. 26/02/14 रोजी जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने सदर निविदा प्रक्रिया स्थगित करण्यात आली. तथापि सार्वत्रिक निवडणुकीची व मनपा प्रभाग पोट निवडणुकीची आचार संहिता संपुष्टात आल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नाही. त्यामुळे सर्वेक्षणाचे काम सुरु होवू शकले नाही.

6) केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाच्या दि.19/05/2015 च्या पत्रान्वये राजीव आवास योजना थांबविण्यात आलेली आहे. तसेच या पत्रान्वये राजीव आवास योजनेत मंजुर करण्यात आलेली पण प्रत्यक्षात काम सूरू न झालेल्या योजना रद्द समजण्यात याव्यात हे स्पष्ट करण्यात आलेले आहे. राजीव आवास योजनेच्या खात्यात शिल्लक रकमेबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेवुन पुढील कार्यावाही होणे आवश्यक आहे.

महापालिकेकडून राजीव आवास योजनेची अंमलबजावणी न झाल्याने गरजू लाभार्थी लाभ मिळण्यापासून वंचित राहिले असून योजनेचा उद्देश सफल होवु शकलेला नाही. महानगरपालिकेने योजनेची अंमलबजावणी न केल्याने केंद्र शासनाकडुन प्राप्त रू.49 लक्ष अनुदान प्रदीर्घ कालावधीसाठी विनावापर अडकुन राहिले आहे.

DATDTBM7001 (Ref No : 131, Hmm No : 164)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

15 बांधकाम विभागाकडील सातपूर विभागांतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 22

लेखा शीर्ष : रस्ते बांधणे म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 111183745.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 108837123.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2346622.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले.500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. डांबर दर फरकाची रक्कम चुकीची परीगणित केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. NP3 आर.सी.सी. पाईप महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करणेसाठी राखुन ठेवलेला असल्याने मक्तेदाराने सदरचे पाईप महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही. अंदाजपत्रकात चुकीचे स्पेसिफिकेशन नमूद केले. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या/ उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सातपूर बांधकाम विभागाकडील खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु. 11,11,83745/- इतका खर्च केला आहे.

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)

			दर		
1	सातपूर प्रभाग क्र.50मधील एक्स्लो पॉईट ते चुंचाळेगाव 18 मी डांबरीरस्ता रिसरफेसिंग करणे रु. 7060318/- सुधारित रु.7021825/-	23/42/2013 दि.01/10/2013	मे.एम.जी..नायर 6.40टक्के जादा दराने	2713	8491304
2	सातपूर नवीन प्र.क्र.50(जुना क्र.81) मधील जुना अंबडवाट रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे रु. 6625238/-	13/30/2013 दि.21/03/2013	मे.एम.टी.पाटील प्रा.लि.17.50 टक्के जादा दराने	2715	9558692
3	सातपूर विभाग नवीन प्र.क्र.21(जुना वार्ड क्र.49) मधील कामगार नगर येथील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे रु. 7895987/-	08/41/2013 दि.20/04/2013	मे. अनिल अंकुश काळे 7.11टक्के कमी दराने	1551	7317809
4	सातपूर प्र.क्र.50मधील म्हाडा वसाहत परिसरातील डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणे रु.7175210/-	23/06/2014 दि.26/08/2014	मे.सुनील शिंदे अॅड ब्रदर्स 36.80 टक्के कमी दराने	2891	4752381
5	सातपूर विभाग प्र.क्र.16 गंगापूर रोड भोसला गेट ते मते नर्सरी मुख्य रस्ता रीसरफेसिंग करणे रु.14465158/-	25/37/2013 दि.09/10/2013	मे.कैलाश किसन बिन्नर 6.80 टक्के जादा दराने	704	17551551
6	सातपूर प्र.क्र.50 मधील संजीवनगर विरारनगर परिसरातील रस्ते रुंदीकरणासाठी खडीकरण	34/41/2014 दि.04/02/2014	ऋषभ कंन्स. 38.77टक्के कामे दराने	2714	3462344

	करणे रु. 6437995/-				
7	सातपूर विभाग नवीन प्र.क्र.21(जुना वार्ड क्र.25) बनविहार कॉलनी गंगासागर परिसरातील खडीकरण रस्त्याचे डांबरीकरण करणे रु. 9368403/-	02/37/2013 दि.03/04/2013	आनंद कंन्स.प्रा.लि. 16 टक्के जादा दराने	2299	9368403
8	सातपूर विभाग प्र.16 मधील मते नर्सरी ते गोदावरी नदीच्या पुला पर्यंत 18 मी.रस्ता रुंदी करण करून विकसित करणे रु. 19575147/-	24/07/2014 दि.26/08/2014	मे.विनोद लूथरा ॲड असो. 3.35 टक्के जादा दराने	1187	20316676
9	सातपूर विभाग प्र.क्र.16मधील आसाराम बापू आश्रम, मते नर्सरी गंगाजल नर्सरी पर्यंत 24मी. डी.पी रस्ता विकसित करणे साखळी क्रमांक 0ते 585 रु. 24207347/-	21/05/2014 दि.26/08/2014	मे. ए.एस.सोनजे असोसिएट्स	2298	24055110
10	सातपूर विभाग प्र.क्र.18 जाधवसंकुल मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे रु. 8293317/-	28/36/2013 दि.25/11/2013	मे.सुनील शांताराम धामणे 22.99टक्के कमी दराने	2658	6319475
	एकूण				111183745

उपरोक्त 1 ते 10 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु. 111183745/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का

रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि तसे विमापत्र उपरोक्त अनुक्रमांक 4 वरील कामाचे नस्तीसोबत जोडलेले नाही. तथापि देयकातून त्यासाठीची रक्कम रु. 44967/- कपात केली आहे. ती कार्यादेश रक्कम रु. 4752381/- च्या 1 टक्के दराने रु.47524/- कपात करणे आवश्यक होते कमी कपात रक्कम रुपये 2557/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक आहे.

2)महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	निविदा दर टक्के	रॉयल्टी व निविदा दराने प्रदा रक्कम रु.
1	सातपूर प्रभाग क्र.50मधील एक्स्लो पॉईट ते चुंचाळेगाव 18 मी डांबरीरस्ता रिसरफेसिंग करणे.	3,6,9,11 व 14	1521.31	70.67	107511	6.40 टक्के जादा	6881
2	सातपूर नवीन प्र.क्र.50(जुना क्र.81) मधील जुना अंबडवाट रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे.	4,7,10 व 11	1201.68	70.67	84923	-----	----
3	सातपूर विभाग नवीन प्र.क्र.21 (जुना वार्ड क्र.49) मधील कामगार नगर येथील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे.	5,11,12,18 व 19	1750.23	70.67	123689	------	------
4	सातपूर प्र.क्र.50मधील म्हाडा	----	8636.56	7067	610346	-----	---

	वसाहत परिसरातील डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणे						
5	सातपूर विभाग प्र.क्र.16 गंगापूर रोड भोसला गेट ते मते नर्सरी मुख्य रस्ता रीसरफेसिंग करणे.	3 व 8	476.54	70.67	33677	---	------
6	सातपूर प्र.क्र.50 मधील संजीवनगर विराटनगर परिसरातील रस्ते रुंदीकरणासाठी खडीकरण करणे.	5,8,9 व 13	7337.47	70.67	518539	-----	-------
7	सातपूर विभाग नवीन प्र.क्र.21(जुना वार्ड क्र.25) बनविहार कॉलनी गंगासागर परिसरातील खडीकरण रस्त्याचे डांबरीकरण करणे	5,12,14,19 व 20	729.519	70.67	51555	16 टक्के जादा	8249
10	सातपूर विभाग प्र.क्र.18 जाधव संकुल मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे	5,8,11,13 व 16	3706.72	70.67	261968	------	----------
	एकूण				1792208		15130

उपरोक्त वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 1792208/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

3) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त वरील कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा

दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून अनुक्रमांक 1 व 7 कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु.15130/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

4) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने

तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
2	सातपूर नवीन प्र.क्र. 50 (जुना क्र.81) मधील जुना अंबडवाट रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे.	582.95	49.40	24.20	25.20	14692	(+) 2571	17261
3	सातपूर विभाग नवीन प्र.क्र.21 (जुना वार्ड क्र.49) मधील कामगार नगर येथील रस्त्यांचे	612.19	49.40	24.20	25.20	15427	(-)1097	14330
6	सातपूर प्र.क्र.50	5410.67	64.30	30.00	34.30	185586	(-)71952	113634

	मधील संजीवनगर विरारनगर परिसरातील रस्ते रुंदीकरणासाठी खडीकरण करणे.							
10	सातपूर विभाग प्र.क्र.18 जाधव संकुल मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे	3644.68	64.30	30.00	34.30	125013	(-)28740	96273
	एकूण							241498

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 2,3, 6 व 10 वरील कामांसाठी रक्कम रु.241498/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

5) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 2 व अनुक्रमांक 7 चे कामासाठीचे अंदाजपत्रकातील डांबरी कामाचे दर निश्चित करतांना त्यात डांबर मुळदर व रु.780 प्र.मे टन वाहतूक खर्च यांवर 4 टक्के दराने जकात कर समाविष्ट केला होता. दिनांक 23/05/2013 रोजी पासून जकात कर रदद झाल्याने त्यानंतर च्या कालावधी मध्ये केलेल्या डांबर कामासाठीचे प्रदान करतांना वापरलेल्या एकूण डांबरा साठी 4 टक्के दराने जकात रक्कम कपात करून घेण्यात आलेली आहे. तथापि तशी कपात करतांना डांबराच्या मूळ खरेदीदरात रु.780 प्र.मे.टन दराने वाहतूक खर्च समाविष्ट न करताच जकातीची आकारणी केल्याचे दिसून येते सबब अनुक्रमांक 2 वरील कामासाठी 98.56 मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु.76877/- वर 4 टक्के दराने रक्कम रु.3075/- व अनुक्रमांक 7 वरील कामासाठी 100.12 मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु.78094 /- वर 4 टक्के दराने रक्कम रु. 3124 /- असे एकूण रक्कम रु. 6199/- ची कमी कपात झालेली आहे.

6) उपरोक्त अनुक्रमांक 1 च्या कामातील बाब क्रमांक 14 “75mm BBM on WBM” साठी रु. 253/- प्र.चौ.मी. दराने एकूण परिमाण 508.18 चौ.मी. साठी रक्कम रु. 128569/- चे प्रदान केले आहे. तथापि डांबर दर 45372/- व दरसूची 2011-12 नुसार केलेल्या दरपृथक्करण शीट नुसार त्यासाठी रु. 213/- प्र.चौ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते सबब रु. 40/- प्र.चौ.मी. जादा दराने 508.18 चौ.मी. साठी रक्कम रु. 20327/- व निविदा 6.40टक्के जादा दराने रु. 1301/- असे एकूण रक्कम रु. 21628/- चे जादा प्रदान झालेले आहे.

7) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामा रुपये 10 लाखापर्यंत साठी रु. 100/- चे मुद्रांकावर व रु 10 लाखाचे वर असेल तर रु.100/- अधिक 10लाखाचे पुढील प्रत्येक लाखासाठी रु.100/- अधिकतम रु.5 लक्ष च्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्यानुसार अनुक्रमांक 4 वरील कामाचा करारनामा रु. 3900/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना तो रु. 120/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे. सबब रु. 3780/- कमी मुद्रांक

शुल्क वसूल करुन "0030 मुद्रांक व नोंदणी" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त अनुक्रमांक 5 वरील कामातील बाब क्रमांक 10 " थर्मोप्लास्टिक पेंट " चे एकूण परिमाण 1189.20 र.मी. साठी रु. 53.60 प्र.र.मी. दराने रक्कम रु. 63741/- चे प्रदान केले आहे तथापि सदर एकूण परिमाणा मध्ये 927.00र.मी. हे झेब्रा क्रॉसिंग चे असुन त्या साठी रु. 44.40 दराने प्रदान करणे आवश्यक होते सबब रु. 9.20 प्र र.मी. जादा दराने रक्कम रु. 8528/- व निविदा 6.80 टक्के जादा दराने रु. 580/- असे एकूण रक्कम रु. 9108/- चे जादा प्रदान झाले आहे. तसेच अनुक्रमांक 7वरील कामातील बाब क्रमांक 26 मध्ये झेब्रा क्रॉसिंग चे 99.00र.मी. साठी 9.30 जादा दरणे रक्कम रु. 921/- व निविदा 16 टक्के जादा दराने रु. 147/- असे रु. 1068/- चे जादा प्रदान झालेले आहे. सबब एकूण रक्कम रु. 10176/- चे जादा प्रदान झालेले आहे.

9) उपरोक्त अनुक्रमांक 8 वरील कामाचे बाब क्रमांक 22 "TMT steel" 38.62 मे.टन वापरले आहे तथापि त्या साठी कोणताही चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे त्याची गुणवत्ता प्रमाणित झालेली नाही. तसेच दरपृथक्करण करतांना रु.283.57प्र.मे.टन गुणवत्ता चाचणी करिता समाविष्ट केलेले असल्याने त्यानुसार 38.62 मे.टन साठीची रक्कम रु. 10951/- व निविदा 3.35 टक्के जादा दराने रु. 367/- असे एकूण रक्कम रु. 11318/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

10)उपरोक्त नमूद अनुक्रमांक 8 वरील कामाचे बाब क्रमांक 6 "providing earthwork embackment" साठी रु. 482.90 प्र.घ.मी. दराने तरतूद करून प्रदान केलेले आहे. तथापि सदर बाबीचे नमूद स्पेसिफिकेशन हे दरसूची आयटम क्रमांक 1101 चे असून त्यानुसार रु.481.90प्र.घ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते सबब एकूण परिमाण 14402.76 घ.मी. साठी रक्कम रु. 14403/- व त्यावर निविदा 3.35 टक्के जादा दराने रु. 483/- असे एकूण रक्कम रु. 14887/- चे जादा प्रदान झालेले आहे.

11) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 9 वरील कामाचे बाब क्रमांक 6 " "providing earthwork embackment" साठी रु. 482.90 प्र.घ.मी. दराने तरतूद करून प्रदान केलेले आहे. तथापि सदर बाबीचे नमूद स्पेसिफिकेशन हे दरसूची आयटम क्रमांक 1101 चे असून त्यानुसार रु.481.90प्र.घ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते सबब एकूण परिमाण 18018.53 घ.मी. साठी रक्कम रु. 18019/- चे जादा प्रदान झालेले आहे.

12) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 10 वरील कामाचे बाब क्रमांक 1 "Breaking and Removing existing asphalt pavement" साठी रु. 652.20र.घ.मी. दराने प्रदान केले आहे तथापि सदर चा दर हा सिमेंट पेव्हमेंट साठीचा असून डांबर पेव्हमेंट साठी दरसूची 2011-12 मधील आयटम 1206 नुसार दरपृथक्करणासह रु. 601.90 दराने प्रदान करणे आवश्यक होते. सबब रु. 63.30प्र.घ.मी. जादा दराने एकूण परिमाण 552.54घ.मी. साठी रक्कम रु. 34976/ व त्यामधून निविदा 22.99टक्के कमी दराने रु. 8041/- वजाजाता रक्कम रु. 26935/- चे जादा प्रदान झालेले आहे.

13) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 10 वरील कामाचे बाब क्रमांक 2 नुसार. "हार्ड मुरूम व बोल्डर" चे 1770.86घ.मी खोदकाम केलेले आहे. सदर खोद्कामातून उपलब्ध साहित्य भराव कामा साठी वापरण्यात योग्य नसल्याबाबत चे चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे ते वापरण्यास योग्य नसल्याचे प्रमाणित होत नाही. असे असतांना सदर उपलब्ध झालेला मुरूम चा वापर न करता तो बाब क्रमांक 4नुसार ते साहित्य वाहून टाकण्यात आले असून त्या साठी रु.134.40प्र.घ.मी. दराने रु. 238004/- व त्यामधून निविदा 22.99 टक्के कमी दराने रु. 54117/- वजाजाता रक्कम रु. 182287/- चे अनावश्यक प्रदान झाल्याचे दिसून येते.

14) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1 ते 10, वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत.

15) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 3, 4 व 7 वरील कामासाठी वापरण्यात आलेले NP3 आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही, सबब शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

16) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1,4,5, चे कामाचे अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

17) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

18) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

19) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 5,8 व 9 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

20) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

21) उपरोक्त अनुक्रमांक 2 च्या कामासाठी मक्तेदाराचा मुदतवाढ मागणी अर्ज नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही.

22)उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1, 2,3 व 4 कामांच्या मोजमाप पुस्तिका अनुक्रमे क्रमांक 2713, 2715, 1551 व 2891

लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	2346622
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	108837123
एकूण	:-	रु.	111183745

DATSWPM6603 (Ref No : 85, Hmm No : 03)

16 बांधकाम पंचवटी विभागांतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

लेखा शीर्ष : रस्ते बांधणे म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 81107875.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 78241955.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2865920.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले. 500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. दबाई साठी तसेच बोल्डर पुरवठा साठी जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या/ उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचवटी बांधकाम विभागाकडील रस्ते बांधणे या लेखाशीर्षा अंतर्गत केलेल्या खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु. 81107875/-इतका खर्च केला आहे.

अ. क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	पंचवटी प्रभाग वार्ड क्रमांक 15मधील देवी चौक ते अमरधाम पर्यंत तसेच शेटे मळा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. रु.13798185/-	32/15/2013 दि.03/07/2013	मे.आर. आणि बी. इंफ्रा.प्रोजेक्ट प्रा.लि. 15.75 टक्के कमी दराने	977 व 2917	11027932
2	पंचवटी विभाग नवीन प्र.क्र.2 (जुना वार्ड क्र.13) वरवंडी रस्ता रुंदीकरण करून खडीकरण करणे रु. 12052799/-	10/97/2013 दि.07/05/2013	मे.यशश्री कंन्सट्र. 30.06 टक्के कमी दराने	2192	8418325
3	पंचवटी विभाग वार्ड क्र.15	119/379/2014 दि.03/03/2014	मे. सुंदराई कंन्सट्र.	2414	3180606

	मधील जैसवाल भवन समोरील चौक तसेच संत ज्ञानेश्वर अभ्यासिका चौक व देवीचौक येथे पेव्हरब्लॉक बसविणे रु.8628354/-		37.77 टक्के कमी दराने		
4	पंचवटी विभाग वार्ड क्र.15 मधील टकलेनगर उद्यान परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. रु. 15717785/-	30/421/2013 दि.13/03/2013	मे.सुनिल शिंदे आणि ब्रदर्स 12.74 कमी दराने	204 व 2188	13431575
5	पंचवटी विभागातील म्हसरूळ आडगांव लिंक रस्त्याचे दिंडोरी रोड ते म्हसरूळ सं.नं.119प	59/213/2013दि.22/10/2013	मे.अनिलकुमार कंन्सट्र. 10.51 टक्के कमी दराने	2912	17379271

	र्यंत अस्तरीकर ण करणे रु.1459625 2/-				
6	पंचवटी वार्ड क्र.15 मधील (नवीन प्र.क्र.11) काट्या मारुती चौक ते देवी चौक पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकर ण करणे. रु. 7768917/-	28/28/2013 दि.07/03/2013	मे.ऋषभ कंन्सट्र. 14.77 टक्के कमी दराने	204 व 2070	649263 4
7	पंचवटी प्र.क्र.5 मधील हरिहरनगर, गुलमोहर नगर, प्रभातनगर इत्यादी परिसरातील रस्ते मजबुतीकर ण करून डांबरीकरण करणे रु. 4139426/-	120/375/2014 दि.04/03/2014	मे.विनोद लूथरा आणि असो. 2.87 टक्के जादा दराने	1486	446970 5
8	पंचवटी विभागातील	53/174/2013 दि.22/10/2013	मे.अशोक एस.सोनजे	2189	801659 2

	मखमलाबाद रस्ता ते कॅनाल रोड फडोळ मळ्या कडे जाणारा रस्ता अस्तरीकरण करणे रु. 6530959/-		15.51टक्के जादा दराने		
9	पंचवटी प्र.क्र.5मधील प्रभातनगर परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे रु. 8104593/-	96/279/2014 दि.22/01/2014	मे.के.के.बिन्नर 2.90 टक्के जादा दराने	1737	8691235
	एकूण				81107875

उपरोक्त 1 ते 9 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.81107875/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1)नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि तसे विमापत्र उपरोक्त अनुक्रमांक 7 वरील कामाचे नस्तीसोबत जोडलेले नाही. तसेच देयकातूनही त्यासाठीची 1 टक्का रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम रुपये 42553/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक आहे.

2)महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	कपात केलेली रक्कम रु.	रॉयल्टी कमी कपात रक्कमरु.
1	पंचवटी प्रभाग वार्ड क्रमांक 15मधील देवी चौक ते अमरधाम पर्यंत तसेच शेटे मळा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.	5,6,11,12 व 18	3608.78	70.67	255032	-----	255032
2	पंचवटी विभाग नवीन प्र.क्र.2 (जुना वार्ड क्र.13) वरवंडी रस्ता रुंदीकरण करून खडीकरण करणे	7,11,14, 17 व 18	18851.87	70.67	133226	232292	1099970
3	पंचवटी विभाग वार्ड क्र.15 मधील जैसवाल भवन समोरील चौक तसेच संत ज्ञानेश्वर अभ्यासिका चौक व देवीचौक येथे पेव्हरब्लॉक बसविणे.	5,8,9,14 18 व 20	1278.02	70.67	90138	7607	82531
4	पंचवटी विभाग वार्ड क्र.15 मधील टकलेनगर उद्यान	4,10,11,16,17 व 21	3668.66	70.67	259264	----	259264

	परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे.						
5	पंचवटी विभागातील म्हसरूळ आडगांव लिंक रस्त्याचे दिंडोरी रोड ते म्हसरूळ सं.नं.119पर्यंत अस्तरीकरण करणे.	1 व 4	1148.88	70.67	81192	----	81192
6	पंचवटी वार्ड क्र.15 मधील (नवीन प्र.क्र.11) काट्या मारुती चौक ते देवी चौक पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	5,6,11, 12 व 18	1864.13	70.67	131738	---	131738
7	पंचवटी प्र.क्र.5 मधील हरिहरनगर, गुलमोहर नगर, प्रभातनगर इत्यादी परिसरातील रस्ते मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे.	4,6, 7 व 12	1381.62	70.67	97638	----	97638
8	पंचवटी विभागातील	1 व 4	1669.98	70.67	118017	-----	118017

	मखमलाबाद रस्ता ते कॅनाल रोड फडोळ मळ्या कडे जाणारा रस्ता अस्तरीकरण करणे.						
9	पंचवटी प्र.क्र.5मधील प्रभातनगर परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे.	5 व 8	695.10	70.67	49123	-----	49123
	एकूण						2174505

उपरोक्त 1 ते 9 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने 1 ते 9 कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 2174505/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

3) सदर अनुक्रमांक 5 वर नमूद कामासाठीचे अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.70 टक्के जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आली असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने रु. 5440/-प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना रक्कम रु.5440/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

4) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
1	पंचवटी प्रभाग वार्ड क्रमांक 15मधील देवी चौक ते अमरधाम पर्यंत तसेच शेटे मळा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.	1814.93	49.00	24.00	25.00	45373	(-)7146	38227
2	पंचवटी विभाग नवीन प्र.क्र.2 (जुना वार्ड क्र.13) वरवंडी रस्ता रुंदीकरण करून खडीकरण करणे	12114.68	49.00	24.00	25.00	302867	(-) 91042	211825
2	====''== गटार खोदकाम	1363.34	71.00	30.00	41.00	55897	(-) 16803	39094
	एकूण							289146

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 1 व 2 वरील कामांसाठी रक्कम रु. 289146/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

5) उपरोक्त अनुक्रमांक 1,3,4 व 6 वर नमूद कामाचे बाब क्र.1 "डांबरीरस्ता फोडणे " या बाबीत निघालेले साहित्य 2 कि.मी. वाहून टाकणे हे काम समाविष्ट आहे. तथापि खोदकामातून उपलब्ध झालेले साहित्य 4 कि.मी. वाहून टाकावयाचे असल्याचे नमूद करून उर्वरित 2 कि.मी. साठी रु. 106/-प्र.घ.मी. 1 व 3 साठी तसेच 4 साठी 3 कि.मी. रु. 119/- व अनुक्रमांक 6 चे कामासाठी रु.116/- दराने अतिरिक्त तरतूद करून प्रदान केले आहे. तथापि दरसूची सूचना

17(c) नुसार एकूण 4 कि.मी. च्या वाहतूक खर्चा च्या रक्कमेतून 2 कि.मी. वाहतूक खर्चा ची समाविष्ट रक्कम वजाकरून उर्वरित दराने अतिरिक्त वाहतुकी साठी प्रदान करणे आवश्यक होते. तथापि तसे न करता उर्वरित 2 कि.मी. साठी 2 कि.मी. वाहतुकीचे दराने स्वतंत्र तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास चुकीचे व जादा प्रदान झाले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	डांबर खोदकामाचे साहित्य वाहतूक एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा 2/3 कि.मी. चा दर रु.प्र.घ.मी.	देय दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
1	पंचवटी प्रभाग वार्ड क्रमांक 15मधील देवी चौक ते अमरधाम पर्यंत तसेच शेटे मळा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.	1644.03	106.00	26.00	80.00	131522	(-) 20715	11080
3	पंचवटी विभाग वार्ड क्र.15 मधील जैसवाल भवन समोरील चौक तसेच संत ज्ञानेश्वर अभ्यासिका चौक व देवीचौक येथे पेव्हरब्लॉक	847.17	106.00	26.00	80.00	67774	(-) 25598	42176

	बसविणे.							
4	पंचवटी विभाग वार्ड क्र.15 मधील टकलेनगर उद्यान परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे.	1353.55	119.00	38.00	81.00	109638	(-) 13968	95670
6	पंचवटी वार्ड क्र.15 मधील (नवीन प्र.क्र.11) काट्या मारुती चौक ते देवी चौक पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	1149.64	116.00	29.00	87.00	100019	(-) 14773	85246
	एकूण							333899

सबब वरील कामाचे डांबर पेव्हमेंट वाहतुकीसाठी चुकीच्या व जादा दराने प्रदान केल्याने रक्कम रु. 333899/- चे जादा प्रदान झालेले आहे.

6) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2 चे कामाचे बाब क्रमांक 7 “Earthwork embackment” साठी रु. 425/- प्र.घ.मी. दराने एकूण परिमाण 3588.69 घ.मी. साठी रक्कम रु.1525193/- चे प्रदान केले आहे. सदर बाबीचे अंदाजपत्रकात नमूद स्पेसिफिकेशन नुसार दरसूची 2009-10 मधील आयटम क्रमांक 20/276 नुसार रु. 418/-प्र.घ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते सबब रु.7.00 प्र.घ.मी. जादा दराने परिमाण 3588.69 घ.मी. साठी रु. 25120/- व निविदा 30.06 टक्के कमी दराने रु. 7551/- वजाजाता रक्कम रु. 17570/- चे अतिप्रदान झालेले आहे.

7) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2 चे कामाचे बाब क्रमांक 7 साठी Standard specification for road work – आर.डी. 12.10 नुसार “ mode of mesurment for earthwork embackment “ नुसार एकूण परीमानातून 5 टक्के दबाई घट वजा करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नसल्याने तशी 5 टक्के वजावट केल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

8) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 6 वरील कामाचे बाब क्रमांक 19 " TMT Steel" चे एकूण परिमाण 8.379 मे.टन साठी रु.56966/- प्र.मे.टन दराने रक्कम रु. 477318/- चे प्रदान केलेळे आहे. दरसूची सर्वसाधारण सूचना नुसार अंदाजपत्रका साठी दरपृथक्करण करतांना दरसूचीतील दरात बिल्डींग कामासाठी 0.75 टक्के व रस्ता व इतर कामासाठी 0.5 टक्के व vat ची रक्कम समाविष्ट करावयाची आहे. सदरचे काम रस्ताचे असल्याने 0.5 टक्के प्रमाणे रु.270.00 vat ची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक असतांना ती 0.75 टक्के दराने रु. 405.56 समाविष्ट केली ती रु. 135.56 ने जादा असल्याने एकूण परिमाण 8.379 मे.टन साठी रक्कम रु. 1136/- व त्या मधून निविदा 14.77 टक्के कमी दराने रु. 168/- वजाजाता रक्कम रु. 968/- चे जादा प्रदान झाले आहे.

9) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 6 वरील कामाचे बाब क्रमांक 19 " TMT Steel" चे दरात गुणवत्ता चाचणी साठी रु. 257.50 प्र.मे.टन समाविष्ट केले आहे. तथापि तसा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. त्या अभावी स्टील साहित्याची गुणवत्ता प्रमाणित झालेली नाही. तसेच त्यासाठी रु. 257.50 प्र.मे.टन दराने एकूण परिमाण 8.379 साठी प्रदान रक्कम रु. 2158/- व त्या मधून निवीदा 14.77टक्के कमी दराने रु. 319/- वजाजाता रक्कम रु. 1839/- चे अनावश्यक प्रदान केलेले आहे.

10) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1,2,3,4,5,6,8 व 9 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत.

11) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1 व 2 वरील कामासाठी वापरण्यात आलेले NP2 आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही, सबब शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

12)उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2, 4, 5, व 9- चे कामाचे अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

13) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

14) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी

केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

15) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1, 2, 4 व 5 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

16) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

17)उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1ते 9 कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	2865920
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	78241955
एकूण	:-	रु.	81107875

17 पंचवटी विभाग वार्ड क्रमांक 10 राहुलवाडी सांस्कृतीक भवन लगत रिटेनिंग वॉल बांधणे

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :5 टक्के राखीव म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 3615436.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3440662.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 174774.00/-

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ट 3 नियम 28 नुसार प्रथम फेरनिविदेत एकमेव निविदा प्राप्त असतांना फेरनिविदा न मागविता 9.67 टक्के जादा दराची प्राप्त एकमेव निविदा स्वीकारण्यात आली. रॉयल्टी कपात केली नाही. मोजमाप पुस्तिका 326 लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक नोंद करण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागा कडील पंचवटी विभाग वार्ड क्रमांक 10 राहुलवाडी सांस्कृतीक भवन लगत रिटेनिंग वॉल बांधणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 3615436/-इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	पंचवटी विभाग वार्ड क्रमांक 10 राहुलवाडी सांस्कृतीक भवन लगत रिटेनिंग वॉल बांधणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठरव कर्णाक 1769 दिनांक 10/10/2010 रु.32,02,200/-
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र.1222 व दिनांक 11/08/2010 रु. .32,02,200/-दरसूची 2009-10
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये .32,02,200/-
5	लेखाशीर्ष	5 टक्के राखीव निधी (कोड नंबर 2598)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	----
8	निविदा विक्री कालावधी	दि.24/03/2011 ते 31/03/2011 मुदत 05/04/2011
9	ई-निविदा फेर निविदा	निविदा क्र. 845-2010नोटीस क्रमांक 194-2010
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 20/04/2011 प्राप्त निविदा (1)
11	न्युनतम निविदा	मे. कल्पतरू कंन्स. 9.67 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 532दि. 13/06/2011
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे. कल्पतरू कंन्स. 9.67 टक्के जादा दराने रु.3511852/- (चालू दरसूची 2010-11 नुसार 1.20टक्के कमी दराने)
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	80/189/2011 दि. 06/08/2011
15	कामाची मुदत	9 महिने दि.06/05/2012 पर्यंत

16	मुदतवाढ	दिनांक 30/04/2014 विना दंडाने
17	काम पूर्ण दिनांक	दिनांक 30/04/2014
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 326 पृष्ठ क्र.82ते 100
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 3615436/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता झालेला खर्च रक्कम रु.3615436/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ट 3 नियम 28नुसार किमान 3 निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. तथापि प्रथम फेरनिविदेत एकमेव निविदा प्राप्त असतांना फेरनिविदा न मागविता 9.67 टक्के जादा दराची प्राप्त एकमेव निविदा स्वीकारण्यात आली. सबब महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नसून नियमाचे पालन झालेले नाही.

2. प्रथम निविदा प्रसिद्ध केली असता एकही निविदा प्राप्त झाली नसल्याचे टिप्पणी मध्ये नमूद केले आहे. तथापि तसा ई-निविदा विभगाकडील अहवाल प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही.

3. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे बाब क्रमांक 9,10,11, 12,13 व 14 नुसार वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 1114.23 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.78742/- शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने तसेच वाळू वाहतूक पास जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून वाहतूक पास मध्ये मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 78742/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

4. सदर कामाचे दुसरे व अंतिम देयकात रॉयल्टी रक्कम वजाजाता उर्वरित रक्कम 3112500/- वर निविदा 9.67 टक्के जादा दराने रक्कम रु. 302139/- येते त्या ऐवजी ती रु.308908/- अशी चुकीची नमूद केली सबब देय रक्कम रु. 6769/- ने जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

5. उपरोक्त कामाचे बाब क्रमांक 20 " TMT Steelbar reinforcement" चे दरात गुणवत्ता चाचणी साठी रु. 214.25 प्र.मे.टन समाविष्ट केले आहे. तथापि तसा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. त्या अभावी स्टील साहित्याची गुणवत्ता प्रमाणित झालेली नाही. तसेच त्यासाठी रु. 214.2 प्र.मे.टन दराने एकूण परिमाण 13.405मे.टन साठी प्रदान रक्कम रु. 2872/- व त्या मध्ये निवीदा 9.67 टक्के जादा दराने रु. 278/- असे एकूण रक्कम रु. 3150/- चे अनावश्यक प्रदान केलेले आहे.

6. सदर कामाचे बाब क्रमांक 20 " TMT Steelbar reinforcement other plant " साठी रु. 53214.90 प्र.मे.टन दराने

तरतूद करून एकूण परिमाण 13.408मे.टन साठी रक्कम रु. 713346/- चे प्रदान केलेले आहे. दरसूची 2009-10 नुसार केलेले दरपृथक्करण पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 28 वर दरसूचीतील आयटम क्र. 15/31 नुसार केलेले दरपृथक्करण करून सदर बाबीचा एकत्रित दर रु. 47398.10 प्र.मे.टन असे नमूद आहे. दरसूचीतील दरात बदल झाल्याबाबत कोणताही तपशील अंदाजपत्रकात नमूद केलेला नाही तसेच त्यासाठीचे कोणतेही सुधारित दरपृथक्करण अंदाजपत्रका सोबत जोडण्यात आलेले नाही. सबब रु. 5816.80 प्र.मे.टन जादा दराने 13.405 मे.टन साठी रक्कम रु. 77974/- व त्यावर निविदा 9.67 टक्के जादा दराने रु. 7540/- असे एकूण रक्कम रु. 85514/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

7. सदर कामाचे बाब क्रमांक 9 " filling the plinth wih excavated material" चे एकूण परिमाण 19.09 घ.मी. साठी रु. 28.60प्र.घ.मी दराने रक्कम रु. 546/- चे प्रदान केलेले आहे. सदर कामाचे खोदकामाचे स्पेसिफिकेशन नुसार त्याचे दरांत त्या साहित्याचे पुनर्भरण (back filling) समाविष्ट आहे. असे असतांना दुबार तरतूद झाल्याने मक्तेदारास रु. 546/- व त्यावर निविदा 9.67 टक्के जादा दराने रु.53/- असे एकूण रक्कम रु. 599/- चे जादा प्रदान झालेले आहे.

8. सदर कामाचे मापे मोजमाप पुस्तिका 326 मधील पान क्रमांक 82 ते 100 वर नोंदविण्यात आलेली आहेत. तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे तशी नोंद करण्यात आलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	174774
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	3440662
एकूण	:-	रु.	3615436

DATSWPM6603 (Ref No : 87, Hmm No : 05)

18 पंचवटी प्रभाग क्र. 1 कलानगर म्हसरूळ मधील रस्त्याची दुरुस्तीकरून डांबरीकरण करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष : रस्ते दुरूस्ती मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 3707970.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3607053.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 100917.00/-

रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. डांबर कामासाठी डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. कामासाठीचे अंदाजपत्रकात तांत्रिक मन्यते नंतर सुधारित रक्कमेस सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही. नस्ती सोबत मोजमाप पुस्तिका 2491 लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक नोंद करण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2013-14 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागा कडील पंचवटी प्रभाग क्र. 1 कलानगर म्हसरूळ मधील रस्त्याची दुरुस्तीकरून डांबरीकरण करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 3707970/-इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	पंचवटी प्रभाग क्र. 1 कलानगर म्हसरूळ मधील रस्त्याची दुरुस्तीकरून डांबरीकरण करणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र. 822 दिनांक 18/03/2013 रु.3099528/-
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र.315 व दिनांक 16/01/2013 रु. 3099528/- दरसूची 2011-12
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 3099528/-
5	लेखाशीर्ष	रस्ते दुरुस्ती (कोड नंबर 2472)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दैनिक. लोकमत दिनांक 16/05/2013 दैनिक सामना दिनांक 17/05/2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.24/06/2013 ते 03/07/2013 मुदत 10/07/2013
9	ई-निविदा	निविदा क्र. 421-2013 नोटीस क्रमांक 45-2013
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 25/07/2013 प्राप्त निविदा (4)

11	न्युनतम निविदा	मे.प्रशांत शिवाजीराव भुसे 15.50 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायीसमिती ठराव क्रमांक 361 दि. 22/08/2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.प्रशांत शिवाजीराव भुसे 6.30 टक्के जादा दराने रु.3220385/- (चालू दरसूची 12-13 नुसार 2.62 टक्के जादा)
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	45/175/2013 दि. 05/10/2013
15	कामाची मुदत	6 महिने दि.06/04/2014 पर्यंत
16	मुदतवाढ	---
17	काम पूर्ण दिनांक	दिनांक 16/03/2014
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 2491 पृष्ठ क्र. 67 ते84
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 3707970/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता झालेला खर्च रक्कम रु. 3707970/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठी वापरलेल्या 38.595 मे.टन डांबरा साठी तारांकित दर फरक रु. 12633.39प्र.मे.टन दराने. रक्कम रु. 487585/- चे प्रदान केले आहे. तारांकित दरफरक परीगणित करताना बाब क्रमांक 4 "BBM ON WBM " चे परिमाण 3206.74 चौ.मी. साठी 2.5 kg प्र.चौ.मी. प्रमाणे 8.62 मे.टन डांबर वापरल्याचे नमूद केले आहे तथापि सदर आयटम चे स्पेसिफिकेशन नुसार त्यात 2.00 kg प्र. चौ.मी. डांबराचा वापर आहे. त्यानुसार एकूण वापरलेले डांबर 1.61 मे.टन जादा दर्शविले व त्यासाठी रु. 12633.39 प्र.मे.टन दराने रक्कम रु. 20340/- चे जादा प्रदान झाले आहे.

2. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे पार्ट 1 चे बाब क्रमांक 1,4, क पार्ट 2 चे बाब क्रमांक 1,3,4, व 9 नुसार वापरलेल्या दगड, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 412.133 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.29125/- शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. सबब कामासाठीची रॉयल्टी ची रक्कम रुपये 78742/- वसूल करून "0853 गौण खनिज" या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

3. सदर कामासाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.30 टक्के जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने रक्कम रु.

1835/- चे प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारास रक्कम रु.1835/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

4. डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

5. सदर कामासाठीचे अंदाजपत्रकात तांत्रिक मन्यते नंतर दुरुस्ती करून अंदाजपत्रकीय रक्कम रु. 3029525/- अशी सुधारण्यात आली. त्या साठी केलेल्या दुरुत्या शहर अभियंता यांनी स्वक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच सुधारित रक्कमेस सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

7. सदर कामाचे मापे मोजमाप पुस्तिका 2491 मधील पान क्रमांक 67 ते 84 वर नोंदविण्यात आलेली आहेत. तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	100917
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	3607053
एकूण	:-	रु.	3707970

DATSWPM6603 (Ref No : 88, Hmm No : 6)

19 नाशिक शहरातील दिंडोरी रस्त्या पासून मनपा हद्दी पावेतो रुंदीकरण डांबरीकरण करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष : सिहस्थ निधी कामे शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 94088265.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 93953660.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 134605.00/-

रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. आर.सी.सी. पाईप महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करणेसाठी राखुन ठेवलेला असल्याने मक्तेदाराने सदरचे पाईप महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही. अंदाजपत्रकात चुकीचे स्पेसिफिकेशन नमूद केले. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या/ उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सिंहस्थ निधी अंतर्गत बांधकाम विभागाकडील नाशिक शहरातील दिंडोरी रस्त्या पासून मनपा हद्दी पावेतो रुंदीकरण डांबरीकरण करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 94088265/- इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	नाशिक शहरातील दिंडोरी रस्त्या पासून मनपा हद्दी पावेतो रुंदीकरण डांबरीकरण करणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 175 दिनांक 28/08/2012
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र. 7 दिनांक 19/09/2013 रु. 112614515/- दरसूची 2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 112614515/-
5	लेखाशीर्ष	सिंहस्थ निधी कामे (2657)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दैनिक लोकमत दिनांक 01/09/2013 व दै. सामना दिनांक 02/09/2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.26/09/2013 ते .03/10/2013 मुदत 07/10/2013
9	ई-निविदा	निविदा क्र. 474-2013 नोटीस क्रमांक 91-2013
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 10/10/2013 प्राप्त निविदा (8)

11	न्युनतम निविदा	मे. आकार कंन्सट्रक्शन 9.09 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायीसमिती ठराव क्रमांक 529 दि. 28/10/2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे. आकार कंन्सट्रक्शन 7.00 टक्के जादा दराने रु.120385685/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	71/2.48/2013 दि. 21/11/2013
15	कामाची मुदत	महिने दि. पर्यंत
16	मुदतवाढ	------
17	काम पूर्ण दिनांक	काम अपूर्ण
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 3388
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 94088265/-
20	प्रदानाचा तपशील	1 ते चौथे धावते देयका रु. 94088265/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 1 ते 4 धावते देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु.94088265/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाचे बाब क्रमांक 7 "Earth work embackment साठी" चे एकूण परिमाण 4895.13 घ.मी. साठी रु. 482.90 प्र.घ.मी. दराने रक्कम रु. 236858/- चे प्रदान केले आहे. Standard specification for road work आर.डी. 12.10 " mode of mesurment for earthwork embackment " नुसार एकूण परीमानातून 5 टक्के दबाई घट वजा करणे आवश्यक आहे. तथापि तशी 5 टक्के वजावट न करताच एकूण परिमाणासाठी प्रदान करण्यात आलेले आहे. सबब 5 टक्के दबाई घटाचे परिमाण 244.75 घ.मी. साठी रक्कम रु. 118190/- व त्या वर निविदा 7 टक्के जादा दराने रु. 8273/- असे एकूण रक्कम रु.126463/- चे जादा प्रदान झालेले आहे.

2. सदर कामाचे बाब क्रमांक 23 नुअर 300mm डाया NP 3 आर.सी.सी.पाईप 17.50 र.मी. साठी रु. 1053.20 प्र.र.मी. दराने प्रदान करण्यात आलेले आहे. नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या गुणवत्ता चाचणी अहवालात सदर पाईप NP2 दर्जा चा असल्याचे नमूद आहे. मक्तेदाराने अंदाजपत्रकानुसार काम केलेले नाही. तसेच कमी दर्जाचा पाईप वापरल्याने NP पाईप साठी रु. 822.20 प्र.र.मी. दर असल्याने त्या नुसार प्रदान करणे आवश्यक होते. सबब रु. 231/- प्र.र.मी. जादा दराने रक्कम रु. 4043/- व त्यावर निविदा 7 टक्के जादा दराने रु. 283/- असे एकूण रक्कम रु. 4326/- चे जादा प्रदान झालेले आहे.

3. सदर कामाचे बाब क्रमांक 11(a) "पाया साठी चे खोदकाम" साठी रु. 156.20 प्र.घ.मी. दराने प्रदान करण्यात आलेले आहे. सदर चे दर हे दरसूचीसन 2012-13 मधील आयटम क्रमांक 900 आहे. सदर कामा साठी आयटम क्रमांक 1002 नुसार रु. 107.60 प्र.घ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते. सबब रु. 48.60प्र.घ.मी. जादा दराने एकूण परीमाण 73.38घ.मी. साठी रक्कम रु. 3566/-व त्या वर निविदा 7 टक्के जादा दराने रु. 250/- असे एकूण रक्कम रु. 3816/- चे

जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

4. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 17008.573 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.1201995/- स्वतंत्र बाब म्हणून प्रदान केलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही.

5. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

6. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही,

7. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	134605
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	93953660
एकूण	:-	रु.	94088265

20 नाशिक शहरातील मध्यरिंगरस्ता निलगिरी बाग ते आगरटाकळी मलनिस्सारण केंद्र ते सायखेडा रोड पावेतो रस्ता विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष : सिंहस्थ निधी कामे शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 33468013.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 33444850.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 23163.00/-

केंद्रीय दक्षता आयोग यांचे कडील परिपत्रक क्रमांक 02/02/11 दिनांक 17/02/2011 मधील अनुक्रमांक (ii) नुसार मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकाचे पालन झालेले नाही. रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. अंदाजपत्रकात चुकीचे स्पेसिफिकेशन नमूद केले. निविदा विशेष अट 2.3 नुसार मोबिलायझेशन अग्रिम रक्कमेची वसुली समान 3 हप्त्यात 12 टक्के व्याज दराने वसूल करावयाची होती. तथापि प्रत्यक्ष वसुली असमान 4 हप्त्यात वसुल केले आहे. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सिंहस्थ निधी अंतर्गत बांधकाम विभागाकडील नाशिक शहरातील मध्यरिंगरस्ता निलगिरी बाग ते आगरटाकळी मलनिस्सारण केंद्र ते सायखेडा रोड पावेतो रस्ता विकसित करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 94088265/- इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	नाशिक शहरातील मध्यरिंगरस्ता निलगिरी बाग ते आगरटाकळी मलनिस्सारण केंद्र ते सायखेडा रोड पावेतो रस्ता विकसित करणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 175 दिनांक 28/08/2012

3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र.8 दिनांक 19/09/2013 रु. 82037590/- दरसूची 2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये . 82037590/-
5	लेखाशीर्ष	सिंहस्थ निधी कामे (2657)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दैनिक लोकमत व दै.सामना दिनांक 02/09/2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.26/09/2013 ते .03/10/2013 मुदत 07/10/2013
9	ई-निविदा	निविदा क्र.476-2013 नोटीस क्रमांक 91-2013
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 110/10/2013 प्राप्त निविदा (5)
11	न्युनतम निविदा	मे. ए.एस.सोनजे 9.84 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायीसमिती ठराव क्रमांक 525 दि. 29/12/2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.अशोक एस.सोनजे 6.50 टक्के जादा दराने रु.87370033/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	74/252/2013 दि. 21/11/2013
15	कामाची मुदत	18 महिने दि 21/05/2015 पर्यंत
16	मुदतवाढ	------
17	काम पूर्ण दिनांक	काम अपूर्ण
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 2613 पन क्रमांक (1 ते 76)
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 33468013/-
20	प्रदानाचा तपशील	1 ते चौथे धावते देयका रु. 33468013/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 1 ते 4 धावते देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 33468013/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठी चे निविदा स्पेशल अट क्रमांक 2.3 पान क्रमांक 106 नुसार मक्तेदारास कार्यादेश रक्कमेच्या 10 टक्के प्रमाणे रु. 8723453/- मोबिलायझेशन अग्रिम एकरकमी प्रदान केले. केंद्रीय दक्षता आयोग यांचे कडील परिपत्रक

क्रमांक 02/02/11 दिनांक 17/02/2011 मधील अनुक्रमांक (ii) नुसार मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकाचे पालन झालेले नाही.

2. सदर कामाचे बाब क्रमांक 9 "पाया साठी चे खोदकाम" साठी रु. 156.20 प्र.घ.मी. दराने प्रदान करण्यात आलेले आहे. सदर चे दर हे दरसूची सन 2012-13 मधील आयटम क्रमांक 900 वरील आहे. सदर कामा साठी आयटम क्रमांक 1002 नुसार सी.डी. वर्क साठी रु. 107.60 प्र.घ.मी. दराने प्रदान करणे आवश्यक होते. सबब रु. 48.60प्र.घ.मी. जादा दराने एकूण परीमाण 447.50 घ.मी. साठी रक्कम रु. 21749/-व त्या वर निविदा 6.50 टक्के जादा दराने रु. 1413/- असे एकूण रक्कम रु. 23163/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

3. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 16411.19 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.1159779/- स्वतंत्र बाब म्हणून प्रदान केलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही.

4. सदर कामाचे बाब क्रमांक 12 "Earth work embackment साठी" चे एकूण परिमाण 9739.18 घ.मी. साठी रु. (482.90 प्र.घ.मी) चौथे धावते देयकापर्यंत पार्ट रेट रु. 400.00प्र.घ.मी. दराने प्रदान केले आहे. अंदाजपत्रकात नमूद स्पेसिफिकेशन नुसार सदर बाबी साठी दरसूची बाब क्रमांक 1101 नुसार रु. 481.90 दराने तरतूद करणे आवश्यक होते. चुकीच्या व जादा दराने तरतूद केलेली असल्याने अंतिम प्रदान करतांना रु. 481.90 प्र.घ.मी. दरानेच प्रदान करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

5. सदर कामाचे चौथे धावते देयका अखेर बाब क्रमांक 8 व 9 नुसार एकूण 11658.67घ.मी. केलेले आहे. मात्र बाब क्रमांक 27 नुसार 8654.03 घ.मी इतकेच खोदकामातून उपलब्ध साहित्य वाहून टाकल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आलेली असून त्या साठी प्रदान करण्यात आलेले आहे. उर्वरित 3004.64 घ.मी. खोद्कातून निघालेले साहित्याचा वापर दर्शविला नाही तसेच ते वाहून टाकल्याची नोंद नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

7. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने

महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

8. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

9. निविदा विशेष अट 2.3 नुसार सदर कामासाठी मक्तेदारास प्रदान केलेले मोबिलायझेशन अग्रिम रक्कमेची वसुली समान 3 हप्त्यात 12 टक्के व्याज दराने वसूल करावयाची होती. तथापि प्रत्यक्ष वसुली असमान 4 हप्त्यात वसुल केले आहे.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

11. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

12. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमापविषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्यालाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	23163
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	33444850
एकूण	:-	रु.	33468013

DATSWPM6603 (Ref No : 90, Hmm No : 09)

21 पंचवटी इंद्रकुंड ते रामकुंड पावेतो पायऱ्या येथे वाहतूक मार्ग तयार करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष : सिंहस्थ निधी कामे शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 33615645.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 32567305.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1048340.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले. रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. आर.सी.सी. पाईप महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करणेसाठी राखुन ठेवलेला असल्याने मक्तेदाराने सदरचे पाईप महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु.100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सिंहस्थ निधी अंतर्गत बांधकाम विभागाकडील पंचवटी इंद्रकुंड ते रामकुंड पावेतो पायऱ्या येथे वाहतूक मार्ग तयार करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 94088265/- इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	पंचवटी इंद्रकुंड ते रामकुंड पावेतो पायऱ्या येथे वाहतूक मार्ग तयार करणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 175 दिनांक 28/08/2012
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र. 47 दिनांक 05/06/2014 रु. 67553470/- दरसूची 2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 67553470/-
5	लेखाशीर्ष	सिंहस्थ निधी कामे (2657)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दैनिक सकाळ दिनांक 05/07/2014(फेरनिविदा 2)
8	निविदा विक्री कालावधी	दि.07/07/2014 ते .10/07/2014 मुदत 14/07/2014
9	ई-निविदा	निविदा क्र.24-2014 नोटीस क्रमांक 32-2014

10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 14/07/2014 प्राप्त निविदा (1)
11	न्युनतम निविदा	मे. जयहिंद रोडबिल्डर्स 27.27 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायीसमिती ठराव क्रमांक 166 दि. 07/08/2014
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.जयहिंद रोडबिल्डर्स 26.91 टक्के जादा दराने रु.856552865/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	03/24/2014 दि. 20/08/2014
15	कामाची मुदत	12 महिने दि 19/08/2015 पर्यंत
16	मुदतवाढ	------
17	काम पूर्ण दिनांक	काम अपूर्ण
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	क्र. 3305
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 33615645/-
20	प्रदानाचा तपशील	1 ते चौथे धावते देयका रु.33615645 /-

उपरोक्त कामाचे प्रथम निविदेत एकही निविदा प्राप्त झाली नाही तसेच प्रथम फेर निविदेत एकूण 3 निविदा प्राप्त झाल्यात त्या पैकी 2 निविदा तांत्रिक दृष्टीने अपात्र ठरल्याने प्राप् एकमेव वैध निविदा ही मे. जयहिंद रोडबिल्डर्स 27.27 टक्के जादा दराची होती. प्राप्त दर जास्त असल्याने दुसरी वेळ फेरनिविदा मागविण्यात आली त्या मध्ये ही एकमेव निविदा प्राप्त झाली व ती मे. जयहिंद रोडबिल्डर्स यांची 27.27 टक्के जादा दराची होती. त्याच्याशी दर कमी करण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी अंदाजपत्रकीय दराच्या 26.91 टक्के जादा दराने काम करण्यास सहमती दर्शिविली. सदर सुधारित निविदा दर स्वीकारण्यात आले व त्यांना कार्यादेश देण्यात आला. कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 1 ते 4 धावते देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 33615645/-बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तसेच विमा संचालनालयाच्या व्यतिरिक्त अन्य विमा कंपन्याकडून घेतलेली विमापत्रे स्वीकारली जाणार नाहीत असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. तथापि मक्तेदाराने युनाटेड इंडिया इन्शुरन्स कडील विमापत्र सदर केल आहे. विमा संचलनालया कडील विमा पत्र सदर केलेले नसल्याने उपरोक्त परिपत्रकातील सुचनेनुसार 1 टक्का रक्कम 856529/- कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक होते. तथापि तशी रक्कम कपात केलेली नाही.

2. सदर कामाचे बाब क्रमांक 28 “TMT Steel” 146.257मे.टन साठी रु. 67600/- प्र.मे.टन दराने रक्कम रु. 9887046/- चे प्रदान केले आहे. सदर दरात गुणवत्ता चाचणी साठी चे रु. 318.80 प्र.मे.टन समाविष्ट आहे. तथापि तसा स्टील चा

गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. सबब त्या मुळे स्टील ची गुणवत्ता प्रमाणित होत नाही. तसेच त्या साठी प्रदान केलेली रक्कम रु. 318.80मे. टन दराने 146.257 मे.टन साठी रक्कम रु. 46627/- व त्यावर निविदा 26.91 टक्के जादा दराने रु. 12547/- असे एकूण रक्कम रु. 59174/- चे जादा प्रदान झालेले आहे.

3. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 1763.62 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.124635/- स्वतंत्र बाब म्हणून प्रदान केलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही.

4. सदर कामाचे बाब क्रमांक 69(a) "1200mm डाया NP3 RCC पाईप पुरवठा व पसरविणे" 84 र.मी. साठी रु.9309.00 प्र.र.मी. दराने प्रदान केले आहे. दरसूची 2012-13 साठी च्या दरपृथक्करण पुस्तकातील पण कर्णाक 176 वरील बाब क्रमांक 1009 ते 1034 वर सदर पाईप चा दर रु. 8064.80 प्र.र.मी. असतांना तो 9309.00 असता जादा दर्शविला असल्याने रु. 1244.20प्र.र.मी. जादा दराने रक्कम रु. 104513/- व त्या वर निविदा 26.91 टक्के जादा दराने रु. 28124/- असे एकूण रक्कम रु. 132637/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

5. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

6. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

7. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

10. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमापविषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्यालाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	1048340
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	32567305
एकूण	:-	रु.	33615645

DATSWPM6603 (Ref No : 91, Hmm No : 10)

22 बांधकाम विभागाकडील पश्चिम विभागांतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 16

लेखा शीर्ष : रस्ते दूरुस्ती म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 34606490.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 34033460.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 573030.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले.500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही. डांबर कामासाठी डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड (60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता

2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक नोंद करण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पश्चिम बांधकाम विभागाकडील खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु. 34606490/-इतका खर्च केला आहे.

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	प्रभाग क्रमांक 22मधील विकास कॉलनी परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे रु. 4634673/-	07/39/2014 दि.02/09/2014	मे.अनिलकुमार कंन्स.2.75टक्के जादा दराने	3146	4200000
2	प्रभाग क्र.15 प्रसाद सर्कल पासून निर्मला कॉन्व्हेंट ते 24मी.डीपी रस्त्या पावेतो 18 मी. डीपी रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे .रु.11366430/-	30/166/2013दि. 25/09/2013	मे.गजानन कंन्स. 6.40टक्के जादा दराने	3212	13314268
3	वार्ड क्रमांक 46राका कॉलनी परिसरात रस्ते अस्तरीकरण, डांबरीकरण करणे रु. 5395924/-	187/387/2011 दि.30/12/2011	सुप्रभा कंन्स. 9.20 टक्के जादा दराने	411	7414586
4	वार्ड क्र.22 मधील पंपींगरोड पासून नहुष सोसायटी पर्यंत 18 मी. डीपी रस्त्यापैकी उर्वरित 9 मी. रस्त्याचे खडीकरण करून डांबरीकरण करणे रु. 9568271/-	193/462/2011 दि.30/12/2011	मे.अनिलकुमार कंन्स.2.98टक्के जादा दराने	1028	2933513
5	प्रभाग क्र.15 (जुना वार्ड क्र.22) वसंत विहार परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे रु.8044588/-	01/79/2013 दि.06/04/2013	मे.अनिलकुमार कंन्स.18.30टक्के जादा दराने	1028	6744123

	एकूण				34606490

उपरोक्त 1 ते 5 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु. 34606490/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि तसे विमापत्र उपरोक्त अनुक्रमांक 2 व 3वरील कामाचे नस्तीसोबत जोडलेले नाही. तसेच देयकातूनही त्यासाठीची 1 टक्का रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम रुपये अनुक्रमांक 2 च्या कामासाठी रु.118397/- व अनुक्रमांक 3 च्या कामासाठी रु.58923/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक आहे. तसेच अनुक्रमांक 4 वरील कामासाठी कार्यादेश रक्कम रु. 9853412/- च्या 1 टक्का रक्कम रु. 98534/- कपात करणे आवश्यक असतांना ती रु. 29335/- कपात केल्याने रक्कम रु. 69199/- कमी कपात केलेली आहे. एकूण रक्कम रु.246519/- विमा संचलनालय यांचे कडे भरणा करण्यात आलेली नाही.

2) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.
1	प्रभाग क्रमांक 22मधील विकास कॉलनी परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे	5, 15	203.62	70.67	14390
4	वार्ड क्र.22 मधील पंपींगरोड पासून नहुष सोसायटी पर्यंत 18 मी. डीपी रस्त्यापैकी उर्वरित 9 मी. रस्त्याचे खडीकरण करून डांबरीकरण करणे	3,9,12, 13 व 19	3912.67	70.67	276508

5	प्रभाग क्र.15 (जुना वार्ड क्र.22) वसंत विहार परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे	5,9,12 व 13	2144.00	70.67	151516
	एकूण				442414

उपरोक्त 1, 4 व 5 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही..

3) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
1	प्रभाग क्रमांक 22मधील विकास कॉलनी परिसरातील रस्ते अस्तरीकरण करणे	63.36 गटर खोदकाम	90.00	37.50	25.20	3326	213	3539
4	वार्ड क्र.22 मधील पंपींगरोड पासून नहुष सोसायटी पर्यंत 18 मी. डीपी रस्त्यापैकी उर्वरित 9 मी. रस्त्याचे खडीकरण करून डांबरीकरण करणे	2747.02	54.90	26.90	28.00	76917	2292	79209

	एकूण							82748

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 1 वरील कामाचे बाब क्रमांक 1 रस्ता खोदकामा साठी यांत्रिकी दराने आकारणी केली तथापि बाब क्रमांक 2 गटार खोदकामा साठी मात्र मानवी श्रमाने खोदकामा चे दराने प्रदान केले सबब अनुक्रमांक 1 व 4 वरील कामांसाठी रक्कम रु. 82748/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

4) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 1,3 व अनुक्रमांक 5 चे कामासाठीचे अंदाजपत्रकातील डांबरी कामाचे दर निश्चित करतांना त्यात डांबर मुळदर व रु.780 प्र.मे टन वाहतूक खर्च यांवर 4 टक्के दराने जकात कर समाविष्ट केला होता. दिनांक 23/05/2013 रोजी पासून जकात कर रदद झाल्याने त्यानंतर च्या कालावधी मध्ये केलेल्या डांबर कामासाठीचे प्रदान करतांना वापरलेल्या एकूण डांबरा साठी 4 टक्के दराने जकात रक्कम कपात करून घेण्यात आलेली आहे. तथापि तशी कपात करतांना डांबराच्या मूळ खरेदीदरात रु.780प्र.मे.टन दराने वाहतूक खर्च समाविष्ट न करताच जकातीची आकारणी केल्याचे दिसून येते सबब अनुक्रमांक 1 वरील कामासाठी 47.77 मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु. 37417/- वर 4 टक्के दराने रक्कम रु. 1497/- व अनुक्रमांक 3 वरील कामासाठी 87.74 मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु. 68437 /- वर 4 टक्के दराने रक्कम रु.2737/- व अनुक्रमांक 5 वरील कामासाठी 73.244 मे.टन डांबरा साठी रु. 780 प्र.मे.टन प्रमाणे रक्कम रु. 57130 /- वर 4 टक्के दराने रक्कम रु.2285 /-असे एकूण रक्कम रु. 6519/- ची कमी कपात झालेली आहे.

5) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 5 वरील कामाचे दुसरे धावते देयक रु. 5058694/- मध्ये व त्याच्या मोजमाप पुर्स्तीकेतील नोदी या मध्ये मोठ्या प्रमाणात उप्रीलेखन करून दुरुस्ती केली आहे. त्या मध्ये मूळ नोंदी व उपरी लेखन करून दुरुस्त केलेली नोंद या दिसून येत नाहीत. तथापि 3 रे व अंतिम देयका नुसार मक्तेदारास एकूण रु. 6506879/- देय असतांना प्रत्यक्षात पहिले धावते रु. 1585429/- दुसरे धावते देयक रु. 5058694/- व तसरे व अंतिम देयक रु. 100000/- असे एकूण रक्कम रु. 6744123/- चे प्रदान केलेले आहे. सबब मक्तेदारास रक्कम रु. 237244/- चे मुल्यांकना पेक्षा जास्त प्रदान झाल्याचे दिसून येते.

6) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 5 वरील कामाचे अंदाजपत्रक रु. 8044588/- साठी शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिल्या नंतर ते रक्कम रु. 6555172/- असे सुधारित करण्यात आले तथापि त्यास शहर अभियंता यांची सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

7) मक्तेदारास मुदतीत काम पूर्ण न केल्याने 10 टक्के रक्कम रु. 658518/- विलंब शुल्का सह दिनांक 18/06/2014 पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु. 100000/- तसरे व अंतिम देयकामधून कपात करण्यात आले आहे. उर्वरित रक्कम रु. 555518/- ची कपात मोजमाप पुस्तिका क्रमांक 163 सन 2015-16 वरून करण्यात आल्याचा शेरा अंतिम देयकात नमूद केला आहे. तथापि तशी कपात केल्याबाबत अभिलेखे नस्तीसोबत जोडण्यात आलेले नसल्याने विलंबशुल्काची कपात केल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

8) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 3 वरील कामाची मूळ मुदत दिनांक 30/08/2012 रोजी समाप्त झालेली असून काम दिनांक 18/12/2013 रोजी पूर्ण झालेले आहे. तथापि त्या वाढीव कालावधी साठी मुदतवाढ मंजूर केल्याचे दिसून येत नाही.

9) उपरोक्त वर नमूद अनुक्रमांक 4 वरील कामाची मूळ मुदत दिनांक 30/12/2012 रोजी समाप्त झालेली असून काम

लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अपूर्ण आहे. मक्तेदाराने दिनांक 03/12/2013 अन्वये मुदतवाढ मागणी केल्याचे दिसून येते तथापि वाढीव कालावधी साठी मुदतवाढ मंजूर केल्याचे दिसून येत नाही. मुदतवाढ मंजुरी सह काम पूर्ण होणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2, 3, 4 व 5 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत.

11) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2, चे कामाचे अंदाजपत्रकात तसेच अनुक्रमांक 1 व 5 वरील कामाचे मोजमाप पुस्तिकेत व देयकाचे प्रतीवर केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

12) डांबर 80/100, 60/70 व 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. उपरोक्त वरील नमूद कामातील डांबर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केलेले आहे तथापि डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमूद केलेले आहे वापरलेल्या डांबराची ग्रेड(60/70) असल्याचे नमूद केलेले नाही. तसेच अनुक्रमांक 3 वरील कामासाठी चे चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

13) मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवारा मध्ये कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचे शेरे नोंदविले आहेत तथापि त्यांनी नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही.

14) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. उपरोक्त नमूद अनुक्रमांक 2 वरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

15) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

16) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमापविषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्यालाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	573030
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	34033460
एकूण	:-	रु.	34606490

23 नाशिक शहरातील बाह्य रिंगरोड पुला पल्सून ते नांदूर नाका ते रा.म.म.क्र.3 (हॉटेल जत्रा) पावेतोचा रस्ता डांबरीकरण करून विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष : सिंहस्थ निधी कामे शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 133970054.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 133791331.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 178723.00/-

शासकीय विमा निधीकडील विमापत्र प्राप्त केले नाही व त्यासाठी ची 1 टक्के रक्कम कपात केली नाही. रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले. रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून मक्तेदाराचे नांव नमूद नसल्याने तसेच त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. आर.सी.सी. पाईप महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी करणेसाठी राखुन ठेवलेला असल्याने मक्तेदाराने सदरचे पाईप महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना त्यांनी महामंडळाकडून पाईप खरेदी केल्याचे दिसून येत नाही. कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप चे गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही.अंदाजपत्रकीय रक्कम रु.100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात सिंहस्थ निधी अंतर्गत बांधकाम विभागाकडील नाशिक शहरातील बाह्य रिंगरोड पुला पल्सून ते नांदूर नाका ते रा.म.म.क्र.3 (हॉटेल जत्रा) पावेतोचा रस्ता डांबरीकरण करून विकसित करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 94088265/- इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	नाशिक शहरातील बाह्य रिंगरोड पुला पल्सून ते नांदूर नाका ते रा.म.म.क्र.3 (हॉटेल जत्रा) पावेतोचा रस्ता डांबरीकरण

		करून विकसित करणे
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 175 दिनांक 28/08/2012
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र. 25 दिनांक 22/11/2013 रु. 163340699/- दरसूची 2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये . 163340699/-
5	लेखाशीर्ष	सिंहस्थ निधी कामे (2657)
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दैनिक गांवकरी दिनांक 26/11/2013 व दैनिक नवशक्ती दिनांक 27/11/2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.03/12/2013 ते 09/12/2013 मुदत 16/12/2013
9	ई-निविदा	निविदा क्र.750-2013 नोटीस क्रमांक 145-2013
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 20/12/2013 प्राप्त निविदा (4)
11	न्युनतम निविदा	मे. नितीन एम.पेखळे 12.50 टक्के जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायीसमिती ठराव क्रमांक 689 दि. 31/12/2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे. नितीन एम.पेखळे 9.50 टक्के जादा दराने रु.17872286/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	87/290/2014 दि. 21/01/2014
15	कामाची मुदत	18 महिने दि.21/07/2015 पर्यंत
16	मुदतवाढ	31/03/2016 पर्यंत
17	काम पूर्ण दिनांक	काम अपूर्ण
18	मोजमाप पुस्तिका क्रमांक	क्र. 3306, 3307 व 3308
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये 133970054/-
20	प्रदानाचा तपशील	1 ते चौथे धावते देयका रु. 133970054/-

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 1 ते 4 धावते

देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 133970054/-बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नगरविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/ 1357/प्र.क्र.166/ 98/ नवि-24 दिनांक 3.11.2003 कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा 1 टक्का रक्कम कपात करून विमानिधी कडे भरणा करणे आवश्यक आहे. तसेच विमा संचालनालयाच्या व्यतिरिक्त अन्य विमा कंपन्याकडून घेतलेली विमापत्रे स्वीकारली जाणार नाहीत असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. तथापि मक्तेदाराने तसे विमा पत्र सादर केलेले नसून ते नस्ती सोबत जोडण्यात आलेले नाही. सबब विमा संचलनालया कडील विमा पत्र सदर केलेले नसल्याने उपरोक्त परिपत्रकातील सुचनेनुसार 1 टक्का रक्कम 178723/- कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक होते. तथापि तशी रक्कम कपात केलेली नाही.

2. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामांसाठी चे वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्य 13063 घ.मी. साठी रॉयल्टी ची रक्कम रु.923185/- स्वतंत्र बाब म्हणून प्रदान केलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चा च्या कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठी ची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

4. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

5. सदर कामासाठी वापरण्यात आलेले आर.सी.सी. पाईप चे गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीसोबत जोडण्यात आलेले नाही.

6. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात तसेच मोजमाप पुस्तिकेत केलेल्या दुरुस्त्या / उपरीलेखन सक्षम प्राधिकारी यांनी स्वक्षांकित केलेल्या नाहीत.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100

लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 अनुक्रमांक 15 नुसार बिल संमत झाल्या बरोबर मोजमापविषयक नोंदवहीतील नोंदी दुसऱ्यालाल शाईतील कर्णरेषेने खोडून टाकण्यात याव्यात व त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाईने करण्यात यावे तथापि तसा तपशील नोद्विण्यात आलेला नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	178723
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	133791331
एकूण	:-	रु.	133970054

DATSWPM6603 (Ref No : 93, Hmm No : 28)

24 बांधकाम विभागाकडील ना.रोड विभागांतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षात विकास कामांमध्ये आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 121276856.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 121060362.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 216494.00/-

रॉयल्टी कपात केली नाही. रॉयल्टी रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान केले.500 घ.मी. पेक्षा जादा खोदकामा साठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना मानवी श्रमाने खोदकामाचे जादा दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास अतिप्रदान झाले आहे. अंदाजपत्रकात केलेल्या दुरुस्त्या/ उपरीलेखन स्वक्षांकित केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची नेमक्या कोणत्या बाबींची तपासणी केली व कोणत्या दिनांकास केली याचा तपशील नमूद केलेला नाही. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असलेल्या कामांसाठी निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. बांधकाम साहित्याचे चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडण्यात आलेले नाहीत. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध

केलेल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील ना.रोड विभागांतर्गत खालील नमूद केलेल्या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामांवर रक्कम रु.12,12,76,856/- इतका खर्च केला आहे.

तक्ता क्र. 1

अ. क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रु.	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तक क्रमांक	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम (रू.)
1	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 97 व 71 मधील आई माऊली चौक ते घोडे मळयापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. रुपये 1,72,74,416/-	09/91/2013 दि. 06/03/2013	बी.पी.सांगळे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. 10.90 टक्के जादा दराने रु. 1,91,57,327/- चालू दरसूची 2011-12 नुसार 2.77 टक्के जादा	क्र. 2931 (पृष्ठ क्र. 1 ते 36)	2,37,81,891/- (तारांकित दर फरकासह)
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मध्ये जाणारा 12 मी. चारीरोड शेडमधुन जाणारी पावसाळी पाईप लाईन गेल्यामूळे (अंतर्गत) रस्त्याची दुरुस्ती करुन सुशोभीकरण करणे. रुपये 1,38,10,320/-	252/416/2011 दि. 30/12/2011	नितीन एम.पेखळे 2.99 टक्के जादा दराने 1,42,23,238/-	क्र. 2672 (पृष्ठ क्र. 113 ते 124)	2,70,02,051/- (तारांकित दर फरकासह)
3	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र.36 मध्ये गोसावी नगर, पारीजातनगर व परीसर येथील रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन पेव्हरब्लॉक बसविणे.	135/280/2011 दि. 21/10/2011	बी.एस.चोप्रा 2.95 टक्के जादा दराने 1,91,23,631/-	क्र. 2138 (पृष्ठ क्र. 41 ते 114)	2,02,72,418/- (तारांकित दर फरकासह)

	रुपये 1,85,75,650/-				
4	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 56 विर सावरकर उड्डाण पुलाखाली छत्रपती चौक ते नवलेचाळ रेल्वे कार्यालयापर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. रुपये 93,17,083/-	6/11/2014 दि. 24/07/2014	सुनिल शींदे अँड ब्रदर्स 27.44 टक्के कमी दराने 68,30,402/-	क्र. 2521 (पृष्ठ क्र. 92 ते 118)	56,96,235/- (तारांकित दर फरकासह)
5	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 61 मधील वडनेर गावापासुन ते पिंपळगाव खांब पर्यंतचा रुंदीकरण झालेला रस्ता डांबरीकरण करणे. रुपये 70,67,967/-	08/92/2013 दि. 23/04/2013	बिन्नर कन्स्ट्रक्शन 15.90 टक्के जादा दराने 81,91,773/-	क्र. 2522 (पृष्ठ क्र. 68 ते 82)	1,06,93,216/- (तारांकित दर फरकासह)
6	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 57 मध्ये देवळाली शीवार स.नं. 246 पासुन पुढे रेल्वे लाईन लगत 18 मी. डी.पी. रोड डांबरीकरण करणे. रुपये 59,23,250/-	40/154/2013 दि. 09/10/2013	मे. कैलास किसन बिन्नर 7.60 टक्के जादा दराने 62,13,396/-	क्र. 1472 (पृष्ठ क्र. 95 ते 102)	रुपये 70,43,793/- (तारांकित दर फरकासह)
7	ना.रोड विभाग, नाशिक पुणा रोड येथील बिटको चौक ते छत्रपती शीवाजी महाराज पुतळयापर्यंत रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 52,73,820/-	27/153/2013 दि. 23/09/2013	बी.पी.सांगळे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. 6.80 टक्के जादा दराने 55,01,784/-	क्र. 2453 (पृष्ठ क्र. 154 ते 164)	63,56,749/- (तारांकित दर फरकासह)
8	ना.रोड विभागातील जय भवानी रोडवरील भालेराव मळा ते आर्टीलरी रोड पर्यंत डी.पी.रोड डांबरीकरण करणे.	42/156/2013 दि. 14/10/2013	मे. नितीन मार्तंडराव पेखळे 7.50 टक्के जादा दराने 1,80,93,630/-	क्र. 2793 (पृष्ठ क्र. 81 ते 101)	2,04,30,503/- (तारांकित दर फरकासह)

	रुपये 1,72,22,149/-				

उपरोक्त 1 ते 8 कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु. 12,12,76,856/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरुम व खडी इत्यादि बांधकाम साहित्या साठी रॉयल्टी ची रक्कम परीगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	कामातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टी चे परिमाण घन मी.	रॉयल्टी चा दर	रॉयल्टी ची वसूल करावयाची रक्कम रु.	निविदा दर %	रॉयल्टी वर निविदा दराने प्रदान रक्कमरु.
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मध्ये जाणारा 12 मी. चारीरोड शेडमधुन जाणारी पावसाळी पाईप लाईन गेल्यामूळे (अंतर्गत) रस्त्याची दुरुस्ती करुन सुशोभीकरण करणे. रुपये 1,38,10,320/-	6,9,12, 13,25, 26	4097.31	70.67	2,89,557/-	2.99% above	8,658/-
3	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र.36 मध्ये गोसावी नगर, पारीजातनगर व परीसर येथील रस्ते रुंदीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन पेव्हरब्लॉक बसविणे. रुपये 1,85,75,650/-	3,6,9, 10	9353.67	70.67	6,61,024/-	2.95% above	19,500/-
4	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 56 विर सावरकर उड्डाण पुलाखाली छत्रपती चौक ते नवलेचाळ रेल्वे कार्यालयापर्यंतचा रस्ता	4,7,10,11,16 व 17	3811.88	70.67	2,69,386/-		

	सिमेंट कॉंक्रीट करणे. रुपये 93,17,083/-						
5	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 61 मधील वडनेर गावापासुन ते पिंपळगाव खांब पर्यंतचा रुंदीकरण झालेला रस्ता डांबरीकरण करणे. रुपये 70,67,967/-	2,3,6	925.27	70.67	65,389/-	15.90% above	10,397/-
6	ना.रोड विभाग, प्रभाग क्र. 57 मध्ये देवळाली शीवार स.नं. 246 पासुन पुढे रेल्वे लाईन लगत 18 मी. डी.पी. रोड डांबरीकरण करणे. रुपये 59,23,250/-	1	57.84	70.67	4,088/-	7.60% above	311/-
7	ना.रोड विभाग, नाशिक पुणा रोड येथील बिटको चौक ते छत्रपती शीवाजी महाराज पुतळयापर्यंत रस्ता अस्तरीकरण करणे. रुपये 52,73,820/-	1	26.95	70.67	1,905/-	6.80% above	130/-
8	ना.रोड विभागातील जय भवानी रोडवरील भालेराव मळा ते आर्टीलरी रोड पर्यंत डी.पी.रोड डांबरीकरण करणे. रुपये 1,72,22,149/-	1	1287.45	70.67	90,984/-		
	एकूण				1676700		38996

उपरोक्त 2 ते 8 वर नमूद कामाचे मक्तेदारांनी रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने सादर कलेली आहेत तथापि सदर ची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित

कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही

2) सदर कामांसाठीचे अंदाजपत्रकांची पडताळणी केली असता अंदाजपत्रकासाठी चे बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम समाविष्ट करून निश्चित केले आहेत. उपरोक्त कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असून कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टी च्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टी च्या रक्कमेवरही निविदा जादादराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टी ची रक्कम शासनाने निश्चित केलेल्या ठराविक दरानेच भरणा करावयाची असल्याने तसेच मक्तेदाराने कामासाठी रॉयल्टी रक्कमेचा भरणा केल्याची खात्री करून तितकीच रक्कम मक्तेदारास प्रदान करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने आकारणी करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारांना वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु. 38,996/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

3) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 1 मध्ये नमुद कामाचे अंदाजपत्रकासाठी दर निश्चित करताना रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी समाविष्ट करुन दर निश्चित केलेले आहेत. मक्तेदारास अंदाजपत्रकीय दराच्या 10.90 टक्के जादा दराने प्रदान केलेले असल्याने मक्तेदारास प्रदान एकूण रक्कमेत रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने एकूण रॉयल्टीची रक्कम रूपये 2,94,367/- समाविष्ट असून, दुसरे व अंतीम देयकातुन रॉयल्टीची रक्कम रु. 2,23,757/- वजा जाता उर्वरीत रक्कमेवर 10.90 टक्के जादा दराने प्रदान केलेले आहे. तथापी फरकाची रक्कम रु. 70,610/- वर 10.90 टक्के निविदा जादा दराने रक्कम रुपये 7,696/- प्रदान झालेले आहेत. रॉयल्टी रक्कम शासनाने विहित केलेल्या दरानेच भरणा करणे आवश्यक असल्याने त्यावर निविदा जादा दराने प्रदान करणे संयुक्तिक नाही. सबब मक्तेदारास रुपये 7,696/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. सदर जादा प्रदान रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

4) बांधकाम विभाग नाशिक दरसूची मधील (General note) सर्वसाधारण सुचना मध्ये नमूद केल्यानुसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी व प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद केल्या नुसार सदर कामातील खोदकामाचे परिमाण 500 घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी यांत्रिकी सहाय्याने खोदकामाचे दराने प्रदान करणे आवश्यक असतांना चुकीच्या व वाढीव मानवीश्रमाने खोदकामा चे दराने तरतूद करून प्रदान केल्याने मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	खोदकामाचे एकूण परिमाण घ.मी.	प्रदान केल्याचा मानवी दर रु.प्र.घ.मी.	देय यांत्रिकी दर रु.प्र.घ.मी..	जादा प्रदान दर रु.	जादा प्रदान रक्कम रु	निविदा जादा/कमी दराने जादा/कमी प्रदान रक्कम रु	एकूण जादा प्रदान रक्कम रु..
1	ना.रोड विभाग, वॉर्ड क्र. 97 व 71 मधील आई माऊली चौक ते घोडे मळयापर्यंत	3101.96	54.90	26.90	28.00	86,855/-	+10.90% 9,467/-	96322

	रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे.							
2	ना.रोड विभाग, जुना वॉर्ड क्र.36 व 68 मध्ये जाणारा 12 मी. चारीरोड शेडमधुन जाणारी पावसाळी पाईप लाईन गेल्यामूळे (अंतर्गत) रस्त्याची दुरुस्ती करुन सुशोभीकरण करणे.	2548.11	54.90	26.90	28.00	71,347/-	+2.99% 2,133/-	73480
	एकूण					158202	11600	169802

उपरोक्त प्रमाणे अनुक्रमांक 1 व 2 वरील कामांसाठी रक्कम रु.1,69,802/- चे चुकीचे व जादा प्रदान झालेले आहे.

5) उपरोक्त वर नमूद तक्ता क्र. 1 मधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या कामाची निविदा स्वीकृतीबाबतचा स्थायी समितीचा ठराव नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही.

7	जाहिरात प्रसिध्दी(वृत्तपत्र व दिनांक)	दै.लोकमत दिनांक-01.09.2013 दै.सामना दिनांक-02.09.2013 शुद्धीपत्रक दिनांक-21.09.2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.26.09.2013 ते 03.10.2013 मुदत-07.10.13
9	ई निविदा	निविदा क्र.472-2013 निविदा सूचना क्र.91-13
10	निविदा उघडल्याचा दिनांक	10.10.2013 प्राप्त निविदा (07)
11	न्युनतम निविदा	बी.पी.सांगळे कं.प्रा.लि. 8.50% जादा दराने रु. 141032845
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.530 दि.29.10.2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	बी.पी.सांगळे कं.प्रा.लि. 6.50% जादा दराने रु. 138433161

14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता (सा.बां.) क्र.67/246/2013 दिनांक-21.11.2013
15	कामाची मुदत	18 महिने दि.22.11.13 ते 21.05.2015
16	मुदतवाढ	अनुपलब्ध
17	काम पूर्ण दिनांक	काम अपूर्ण
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्र.	क्र. 2798 पृ.क्र. 02-173
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-121571917
20	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्र.01 व 04 रु. 121571917

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता एकूण 01 ते 04 धावत्या देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 121571917 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त कामाचे बाब क्रमांक 21(b) “Earth work embackment साठी” चे एकूण परिमाण 4534.978 घ.मी. साठी रु. 482.90 प्र.घ.मी. दराने रक्कम रु.2189941 चे प्रदान केले आहे. Standard specification for road work आर.डी. 12.10 “mode of mesurment for earthwork embackment" नुसार एकूण परीमाणातून 5 टक्के दबाई घट वजा करणे आवश्यक आहे. तथापि तशी 5 टक्के वजावट न करताच एकूण परिमाणासाठी प्रदान करण्यात आलेले आहे. सबब 5 टक्के दबाई घटाचे परिमाण 226.75 घ.मी.साठी रु.482.90 व त्यावर निविदा जादा दर 6.50 % असे एकूण रु. 514.29 दराने रक्कम रु. 116615 चे जादा प्रदान झालेले आहे.

2. सदर कामास शहर अभियंता यांनी दिनांक-19.09.2013 रोजी तांत्रिक मान्यता दिली असतांना निविदा मात्र दिनांक-01.09.2013 रोजी प्रसिध्द केल्याचे दिसून येते. तांत्रिक मान्यतेपूर्वीच निविदा प्रसिध्द करणे अनियमित आहे.

3. सदर कामाच्या बाब क्र.21(a) (जिल्हा दरसूची व दरपृथःकरण 12-13 बाब क्र.1081) Providing & Laying Hard Murum Blanketing या बाबीन्वये 8813.428 घ.मी.साठी रु. 511.40 प्र.घ.मी.दराने रु.4507187 एवढी रक्कम ठेकेदारास प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि अंदाजपत्रकात नमूद सदर बाबीचे स्पेशिफीकेशन साठी जिल्हा दरसूचीतील बाब क्र.1101 नुसार मूळ दर रु.77 प्र.घ.मी. व दरपृथःकरणासह रु.481.90 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक होते. तथापि या प्रमाणे अदाई न केल्याने रु.29.50 व त्यावर निविदा दर 6.50% जादा दर असे एकूण रु. 31.42 दराने रु. 276918 जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चाच्या कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध

करण्यात येईल. तथापि उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

5. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख, दिनांक 15/12/2003 नुसार खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे.सदर कामासाठी वापरलेल्या बाब क्र.33 Rifilling trenches या बाबीची 2352.677 घन मीटरसाठी रु.70.67 प्रति घन मीटर दराने रॉयल्टीची रक्कम रु.166264 वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

6. सदर कामासाठी एकमुस्त रु. 12150000 मोबिलायझेशन अग्रीम देण्यात आलेला आहे. केंद्रीय दक्षता आयोग यांचे कडील परिपत्रक क्रमांक 02/02/11 दिनांक 17/02/2011 मधील अनुक्रमांक (ii) नुसार मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि सदर परिपत्रकाचे पालन झालेले नाही.

7. सदर कामाचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संचिकेत संलग्न केलेले नाही. सदर कामाची मुदत संपून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने मुदतवाढीसह काम पूर्ण करणे आवश्यक आहे.

8. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/ उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले 200,300,450,600 व 900mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

9. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट-3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

11. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	559797
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	121012120
एकूण	:-	रु.	121571917

DATDTBM7001 (Ref No : 164, Hmm No : 76)

40 पंचवटी विभाग वॉर्ड क्र.19 मधिल आरक्षण क्र.432 स.नं.03 येथे विभागीय कार्यालय इमारतीचे बांधकाम करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष : मनपा निधी मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 93411035.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 88986783.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4424252.00/-

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ट 3 नियम 28 नुसार किमान 3 निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. तथापि फेरनिविदेत एकमेव निविदा प्राप्त असतांना फेरनिविदा न मागविता 4.05 टक्के जादा दराची प्राप्त एकमेव निविदा स्वीकारण्यात आली. TMT Steelbar reinforcement from other plant या बाबीचे दरसूचीतील दरात बदल झाल्याबाबत कोणताही तपशील अंदाजपत्रकात नमूद केलेला नाही तसेच त्यासाठीचे कोणतेही सुधारित दरपृथक्करण अंदाजपत्रकासोबत जोडण्यात आलेले नाही. Providing R.C.C. M-25 for column and beam व Providing and Applying Polymer base Apex paint या बाबींचे चुकीचे दरपृथ:करण केल्याने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले 225 व 300 mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 171 मधील 6 नुसार निविदा उघडल्याच्या दिनांका पासून एक आठवड्यात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य असतांना आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. निविदेचे संभाव्य मूल्य रु.100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेणे असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

1	कामाचे नांव	पंचवटी विभाग वॉर्ड क्र.19 मधिल आरक्षण क्र.432 स.नं.03 येथे विभागीय कार्यालय इमारतीचे बांधकाम करणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र.1477 दिनांक- 10/12/2010 रु.86115858
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र.NMC/PWD/1232 दिनांक- 12/08/2010 रु. 86115858 दरसूची-2009-10
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये- 86115858
5	लेखाशीर्ष	मनपा निधी "इमारत बांधणे"
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी(वृत्तपत्र व दिनांक)	दै.लोकमत दि.23.03.2011 फेर निविदा दुसरी वेळ
8	निविदा विक्री कालावधी	दि.30.03.2011 ते 04.04.2011 मुदत-06.04.11
9	ई निविदा	निविदा क्र.884-2010 निविदा सूचना क्र.01-2011
10	निविदा उघडल्याचा दिनांक	19.04.2011 प्राप्त निविदा (01)
11	न्युनतम निविदा	मे.आनंद कं.प्रा.लि. 4.05% जादा दराने रु. 89603550
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.388 दि.21.05.2011
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.आनंद कं.प्रा.लि.4.05% जादा दराने रु. 86115858चालू दरसूची10-11नुसार 6.31% कमी
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता (सा.बां.) क्र.60/145/2011 दिनांक- 02.07.2011
15	कामाची मुदत	24 महिने दि.02.07.11 ते 01.07.2013
16	मुदतवाढ	दिनांक-01.07.2014 पर्यंत

17	काम पूर्ण दिनांक	01.07.2014
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्र.	1.क्र.3030 पृ.क्र.01-38 3.क्र.2525 पृ.क्र.80-100 2.क्र.3031 पृ.क्र.01-31 4.क्र.3035 पृ.क्र.147-200 5.क्र.3034 पृ.क्र.122-201
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-93411035
20	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्र.01 ते 08 व अंतिम नवव्या देयका अखेर रु. 93411035

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता एकूण 01 ते 08 धावत्या व नवव्या अंतिम देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 93411035 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ट 3 नियम 28 नुसार किमान 3 निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे. तथापि फेरनिविदेत (दुसरी वेळ) एकमेव निविदा प्राप्त असतांना फेरनिविदा न मागविता 4.05 टक्के जादा दराची प्राप्त एकमेव निविदा स्वीकारण्यात आली. सबब महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नसून नियमाचे पालन झालेले नाही.

2. प्रथम निविदा प्रसिद्ध केली असता एकही निविदा प्राप्त झाली नसल्याचे टिप्पणी मध्ये नमूद केले आहे. तथापि तसा ई-निविदा विभागाकडील अहवाल प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही.

3. " TMT Steelbar reinforcement from other plant " या बाबीचे दरसूची 2009-10 नुसार केलेले दरपृथक्करण पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 28 वर दरसूचीतील आयटम क्र.15/31 नुसार केलेले दरपृथक्करण करून सदर बाबीचा एकत्रित दर रु. 47398.10 प्र.मे.टन नमूद आहे. तथापी प्रत्यक्षात अदाई करतांना रु. 53214.90 प्र.मे.टन दर ग्रहीत धरण्यात आला आहे. दरसूचीतील दरात बदल झाल्याबाबत कोणताही तपशील अंदाजपत्रकात नमूद केलेला नाही तसेच त्यासाठीचे कोणतेही सुधारित दरपृथक्करण अंदाजपत्रकासोबत जोडण्यात आलेले नाही. तसेच जिल्हा दरसूची मधिल सर्वसाधारण सूचना तथा दरपृथ:करणानुसार सदर बाबीची अदाई/दर निश्चिती करतांना तळमजल्यासाठी (GF) मूळ दर (दरपृथ:करणासह) व त्या पुढील प्रत्येक मजल्यासाठी 1% दर अधिक करून त्यानुसार अदाई करावयाची आहे. सदर विभागीय कार्यालयाची इमारत ही भूमिगत मजल्यासह (Lower ground floor) तळ,पहिला,दुसरा व तिसरा मजला अशी बांधण्यात आलेली आहे. उपरोक्त बाबीची अदाई/दर निश्चिती करतांना भूमिगत मजल्यासाठी (Lower ground floor) 1% दरवाढ अनुज्ञेय ठरत नाही.त्याचप्रमाणे तळमजल्यासाठी (Upper Ground floor) देखील 1% दरवाढ अनुज्ञेय ठरत नाही. तथापि या दोन्ही मजल्यासाठी 1% प्रमाणे वाढीव अदाई/दर निश्चिती केल्याने त्या मजल्यांसाठी व त्यावरील तिन्ही मजल्यांसाठी 1% प्रमाणे एकूण खालील तपशिलाप्रमाणे रक्कम रु. 3115592 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

अ. क्र.	बाब (अंदाजपत्रकातील बाब क्र. 26)	मजला floor	दरसूची/ पृथ:करण नुसार अनुज्ञेय दर	अदाई केलेला दर	तफावत/ फरक	परिमाण मे.टन	रक्कम
1	TMT Steelbar	LGF	47398.10	53214.90	5816.80	181.847	1057768
	TMT Steelbar	UGF	47398.10	53744.60	6346.50	67.790	430229
	TMT Steelbar	FF	47896.90	54274.40	6404.50	78.400	502113
	TMT Steelbar	SF	48341.70	54804.10	6462.40	73.840	474340
	TMT Steelbar	TF	48813.60	55333.90	6520.30	71.410	465615
	TMT Steelbar	Terrace	49285.40	55863.60	6578.20	14.210	93476
	TMT Steelbar Part - B	--	47398.10	53214.90	5816.80	15.825	92051
	एकूण						3115592

4. सार्वजनिक बांधकाम जिल्हा दरसूची मधिल सर्वसाधारण सूचना तथा दरपृथ:करणानुसार Providing R.C.C. M-25 for column & beam या बाबीची अदाई/दर निश्चिती करतांना तळमजल्यासाठी (GF) मूळ दर (दरपृथ:करणासह) व त्या पुढील प्रत्येक मजल्यासाठी 1% दर अधिक करून त्यानुसार अदाई करावयाची आहे. सदर बाबीची अदाई/दर निश्चिती करतांना भूमिगत मजल्यासाठी (Lower ground floor) 1% दरवाढ अनुज्ञेय ठरत नाही. तसेच तळमजल्यासाठी (Upper Ground floor) देखील 1% दरवाढ अनुज्ञेय ठरत नाही. तथापि या दोन्ही मजल्यासाठी 1% प्रमाणे वाढीव अदाई/दर निश्चिती केल्याने त्या मजल्यांसाठी व त्यावरील दोन्ही मजल्यांसाठी 1% प्रमाणे एकूण खालील तपशिलाप्रमाणे रक्कम रु. 87294 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

अ. क्र.	बाब (अंदाजपत्रकातील बाब क्र. 19 व 20)	मजला floor	दरसूची/ पृथ:करण नुसार अनुज्ञेय दर	अदाई केलेला दर	तफावत/ फरक	परिमाण मे.टन	रक्कम

1	RCC M-25 for column	LGF	5847.50	5900.40	52.90	79.92	4228
2	वरीलप्रमाणे	UGF	5847.50	5953.20	105.70	75.04	7932
3	वरीलप्रमाणे	FF	5900.40	6006.00	105.60	74.79	7898
4	वरीलप्रमाणे	SF	5953.20	6058.80	105.60	68.18	7200
5	वरीलप्रमाणे	TF	6006.00	6111.60	105.60	65.09	6874
6	वरीलप्रमाणे	Terrace	6058.80	6164.50	105.70	27.31	2887
7	RCC M-25 for beam	UGF	5910.60	6017.50	106.90	89.23	9539
8	वरीलप्रमाणे	FF	5964.00	6071.50	107.50	129.09	13877
9	वरीलप्रमाणे	SF	6017.50	6124.30	106.80	118.40	12645
10	वरीलप्रमाणे	TF	6070.90	6177.50	106.60	121.85	12989
11	वरीलप्रमाणे	TF	6124.30	6231.00	106.70	11.48	1225
	एकूण						87294

5. Providing & Applying Polymer base Apex paint या बाबीच्या अदाई/दर निश्चिती करतांना देखील वरीलप्रमाणे 1% जादा आकारणी केल्याने रु.5540 ठेकेदारास जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

4. बाब क्र.46 Provoding & Laying polish stone जिल्हा दरसूची (बाब क्र.44 पान नं.97) / अंदाजपत्रकातील सदर बाबीच्या स्पेशिफिकेशन (BD. M 22/390) नुसार दर रु.780 प्र.स्क्वे.मीटर (सरासरी पहिल्या ते पाचव्या मजल्या पर्यंत) असा असतांना रु.4375 प्र.स्क्वे.मीटर प्रमाणे म्हणजेच रु.3595 व त्यावर निविदा जादा दर रु.4.05% असे एकूण रु.3740.60 प्र.स्क्वे.मीटर प्रमाणे रु.1215826 जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

6. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकात Part-A साठी रु.487577 व Part-B साठी रु.13963 अशी एकूण रु.501540 एवढी रॉयल्टी गृहीत धरण्यात आलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी (मुरूम/दगडासाठी) भरणा चलन जोडलेले आहे. तथापि सदरचे चलन हे एकत्रित रॉयल्टी भरणा

रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही. तसेच दरपृथ:करणात रु.70.67 प्र.घ.मी.दराने रॉयल्टीचा समावेश केला आहे. निविदा दर 4.05% जादा असल्याने रॉयल्टीच्या दरावर तेवढी रक्कम ठेकेदारास जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

7. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/ उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेले 225 व 300 mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

8. सदर कामाच्या निविदा दिनांक-19.04.2011 रोजी उघडल्या आहेत व कामाचे आदेश दिनांक-02.07.2011 रोजी देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांका पासून एक आठवड्यात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/प्रक्र.171/08/नवि-20 दिनांक-02.03.2009 नुसार रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य आहे. तथापी सदर कामाचे आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 1971 चे नियम 180 (3) नुसार जेव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेव्हा मोजणी पुस्तकांतील संबंधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकांत त्याचा प्रतिसंदर्भ नमूद करण्यात यावा असे असताना मोजमाप पुस्तिकेतील लाल शाईने काट मारण्यात आलेली नाही व देयकात तसेच मोजणी पुस्तकात त्याचा प्रतीसंदर्भ नोद्विण्याची कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	4424252
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	88986783
एकूण	:-	रु.	93411035

DATDTBM7001 (Ref No : 165, Hmm No : 77)

41 बाह्यरिंग रस्ता- पपया नर्सरी ते एक्सलो जंक्शन ते गरवारे पॉइंट पावेतो रुंदीकरण- डांबरीकरण करून करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 09

लेखा शीर्ष : सिंहस्थ निधी कामे शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 251580632.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 248662495.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2918137.00/-

बाब क्र. 18a Providing and Laying Hard Murum Blanketing या बाबीसाठी रु.481.90 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक असतांना रु.511.40 दराने अदाई केल्याने रु. 402331 जादा अदाई झाल्याचे दिसून येते. निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिकात प्रसिद्ध केलेली नाही. मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. शासकीय निधीकडे विमा उतरविला नसल्यास संबधित कामाच्या देयकातून 1% रक्कम कपात करणे आवश्यक आहे. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला दिसून येत नाही. निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. सदर कामासाठी बाब क्र.25 नुसार वापरण्यात आलेले 200,300,450 व 600mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही. निविदेचे संभाव्य मूल्य रु.100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेणे आवश्यक असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

1	कामाचे नांव	बाह्यरिंग रस्ता- पपया नर्सरी ते एक्सलो जंक्शन ते गरवारे पॉइंट पावेतो रुंदीकरण- डांबरीकरण करून करणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र.175 दिनांक- 28/08/2012 रु.9.27 कोटी
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र. NMC/PWD/41 दिनांक- 29/11/2013 रु. 234995335 दरसूची-2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये- 234995335

5	लेखाशीर्ष	"सिंहस्थ कामे"
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी(वृत्तपत्र व दिनांक)	दै.सकाळ दिनांक-01.12.2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.10.12.2013 ते 16.12.2013 मुदत-23.12.13
9	ई निविदा	निविदा क्र.805-2013 निविदा सूचना क्र.150-13
10	निविदा उघडल्याचा दिनांक	23.12.2013 प्राप्त निविदा (04)
11	न्युनतम निविदा	एम.टी.पाटील बिल्डर्स & कॉ. 14.95% जादा दराने रु. 270127138
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.700 दि.31.12.2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	एम.टी.पाटील बिल्डर्स & कॉ. 11.60% जादा दराने रु. 262125739
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता (सिंहस्थ) क्र.93/292/2014 दिनांक-21.01.2014
15	कामाची मुदत	18 महिने दि.22.01.14 ते 21.07.2015
16	मुदतवाढ	अनुपलब्ध
17	काम पूर्ण दिनांक	अनुपलब्ध
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्र.	क्र. 3295 पृ.क्र. 32-62 क्र. 3375 पृ.क्र. 01-100
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-251580632
20	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्र.01 ते 06 रु. 251580632

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 01 ते 06 धावत्या देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 251580632 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामाच्या बाब क्र.18(a) (जिल्हा दरसूची व दरपृथःकरण 12-13 बाब क्र.1081) Providing & Laying

Hard Murum Blanketing या बाबीन्वये 12221.481 घ.मी.साठी रु. 511.40 प्र.घ.मी.दराने रु. 6250065 एवढी रक्कम ठेकेदारास प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि अंदाजपत्रकात नमूद सदर बाबीचे स्पेशिफीकेशन साठी जिल्हा दरसूचीतील बाब क्र.1101 नुसार मूळ दर रु.77 प्र.घ.मी. व दरपृथ:करणासह रु.481.90 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक होते. तथापि या प्रमाणे अदाई न केल्याने रु.29.50 व त्यावर निविदा दर 11.60% जादा दर असे एकूण रु. 32.92 दराने रु.402331 जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

2. सदर कामासाठी एकमुस्त रु. 20250000 मोबिलायझेशन अग्रीम देण्यात आलेला आहे. केंद्रीय दक्षता आयोग यांचे कडील परिपत्रक क्रमांक 02/02/11 दिनांक 17/02/2011 मधील अनुक्रमांक (ii) नुसार मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि सदर परिपत्रकाचे पालन झालेले नाही. तसेच निविदेतील विशेष अटी/शर्तीनुसार (क्र.2.3) मोबिलायझेशन अग्रीमाची वसुली करण्यात आलेली नाही.

3. महसूल व वनविभाग शासन अधिसूचना दिनांक 11.2.2010 नुसार रुपये 70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसूली होणे आवश्यक आहे. त्या नुसार उपरोक्त कामासाठी बाब क्र.61 नुसार वापरलेल्या बांधकाम/ गौणखनीज साहित्य 13145.097 घ.मी.साठी रॉयल्टीची रक्कम रु.928964 स्वतंत्र बाब म्हणून प्रदान केलेली आहे. तथापि त्याची कपात करून सदर रक्कम शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही. नस्ती सोबत रॉयल्टी भरणा केल्याबाबत एकत्रित रॉयल्टी भरणा चलने जोडलेली आहेत तथापि सदरची चलने ही एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेची असून त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती संबंधित कामासाठीची असल्याचे सिद्ध होत नाही.

4. महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्र.जिईएन/1098/1357/प्र क्र166/98मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. शासकीय निधीकडे विमा उतरविला नसल्यास संबधित कामाच्या देयकातून 1% रक्कम कपात करणे आवश्यक आहे. सदर कामाचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.सदर अभिलेखे दर्शवावे अन्यथा 1% विम्याची रक्कम रु. 2515806 वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.-109/रा.म.-2 दिनांक-22.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक असतांना साहित्याचा असा अहवाल घेण्यात आलेला दिसून येत नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चाच्या कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

7. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2002/(2990)/ उद्योग-6, दि. 4/2/2006 परिच्छेद "तीन" नुसार शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6, दि. 2/1/1992 च्या परिशिष्ट "तीन" मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवलेल्या वस्तुंची खरेदी महामंडळाकडूनच करणे बंधनकारक आहे. महामंडळाकडून खरेदी करण्यासाठी राखीव असलेल्या

वस्तुंसहीत संपूर्ण कामाचा ठेका निश्चित करावा लागत असल्यास अशा निविदेमध्ये सुध्दा वस्तुची खरेदी दरकरारावरच व महामंडळामार्फतच करण्यात यावी अशा सूचना अंतर्भुत करण्यात याव्यात अन्यथा सदरची निविदा अग्राहय समजण्यात यावी, असे नमुद आहे. सदर कामासाठी बाब क्र.25 नुसार वापरण्यात आलेले 200,300,450 व 600mm आर.सी.सी. पाईप मक्तेदाराने महामंडळाकडून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट-3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	2918137
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	248662495
एकूण	:-	रु.	251580632

DATDTBM7001 (Ref No : 166, Hmm No : 84)

42 नाशिक मनपा हद्दीतील गंगापूर रस्ता-अशोकस्तंभ ते जेहान सर्कल ते बारदान फाटा ते मनपा हद्दी पावेतो रुंदीकरण व डांबरीकरण करून विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष : सिंहस्थ निधी कामे शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 310959673.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 310225140.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 734533.00/-

वाढीव खर्चासाठी सुधारित प्रशासकीय प्रशासकीय घेतल्याबाबत अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाहीत. बाब क्र.26a Providing and Laying Hard Murum Blanketing या बाबीसाठी रु.481.90 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक असतांना रु.511.40 दराने अदाई केल्याने रु. 633584 जादा अदाई झाल्याचे दिसून येते. मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे.

खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक असतांना सदर प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही. निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिकात प्रसिद्ध केलेली नाही. रु. 50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेणे अनिवार्य असतांना आशा प्रकारे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुण घेण्यात आलेले नाही. निविदेचे संभाव्य मूल्य रु.100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेणे असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

1	कामाचे नांव	नाशिक मनपा हद्दीतील गंगापूर रस्ता-अशोकस्तंभ ते जेहान सर्कल ते बारदान फाटा ते मनपा हद्दी पावेतो रुंदीकरण व डांबरीकरण करून विकसित करणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र.175 दिनांक- 28/08/2012 रु.31 कोटी
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता क्र. NMC/PWD/40 दिनांक- 29/11/2013 रु. 399997550 दरसूची-2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये- 399997550
5	लेखाशीर्ष	"सिंहस्थ कामे"
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी(वृत्तपत्र व दिनांक)	दै. सकाळ दिनांक-01.12.2013
8	निविदा विक्री कालावधी	दि.10.12.2013 ते 16.12.2013 मुदत-23.12.13
9	ई निविदा	निविदा क्र. 804-2013 निविदा सूचना क्र.150-13
10	निविदा उघडल्याचा दिनांक	23.12.2013 प्राप्त निविदा (04)
11	न्युनतम निविदा	मे.बी.पी.सांगळे कं. प्रा.लि.नाशिक 16.51% जादा दराने रु.466037146

12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.701 दि.31.12.2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मे.बी.पी.सांगळे कं. प्रा.लि.नाशिक 11% जादा दराने रु.443240719
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	संचिकेत अनुपलब्ध
15	कामाची मुदत	अनुपलब्ध
16	मुदतवाढ	अनुपलब्ध
17	काम पूर्ण दिनांक	अनुपलब्ध
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्र.	क्र. 3381,3382,3299व 3687
19	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-310959673
20	प्रदानाचा तपशिल	धावते देयक क्र.01 ते 03 रु. 310959673

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता 01 ते 03 धावत्या देयकांन्वये झालेला खर्च रक्कम रु. 310959673 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महासभा ठराव क्र.175 दिनांक-28.08.2012 अन्वये सदर कामाच्या रु.31 कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.तथापि अंदाजपत्रक रु.399997550 चे असल्याने वाढीव खर्चासाठी अथवा सुधारित प्रशासकीय प्रशासकीय घेतल्याबाबत अभिलेखे संचिकेत निदर्शनास आले नाहीत.

2. सदर कामाच्या बाब क्र.26(a) (जिल्हा दरसूची व दरपृथ:करण 12-13 बाब क्र.1081) Providing & Laying Hard Murum Blanketing या बाबीन्वये 19346.080 घ.मी.साठी रु. 511.40 प्र.घ.मी.दराने रु. 9893583 एवढी रक्कम ठेकेदारास प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि अंदाजपत्रकात नमूद सदर बाबीचे स्पेशिफीकेशन साठी जिल्हा दरसूचीतील बाब क्र.1101 नुसार मूळ दर रु.77 प्र.घ.मी. व दरपृथ:करणासह रु.481.90 या दराने ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक होते. तथापि या प्रमाणे अदाई न केल्याने रु.29.50 व त्यावर निविदा दर 11% जादा दर असे एकूण रु. 32.75 दराने रु.633584 जादा अदाई झाल्याचे दिसून येते.

3. सदर कामासाठी एकमुस्त रु. 40050000 मोबिलायझेशन अग्रीम देण्यात आलेला आहे. केंद्रीय दक्षता आयोग यांचे कडील परिपत्रक क्रमांक 02/02/11 दिनांक 17/02/2011 मधील अनुक्रमांक (ii) नुसार मोबिलायझेशन अग्रीमाची रक्कम किमान 2 पेक्षा कमी नाही इतक्या हप्त्यात प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि सदर परिपत्रकाचे पालन झालेले नाही.

4. महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/2001/प्र.क्र.308/ख,दिनांक-15/12/2003 नुसार

खोदकामातून उपलब्ध साहित्य त्याच ठिकाणी अथवा इतर ठिकाणी वापर केल्यास विहित दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वापरलेल्या बाब क्र.37 Rifilling trenches या बाबीची 1344.49 घन मीटरसाठी रु.70.67 प्रति घन मीटर दराने रॉयल्टीची रक्कम रु. 95015 वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

5. बाब क्र.26(B) Providing earth work for refilling the trenches 955.60 घ.मी.साठी रु. 482.90 दराने रु. 461459 ठेकेदारास प्रदान केले आहे. तथापि जिल्हा दरसूची पान क्र.154 अ.क्र.1101 नुसार सदर बाबीचा दर रु.481.90 प्र.घ.मीटर असा आहे. त्यामुळे रु.01 व त्यावर निविदा जादा दर 11% या प्रमाणे एकूण रु.1061 ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.

6. सदर कामासाठी “TMT steel” 13.77 मे.टन वापरले आहे तथापि त्यासाठी कोणताही चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे त्याची गुणवत्ता प्रमाणित झालेली नाही. सदर बाबीचे दरपृथक्करण करतांना रु.318.80 प्र.मे.टन गुणवत्ता चाचणी करिता समाविष्ट केलेले असल्याने त्यानुसार 13.77 मे.टन साठीची रक्कम रु.4390 व निविदा 11 टक्के जादा दराने रु.483 असे एकूण रक्कम रु.4873 चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते.

7. सदर कामाच्या प्रथम धावत्या देयकात बाब क्र.08 नुसार 7061.74 घ.मी.ची रु.499053 एवढी रॉयल्टी स्वतंत्र दर्शवून ठेकेदारास अदा केली आहे. तथापि सदर रक्कम देयकातून कपात करून शासन खाती भरणा करण्यात आलेली नाही अथवा संबधित ठेकेदाराने रॉयल्टी शासन खाती भरल्याबाबत चलन संचिकेत आढळले नाहीत. त्यामुळे सदर रक्कम वसूल करून “853 गौण खनिज” या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट 3 मधील अनुक्रमांक 19 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय खर्चाच्या कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिका प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 50 लक्ष पेक्षा जास्त असतांनाही सदर कामासाठीची निविदा राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ट-3 अनुक्रमांक 21 नुसार निविदेचे संभाव्य मूल्य रु. 100 लाखाहून अधिक असेल अशा सर्व प्रकरणात निविदापूर्व बैठक घेण्यात येईल. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 100 लाखाहून जास्त असतांना निविदापूर्व बैठक घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

10. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	734533
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	310225140

एकूण	:-	रु.	310959673

43 JNNRUM अंतर्गत वडाळा व शिवाजीवाडी येथील घरकुल योजनेच्या कामासाठी मुलभूत सुविधा पुरविणे कामांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :JNNRUM घरकुल योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 10276070.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9890787.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 385283.00/-

वडाळा व शिवाजीवाडी योजनेतील अंतर्गत रस्त्यांचे WBM चे काम पूर्ण नसताना त्यावरील करावयाच्या रस्त्याच्या कामाची निविदा प्रसिध्द केली. तसेच कार्यादेश दिल्यानंतर वेळीस जागेची उपलब्धता झाली नाही. शिवाजीवाडी स.नं. 808/12 येथी कामापैकी काही जागा प्रत्यक्ष ताब्यात नसतांना निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. या जागेचा भुसंपादन प्रस्ताव कार्यादेशानंतर विलंबाने राबविण्यात आला. वडाळा व शिवाजीवाडी येथील कामासाठी मक्तेदारास मुदतवाढ मंजूर नाही. शिवाजीवाडी स.नं. 808/12 येथील कामास पुर्वलक्षी प्रभावाने कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे. गौणखनिज रॉयल्टी वसुली करण्यात आलेली नाही. कामाच्या वाढीव मुदतीसाठी ग्राहय कंत्राटी कामाचा विमा प्राप्त केलेला नाही. त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेत घरकुल योजनांच्या ठिकाणी मुलभूत सुविधा पुरविणेसाठी तसेच जोड रस्ते तयार करणेसाठी कामे हाती घेण्यात आली आहेत. वडाळा व शिवाजीवाडी येथील घरकुल योजनेच्या कामासाठी मुलभूत सुविधा पुरविणे व हॉटेल छान ते शिवाजीवाडी घरकुल योजनेपर्यंत रस्ता तयार करणे या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तिका क्र.	कामावरील खर्च
1	JNNRUM अंतर्गत चालू असलेल्या वडाळा	साबांवि डेस्क-6/150/352/2011,	मे.राघवेंद्र इन्फ्रास्ट्रक्चर	1536, 2302 व 2303.	प्रथम धावते देयक

	व शिवाजीवाडी येथील घरकुल योजनेच्या कामासाठी भुमिगत पाण्याच्या टाक्या बांधणे, अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे इ. रक्कम रू.18247960/-	दि.14/12/2011	8.59 टक्के कमी दर		रू.2716808/- दुसरे धावते देयक रू.8491738/-
2	नाशिक पुर्व विभागातील JNNRUM अंतर्गत शिवाजीवाडी स.नं.808/1/2 येथे चालू आलेल्या घरकुल योजनेसाठी रस्ता तयार करणे. रक्कम रू.7777974/-	साबांवि डेस्क-6/39/108/2013, दि.08/03/2013	मे.एन.के. वर्मा, 65.50 टक्के जादा दर	2304	प्रथम धावते देयक रक्कम रू.1784332/-

उपरोक्त कामांच्या उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले असुन मार्च 2015 अखेर झालेल्या एकुण रक्कम रू.10276070/- च्या खर्चावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. अ.क्र. 1 वर नमूद कामाच्या मक्तेदाराने या कामातील रस्त्याचे WBM चे काम पुर्ण नसल्याने पुढील काम करू शकत नसल्याचे कळविले आहे. मुळ घरकुल योजनेतील अंतर्गत रस्त्यांचे WBM चे काम पुर्ण झालेले नसतांना त्यावरील करावयाच्या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. कार्यादेश दिल्यानंतर वेळीच जागेची उपलब्धता न झाल्याने प्रकल्पास विलंब झालेला आहे.

2. अ.क्र. 2 वर नमूद काम मुदतीत पुर्ण न झाल्याने मुदतवाढ प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावात हॉटेल छान कडुन 200 मी. लांबीचा रस्ता मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे सदरची जागा ताब्यात घेणेकामी विलंब लागणार असल्याने नमुद करण्यात आलेले आहे. जागा ताब्यात नसतांना निविदा प्रकिया राबवुन कार्यादेश देण्यात आला. प्रत्यक्षात या जागेचा भुसंपादन प्रस्ताव केस क्र.45/15 अन्वये कार्यादेश दिल्यानंतर विलंबाने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

3. अ.क्र. 1 वर नमुद कामाची मुदत 14/12/2012 पर्यंत होती. मुदतीत काम पुर्ण झालेले नाही. तसेच मक्तेदारास मुदतवाढ मंजुर केल्याचे अभिलेखे नस्तीसोबत नाहीत. मुदतीत काम पुर्ण केलेले नसतांनाही निविदा अटी व शर्तीप्रमाणे मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अ.क्र. 2 येथील कामास दि.15/05/2015 पर्यंत विनादंड मुदतवाढ देण्यात आली. निविदा अटी व

शर्तीप्रमाणे मक्तेदाराने मुदतवाढ संपण्यापुर्वी मुदतवाढीचा अर्ज करणे आवश्यक आहे. मक्तेदाराचा अर्ज नस्तीस जोडलेला नाही. कार्यादेशाप्रमाणे कामाची मुदत 07/12/2013 पर्यंत होती. मुदतवाढीचा प्रस्ताव प्रदीर्घ विलंबाने दि.02/02/2015 अन्वये सादर करण्यात आला असून त्यास दि.17/03/2015 रोजी टिपण्णीव्दारे मान्यता देण्यात आली. मुदतवाढीस पूर्वलक्षी प्रभावाने कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे. मुदतवाढीच्या कालावधीतही काम पुर्ण झालेले नाही.

4. अनुक्रमांक 1 वर नमुद कामासाठी कार्यादेश दिनांक 14/12/2011 रोजी देण्यात आल्याने महसुल व वनविभाग शासन अधिसुचना दि.11/02/2010 नुसार रू.70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वापरलेल्या साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम परिगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

देयकाचा तपशिल	बाब क्रमांक	रॉयल्टीचे एकूण परिमाण घ.मी.	रॉयल्टीचा दर रक्कम रू.	एकूण रक्कम रू.
दुसरे धावते देयक - शिवाजीवाडी PART A	1,2,7, 8 ते 11	149.78	70.67	10585
दुसरे धावते देयक - शिवाजीवाडी PART B	3,5,8,10, 13	925.57	70.67	65410
दुसरे धावते देयक - वडाळा PART A	4,7 ते 11	65.72	70.67	4644
दुसरे धावते देयक - वडाळा PART C	2,3,4,7,11	444.62	70.67	31421
दुसरे धावते देयक - शिवाजीवाडी PART C	2,3,5,7,11	572.916	70.67	40487
			एकूण	152548

मक्तेदाराने या कामासाठी वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी भरल्याचे अभिलेखे सादर केलेले नाहीत. सबब, रॉयल्टीची रक्कम देयकातुन वसुल करणे आवश्यक होते. तथापि, दुस-या धावत्या देयकापर्यंतची रॉयल्टीची रक्कम रू.152548/- वसुल करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

5. अ.क्र. 2 वर नमुद कामासाठी रॉयल्टीची रक्कम रू.104010/- परीगणित करून देयकात स्वतंत्र दर्शवून प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, मक्तेदाराने या कामासाठी वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी भरल्याची चलने नस्तीसोबत जोडलेली नाहीत. सबब, मक्तेदारांस अदा करण्यात आलेली रॉयल्टी रक्कम रू.104010/- वसुल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

6. नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र.166/98 /नवि-24 दि.03.11.2003 नुसार कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक आहे. तथापि, तसे विमापत्र अ.क्र. 2 वर नमुद कामाचे नस्तीसोबत जोडलेले नाही. तसेच देयकातुनही त्यासाठीची 1

टक्का रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम रू.128725/- वसुल करून विमा संचालनालयाकडे भरणा होणे आवश्यक आहे.

अ.क्र. 1 वर नमुद कामासाठी विम्याची मुदत दि.14/06/2013 पर्यंत होती. (with maintenance period 14/06/2014 पर्यंत) त्या मुदतीनंतरही काम अपूर्ण असून त्यापुढील कालावधीसाठी विम्याचे नुतनीकरण केलेले नाही.

7. अ.क्र. 2 वर नमूद कामाची प्रशासकीय मान्यतेची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही. या कामाची निविदा दि.10/11/2012 ते 11/11/2012 च्या वृत्तप्रत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.कामास तांत्रिक मान्यता दिनांक 12/11/12 रोजी देण्यात आलेली आहे. कामास तांत्रिक मान्यता नसतांना निविदा प्रसिध्द करण्यात आली.

8. अ.क्र. 1 वर नमूद कामास महासभेने प्रशासकीय मान्यतेत "प" अंदाजपत्रक शहरी गरिबांना सुविधा पुरविणे या लेखा शिर्षातून खर्चास मान्यता दिलेली आहे. या कामाचे प्रथम धावते देयक "प" अंदाजपत्रक या लेखाशिर्षातुन खर्ची टाकण्यात आलेले आहे. तथापि, त्यानंतरचा खर्च JNNRUM च्या लेखाशिर्षातुन करण्यात आलेला आहे. लेखाशिर्ष बदलासाठी मान्यता घेण्यात आलेली नाही.

9. उपरोक्त कामांसाठी मक्तेदाराने सादर केलेल्या बँक गॅरंटीच्या प्रती नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत. त्याअभावी बँक गॅरंटीचे नुतनीकरण केल्याची पडताळणी करता आली नाही.

10. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/ प्र.क्र. 171/08/नवि.20 दि.02.03.2009 नुसार रू.50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे. अ.क्र.1 च्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन अदयापपावेतो तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.

11. मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवा-यात कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचा शेरा नोंदविलेला आहे. तथापि, त्यांनी कोणत्या बाबींची तपासणी केली याच्या बाबनिहाय व दिनांक निहाय नोंदी घेतलेल्या नाहीत.

12. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	385283
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	9890787
एकूण	:-	रु.	10276070

DATDTBM7001 (Ref No : 123, Hmm No : 62)

44 JNNRUM अंतर्गत चुंचाळे शिवार येथील चालू असलेल्या घरकुल योजनेच्या ठिकाणी मुलभूत सुविधा पुरविणे कामातील उणीवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :JNNRUM घरकुल योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 40172651.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 39114102.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 1058549.00/-

चुंचाळे येथील नियमित घरकुल योजनेंतर्गत WBM रस्त्याचे काम पूर्ण झालेले नसतानाही त्यावर करावयाच्या क्रांक्रीटीकरणाच्या कामाची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. कायादेश दिल्यावर विलंबाने जागा उपलब्ध झाली. गौण खनिज रॉयल्टीची वसुली करण्यात आलेली नाही. रॉयल्टीच्या रकमेवर निविदा जादा दराने प्रदान रकमेची वसुली केलेली नाही. चुंचाळे येथील कामाच्या मक्तेदारांस करण्यात आलेल्या दंडाची वसुली केलेली नाही. अंगणवाडीच्या कामास मुदतवाढ मंजुर नाही किंवा दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. कंत्राटी कामाचा विमा प्राप्त केलेला नाही. 1 टक्का रक्कम कपात केलेली नाही. त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत विविध ठिकाणी शहरी गरीबांसाठी घरे बांधणे (घरकुल योजना) योजना हाती घेण्यात आली आहे. या घरकुल योजनांच्या ठिकाणी मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रस्ते क्रांक्रीटीकरण करणे, डांबरीकरण करणे, अंगणवाडी, कम्युनिटी हॉल, पंप हाऊस बांधणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली. मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी चुंचाळे स.नं. 75/अ चालू असलेल्या घरकुल योजनेच्या ठिकाणी खालील कामे हाती घेण्यात आली.

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव स्वीकृत निविदा दर	मोजमाप पुस्तिका क्र.	कामावरील खर्च
1	JNNRUM अंतर्गत चुंचाळे स.न. 75/अ येथे चालू असलेल्या घरकुल योजनेच्या कामासाठी अंतर्गत रस्त्याचे क्रांक्रीटीकरण करणे, दुकाने,गाळे बांधणे, प्राथमिक आरोग्य केंद्र	साबांवि डेस्क-6/152/352/2011, दि.15/12/2011	मे.राघवेंद्र इन्फ्रास्ट्रक्चर 6.59 टक्के कमी दराने	2542 127/98-99.	धावते देयक 1 ते 4 रू.34641504/- 5 वे धावते देयक रू.3205401/- (शॉपींग सेंटर)

	बांधणे टपरी, मार्केट व स्वच्छातागृहे बांधणे इ.अनुषंगिक कामे करणे.इ. रक्कम रू.61898000/-				एकूण रक्कम रू.37846905/-
2	नविन नाशिक विभागातील JNNRUM अंतर्गत चुंचाळे शिवारातील योजनेच्या ठिकाणी अंगणवाडी इमारत बांधणे रक्कम रू.2028401/-	साबांवि डेस्क-6/44/2013, दि.14/03/2013	मे.ज्ञानेश्वर संपतराव निडके, 84.99 टक्के जादा दराने	2340	धावते देयक क्र.1 ते 2 एकूण रक्कम रू.2325746/-

उपरोक्त कामांच्या उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले असुन मार्च 2015 अखेर झालेल्या एकुण रक्कम रू.40172651/- च्या खर्चावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त अ.क्र. 1 च्या कामाच्या मक्तेदाराने दि. 10/09/2012 च्या पत्रान्वये अदयापपावेतो WBM रस्त्याचे काम झालेले नसल्याने त्यावरील डांबरीकरणाचे काम करता आले नसल्याचे कळविले आहे. या कामाच्या वेगवेगळया घटकांच्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.6.18 कोटी पैकी रस्त्याच्या कामाची किंमत रू.5.03 कोटी आहे. एकुण कामापैकी 81 टक्के काम रस्त्याचे असतांना व या रस्त्याचे नियमित घरकुल योजनेअंतर्गत WBM चे काम पुर्ण झालेले नसतांनाही त्यावर करावयाच्या क्रांक्रीटीकरण कामाची निविदा प्रकिया राबविण्यात आली. कार्यादेश दिल्यानंतरही विलंबाने जागा उपलब्ध करून दिल्याचे दिसते. निविदा अटी व शर्ती प्रमाणे स्टाररेट फरक देय असल्याने त्यापोटी येणारा खर्चाचा अतिरीक्त भार महानगरपालिकेवर पडु शकतो.

2. अ.क्र. 1 च्या कामासाठी दि. 15/12/2011 अन्वये तर अ.क्र. 2 च्या कामासाठी दि. 14/03/2013 अन्वये कार्यादेश देण्यात आलेले असल्याने महसुल व वनविभाग शासन अधिसुचना दि. 11/02/2010 नुसार रू.70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त कामांसाठी वापरलेल्या दगड,वाळू, मुरूम, खडी इत्यादी बांधकाम साहित्यासाठी रॉयल्टीची रक्कम परिगणित करून शासन सदरी भरणा करण्यात आलेली नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	देयकातील बाब क्रमांक	एकूण रॉयल्टीचे परिमाण घ.मी.	रॉयल्टीचा दर	वसुलीची रक्कम
1	JNNRUM अंतर्गत चुंचाळे स.न. 75/अ येथे चालू असलेल्या घरकुल योजनेच्या	4 थे धावते देयक 3,A9,A11,	12879.9	70.67	910223

	कामासाठी अंतर्गत रस्त्याचे क्रांक्रीटीकरण करणे, दुकाने,गाळे बांधणे, प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे टपरी, मार्केट व स्वच्छातागृहे बांधणे इ.अनुषंगिक कामे करणे.इ. रक्कम रू.61898000/-	6,8,11 5 वे धावते देयक 6 ते 18	384.691	70.67	27186
2	नविन नाशिक विभागातील JNNRUM अंतर्गत चुंचाळे शिवारातील योजनेच्या ठिकाणी अंगणवाडी इमारत बांधणे रक्कम रू.2028401/-	6 ते 18, 21 ते 26, 31 ते 34, 34	299.035	70.67	21133
				एकूण	958542

अ.क्र. 1 च्या कामाची एकूण रॉयल्टी भरणा केलेल्या चलनाची झेरॉक्स प्रत नस्तीस जोडलेली आहे.सदर चलन एकत्रित रॉयल्टी भरणा रक्कमेचे असुन त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती रॉयल्टी सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याची असल्याचे प्रमाणित होत नाही. सबब रॉयल्टीची रक्कम रू. 958542 /- वसुल करून शासन सदरी भरणा होणे आवश्यक असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3. अ.क्र. 2 वर नमूद कामाच्या अंदाजपत्रकासाठी सन 2006-07 च्या दरसूची नुसार बाबनिहाय दर निश्चित करतांना रॉयल्टी ची रक्कम रू.35.34 समाविष्ट करून दर निश्चित केले आहेत. या कामासाठी अंदाजपत्रकीय दराच्या 84.99 टक्के जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असुन कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टीच्या रक्कमेसह एकूण रक्कमेवर निविदा जादा दराची आकारणी केली आहे. त्यामुळे रॉयल्टीच्या रक्कमेवरही निविदा जादा दराने प्रदान झाले आहे. रॉयल्टीच्या रक्कमेवर निविदा जादा दराने प्रदान करणे संयुक्तिक नसल्याने एकूण परीमाण 299.035 घ.मी. साठी रू.35.34 प्र.घ.मी. दराने येणारी रक्कम रु.10568 वर निविदा जादा दराने रु.8982 चे अनावश्यक जादा प्रदान झालेले आहे.

4. अ.क्र.1 वर नमूद कामासाठी शहर अभियंता यांनी दि.15.01.2015 च्या टिपण्णीव्दारे दि.15.12.2014 पासून प्रतिदिवस रू.500/- दंड आकारण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि, या प्रमाणे मक्तेदाराकडून दंडाची वसुली करण्यात आलेली नाही. दि.15.12.2014 पासुन दि.31.03.2015 पर्यंत 107 दिवसांसाठी रू.500/- प्रमाणे एकूण रक्कम रू.53500/- दंडाची वसुली करण्यात आलेली नाही. दि.31.03.2015 नंतरच्या कालावधीसाठीही दंडाची वसुली होणे आवश्यक आहे.

5. अ.क्र. 2 वर नमूद कामाची मुदत 14.12.2013 पर्यंत होती. काम अपुर्ण असून त्यापुढील कालावधीसाठी मुदतवाढ मंजुर केल्याचे दिसुन येत नाही. तसेच मुदतीत काम पूर्ण न केल्याने निविदा अटी व शर्ती प्रमाणे मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6. अ.क्र. 1 च्या कामासाठी मक्तेदाराने सादर केलेल्या कंत्राटी कामाच्या विम्याची मुदत दि.15.12.2013 पर्यंत (with maintenance period 14/12/2014 पर्यंत) होती. त्यामुदतीनंतरही काम अपूर्ण असुन मक्तेदाराकडुन

कामाच्या संपूर्ण कालावधी साठी ग्राहय विमापत्र प्राप्त केलेले नाही.

अ.क्र. 2 च्या मक्तेदाराने शासकीय विमा निधीकडील विमापत्र नस्तीसोबत जोडलेले नाही. नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील परिपत्रक क्रमांक जी.ई.एन.1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दि.03.11.2003 नुसार कार्यादेश रक्कमेच्या 1 टक्का रक्कम रू.37525/- देयकातुन कपात करून विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात आलेला नाही.

7. उपरोक्त कामांसाठी मक्तेदाराने सादर केलेल्या बँक गॅरंटीच्या प्रती नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत. त्याअभावी बँक गॅरंटीचे नुतनीकरण केल्याची पडताळणी करता आली नाही.

8. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.2008/133/ प्र.क्र. 171/08/नवि.20 दि.02.03.2009 नुसार रू.50 लक्ष वरील विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे. अ.क्र.1 च्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन अदयापपावेतो तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.

9. अ.क्र. 1 च्या कामाची तांत्रिक मान्यतेची प्रत नस्ती सोबत जोडलेली नाही.

10. मोजमाप पुस्तिकेत कामाच्या एकत्रित गोषवा-यात कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के बाबींची तपासणी केल्याचा शेरा नोंदविलेला आहे. तथापि, त्यांनी कोणत्या बाबींची तपासणी केली याच्या बाबनिहाय व दिनांक निहाय नोंदी घेतलेल्या नाहीत.

11. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम	:-	रु.	1058549
आक्षेपाधीन रक्कम	:-	रु.	39114102
एकूण	:-	रु.	40172651

DATDTBM7001 (Ref No : 124, Hmm No : 63)

45 नाशिक पुर्व विभागातील हॉटेल साई पॅलेस मागील सर्व्हे नं.892, 899, 906 मधील JNNURM अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेकरीता ॲप्रोज रोड खडीकरण व डांबरीकरण करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

लेखा शीर्ष :JNNRUM घरकुल योजना शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 229869001.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 228803411.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 1065590.00/-

प्रशासकीय मान्यतोची प्रत उपलब्ध झालेली नाही. तांत्रिक मान्यतेपूर्वी निविदा प्रसिध्द करण्यात आली. गौणखनिज रॉयल्टीची तसेच रॉयल्टी रकमेवर निविदा जादा दराने प्रदान रकमेची वसूली केलेली नाही. डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात डांबराचे ग्रेड नमूद नाही. त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेत नाशिक पुर्व विभागातील हॉटेल साई पॅलेस मागील सर्व्हे नं.892, 899, 906 मधील JNNURM अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेकरीता ॲप्रोज रोड खडीकरण व डांबरीकरण करणे बाबबतची कामे करण्यात आली असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	कामाचे नाव	नाशिक पुर्व विभागातील हॉटेल साई पॅलेस मागील सर्व्हे नं.892, 899, 906 मधील JNNURM अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेकरीता ॲप्रोज रोड खडीकरण व डांबरीकरण करणे
2	प्रशासकिय मान्यता क्रमांक	उपलब्ध झाला नाही.
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	शहर अभियंता 1017 दि.12/11/2012 रु.10937590/- (दरसूची 2006-07)
4	अंदाजपत्रकीय रक्कम रूपये	रु.10937590/-
5	लेखाशिर्ष	शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे JNNURM
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी - 1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दै.महाराष्ट्र टाइम्स दि.11/11/2012, दै.लोकमत दि.10/11/2012
8	निविदा विक्री कालावधी	दि. 22/11/2012 ते दि.29/11/2012 मुदत दि.04/12/2012
9	निविदा उघडल्याचा दि.व प्राप्त निविदा	दि.06/12/2012 प्राप्त निविदा (05)
10	न्यूनतम निविदा	मे पवार पाटकर कन्स्ट्रक्शन 112 टक्के जादा दराने
11	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 827 दि.22/02/2013
12	मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर	मे पवार पाटकर कन्स्ट्रक्शन 65.40% जादा दराने दराने रक्कम रु.1,80,90,773/- चालू दरसूची 2012-13 नुसार 10.88% कमी दराने

13	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	साबावि-डेस्क-6/42/109/2013 दि.18/03/2013
14	कामाची मुदत	12 महिने दि.18/03/2014 पर्यंत
15	मुदतवाढ	---
16	काम पुर्ण दिनांक	दि.14/03/2014
17	मोजमाप पुस्तिका क्रमांक व पा.क्रमांक	क्र.2506/11-12 (पा.क्र 78 ते 135)
18	कामावर झालेला एकुण खर्च (रूपये)	रु. 22986900
19	अंतिम प्रमाणक क्रमांक, दिनांक व रक्कम रूपये	प्रथम धावते देयक रक्कम रू.2,18,64,666/- दूसरे व अंतिम देयक रक्कम रु.11,22,234/-

नाशिक पुर्व विभागातील हॉटेल साई पॅलेस सर्व्हे नं.892, 899, 906 मधील JNNURM अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल योजनेकरीता ॲप्रोचरोड खडीकरण व डांबरीकरण करणे कामाच्या ई.निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण 5 निविदा प्राप्त झाल्या. त्यातील मे.पवार पाटकर कन्स्ट्रक्शन यांची प्राकलन दरापेक्षा 112 टक्के जास्तीची निविदा न्युनतम ठरली. वाटाघाटी अंती त्यांनी प्राकलन दरापेक्षा 65.40 टक्के जादा दराने काम करण्यास संमती दिली. उपरोक्त कामाचे उपलब्ध करून देण्यात आलेले देयके, नस्ती इत्यादींची पडताळणी करण्यात आलेली असून झालेला खर्च रक्कम रू.22986900/- यांवर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येंत आहे.

1. या कामाची प्रशासकीय मान्यता ठरावाची प्रत उपलब्ध झाली नाही. नस्तीतील अहवालावरून सदर कामाची निविदा सुचना दि.10/11/2012 व 11/11/2012 च्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि, या कामास तांत्रिक मान्यता दि.12/11/2012 रोजी देण्यात आलेली आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त नसतांना निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

2. मक्तेदारास कार्यादेश दि.18/03/2013 रोजी दिलेला असल्याने महसुल व वनविभाग, शासन अधिसुचना दिनांक 11/002/2010 नुसार रू.70.67 प्र.घ.मी. दराने रॉयल्टी आकारणी व वसुली होणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वापरलेले बाब.क्र. 2,6,9,11 चे एकूण परिमाण 11362.37 घ.मी. साठी रू.70.67 दराने रक्कम रू.802979/- वसुल करून शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे. नस्तीसोबत मक्तेदाराने एकत्रित रॉयल्टी भरणा केलेल्या चलनांचा झेरॉक्स प्रती जोडलेल्या आहेत. तथापि, ही चलने एकत्रित रॉयल्टी भरणा रकमेची असुन त्यावर कामाचे नांव नमूद नसल्याने ती या कामासाठी वापरलेल्या साहित्याची असल्याचे प्रमाणित होत नाही. सबब, रक्कम रू.802979/- वसुल होवुन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

3. सदर कामाच्या अंदाजपत्रकासाठीचे सन 2006-2007 च्या दरसुचीनुसार बाब निहाय दर निश्चीत करतांना रॉयल्टीची रक्कम रू.35.34 समाविष्ठ करून दर निश्चीत केलेले आहेत. या कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने निविदा स्वीकृत करण्यात आलेल्या असुन कामाची रक्कम प्रदान करतांना रॉयल्टीच्या रक्कमेसह एकुण रक्कमेवर निविदा जादादराची आकारणी केलेली आहे. त्यामुळे रॉयल्टीच्या रकमेवरही निविदा जादा दराने प्रदान झालेले आहे. रॉयल्टीच्या रकमेवर निविदा जादा दराने प्रदान करणे संयुक्तिक नसल्याने बाब क्र. 2,6,9,11 च्या एकुण परिमाण 11362.37 घ.मी.साठी रू.35.34 प्र.घ.मी.दराने येणारी रक्कम रू.401546/- वर निविदा जादा दर 65.40 टक्के प्रमाणे रू.262611/- चे अनावश्यक जादा प्रदान झाले आहे.

4. डांबर तारांकीत दर फरक रक्कम रू.5133477/- प्रदान करण्यात आलेली आहे. निविदा तारांकित दर फरक प्रदानाबाबतच्या अटी व शर्तीनुसार मक्तेदाराने डांबर खरेदीबाबत पुरेसा पुरावा म्हणुन खरेदीचे मुळ देयक, चलन अथवा जकातीची पावती सादर करणे आवश्यक आहे. तथापि, असा कोणताही पुरावा प्राप्त केल्याचे दिसुन येत नाही.

5. सदर कामासाठी 60/70 ग्रेड डांबराचे दराने अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व त्या नुसार मक्तेदारास प्रदान केले आहे. डांबराचे 80/100, 60/70, 30/40 ग्रेड नुसार दर स्वतंत्र आहेत. तथापि, डांबर कामाचे प्राप्त केलेल्या चाचणी अहवालात फक्त डांबराचे प्रमाण नमुद केलेले आहे. त्यामुळे वापरलेले साहित्य विर्निदेशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

17) काम पुर्णत्वाचा दाखला दिल्यावर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिल्याचे बऱ्याच प्रकरणी दिसून येते. जर काम समाधानकारकरित्या पुर्ण केलेले असेल तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने देण्याचे प्रयोजन कळत नाही.

18) प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली जात नाही तसेच या सबंधी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले जात नाहीत असे दिसून येते. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न घेता प्राकलन प्रमाणित नसतानाही प्रस्ताव सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले.

19) काही नस्त्यांना देयकाची प्रत सोडून सर्व दस्तऐवजे मूळ न जोडता छायाप्रती जोडलेल्या आहेत. याबाबत लेखापरीक्षणावेळी मूळ दस्तऐवजे उपलब्ध झाली नाहीत व कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

20) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

21) कंत्राटदाराने कामावर नियुक्त केलेले कामगार / सेवक यांना अनुज्ञेय रक्कम धनादेशाद्वारे तसेच त्यांचे ईएसआय, ईपीएफ, व्यवसाय कर, कामगार निधी इत्यादी रकमा संबंधित प्राधिकारणाकडे जमा केल्याबाबत विभागाकडून खात्री करणे आवश्यक होते परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजावरुन अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

22) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी

दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

23) करारनाम्यातील अटी व शर्ती, कामाचे आदेशात नमूद बाबी, हजेरी पुस्तक या अनुषंगाने कोणतेही अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत व नुकसानीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

24) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

25) 10 टक्के पेक्षा कमी अधिक दराची निविदा स्वीकृत करताना निविदाधारकाकडून दर पृथ:ककरण प्राप्त करुन त्याबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी समर्थन नमूद करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

26) ई निविदा व फेरनिविदा यांच्या नस्तीस असलेल्या छायांकित प्रती वाचनीय नाहीत. प्राकलन प्रमाणित नाही. तुलनात्मक दर तक्ता नस्तीस नाही.

27) उदयान कल्पक यांचे पत्र क्रमांक दिनांक 10.01.2010 ची छायांकित प्रत नस्तीस असून त्यात कोणताही संदर्भ नमूद केलेला नाही, परंतू त्यांना तपशिलवार अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यातही रकमांमध्ये खाडाखोड असून रूपये 3894687/- मध्ये फेरबदल करून रूपये 3720066/- रक्क्म दर्शविली आहे. उदयान कल्पक या खाजगी कंपनीची नियुक्ती, फी, अधिकृत इत्यादी बाबत कोणतीही माहिती/दस्तएवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेली नाही.

28) प्राकलनात हॉर्टीकल्चर वर्क येथे सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. एम.एस.ई.बी. दर बाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

29) कंत्राटदार श्री.भगत यांच्याशी दर कमी करण्याबाबत यांच्या वाटाघाटी केल्यावर त्यांनी दिलेल्या पत्राची प्रत नस्तीत संलग्न नाही.

30) डीएसआरच्या जुन्या दराने प्राकलन करण्याचे प्रयोजन कळून येत नाही.

31) कार्यादेश दिनांक 22/9/2011 नुसार कामाची मुदत 11 महिने होती. काम पूर्णत्वाचा दाखला दिनांक 8/02/2012 रोजी देण्यात आला आहे, अटी/शर्ती जामीननामा येथे संबंधित अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

32) प्रथम व धावत्या देयकात सर्वत्र देयकात खाडाखोड, गिरवागिरव केलेली असून रक्क्म, साहित्य इत्यादीबाबत कोणतीही पडताळणी करता आलेली नाही.

33) देयकांना अयोग्य क्रमांक दिलेले आहेत, प्रथम चालू देयक, दुसरे व अंतिम देयक, तिसरे चालू देयक, चौथे चालू देयक, पाचवे चालू देयक, सहावे व अंतिम देयक. काही देयकांवर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

34) तिसऱ्या चालू देयकावर देयक पारित करण्याबाबत अभिप्राय नमूद केलेले नाहीत. चौथ्या चालू देयकासंबंधी

ना हरकत प्रमाणपत्र नस्तीस नाही.

35) काम पूर्ण झाल्याच्या प्रतीवृत्तावर कमी जादा साहित्य वापराबाबत अभिप्राय व सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतलेली नाही.

36) कामाच्या गुणवत्ताबाबत तपासणीचा कोणताही अहवाल नस्तीस नाही.

37) साहित्य वापर विवरणपत्रात थिरॉटीकल, प्रॅक्टीकल, ॲक्च्युअल, एकूण येथे सर्व रकाने कोरी असून त्यात कोणतीही माहिती नमूद नाही तसेच त्यावर कंत्राटदार व सक्षम अधिकाऱ्यारी स्वाक्षरी नाहीत.

38) मोजमाप पुस्तक क्रमांक 3005 तपासणी वेळी उपलबध न झाल्याने त्यातील नोंदीबाबत खात्री करता आलेली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 57, Hmm No : 149)

73 विविध खुल्या जागा व रस्ता दुतर्फा वृक्षारोपण करणे कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 871736.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 863018.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8718.00/-

प्राप्त नाविदापैकी तीन निविदा पात्र नसूनही नियमानुसार कार्यवाही केलेली नाही. दरपृथ:करणातील चुकांबाबत मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार कार्यवाही झालेली नाही. नस्त्यांना छायांकित प्रती जोडल्या आहेत. मूळ नस्तीस प्रस्ताव सादर केलेल्या नाहीत. उदयानांच्या मालकी हक्कासंबंधी व देयकातून वसूल केलेल्या रकमांसबंधी दस्तऐवजे नस्तीस संलग्न नाही. वृक्षरोपणासंबंधी नोंदवही ठेवलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत विविध खुल्या जागा व रस्ता दुतर्फा वृक्षारोपण करण्यासाठी खर्च केला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र /दिनांक	विभागाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ

						क्रमांक
1	1074/ 27.03.15	नाशिक पश्चिम	श्री. पी. यु. चवरे	विविध खुल्या जागा व रस्ता दुतर्फा वृक्षारोपण करणे	265360	2271/ --
2	1075/ 27.03.15	नाशिक पूर्व	श्री. पी. यु. चवरे		265360	2271/ --
3	1076/ 27.03.15	नाशिक रोड	श्री. महारूद्र एन्टरप्रायजेस		265360	2271/ --
4	974/02.03.2015	पंचवटी विभाग	चे.महात्मा मजूर बांधकाम सोसायटी	रस्ता दुभाजक येथे वृक्षारोपण व देखभाल करण्याचे काम	75656	2754/---
					871736	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305 /सहविमा /साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. विम्याची रक्कम रु.8718/- शासकीय खजिन्यात भरण्यात यावी.

2) देयक क्रमाक 1075 - कंत्राटदाराने कामाच्या दराबाबत महानगरपालिकेला दिलेल्या पत्रांवर दिनांक नमूद केलेला नाही. करारात व आदेशात नमूद कालावधीत तफावत आहे, करारनामा रूपये 100/- च्या स्टॅप पेपरवर करण्यात आला आहे. लेखापरीक्षणावेळी देयक क्रमांक 1074 व त्यासंबधी कोणतेही दस्तएवजे/अभिलेखे, देयक, नोंदवहया इत्यादी उपलब्ध न झाल्याने झालेल्या कामाबाबत व खर्चाबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

3) देयक क्रमाक 1076 - दिनांक 15.06.2013 रोजी मा.आयुक्त यांनी दरपृथकरनात चुका असल्याचे नमूद केलेले आहे, परंतू यावर कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी महारूद्र एन्टरप्रायजेस यांची निविदा कमी दराची असली निविदा जाहिराती नुसार त्यांचेकडे अनुभव दाखला किंवा शैक्षणिक अर्हता असल्याबाबत कोणतीही दस्ताएवज नस्तीस सलग्न नाही. त्यामुळे दोनच निविदा पात्र ठरतात. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता-2011 परिशिष्ठ 3 (नियम 466[4])-28 नुसार तीन पेक्षा कमी

निविदा प्राप्त झाल्यास एकतर निविदा स्वीकारण्याचा कालावधी वाढविणे आवश्यक होते. कालावधी वाढवूनही निविदा प्राप्त न झाल्यास पात्रपैकी एकाची निवड करुन सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेसह प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडणे आवश्यक होते. परंतु नियमानुसार कार्यवाही या प्रकरणी झालेली दिसून येत नाही. कामाच्या आदेशात, अटी/शर्ती याबाबत पूर्तता होण्याबाबत तपशिल नमूद नाही.

4) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

5) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

6) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

7) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

8) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

11) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

12) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

13) मोजमाप पुस्तक क्रमांक 2271 लेखापरीक्षणावेळी उपब्ध न झाल्याने त्यात नमूद नोंदी विषयी खात्री करता आलेली नाही तसेच मोजमाप पुस्तक क्रमांक 2754 लेखापरीक्षणावेळी उपब्ध न झाल्याने त्यात नमूद नोंदी विषयी खात्री करता आलेली नाही.

14) वृक्ष रोपणासंबधी नोंदवही ठेवलेली नाही, त्यामुळे एकूण वृक्ष संख्या नव्याने लागवड, वाढ झालेले वृक्ष, हानी झालेले वृक्ष, शिल्लक वृक्ष इत्यादीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

15) वृक्षारोपण करताना शासकीय विभाग यांच्याशी विचार विनिमय करुन पर्यावरण संवर्धानाच्या दृष्टिने वृक्षांची लागवड करणेबाबत कार्यवाही केली जात नाही.

16) पहील्या चालू देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. अटी/शर्ती व जामिननाम्यावर संबधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तांत्रिक अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल, नाहरकत प्रमाणपत्र, काम पूर्णत्वाचा दाखला हे मोघम स्वरूपात दिले असून त्यात सविस्तर तपशिल नमूद नाही.

17) प्राकलन प्रमाणित नसताना तांत्रिक मान्यता नसतानाही प्रस्ताव सादर केल्याचे नस्तीवरून दिसून येते प्रस्ताव सादर करताना वृक्ष लागवडीची संख्या, स्थळ व पूर्वी अस्थित्वात असलेली वृक्षांची सख्या याबाबत कोणतीही माहिती नमूद केली जात नाही.

MINVAJM6901 (Ref No : 64, Hmm No : 156)

74 उदयान विभागाअंतर्गत केलेल्या विविध कामाचा विमा न उतरविण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 10712633.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10605503.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 107130.00/-

कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा उतरविणे आवश्यक होते, विम्याची रक्कम शासकीय खजिन्यात भरणे आवश्यक होते. तथापि याबाबत कोणतीही दस्तऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेली नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणावेळी उदयान विभागात निवड महिन्यातील लेख्यांची पडताळणी करताना केलेल्या विविध कामाचा विमा न उतरविल्याचे निदर्शनास आले त्याचा खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र/दिनांक	कामाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	अंदाज पत्रकीय रक्कम रु.	एक टक्के दराने विम्याची रक्कम रुपये
1	974/02.03.2015	वृक्षारोपण करुन देखभाल	महात्मा मजूर बांधकाम सोसायटी	86400	864
2	975/02.03.2015 984/07.03.2015	आनंदनगर येथील खुल्या जागेत वॉल कंपाऊंड पाथ वे इत्यादी उदयान विकसित करण्याबाबत	श्री. एन. डी. भगत	1018399	10184
3	978/02.03.2015	गो.ह.देशपांडे उदयान देखभाल करणे	जिजाई मजूर बांधकाम सोसायटी	495000	4950
4	985/07.03.2015	गोसावी नगर खुल्या जागेत कंपाऊंड वॉल, जॉगिंग ट्रॅक इत्यादी कामे	श्री. एन. डी. भगत	1293809	12939
5	988/09.03.2015	डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोरील उदयानाचे सुशोभिकरण करण्याचे काम	अनमोल मजूर बांधकाम सोसायटी	176368	1764
6	1007/10.03.2015	उत्तरानगर नंबर 1 येथील जागेत उदयान विषयक कामे करणे	विजय राज मजूर बांधकाम सोसायटी	195000	1950
7	1008/10.03.2015	हार्मोनी अपार्टमेंट येथे खुल्या जागेत उदयान विषयक कामे इत्यादी	प्रगती मजूर बांधकाम सोसायटी	75000	750
8	1010/10.03.2015	स्टेट बॅक कॉलनी येथील उदयान नुतणीकरण इत्यादी	ज्योतीबा मजूर बांधकाम सोसायटी	188629	1887
9	1052/23.03.2015	मखमलाबाद शिवार - सर्वे नंबर 19/1 मोकळया जागेत	कौशल्या मजूर बांधकाम सोसायटी	193766	1938

		पाथ वे बनविणे			
10	487/04.06.2014	राजीव नगर मोकळया जागेत उदयान विकसित करणे	मे.रोहन सुभाष पाटील	1797197	17972
11	500/13.06.2014	राजीव नगर मोकळया जागेत उदयान विकसित करणे	मे.रोहन सुभाष पाटील	1797198	17972
12	598/22.08.2014	स्वामी नगर,अंबड येथे उदयान विकसित करणे	श्री. पी. यु. चवरे	1853007	18530
13	631/25.08.2014	सहदेव नगर येथे जॉगिंग ट्रॅक तयार करणे व उदयान विकसित करणे	श्री. चंद्रशेखर बी. सावंत	739660	7397
14	1012/12.03.2015	कंम्पांउंड वॉल असलेल्या जागेत पाथवे करणे	श्री.अमित धामणे	303445	3035
15	433/22.06.2014	नाशिक रोड वॉर्ड क्रमांक 73 मधील लोकमान्य नगर उदयानाचे नुतनीकरण कामांतर्गत सुशोभिकरण करणे	चे.ज्योती मजूर बांधकाम सोसायटी	499755	4998
		एकूण रक्कम रुपये		10712633	107130

विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी/2301/सहविमा/न.पा-1, दि.10/09/2001 नुसार कंत्राटी कामाचा विमा कार्योदेशापासून कामाच्या अंतिम तारखेच्या कालावधीमध्ये उतरविणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/न.वि.-24 दि.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रीविनी-2305/सहविमा/साबावि/फ-2 दि.12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदारानी कंत्राटी कामाचा विमा न उतरविल्यास अंदाजपत्रकीय रकमेच्या एक टक्के रक्कम वसूल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त देयकांच्या नस्त्यांची तपासणी करताना विम्याची रक्कम भरणेबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही व त्यासंबंधी कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. उपरोक्त नमूद प्रकरणी विम्याची रक्कम रुपये 107130/- शासकीय खजिन्यात भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सन 2014-2015 मधील लेखापरीक्षण कालावधीतील अशा प्रकारच्या विमा न उतरविण्याचे प्रकरणे अस् शकतील त्यामुळे अशा प्रकरणी पडताळणी करुन विम्याची रक्कम शासकीय खजिन्यात भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

MINVAJM6901 (Ref No : 69, Hmm No : 161)

75 महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने शासन अधिसूचना दिनांक 6.08.2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कर रक्कम वसूलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3213386.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3213386.00/-

शासन अधिसूचना दिनांक 06.08.2012 नुसार बांधकाम परवाना देताना स्थानिक संस्था कर वसूलीची कार्यवाही केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे व नाशिक रोड विभागीय कार्यालयाचे लेखापरीक्षण करताना निवडक प्रस्तावांची तपासणी करताना बांधकाम परवाने देताना स्थानिक संस्था कर वसूलीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. शासन अधिसूचना दिनांक 6.08.2012 नुसार स्थानिक संस्था कर वसूली बांधकाम परवाना देताना वसूल करणे आवश्यक आहे. बांधकाम परवाना संबंधी नस्त्यांची तपासणी करताना स्थानिक संस्था कर भरणेबाबत संबंधितांनी हमीपत्र कंत्राटदारांनी दिलेले आहे, काही नस्त्यांना त्यांच्या मूळ प्रती जोडलेल्या नसून छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी स्थानिक संस्था कर भरणेबाबत / रिटर्न फाईल करण्याबाबत हमी दिलेली असून सन 2014-2015 हे आर्थिक वर्ष संपल्यावर याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही, याबाबत नस्तीस कोणताही तपशील उपलब्ध नाही. स्थानिक संस्था कराची पूर्ण वसूली झाल्याची खात्री करूनच बांधकाम पूर्णत्व दाखला देणे आवश्यक आहे.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका 1949 (2012 नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम 2012 चे नियम 27 (ड) (4)) अन्वये महानगपालिकेच्या हददीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणारा बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार, स्थानिक संस्था कर याखाली महानगपालिकेकडे स्वत:ची नोंदणी करेल आणि त्याला, शहराच्या हददीत बांधकामाकरिता किंवा वापराकरीता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकत्र स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय असेल किंवा खालील मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करण्याचा पर्याय असेल.

अ) चौथ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उदवाहक नसेल तेथे) रू. 100 प्रती चौरस मीटर

ब) सातव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम (ज्या इमारतीत उदवाहक असेल तेथे) रूपये 150 प्रती चौरस मीटर

क) उत्तुंग इमारतींचे बाधकाम (सात मजल्यांपेक्षा अधिक) रूपये 200 प्रती चौरस मीटर

3. जो कंत्राटदार ठोक कर प्रदानाचा पर्याय स्विकारेल तो प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यावर स्थानिक संस्था कराच्या अशा देय रक्कमेपैकी 50% आगाऊ रकमेचे प्रदान करू शकेल. तसेच महानगरपालिकेच्या हददीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हददीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रकमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने उक्त् कर प्रदान करण्याचा पर्याय असेल. त्यानुसार प्रत्यक्षात कार्यवाही केली जात नाही असे दिसून येते.

4. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात दिलेल्या सर्व बांधकाम परवान्यासंदर्भात स्थानिक संस्था कराची आकारणी करणे आवश्यक आहे. काही निवडक प्रस्तावाची तपासणी करताना स्थानिक संस्था कर वसूली संदर्भात कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कंत्राटदाराचे नाव	स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक	बांधकाम चौरस मिटर	रक्कम
1	जय कन्स्ट्रक्शन	NSK 502885	458.31	45831
2	चे. उषा किरण को.ऑप.हौ.सो.	NSK 805608	278.81	27881
3	प्रविण भालचंद्र पवार	NSK 70345	674.1	67410
4	मिलिंद विष्णू धात्रक	-	304.5	30450
5	साहेबराव सानप	-	243.36	24336
6	किशारे ठोंबरे	-	18.54	1854
7	निलकंठ भिकाजी गलांडे	NSK 801126	212	21200
8	सोहम कन्स्ट्रक्शन	-	610.58	61058
9	श्री डी. शाह	-	7120.126	712013
10	श्री. अक्षयकुमार सिन्हा	-	386.44	38644
11	सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन	NSK 804444	58.5	5850
12	श्री.त्रिंबक नामदेव घोरपडे	NSK 604513	141.4	14140

13	अभिजित जाधव	NSK 802111	101.37	10137
14	श्री.बाळकृष्ण मुरलीधर पगारे	-	143.47	14347
15	राजसमर्थ को. ऑप. हौ. सो.	NSK 805682	878.85	87885
16	तनिश कन्स्ट्रक्शन	NSK 805544	466	46600
17	प्रभावि इन्फ्रास्ट्रक्चर	NSK 805139	508.14	50814
18	संजय एस. सकट	NSK 805493	671.706	67171
19	स्पेस डेव्हलपर्स कॉर्पोरेशन	NSK 603865	8607.26	860726
20	गोखले एज्युकेशन सोसायटी	-	10250.39	1025039
		एकूण		3213386

उपरोक्त् आकारणी किमान दर रूपये 100/- प्रती चौरस मीटर प्रमाणे दर्शविलेली असून अधिसूनचनेत नमूद केल्यानुसार आकरणी करून संबंधित व्यवसायिक/कंत्राटदार यांचेकडून वसूल करणे आवश्यक होते, अशी कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक् नुकसान झाले असून शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 74, Hmm No : 188)

76 स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी रक्कम रु. 130000/- इतक्या दंडाच्या रक्कमेची वसुली करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 130000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 130000.00/-

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 मधील तरतुदी नुसार लेखापरिक्षण कालावधी पर्यंत एकूण

16 व्यापा-यांना विवरणपत्र दाखल केले नाही. तसेच सन 2014-15 अखेरचे वार्षीक विवरणपत्र दाखल न करणे या प्रकरणी एकूण 10 व्यापा-यांना विवरणपत्र दाखल करणे बाबत एच नोटीस तसेच रक्कम रु. 5000/- शास्तीची नोटीस बजावण्यात आलेली आहे. या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 43, 48 (6) नुसार त्यांचेकडून रु. 5000/- प्रमाणे दंडाची एकूण रक्कम रु. 130000/- वसुल होणे आवश्यक आहे

नाशिक महापालिकेचे सन 2014-15 या वित्तिय वर्षाचे लेखापरिक्षणात स्थानिक संस्था कर विभागाकडील निवडक कर भरणा प्रकरणांची पडताळणी केली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे उणिवा आढळून आलेल्या आहेत.

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 नुसार प्रत्येक व्यापा-याने सहामाही व वार्षीक विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार व्यापारी किंवा व्यक्तीनुसार त्यांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000/- पेक्षा अधीक नसेल इतक्या रक्कमेच्या शास्तीची आकारणी करता येईल अशी तरतुद आहे.

तथापी सन 2014-15 अखेरचे वार्षीक विवरणपत्र दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी खालील विवरणपत्रात नमुद केल्यानुसार एकूण 16 व्यापा-यांना विवरणपत्र दाखल करणे बाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

अ.क्र.	स्थानिक संस्था कर नोंदणी क्र.	स्थानिक संस्था कर धारकाचे नांव
1	NSK400194	मे.पटेल ब्रदर्स
2	NSK400059	न्यु.पुजा कॅश्युज
3	NSK400084	श्रीमती निर्मला व श्रीजमनादास हिनानी चैरिटेबल ट्रस्ट
4	NSK400105	मे.शहिद एकनाथ खैरनार सर्व्हिस स्टेशन
5	NSK400136	श्री.गणेश ॲग्रो सर्व्हिसेस/ राजदिप क्रेटस
6	NSK400176	महावीर ग्लास ट्रेडर्स
7	NSK400178	मे.गडाख स्पेअर्स
8	NSK400186	मे.दर्शन ट्रेडर्स, कंपनी
9	NSK400192	बसंतीलाल मुलतानमल ललवाणी
10	NSK400211	ग्लो एन्टरप्राईजेस
11	NSK400250	स्काय इलेट्रोमा

12	NSK503590	अदर्श स्टिल ट्रेडर्स
13	NSK503669	नाशिक डेन्टल स्पेशालिटी
14	NSK503885	कांचा बिल्डर्स आणि डेव्लपर्स
15	NSK504087	श्री.बालाजी डेव्हलपर्स
16	NSK504466	श्रीकृष्णा नॉव्हेलटीज

तथापी लेखापरिक्षण कालावधीपर्यंत उपरोक्त व्यापा-यांनी विवरणपत्र सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांचेवर उपरोक्त नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी त्यांचेकडून रु. 5000/- प्रमाणे दंडाची रक्कम रु. 80000/- वसुल होणे आवश्यक आहे.

तसेच सन 2014-15 अखेरचे वार्षीक विवरणपत्र दाखल न करणे या प्रकरणी खालील विवरणपत्रात नमुद केल्यानुसार एकूण 10 व्यापा-यांना विवरणपत्र दाखल करणे बाबत वेळोवेळी एच नोटीस तसेच रक्कम रु. 5000/- इतक्या रक्कमेच्या शास्तीची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

अ.क्र.	स्था.सं.कर नोंदणी क्रमांक	स्था.सं.कर नोंदणी धारकाचे नांव	एच नोटीस क्रमांक	रू.5000/- दंडाची नोटीस
1	मे.परमार वायर ॲन्ड केबल इंडस्टीज	NSK-200486	1971-12/10/2015	18-13/04/2016
2	मे.नुराणी मशिन अल्स	NSK-201193	2336-15/10/2015	173-13/04/2016
3	मे.भगवती हार्डवेअर ॲन्ड बिल्डींग सप्लायर्स	NSK-201385	2428-15/10/2015	222-21/04/2016
4	मे.मॅक स्टील प्रा.लि.	NSK-202960	3211-20/10/2015	573-27/04/2016
5	मे.निर्मल टाईल्स ॲन्ड मार्बल	NSK-203008	3225-21/10/2015	582-27/04/2016
6	मे.इंदर नारंग इंजिनिअरींग वर्क्स	NSK-203105	3261-21/10/2015	595-27/04/2016
7	मे.विशाल इलेक्ट्रो इंडस्ट्रीत प्रा.लि.	NSK-203997	3685-26/10/2015	803-02/05/2016

8	मे.अशियन स्टील	NSK-205134	4195-02/11/2015	1039-04/05/2016
9	मे.शिव कन्स्ट्रक्शन	NSK-205470	4357-03/11/2015	1161-13/05/2016
10	मे.ओमकार टुल्स	NSK-205556	4401-04/11/2015	1199-23/05/2016

तथापी उपरोक्त व्यापा-यांनी दंडाच्या रक्कमेचा भरणा अद्यापपावेतो केलेला नसल्याने स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 43 नुसार (मालमत्ता जप्त/बँक खाती तात्पुरत्या स्वरुपात गोठविणे) कारवाई करुन त्यांचेकडून रु. 5000/- प्रमाणे दंडाची रक्कम रु. 50000/- वसुल होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 113, Hmm No : 55)

77 स्था.सं.कर धारकाने सन 2014-2015 या कालावधीतील सादर केलेल्या वार्षीक विवरणपत्राच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कर नियम 33 अन्वये कराचे निर्धारण केल्यानंतर स्था.सं.कर धारकाकडून येणे असलेल्या फरकाची रक्कम रु. 8568/- च्या वसुलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 8568.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 8568.00/-

सन 2014-15 या वर्षात व्यापा-यांनी सादर केलेल्या वार्षीक विवरणपत्रांच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कर नियम 33 अन्वये विभागाने स्थानिक संस्था कर नियम 33 (6) अन्वये कार्यवाही करुन, येणे असलेल्या रकमेचे निर्धारण केलेले आहे. सदरहु रकमांची अद्यापपावेतो वसुली झालेली नाही. तसेच स्थानिक संस्था कर नियम 40 / 43 या नियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कर विभागाकडील व्यापा-यांनी सादर केलेल्या वार्षीक विवरणपत्रांच्या नस्तींची पडताळणी केली असता, खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

सन 2014-15 या वित्तीय वर्षात व्यापा-यांनी सादर केलेल्या वार्षीक विवरणपत्रांच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कर नियम 33 अन्वये विभागाने खालील नमुद नस्तींचे कर निर्धारण केलेले आहे. त्यास अनुसरुन विभागाने प्रत्येक

प्रकरणी निर्णय घेण्यापुर्वी स्थानिक संस्था कर नियम 33 (6) अन्वये कार्यवाही करुन येणे असलेल्या रकमेचे निर्धारण केलेले आहे. सदरहु रकमांची अद्यापपावेतो वसुली झालेली नाही.

विभागाने निर्धारीत केलेली रक्कम वाजवी कारण असल्याशिवाय विनीर्दिष्ट तारखेपर्यंत न भरल्यास स्थानिक संस्था कर नियम 49 अन्वये शास्ती आकारण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने तसेच स्थानिक संस्था कर नियम 40 / 43 या नियमानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परीशीष्ट क्र. 1 मध्ये नमुद 5 प्रकरणे उदाहरणादाखल नमूद केली असून सन 2014-15 मधील सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन अशा प्रकरणी योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 114, Hmm No : 53)

78 नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 चे मालमत्ता कर ची थकबाकी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 560763000.00 /-

मार्च 2015 अखेर रक्कम रुपये 56,07,63,000/- एवढया मालमत्ता कराची थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही. थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना व प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणांतर्गत कर आकारणी विभागाकडील अभीलेख्यांची पडताळणी केली असता, खालीलखाललखखस नमुद केल्याप्रमाणे माहे मार्च 2015 अखेर प्रभागनिहाय घरपट्टी करांची थकबाकी असल्याचे दिसून आलेले आहे.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	विभागिय कार्यालयाचे नांव	मिळकत संख्या	एकुण उद्दीष्ट	एकुण वसुली	एकूण थकबाकी	वसुलीचे शेकडा प्रमाण
1	नाशिक पुर्व	73130	2866.04	1490.33	1375.66	52.00%

2	नाशिक पश्चिम	35561	1743.21	1381.79	359.72	79.27%
3	पंचवटी	77939	2746.66	1162.90	1582.05	42.34%
4	नाशिकरोड	66261	2218.55	1232.04	984.98	55.53%
5	सातपुर	40513	1095.82	775.36	318.62	70.76%
6	नविन नाशिक	86941	2433.94	1447.53	984.98	59.47%
	एकूण	380345	13104.22	7489.95	5607.63	57.16%

मार्च 2014 अखेर वरीलप्रमाणे रुपये 56,07,63,000/- एवढया मालमत्ता कराची वसुली करण्यात आलेली नाही. सदर थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही व त्यामूळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 117, Hmm No : 65)

79 नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 चे पाणीपट्टी कराची थकबाकी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 470517162.00 /-

मार्च 2015 अखेर रक्कम रुपये 47,05,17,162/- एवढया पाणीपट्टी कराची थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही. थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना व प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणांतर्गत कर आकारणी विभागाकडील अभीलेख्यांची पडताळणी केली असता, खालीलखाललखखस नमुद केल्याप्रमाणे माहे मार्च 2015 अखेर प्रभागनिहाय पाणीपट्टी कराची थकबाकी

असल्याचे दिसून आलेले आहे.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	विभागिय कार्यालयाचे नांव	नळ कनेक्शन संख्या	एकुण उद्दीष्ट	एकुण वसुली	एकूण थकबाकी	वसुलीचे शेकडा प्रमाण
1	नाशिक पुर्व	27079	144585289	62991267	81594022	43.57%
2	नाशिक पश्चिम	10016	89973484	65997132	23976352	73.35%
3	पंचवटी	34819	149120939	61805150	87315789	41.45%
4	नाशिकरोड	28524	202233304	83856199	118377105	41.47%
5	सातपुर	25810	118761930	49880544	68881386	42.00%
6	नविन नाशिक	51017	177354502	86981994	90372508	49.02%
	एकूण	177265	882029448	411512286	470517162	46.66%

मार्च 2015 अखेर वरीलप्रमाणे रुपये 47,05,17,162/- एवढया पाणीपट्टी कराची वसुली करण्यात आलेली नाही. सदर थकबाकी वसूल न केल्यामुळे महापालिकेस अपेक्षीत उत्पन्न प्राप्त झालेले नाही व त्यामूळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुली बाबत प्रभावी उपाय योजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 118, Hmm No : 66)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

80 खत प्रकल्प पुर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित नसले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 6

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सन 2014-15 मध्ये खत प्रकल्पावर खर्चाच्या अनुषंगाने खत विक्रीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात असल्याने खत प्रकल्प पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित केलेला नाही. त्यामुळे होणा-या खर्चामुळे महानगरपालिकेचा आर्थिक स्त्रोत वाढण्याऐवजी तो तोटयात असल्याने दिसून येते. खतप्रकल्पा अंतर्गत असलेली सर्व मशिनरी व जड वस्तु संग्रहाची जडसंग्रह नोंदवही (डेड स्टॉक रजिष्टर) अभावि, प्रकल्पा अंतर्गत असलेली चालू मशिनरी व ना-दुरूस्त बंद अवस्थेत असलेली मशिनरी या बाबतचा ताळमेळ व निर्लेखनाची कार्यवाही बाबत पडताळणी करता आलेला नाही.

नाशिक महानगरपालिका नाशिक अंतर्गत खत प्रकल्प कार्यान्वित असून त्यावर सन 2014-15 मध्ये खर्च व उत्पन्ना बाबतची माहीती मागविली असता, त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

संगणक कोड	बाब	सन 2014-15 मध्ये झालेला खर्च रू. लाखात
717	स्थायी आस्थापना	189.23
718	विदयुत बिले	13.33
719	पाणी बिले	1.46
720	डिझेल	74.28
721	मशिनरी दुरूस्ती	65.51
722	कल्चर सॅनिट्रेट	8.35
723	प्लास्टिक पिशवी	25.00

724	रजि.इन्शु.फी.	21.14
725	रिफ्युझल विल्हेवाट	62.96
875	दैनंदिन देखभाल व दुरूस्ती	19.21
	एकुण एकंदर खर्च	481.07

.सन 2014-15 मध्ये एकुण खत विक्री खालील प्रमाणे

अ.क्र.	माहे/वर्ष	सन 2014-15 मधील गोण मेट्रीक टन विक्री	सन 2014-15 मध्ये सुट्टे मेट्रीक टन विक्री	एकूण मेट्रीक टन विकी	सन 2014-15 मधील एकूण झालेली विक्री रक्कम रू.
1	एप्रिल 2014	23.225	33.575	56.80	147939
2	मे 2014	29.650	14.160	43.810	128468
3	जून 2014	78.450	32.585	111.035	316815
4	जुलै 2014	89.565	31.780	121.345	347496
5	ऑगस्ट 2014	124.155	23.245	147.4	430569
6	सप्टेंबर 2014	100.365	43.455	143.82	409737
7	ऑक्टोबर 2014	7.685	18.630	26.315	69633
8	नोव्हेंबर 2014	22.415	9.245	31.66	90389
9	डिसेंबर 2014	16.435	6.995	23.43	66792
10	जानेवारी 2015	20.820	7.805	28.625	81974
11	फेब्रुवारी 2015	17.575	9.195	26.770	75713
12	मार्च 2015	30.255	5.720	35.975	105065
		560.595	236.39	796.985	2270590

उपरोक्त प्राप्त माहीतीच्या आधारे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. विभागाने उपलब्ध केलेल्या माहीतीनुसार सन 2014-15 मध्ये खत प्रकल्पावर एकूण रक्कम रू. 481.07 लक्ष इतका खर्च झालेला असून खत विक्री रक्कम रू.22,70,590/- इतक्या रकमेचा झालेला आहे. खर्चाच्या अनुषंगाने खत विक्रीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात 4.71 टक्के आहे. यावरून खत प्रकल्प पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित केलेला नसल्याचे दिसते.

2. खतप्रकल्पावर होणा-या खर्चामुळे महानगरपालिकेचा आर्थिक स्त्रोत वाढण्याऐवजी तो तोटयात असल्याने दिसून येते. त्यामुळे सन 2014-15 मध्ये खत प्रकल्पावर एकूण रक्कम रू.481.07 लक्ष इतक्या रकमेच्या खर्चामुळे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

3. खत प्रकल्पाअंतर्गत सन 2014-15 मध्ये झालेली खतविक्री बाबतचे पावती पुस्तके व त्याअनुषंगिक जमा किर्द उपलब्ध न झाल्याने त्यांची पडताळणी करता आली नाही.

4. खतप्रकल्पा अंतर्गत असलेली सर्व मशिनरी व जड वस्तु संग्रहाची जडसंग्रह नोंदवही (डेड स्टॉक रजिष्टर) उपलब्ध न झाल्याने प्रकल्पा अंतर्गत असलेली चालू मशिनरी व ना-दुरूस्त बंद अवस्थेत असलेली मशिनरी या बाबतचा ताळमेळ घेता आलेला नाही. तसेच विना वापर पडुन असलेल्या मशिनरीची लेख्या अभावि पडताळणी करता आलेली नाही.

5. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन खत प्रकल्पातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

6. खत प्रकल्पामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल तसेच निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

81 नाशिक महानगरपालिका हददीतील घरोघरचा व रस्त्याच्याकडेचा केरकचरा वाहनादवारे संकलित करून पाथर्डी स्थित खतप्रकल्पावर वाहतूक करणेबाबतच्या खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 13

लेखा शीर्ष :00 म.न.पा.निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 188930878.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 188930878.00/-

इलेक्ट्रॉनिक्स वजन काटाच्या पावत्या व त्यामध्ये दर्शविण्यात आलेले वजन व त्यातून वजा करण्यात आलेले मातीचे वजन बरोबर असल्याचे प्रमाणित करून देयकासोबत जोडलेले नाही. कचरा खाजगी वाहनादवारे गोळा करण्यापूर्वी वाहन निहाय पूर्व परवानगी घेण्यात आलेली नाही. ठेकेदारास ज्या कारणासाठी दंड केला आहे, त्या कारणांचा तपशिल उपलब्ध झाला नाही. घंटागाडी वाहनावर कार्यरत जीपीएस यंत्रणा कार्यान्वित केली नसल्याचे दिसून येते. कंत्राटी कामगार (नियमन व निमुर्लन) 1971 व मध्यवर्ती नियमानुसार मस्टर रोल, मजुरी नोंदवही, मजुरी कपात नोंदवही, जादा कामाची नोंदवही, मजुरी स्लिप इत्यादी लेखे ठेवले नाहीत. कंत्राटी कामगाराचे तास व सेवेच्या इतर शर्ती हया किमान वेतन अधिनियमान्वये निश्चित केल्यानुसार आहेत किंवा नाहीत याची देखील खात्री विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिका क्षेत्राचे हददीतील घरोघरचा व रस्त्याच्या कडेचा केरकचरा मनपा मालकीचे घंटागाडीचे वाहनदवारे व ठेकेदाराकडील आवश्यकतेनुसार नेमन्यात येणारी खाजगी वाहनादवारे सन 2013-2014 मध्ये कामाचा आदेश दिल्यापासून पुढील दोन वर्षाकरीता संकलित करून मनपा खत प्रकल्पावर वाहतूक करण्याकरिता घंटागाडी ठेकेदार नेमण्याकरिता जाहिर निविदा दर मागविले असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1	प्रशासकीय मंजूरी	महसभा ठराव क्र.334 दिनांक 14.12.2012 रू.11,00,00,000/-
2	वित्तीय मंजूरी	स्थायी समिती ठराव क्र.162 दिनांक 10.6.2013 अन्वये 2013-2014 व 2014-2015 खर्चास मंजूरी देण्यात आली.
3	कामाचा कालावधी	दिनांक 8.7.2013 ते 7.7.2015

ठेकेदार, मंजूर दर व कामाचे आदेश खालीलप्रमाणे.

अ.क्र.	विभाग	ठेकेदाराचे नाव	मंजूरी दर (प्रतिटन)	कामाचे आदेश
1	नाशिक पूर्व	सय्य्द आसिफ अली, नाशिक	1352/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1173, दि.4.7.13
2	नाशिक (प)	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1251/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1174, दि.4.7.13
3	नाशिक रोड	विशाल सर्विसेस नाशिक	1335/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1175, दि.4.7.13
4	सिडको	वॉटरग्रेस प्रॉडक्टस	1161/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे

		नाशिक		आदेश क्र.1176, दि.4.7.13
5	सातपूर	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	1314/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1177, दि.4.7.13
6	पंचवटी	समिक्षा कन्स्ट्रक्शनस ठाणे	1314/-	आरोग्य वैदयकीय अधिकारी यांचे आदेश क्र.1172, दि.4.7.13

मनपा घंटागाडी वाहन वापराकामी प्रति वाहन रूपये 8,000/- मासिक भाडे आकारण्यात आले.

लेखाशिर्ष:- केरकचरा वाहतूक

केरकचरा वाहतूकीवर झालेला खर्च सन 2013- 2014

अ.क्र.	विभाग	ठेकेदाराचे नाव	करारनामा दिनांक	खर्च रक्कम	एकूण केरकचरा संकलन मे.टन
1	नाशिक पूर्व	सय्य्द आसिफ अली, नाशिक	17.6.2013	24966517	26015 मे.टन
2	पंचवटी	समिक्षा कन्स्ट्रक्शनस ठाणे	17.6.2013	21559762	23282 मे.टन
3	नाशिक रोड	विशाल सर्विसेस नाशिक	17.6.2013	23855788	24676 मे.टन
4	नाशिक (प)	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	दिसून आला नाही	13268692	15017 मे.टन
5	सिडको	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	18.6.2013	18291150	22195 मे.टन
6	सातपूर	वॉटरग्रेस प्रॉडक्टस नाशिक	18.6.2013	13380619	14203 मे.टन

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1)सन 2014-15 या आर्थिक वर्षात केरकचरा वाहतूकीवर रूपये 188930878/- एवढा खर्च केला असून एकूण 142223 मे.टन एवढा कचरा वाहनादवारे गोळा करण्यात आला आहे. कचरा वाहतूक करणा-या वाहनांच्या इलेक्ट्रॉनिक्स वजन काटाच्या पावत्या व त्यामध्ये दर्शविण्यात आलेले वजन व त्यातून वजा करण्यात आलेले मातीचे वजन बरोबर असल्याचे प्रमाणित करून देयकासोबत जोडलेले नाही. कचरा खाजगी वाहनादवारे गोळा करण्यापूर्वी वाहन निहाय पूर्व परवानगी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

2) कचरा वाहनाचे वजन करताना त्यामध्ये बांधकामातील खराब साहित्य, दगड, माती, कापलेली झाडे किंवा इतर साहित्य नसल्याचे व प्रत्येक कचरा वाहन हे नेमून दिलेल्या मार्गावरून दररोज कचरा गोळा करत असल्याचे प्रमाणित केलेले नाही.

3) ठेकेदाराचे देयकातून दंड वसूली करण्यात आल्याचे दिसून येते, परंतू सदरचा दंड वाहने निश्चिती वेळेत

उपलब्ध न झाल्याचा आहे किंवा कचरा न उचलला गेल्याबाबत आहे, प्रत्येक वाहन कचरा संकलनाकरीता कृती आराखडा सादर न केल्याबाबत आहे, याचा उलघडा लेखापरीक्षणात/देयकात करण्यात आलेला नाही तसेच सदरबाबत कारण नमूद केलेले नाही.

4) कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर ठेकेदाराने कामाचे प्रभावी अंमलबजावणीकरिता सात दिवसाचे आत प्रभाग निहाय नियुक्त्या केलेल्या कर्मचा-यांची व वाहनांची यादी मनपास सादर केल्याचे दिसून आले नाही, त्यामुळे कर्मचारी व वाहने विभागनिहायच काम करित असल्याचे दिसून आले नाही.

5) ठेकेदारामार्फत प्रत्येक विभागीय कार्यालयात घंटागाडी विषयक तक्रार निवारन कर्मचारी वर्ग व सोईसुविधा उपलब्ध केल्याचे आढळून आले नाही.

6) घंटागाडी वाहनावर सद्यस्थितीत कार्यरत जीपीएस यंत्रणा कार्यान्वित केल्याबाबत कार्यवाही आढळून आली नाही.

7) विभागीय स्वच्छता निरीक्षक, विभागीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांनी वेळोवेळी निर्देशित केलेनुसार घंटागाडी कामकाजाचा दैनिक आठवडी व मासिक अहवाल सादर करण्याच्या सुचना असताना असा कोणताही अहवाल संचिकेत पाहावयास मिळाला नाही.

8) महानगरपालिका मालकीच्या घंटागाडी वाहनाची संपूर्ण देखभाल व दुरुस्ती ठेकेदाराने करावयाची आहे. त्यासाठी दरमहा उपअभियंता, खत प्रकल्प किंवा महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत खातरजमा केल्याबाबत दिसून आले नाही.

9) प्रभागनिहाय व वाहननिहाय उचलण्यात आलेल्या कचऱ्यांची नोंद, मनपा घंटागाडी वाहनांचे सुस्थितीबाबत संबंधितांनी दिलेला दाखला, पी.एफ / ई.एस.आय.सी इत्यादीच्या चलनाच्या पावत्या दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

10) किमान वेतन कायदा 1948 नुसार कामगारांना किमान वेतन अदा केल्याची खात्री विभागप्रमुख यांनी केल्याचे दिसून आले नाही. कंत्राटी कामगार अधिनियम 1970 मधील कलम 21 नुसार कामगारांना वेतन अदा करताना विभागप्रमुख व त्यांचे प्रतिनिधी यांनी हजर राहून प्रत्यक्ष मजुरी दिल्याची खात्री करुन प्रमाणित केले असल्याबाबत दिसून आले नाही.

तसेच कलम 29 नुसार प्रत्येक कामगाराचे वय, तपशिल त्याने केलेले कामाचे तास, दिलेले मजुरी इत्यादींची विहीत माहिती नोंदवहीत दिसून आली नाही.

11) कंत्राटी कामगार (नियमन व निमुर्लन) 1971 व मध्यवर्ती नियमानुसार मस्टर रोल, मजुरी नोंदवही, मजुरी कपात नोंदवही, जादा कामाची नोंदवही, मजुरी स्लिप इत्यादी लेखे ठेवल्याचे दर्शविण्यात आले नाहीत. कंत्राटी कामगाराचे तास व सेवेच्या इतर शर्ती हया किमान वेतन अधिनियमान्वये निश्चित केल्यानुसार आहेत किंवा नाहीत याची देखील खात्री विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

12) ठेकेदाराने त्या त्या विभागात काम करण्याऱ्या कर्मचारी व कामगारांचा विमा संचालनालयाकडे काढल्याबातचे अभिलेखे दिसून आली ती पुढीलप्रमाणे - नाशिक (पश्चिम) दि.16/11/2015, सिडको दि.24/11/2015, सातपुर दि.16/11/2015, पंचवटी दि.26/11/2015, नाशिक (पुर्व) दि.09/12/2015, नाशिक रोड दि.11/11/2015 रोजी

काढल्याचे दिसून येते परंतु अंदाजे दीड वर्षानंतर विमा का काढण्यात आला याबाबत समर्पक खुलासा सादर केला नाही.

13) टर्म डिपॉझिटसाठी वॉटरग्रेस पॉड्रक्टस यांनी दि.शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि. व दिग्विजय इंटरप्रायझेस यांनी दि नाशिक मर्चंट्स को-ऑप बँक लि. या बँका राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड असल्याबाबतची माहिती होऊ शकली नाही तसेच सदर बँकेने रक्कम रुपये 50 लाखाची बँक सॉलव्हन्सीसाठी देखील उपरोक्त प्रमाणे माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

DATPDMM6101 (Ref No : 171, Hmm No : 145)

82 सन 2014-2015 या कालावधीत नगरसचिव विभागातील अल्पोपहार बाबींवरील आकस्मित खर्च या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 5

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1072937.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1072937.00/-

महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 63 ते 66 खाली ज्या खर्चाच्या बाबीसाठी खर्चाचे अधिकार दिले आहे, त्यामध्ये अल्पोपहार व चहापान खर्चाचा समावेश होत नसतांना सदर खर्च करण्यात आला आहे. सदर खर्च करतांना विना निविदा व दर पत्रके न मागविता केलेला आहे. अल्पोपहार व चहापान इत्यादी खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. पुरवठादारांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. बैठकीसाठी प्रती व्यक्ती रू50/- व शासनाच्या मंजुरीने जास्तीत जास्त प्रती व्यक्ती रू100/- या पेक्षा अधिक खर्च करण्याची तरतुद नसतांना विभागाने मात्र प्रती व्यक्ती रू50/- ते रू100/- पेक्षा जास्त खर्च केलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील आकस्मिक खर्च नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले आले असता नगरसचिव विभागा अंतर्गत महापौर कार्यालय, महापौर निवासस्थान (रामायण बंगला), उप महापौर कार्यालय येथे वेळोवेळी भेट देणारे पाहुणे, स्थायी समिती बैठक व महासभेच्या बैठकीसाठी होणा-या अल्पोपहार व चहापा़न यासाठी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खालीलप्रमाणे एकूण अंदाजे रक्कम रू 10,72,937/- इतका खर्च केलेलर आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ) महापौर निवासस्थान व कार्यालयासाठी करण्यात आलेला खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नाव	रक्कम
1	आदेश क्र. 404 दिनांक 14/8/2014	रामायण अल्पोपहार खर्च	वैदेही रेस्टॉरंट	107685
		किरकोळ खर्च	अनिस शेख	1341
		रामायण दुध खर्च	बिलाल खतीफ	48060
		रामयण अल्पोपहार व किरकोळ खर्च	एच.एस.कदम	133875
		अल्पोपहार व चहापान खर्च	सागर स्वीटस	194124
		एकूण (अ)		**485085**

ब) उप महापौर कार्यालयासाठी अल्पोपहार व चहापान खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम
1	आदेश क्र. 402 दिनांक 14/8/2014	अल्पोपहार व चहापान खर्च	सागर स्वीटस	401772
			एकूण (ब)	**401772**

क)स्थायी समिती सभा करिता चहापान व अल्पोपहार खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम
1	आदेश क्र. 403 दिनांक	फोटो फ्रेचम	अनिस शेख	22450

	14/08/2014	अल्पोपहार खर्च	अनिलसिंग मदनसिंग परदेशी	14450
			एकूण (क)	**36900**

ड) महासभेकरिता चहापान व अल्पोपहार खर्च

अक्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम
1	आदेश क्र. 400 दिनांक 14/8/2014	अल्पोपहार खर्च	वैदेही रेस्टॉरंट	149180
		एकूण (ड)		**149180**
एकूण अंदाजे खर्च (अ+ब+क+ड)				**1072937**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 63 ते 66 खाली ज्या खर्चाच्या बाबीसाठी खर्चाचे अधिकार दिले आहेत, त्यामध्ये सदर खर्चाचा समावेश होत नाही. तरी सदर खर्च कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आला. याबाबत विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले असता, कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

2) अल्पोपहार व चहापानासाठी एकूण रु.10,72,937/- एवढा खर्च सन 2014-2015 मध्ये झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण 5 (2) नुसार महानगरपालिकेने कुठलाही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीराती नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना निवीदा व दरप्रत्रके न मागविता वरील खरेदी केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/ 2512/ उघोग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3)फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जादा खर्च असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र 859 दिनांक 19.11.2005 अन्वये सदर खर्चाची मर्यादा शिथिल करून मा.स्थायी समिती ने ठराव क्रमांक 1174 दिनांक 20.10.2011 अन्वये कोणतीही दरपत्रके न मागविता खर्च करण्याचा ठराव पारित केलेला आहे. मात्र सदरील ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसून निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी विशिष्ठ पुरवठादाराकडुन अल्पोपहार व चहापान करीता खरेदी केलेला असल्याने जादा खर्च झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा प्रकारच्या साहित्यांची वारंवार आवश्यकता भासत असल्यास निविदा काढून वार्षिक दर मंजूर करणे शक्य असतांना अशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

3) नाशिक महानगरपालिकेने स्थायी समिती व महासभेदरम्यान अल्पोपहार व चहापानासाठी अनुक्रमे रक्कम रूपये 36,900/- व रक्कम रू. 1,49,180/- इतका खर्च केला आहे, शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक विअप्र-

10.08/प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15 मे 2009 मधील (अ.क.10 नियम 31(अ) अन्वये) महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम 1965, नियम 31(अ),(1) व (2) नुसार बैठकीकरीता व जी बैठक दोन तासांपेक्षा अधिक कालावधीकरीता चालते त्याकरीता चहापान व अल्पोपहारासाठी खर्च अनुज्ञेय आहे. परंतु अशा बैठकीचे, सभेचे कामकाज बराच वेळ चालल्याचे अपेक्षित असावे. अशा वेळी चहा, कॉफी या सारखी सौम्य पेये देण्याचे अनुज्ञेय आहे. काही प्रसंगी बैठक तीन तासांपेक्षा जास्त काळ चालण्याची शक्यता असल्यास चहाबरोबर फराळाचे पदार्थही देता येतात. अशा प्रकरणात प्रती व्यक्ती रू.50/- व शासनाच्या मंजुरीने जास्तीत जास्त प्रती व्यक्ती रू.100/- या पेक्षा अधिक खर्च करण्याची तरतुद नसतांना विभागाने मात्र प्रती व्यक्ती रू.50/- ते रू.100/- पेक्षा जास्त खर्च केलेला आहे.

4) अल्पेपहार व चहापान इत्यादी खरेदीची उप प्रमाणके यांची तपासणी केली असता, संबंधित पुरवठादारांना सदरील खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहित. परिणामी पुरवठयाचे परिमाण, दर कोणकोणत्या बाबी पुरवठादाराने पुरविणे आवश्यक आहे, याची कोणतीही तपासणी आणि पडताळणी न करता संबंधिताना रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. संबंधित पुरवठादारानी प्रत्यक्षात किती अल्पोपहार व चहापान इत्यादींचा पुरवठा केला आहे, याची कोणतीही माहीती/ अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झालेले नाहीत. परिणामी पुरवठादारांना रक्कम अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रदान करण्यापूर्वी आवश्यक ती तपासणी नमूद करून व पुरवठादाररच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर, व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

5) सदरच्या देयकांच्या रकमा अदा करण्यापूर्वी अल्पोपहार व चहापान केल्याच्या खर्चाची तपशिल दर्शविणारी आकस्मीक खर्चाची नोंदवही व अल्पोपहार व चहापानावरील खर्च कोणकोणत्या अभ्यांगतांसाठी केला याबाबतच्या कुठल्याही नोंदी ठेवलेल्या नाहीत.

वरील उणिवांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

83 नगरसचिव विभागातील सन 2014-2015 या कालावधीत हार,पुष्पगुच्छ व शाली इत्यादी बाबींवरील आकस्मित खर्च लेखाशिर्षांतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 3

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 475370.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 475370.00/-

सदरचा खर्च करतांना विना निविदा व दर पत्रके न मागविता केलेला आहे. शासन निर्णय दिनांक 2.1.1992

मधील परिच्छेद क्रमांक 8.3) फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जादा खर्च असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. पुष्पगुच्छ व शाल इत्यादी खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. पुरवठादारांच्या उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील आकस्मित खर्च नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता नगरसचिव विभागामार्फत विविध कार्यक्रमांसाठी हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादी बाबींकरीता सन 2014-2015 या वित्तीय वर्षात आकस्मित खर्च या लेखाशिर्षाखाली एकुण रक्कम रूपये 4,75,370/- इतका खर्च करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	पुरवठाकाराचे नांव	रक्कम
1	आदेश क्र. 401 दिनांक 14/8/2014	हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	63600
		हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	29600
		हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	34200
		हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	49000
		हार, पुष्पगुच्छ	ग्रीन हाऊस, नाशिक	23400
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	36000
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	32200
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	19200
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	16200
		शाली	अशोक होजिअरी, नाशिक	18700
		शाली	अशोक होजिअरी, नाशिक	10400
		शाली	दिपसन्स साडी पॅलेस	20040
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	26000
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	16000

		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	53280
		हार, पुष्पगुच्छ	निलेश फ्लॉवर्स	18200
			एकूण	**466020**
2	आदेश क्र. 12 दिनांक 4/8/2014	हार, पुष्पगुच्छ	मा.महापौर सो. यांचे स्वीय सचिव यांनी केलेला इ. खर्च	8150
			एकूण	**8150**
3	आदेश क्र. 16 दिनांक 30/8/2014	हार, पुष्पगुच्छ	मा.महापौर सो. यांचे स्वीय सचिव यांनी केलेला इ. खर्च	1200
			एकूण	**1200**
			एकूण खर्च	**475370**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मध्ये वजावट नोंदवहीनुसार हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादीसाठी एकूण रु 4,75,370/- एवढा खर्च झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5 (2) नुसार महानगरपालिकेने कुठलेही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रातील जाहीराती नोटीस देऊन अशा खरेदीसाठी निविदा मागविणे आवश्यक असतांना विना निविदा व दरप्रत्रके न मागविता सदरची खरेदी केली आहे. तसेच कोणतेही काम शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उद्योग-6 दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3)फ) अन्वये प्रत्येक बाबीसाठी वर्षभरात रू 50,000/- पेक्षा जादा खर्च असल्यास त्यासाठी जाहिर निविदा प्राप्त करून त्यानंतरच खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नाशिक महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र 859 दिनांक 19.11.2005 अन्वये सदर खर्चाची मर्यादा शिथिल करून मा.स्थायी समिती ने ठराव क्रमांक 1174 दिनांक 20.10.2011 अन्वये कोणतीही दरपत्रके न मागविता खर्च करण्याचा ठराव पारित केलेला आहे. मात्र सदरील ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसून निविदा प्रक्रिया न राबविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ नाशिक महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी विशिष्ठ पुरवठादाराकडुन हार, पुष्पगुच्छ व शाली खरेदी केलेल्या असल्याने जादा खर्च झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा प्रकारच्या साहित्यांची वारंवार आवश्यकता भासत असल्यास निविदा काढून वार्षिक दर मंजूर करणे शक्य असतांना अशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

2) हार, पुष्पगुच्छ व शाल इत्यादी खरेदीची नस्तीची तपासणी केली असता, संबंधित पुरवठादारांना सदरील खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. परिणामी पुरवठयाचे परिमाण, दर कोणकोणत्या बाबी पुरवठाकाराने पुरविणे आवश्यक आहे, याची कोणतीही तपासणी आणि पडताळणी न करता संबंधिताना रकमा अदा केलेल्या आहेत. संबंधित पुरवठाकारानी प्रत्यक्षात किती हार, पुष्पगुच्छ व शाली इत्यादींचा पुरवठा केलेला आहे, याची कोणतीही माहीती/ अभिलेखे नस्तीसोबत ठेवलेले नाहीत. परिणामी पुरवठाकारांना रक्कम अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रदान करण्यापूर्वी आवश्यक ती तपासणी नमूद करून व पुरवठादारकांच्या

उपप्रमाणकांवर प्रदानार्थ मंजुर, व अदा करून रद्द केले असे शेरे नमूद करून स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

3) सदरच्या देयकांच्या रकमा अदा करण्यापूर्वी या साहित्याचा वापर कोणकोणत्या अभ्यांगतांसाठी केला याबाबतच्या कुठल्याही नोंदी ठेवलेल्या नाहीत.

वरील उविणांवरून असे दिसून येते की, मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 14, Hmm No : 113)

84 नगरसचिव विभागातील मा. महापौर यांचे स्वीय सचिव, मा.सभापती स्थायी समिती यांचे स्विय सचिव तसेच नगरसचिव विभागातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला (O.T) प्रदान करतांना झालेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 3

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1586335.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1586335.00/-

केंद्र तसेच राज्य शासनाने कार्यालयीन कामकाजासाठी फक्त वाहन चालक आणि शिपाई यांच्यासाठी त्यांच्या वेतनाच्या 50% च्या मर्यादेत अतिरीक्त कामाचा मोबदला अनुज्ञेय असतांना महानगरपालिकेने नगरसचिव विभागातील स्विय सचिव, लिपीक यांना मोठया प्रमाणात अतिरीक्त कामाचा मोबदला दिला आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे नगरसचिव विभागातील निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता नगरसचिव विभागातील मा.महापौर यांचे स्वीय सचिव यांना 2,52,030/-, मा.सभापती स्थायी समिती यांचे स्वीय सचिव यांना 73,526/-, नगरसचिव विभागातील वाहन चालक यांना 9,31,173/- व महानगरपालिकेतील इतर कर्मचारी यांना 3,29,606/- अशी एकूण 15,86,335/- इतक्या रकमेचा अतिरिक्त कामाचा मोबदला देण्यात आला आहे. सदर रक्कम ही सन 2014-2015 या कालावधीच्या नगरसचिव विभागाच्या स्थायी आस्थापना या लेखाशिर्षातील वजावट नोंदवहीच्या अनुषंगाने असून सदरची देयके लेखापरिक्षणास वारंवार मागणी करूनही उपलब्ध झालेली नाहीत, यास्वत सदर रकमेची गणना कशाप्रकारे केली, याबाबतची पडताळणी लेखापरिक्षणास करता आलेली नाही.

सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय सादर करण्यात येत आहेत.

1. नाशिक महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.1823 दिनांक 18.3.2011 अन्वये वरील प्रमाणे अतिरिक्त कामाचा मोबदला अदा करण्यासाठी ठराव पारित केलेला आहे. त्याअनुषंगाने मा.आयुक्त यांनी आदेश क्र.888 दि. 25.10.2012 अन्वये मंजुरी आदेश निर्गमित केलेले आहेत. राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे सार्वजनिक सुट्टी दिवशी काम केल्यास त्यासाठी बदली रजा (compensatory holiday) संबंधितांना मंजुर करता येतो मात्र अशा प्रकारे कार्यालयीन काम करण्यासाठी अतिरिक्त मोबदला अदा करण्याची कार्यवाही प्रचलित नाही.

2. मा. आयुक्त, नाशिक यांचे आदेश क्रमांक 888 दि.25.10.2012 मध्ये सुट्टीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामावर बोलविण्यापुर्वी संबंधित विभागप्रमुखांनी मा.आयुक्त यांची पुर्व मंजुरी घेऊन आदेश निर्गमित केल्यानंतरच सदर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मेहनताना अदा करण्याची कार्यवाही करावयाची आहे. मात्र अशा प्रकारे मा.आयुक्त यांची पुर्व मंजुरी आणि आदेश निर्गमित करून संबंधित कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मेहनताना अदा केला किंवा कसे याबाबत अभिलेख्याअभावी खात्री करता आलेली नाही.

3. प्रचलित शासन आदेशानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला (वाहनचालक आणि शिपाई केवळ यांच्यासाठी त्यांच्या वेतनाच्या 50% पेक्षा जास्त अनुज्ञेय नाही.) परंतू सदरचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याने वाहन चालक व इतर कर्मचारी यांना अदा केलेल्या रकमेची पडताळणी करता आली नाही. तसेच सदरील खर्च केंद्र व राज्य शासनाने आपआपल्या आस्थापना मध्ये बंद केला असताना महानगरपालिकने सदर रक्कम अदा केली आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 15, Hmm No : 114)

85 नाशिक महानगरपालिकेत महासभेचे व स्थायी समितीचे ठराव नगरसचिव विभागामार्फत समन्वय कक्षास विलंबाने पाठविले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9ड

महासभा व स्थायी समितीचे ठराव समन्वय कक्षामार्फत सर्व विभागांना वितरीत केले जातात. ठराव दिनांक व सदर ठराव समन्वय कक्षाकडे पाठविल्याचा दिनांक यात मोठे अंतर आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची" ड"¶ प्रकरण 2 नियम 9 (न), नियम 9 (ज) मध्ये केलेल्या तरतूदींचे पालन होत नसल्याचे दिसते. ठराव उशिराने प्राप्त होत असल्याने ठरावांची अंमलबजावणीस विलंब होत असल्याचे दिसते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण 2 मध्ये महानगरपालिका, स्थायी समिती इ.चे कामकाजा संबंधी तरतुदी आहेत. प्रकरण 2 नियम 9 (न) अन्वये '' नगरपालिका सचिवाने, प्रत्येक सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज या संबंधीचे एक कार्यवृत्त सभेच्या दुस-या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर तयार केले पाहिजे आणि ते या प्रयोजनासाठी तरतुद करण्यात आलेल्या पुस्तकात ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने सही केली पाहिजे आणि उक्त कार्यवृत्त पुस्तक कोणत्याही पालिका सदस्यास, विना मुल्य व अन्य कोणत्याही व्यक्तीस आठआणे फी दिल्यावर सर्व वाजवी वेळी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात पाहता येतील'' अशी तरतुद करण्यात आली आहे.

स्थायी समितीच्या कामकाजाबाबतीत नियम 3(ज) अन्वये " नगरपालिका सचिवाने, स्थायी समितीच्या आणि उपसमितीच्या प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे आणि अशा सभेतील कामकाज यासंबधीचे एक कार्यवृत्त, या प्रयोजनासाठी तरतुद करण्यात आलेल्या पुस्तकात नमूद करून ठेवले पाहिजे आणि त्यावर नंतरच्या सभेत,अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने सही केली पाहिजे," असाही तरतूद आहे.

नाशिक महानगरपालिकेत महासभेचे व स्थायी समितीचे ठराव नगरसचिव विभागामार्फत समन्वय कक्षास पाठविले जातात व समन्वय कक्षामार्फत विभागांना ठरावाच्या प्रती वितरीत केल्या जातात. नगरसचिव विभागाकडील समन्वय कक्षाकडे ठराव पाठविलेल्या सन 2013-2014 व 2014-2015 वर्षातील नस्तीची पडताळणी केली असता, ठरावाचा दिनांक व सदर ठराव समन्वय कडे पाठविल्याचा दिनांक यात मोठे अंतर दिसुन आले. यातील प्रदीर्घ विलंबाने प्राप्त झाले ठराव उदाहरणादाखल खालील प्रमाणे आहेत.

महासभा ठराव क्रमांक व दिनांक	समन्वये कक्षाकडे पाठविल्याचा दिनांक
24/ 18-03-2012	24-07-2013
239/ 18-10-2012	01-08-2013
324/ 18-10-2012	03-10-2013
25/ 14-12-2012	11-09-2013
489/ 19-12-2012	24-10-2013
29/ 17-01-2013	21-11-2013
486/ 19-12-2012	05-12-2013
558/ 17-01-2013	05-12-2013
865/ 18-03-2013	05-12-2013
715/ 15-03-2013	04-01-2014
956/ 18-03-2013	06-03-2014
980/ 18-03-2013	01-09-2014
845/ 04-12-2013	01-09-2014

753/ 04-12-2013	01-09-2014
710, 781/ 04-12-2013	29-10-2014
65/ 08-12-2014	02-12-2015
341/ 20-06-2014	20-04-2016
306/ 18-03-2015	04-04-2016
1437,1446 1458,1459/ 17-07-2014	20-04-2016
1527, 1534,1543,1544,1549,1552/ 13-08-2014	20-04-2016
स्थायी समिती ठराव क्र.व दिनांक	समन्वय कक्षाकडे पाठविल्याचा दिनांक
79/ 06-05-2013	04-12-2013
69/ 09-05-2013	11-12-2013
65/ 09-05-2013	18-01-2014
731 ते 736 / 31-05-13	21-01-2014
108 / 23-05-2013	28-01-2014
72/ 09-05-2013	15-02-2014
318 ते 321,326 ते 358 / 12-1-2014	14-11-2014

वरील नमुद तपशिल उदाहरणादाखल नमुद करण्यात आलेला असुन ठरावाच्या दिनांकानंतर विलंबाने ठराव समन्वय कक्षात प्राप्त होत असल्याने ठरावांच्या अंमलबजावणीस विलंब होतो असे दिसते.

DATDTBM7001 (Ref No : 126, Hmm No : 104)

86 सन 2014-2015 मध्ये महिला व बालकल्याण विभागातर्फे आंगणवाडी बालकांना पूरक पोषण आहार देण्यातील उणीवाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

शासननिर्णयाच्या तुलनेत आहाराचे प्रमाण कमी देण्यात आले असून दर मात्र शासन निर्णयापेक्षा जास्त अदा करण्यात आले आहेत. प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त यांनी आंगणवाडयांना नियमित भेटी व तपासण्या केलेल्या नाहीत. राज्य शासनामार्फत व नाशिक महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या आंगणवडयाचे क्षेत्र वेगवेगळे आहे किंवा नाही याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या कालावधीतील महिला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

नाशिक महानगरपालिका, महिला व बालकल्याण कार्यालयाच्या अधिनिस्त एकूण 419 अंगणवाडया महानगरपालिकेच्या 6 विभागांतर्गत कार्यरत असून सदर अंगणवाडीत अंदाजे 15000 बालके शिक्षण घेत आहेत. शासन निर्णय क्र.एबावि 2008/प्र.क्र. 59/का-5, दिनांक 24/8/2009 च्या अनुषंगानने मा.महासभा ठराव क्र. 185/दिनांक 15/6/2013 तसेच स्थायी समिती ठराव क्र.449/दिनांक 26/9/2013 अन्वये प्रती लाभार्थी (बालकास) प्रति दिन रक्कम रू.6/- याप्रमाणे पुरक पोषण आहार देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

अंगणवाडी शाळेतील बालकांना सकस आहार देणेकामी मा.आहार तज्ञ, जिल्हा रूग्णालय, नाशिक यांचेकडून सन 2012-2013 पासून सकस आहाराची पाककृती व आठवडयाचा तक्ता बनवून घेण्यात आला असून खालीलप्रमाणे सकस आहार सन 2014-2015 या वर्षाकरिता सुध्दा पुरविण्याबाबत नमूद केले आहे. सदर तक्ता खालील प्रमाणे आहे.

वार	पदार्थ	वजन(ग्रॅम)	उष्मांक	प्रथिने(ग्रॅम)
सोमवार	गुळ,शेंगदाणे लाडू	60	360	8.8
मंगळवार	केळी	100	116	1.2
बुधवार	मटकी,मोडाची उसळ	50	148.8	8.32
गुरुवार	गव्हाची लापशी	60	214	4.80
शुक्रवार	केळी	100	116	1.2
शनिवार	राजगिरा लाडू	50	71	1.4

सकस आहार नियंत्रण समितीच्या धोरणात्मक निर्णय घेतल्याप्रमाणे सकस आहार पुरवठयामध्ये खंड पडू नये, मुले सकस आहारापासून वंचित राहू नये तसेच तरतूद केलेल्या निधीची पुरेपूर वापर व्हावा म्हणून सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षाकरिता पुढील सकस आहार पुरवठादारांची निवड होईपर्यत सन 2013-2014 मध्ये

निवड झालेल्या पुरवठादारांकडून काम करून घेण्याबाबत मा.आयुकत यांचे आदेश क्र.979, दिनांक 01/10/2013 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन 2014-2015 या कालावधीत सन 2013-2014 करिता निवड केलेल्या महिला बचत गटाकडून आंगणवाडीत सकस आहार पुरविवण्यात आला आहे.

सदर बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मा.महासभा ठराव क्र. 185/दिनांक 15/6/2013 तसेच स्थायी समिती ठराव क्र.449/दिनांक 26/9/2013 अन्वये प्रती लाभार्थी (बालकास) प्रति दिन रक्कम रू.6/- याप्रमाणे पुरक पोषण आहार देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक इबाबी 2008/प्र.क्र.59/का-5 दि.24/08/2009 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील सर्वसाधारण क्षेत्रातील(जनरल) लाभार्थ्याकरिता 500 उष्मांक आणि 12 ते 15 ग्रॅम प्रथिने देणे आवश्यक आहे तसेच शासन निर्णय क्रमांक एबावि 2010/प्रक्र 113/का-5, दिनांक 26/09/2011 च्या सुधारित दराप्रमाणे खर्चाची मर्यादा प्रती दिन प्रती लाभार्थी रु.5.25/- एवढी निश्चित केली आहे. परंतू नाशिक महानगरलिकेने रु.5.25 ऐंवजी रु.6 प्रती दिन /प्रती बालक असा वाढीव दर मंजूर केला असून वरिल तक्याप्रमाणे आठवडयाचा आहार दिला जातो. म्हणजे दर आठवडयाला 3000 उष्मांका ऐवजी 1025.80 उष्मांक व 72 ग्रॅम प्रथिने ऐवजी 25.72 ग्रॅम एवढाच आहार दिला आहे. परंतु दर रुपये पाच रूपये पंचवीस पैसे ऐवजी सहा रुपये देण्यात आला आहे. म्हणजेच उपरोक्त शासन निर्णयाच्या तुलनेत आहाराचे प्रमाण कमी असूनही दर मात्र शासन निर्णयापेक्षा जास्त दिल्याचे दिसून येते.

2) महिला बचत गटाकडून अंगणवाडयांना पुरविण्यात येणारा पूरक पोषण आहारचे परिमाण, उष्मांक व प्रथिने मोजून घेण्याची/तपासणी करण्याची कोणतीही यंत्रणा कार्यरत नाही. त्यामुळे पुरविलेला आहाराच्या दर्जाची खात्री केलेली दिसून येत नाही. महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि 2008/प्र.क्र.59/का-5 मंत्रालय मुंबई दि.24/08/2009 मधील परिच्छेद 3.10 प्रत्येक दिवसाचा आहाराचा नमुना 24 तासांसाठी जतन करून ठेवावा व संबंधित अधिकाऱ्यांनी 3 महिन्यातून एकदा अचानकपणे आहाराची तपासणी करावी. कमी पुरवठा, खंडित पुरवठा, निकषानुसार आहार नसणे इत्यादी बाबत दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत नमूद केले असून सदर बाबतची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) सदर उददीष्टाखाली 2 कोटी एवढी तरतूद असून फक्त 1 कोटी 3 लाख एवढाच खर्च करण्यात आला आहे.

4) सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षाकरिता 34 महिला संस्था/महिला मंडळ/महिला बचत गट यांना सकस आहार नियंत्रण समितीने निवड केलेल्या पुरवठादारांपैकी 17 नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आल्या यापैकी यशस्वीनी महिला बचत गट यांनी आंगणवाडी एनपी 43 56 क्रमांक शाळेजवळ वडारवाडी पंचवटी प्रभाग क्रमांक 9 या आंगणवाडीने आहार साठा व वितरण नोंदवहीत नोंदी घेतल्याचे दिसून आले नाही.

5)प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त यांनी आंगणवाडयांना नियमित भेटी व तपासण्या केल्याचे दिसून येत नाही.

6)राज्य शासनाच्या एकात्मिक बाल विकास योजनेमार्फत नाशिक शहरी विभागात देखील आंगणवाडयातील बालकांना पोषण आहार देण्याबाबतची योजना कार्यन्वीत आहे. यामुळे राज्य शासनामार्फत व नाशिक महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या आंगणवडयाचे क्षेत्र वेगवेगळे आहे किंवा नाही याची पडताळणी होणे

आवश्यक आहे. जेणेकरून एकाच लाभार्थ्यास सदर योजनेचा लाभ दुबार होणार नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 19, Hmm No : 127)

87 महिला व बालकल्याण विभागांतर्गत मकर संक्रात निमित्ताने राबविण्यात आलेल्या परिसंवाद, हळदी कुंकु कार्यक्रमाच्या खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 198900.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 198900.00/-

हळदीकुंकु सभारंभासाठी भेटवस्तुकरिता 1,20,000/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतू सदर कार्यक्रमाकरिता कोणती भेट वस्तु/वाण देणे आवश्यक आहे तसेच कोणती भेट वस्तु देण्यात आली याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख केल्याचे दिसून येत नाही. करारनामा विलंबाने करण्यात आला.

महिला व बालकल्याण विभागामार्फत मनपा क्षेत्रातील माहिला सदस्या, अंगणवाडी सेविका, मदतनिस तसेच सामाजिक क्षेत्रातील महिला व महानगरपालिका कर्मचारी यांना मकरसंक्रात सणानिमित्त हळदी कुंकु कार्यक्रम व संक्रात कार्यक्रमास व त्यासाठी येणा-या खर्चास ठराव क्रमांक 10 , दिनांक 26/11/2013 रोजी रूपये 2,00,000/- रकमेस मंजूरी दिली आहे तसेच सदर कार्यक्रम दिनांक 06/02/2014 रोजी आयोजित करण्यात आला होता.

सदरचे काम इव्हेंट मॅनेटमेंट कडून एजन्सीकडून घेणेकरिता ई कोटेशन प्रसिध्द करण्यात आले असता प्राप्त तीन कोटेशन धारकांपैकी विरंगणा शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक यांचा तुलनात्मक दर सर्वात कमी असल्याने त्यांना काम देण्यात आले आहे, सदर कार्यक्रमास खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

अ.क्र	तपशील	रूपये
1	भेट वस्तु	120000
2	चहा पाणी (बिसलरी)	8400
3	मिठाई	32500

4	नास्ता, अल्पोहार	36000
5	तंज्ञ डॉक्टरांचे मानधन	2000
	एकूण	198900

सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कार्यक्रमास विरंगणा शिक्षण प्रसारक मंडळ, रेणूका माता बहुउददेशीय विकास महिला मंडळ,, प्रगती महिला शैक्षणिक सामाजिक विकास संस्था, नाशिक या तीन संस्थेचे कोटेशन प्राप्त झाले आहेत, पंरतू कोटेशन मध्ये बाब निहाय खर्च नमूद न करता कार्यक्रमाचा एकूण खर्च नमूद केला आहे. तसेच तीनही कोटेशनवर दिनांक नमूद केलेला नाही तसेच कार्यालयात प्राप्त झाल्याचा कार्यालयाने आवक क्रमांक व दिनांक नमूद केला नाही, यामुळे सदरचे कोटेशन प्रत्यक्षात कधी प्राप्त झाले आहेत व कधी स्विकारले आहेत याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

2) विरंगणा शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक यांच्या कोटेशनमध्ये वरील तक्त्याप्रमाणे रक्कम नमूद केली आहे. परंतू तक्त्यात वस्तू किती प्रमाणात पुरविण्यात येतील याबाबत कोणत्याही प्रकारची नोंद दिसून येत नाही.

3) विरंगणा शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक यांना भेटवस्तुकरिता 1,20,000/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतू सदर कार्यक्रमाकरिता कोणती भेट वस्तु/वाण देणे आवश्यक आहे तसेच कोणती भेट वस्तु देण्यात आली याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख केल्याचे नस्तीमध्ये दिसून आले नाही, तरी प्रत्यक्षात भेट वस्तू देण्यात आल्या किंवा नाही याबाबची पडताळणी करणे शक्य झाले नाही.

4) सदर कार्यक्रमास उपस्थित महिलाची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, यामुळे प्रत्यक्षात किती महिला सदर कार्यक्रमास उपस्थित होत्या व किती महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या आहेत याबाबतची पडताळणी करता आली नाही.

5) एखादया संस्थेस काम दिल्यानंतर तात्काळ कामाबाबतचा करारनामा करणे आवश्यक आहे, परंतू सदर प्रकरणी विरंगणा शिक्षण प्रसारक मंडळ यांना दिनांक 6/02/2014 रोजी वर्कवॉर्डर देण्यात आली असून सदरचा कार्यक्रम देखील दिनांक 6/2/2014 रोजी करण्यात आला आहे व करारनामा दिनांक 12/3/2014 नंतर करण्यात आलेला आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 20, Hmm No : 128)

88 महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल आर.एम.ग्रुप नाशिक या संस्थेस कमी भाडेतत्वावर देण्यात आल्याने झालेली अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल आर.एम.ग्रुप या संस्थेस एका वेळेस जास्तीत जास्त सात दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सरावासाठी आरक्षित करण्याची परवानगी देण्यात आली असताना सदर हॉल संपुर्ण वर्षभर नाममात्र रक्कम रु.10/- ने वापरण्यात आलेले आहे. सदर संस्थेकडून एका सत्राकरिता 100/- प्रमाणे आकारणी करणे अपेक्षित असताना सन 2006 सालापासून कमी रक्कम आकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे तसेच कालिदास कलामंदिराचे 2014-2015 या आर्थिक वर्षातील खर्चासंबंधीची देयके व त्या संबंधित नस्त्या मागणी करुनही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर कालावधीचे खर्चाचे लेखापरीक्षण करता आलेले नाहीत.

अ) नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या कालावधीतील महाकवी कालिदास कलामंदिर येथील निवडक जमा बाबींचे लेखापरीक्षण केले असता आर.एम.ग्रुप नाशिक या संस्थेस विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सरावासाठी महाकवी कालिदास कलामंदिर येथील सराव हॉल ज्यावेळी इतर संस्थेचे /व्यक्तींचे आरक्षण नसेल त्यावेळी रिकामा असेल अशा वेळेस फक्त सायंकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत प्रतिदिन रू.10/- या प्रमाणे भाडे व नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स आकारणी करून वापरण्यास मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक 9529, दिनांक 02/02/2006 अन्वये परवानगी देण्यात आली आहे तसेच सदर आदेशात सदर संस्थेस एकावेळी जास्तीत जास्त सात दिवस आरक्षण करता येईल तथापि महानगरपालिकेस ज्यावेळेस सदर हॉलची आवश्यकता राहिल त्यावेळेस सदर हॉल त्वरित खाली करून देणे सदर संस्थेवर बंधनकारक राहिल असे नमूद केले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर हॉलचे आरक्षण हे एका वेळेस जास्तीत जास्त सात दिवस करण्याबाबत आदेशात नमूद केले आहे परंतु आर.एम.ग्रुप संस्थेने सदर सराव हॉलचा वापर पूर्ण वर्षभराकरीता केलेला आहे. यामुळे सदर सराव हॉल संपूर्ण वर्षात इतर संस्थेस / व्यक्तीस दिला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

2) सात दिवसांपेक्षा जास्त सराव हॉलचा वापर केल्यास सदर संस्थेकडून एका सत्राकरिता 100/- प्रमाणे आकारणी करणे अपेक्षित होते परंतू पुर्ण वर्षाकरिता एका सत्राकरीता 10/- रूपये एवढीच आकारणी केल्याने महानगरपालिकेस प्राप्त होवू शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहिली आहे.

3) मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार सन 2006 पासून रक्कम रु.10/- एवढे नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे परंतु सन 2006 ते सन 2015 अखेरपर्यंत त्यात वाढ होणे अपेक्षित होते परंतु तसे न झाल्याने महानगरपालिकेस प्राप्त होवू शकणाऱ्या उत्पन्नापासून महानगरपालिका वंचित राहिली आहे.

ब) सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे कालिदास कलामंदिर येथील विविध कामांवरील झालेल्या खर्चासंबंधी देयक नोंदवही, देयके, प्रमाणके, खर्चासंबंधी मुळ नस्ती, वजावट नोंदवही व साठा नोंदवही इत्यादी दस्तऐवजे व नोंदवहया वारंवार मागणी करुनही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने या कालावधीतील झालेल्या खर्चाबाबत कोणतीही खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. त्यामुळे सन 2014-15 या कालावधीतील खर्चाचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 21, Hmm No : 137)

89 सन 2014-2015 या कालावधीतील भविष्य निर्वाह निधी लेख्यातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी नियत वयोमान सेवानिवृत्ती आगोदर 3 महिने बंद करण्यात आलेली नाही. अग्रीमाचे किमान 12 हप्ते कपात होणे आवश्यक असतांना त्यापेक्षा कमी हप्ते कपातीनंतर देखील कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी अग्रीम देण्यात आले आहे तसेच एकाच वर्षात 5 ते 6 वेळा अग्रीम अदा करण्यात आला आहे. कर्मचा-याने विहित नमुन्यात अर्ज सादर कलेले नाहीत. निधीतून रकमा वारंवार अदा केल्याने वर्गणीदाराच्या सेवानिवृत्तीनंतर भविष्य निर्वाह निधी बचतीचा मूळ उददेश सफल होत नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे भविष्य निर्वाह निधीचे 4705 वर्गणीदारांचे लेखे तपासणी कामी उपलब्ध करून देण्यात आले. निवड महिन्यातीचे मार्च 2015 या महिन्याचे लेखे तपासले असता एकूण 306 अधिकारी/कर्मचा-यांना परतावा अग्रीम/नापरतावा रक्कमा अदा केल्या आहेत. त्यापैकी निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता लेखापरिक्षणात खालीलबाबींची अनियमिपततादिसून आली आहे.

1) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम क्र 7 नुसार वर्गणीदाराच्या नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या आगोदर 3 महिने मासिक वर्गणी बंद करणे आवश्यक आहे. माहे मार्च 2015 मध्ये 14 सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे अंतिम प्रदानाचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे तपासले असता त्यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी डिसेंबर 14 पेड ईन जानेवारी 2015 मध्ये तीन महिन्यापूर्वी बंद करण्यात आली आहे, पंरतू माहे फेब्रुवारी 15 पेड इन मार्च 15 मध्ये पुन्हा भविष्य निर्वाह निधी वर्गणी कपात करण्यात आली आहे. (उदा.

अे.के.चव्हाण/अधिक्षक खाते क्र 1102, अे.के.गायवते/सहा. अधिक्षक खाते क्र 3077, आर.बी.गावीत/सहा. अधिक्षक खाते क्र 1361, एस.व्हि.चव्हाण/सहायक अधिक्षक खाते क्र 1968, के.आर.सोनावणे/वरिष्ठ लिपीक खाते क्र 1230, के.एम.उनावणे/बिगारी खाते क्र 1594, एस.के.लाडे/बिगारी खाते क्र 1465, एस.सी.नागरकर/आया खाते क्र 4072, एस.के.दिवे/वि.निरिक्षक खाते क्र 4415, डी.टी.विसपूते /वि.निरिक्षक खाते क्र 4391, एन.एम.शिगोळे/वरिष्ठ लिपिक खाते क्र 4842, पी.बी.उदगे/बिगारी खाते क्र 1511, अे.के.बतासे/लिपिक खाते क्र. 4862, एस.डी.विधाते/खाते क्र 3446)

2) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 13 मधील तरतुदी नुसार भविष्य निर्वाह निधी खातेधारकांनी पूर्वी घेतलेल्या अग्रीमाची पूर्ण फेड अथवा किमान 12 हप्यांची परतफेड करेपर्यत विशेष कारण लेखी नोंदवून कोणत्याही वर्गणीदारांना पोटनियम (1) मध्ये घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर करता येणार नाही. परंतू खातेधारकांना त्यांनी पूर्वी घेतेलेल्या अग्रीमाची पूर्ण परतफेड किंवा किमान 12 हप्यांची परतफेड न होता फक्त तीन चार हप्ते कपात झाल्यांनतर परत दुसरे कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर केलेले आहे. उदाहरणादाखल खालील खातेधारकांना त्यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे सन 2014-2015 मध्ये परतावा अग्रीम मंजूर करण्यात आले आहेत.

अग्रीम अदा केलेला महिना	एम.कादर /प्लंबर खाते क्र 3410,	अे.अन्सारी/वाल्वेमन खाते क्र 3598	डी.आर.मकवाना/ स.कामगार खाते क्र 8986	एच.एन.जाधव/स.कामगार खाते क्र 5250	एस.एन.भारमल/ वॉचमन खाते क्र 5271	अे.जे.मोरे/इलेक्टीशन खाते क्र 3347
4/14		23850	11570	13450	34100	
5/14	18300					19000
6/14			9920	10400	25200	
7/14		26350				
8/14	22300		13260		21200	18750
9/14		20000		9900		
10/14					19700	
11/14	26000	17610	16765			

12/14			9320	13450		24400
1/15	17250	20000			49500	
2/15						
3/15		19980	15770	18600		21900

सर्वसाधारण परिस्थीत परतावा अग्रीम मंजूर करताना नियम 13(2) मुळ वेतनाच्या 3 पट किंवा खात्यात जमा असलेली शिल्लक रकमेच्या निम्मी, दोन्ही पैकी जी कमी असेल तेवढी रक्कम मंजूर करता येते तसेच नियम क्र 13(3) खातेधारकाने मागील घेतलेले अग्रीमाचे किमान 12 मासिक हप्ते किंवा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल तो त्याची परतफेड करेपर्यत सर्वसाधारण परिस्थितीत कर्मचा-यास कमाल मर्यादेपेक्षा जादा अग्रीम मंजूर करता येत नाही.

तसेच ना परतावा अग्रीम काढण्याबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्रमांक 16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतना एवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रक्कमेच्या 50 टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक असणारी एकूण रक्कम व वर्गणीदाराच्या अग्रीमाचे प्रयोजन पहाता सक्षम प्राधिकारी त्यास शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त 75 टक्के एवढी रक्कम मंजूर करू शकतो, परंतू वरिल तपशीलातील नमूद प्रकरणे पाहता परतावा/ना परतावा अग्रीम मंजूर करतांना कर्मचा-याच्या खात्यावरील शिल्लक रक्कम किती आहे व त्यानुसार अग्रीम मंजूरीस किती पात्र आहे याबाबत कोणतीही शहानिशा न करता अग्रीम मंजूर करुन अदा केले असल्याचे दिसून येते.

3) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार संबंधित वर्गणीदारांनी परतावा/ना परतावा अग्रीमाची मागणी विहित नमुन्यातील (परतावा व ना परतावा) या करिता स्वतंत्र अर्ज नमुना 1 व नमुना 3 मध्ये सादर केलेले नाही.

4) विभागप्रमुखाने अर्जदाराने अग्रीम घेतल्यानंतर भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील तरतुदीनुसार खर्चाचे विनियोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, ते घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रामुख्याने कुटुंबाची व्याख्या, नाते इत्यादी महत्वपूर्ण बाबी खात्री होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी निधीतून रकमा वारंवार अदा केल्याने वर्गणीदाराच्या सेवानिवृत्ती नंतर भविष्य निर्वाह निधी बचतीचा मूळ उददेश सफल होणार नाही.

5) भविष्य निर्वाह निधी खात्याचे बृहतपत्रकाचे व लेजर याचे अवलोकन केले असता खालील कर्मचारी यांच्या वेतनाच्या वित्तलब्धीच्या कमीत कमी 6 टक्के इतकी वर्गणी कपात होणे आवश्यक असतांना त्यांच्या वेतनातून कोणतीच कपात करण्यात आलेली नाही.

अ. क्र.	खाते क्र.	अधिकारी कर्मचा-याचे नाव	मूळ वेतन + ग्रेड पे	कपात केलेली रक्कम	भनिनि मधील शिल्लक

					रक्कम
1	5602	अे.आर.गायकवाड/वॉर्डबॉय	3170	0	89108
2	5726	एम.डी.लोंडे/स.कामगार	7470+1800	0	143136
3	5765	आर.ओ.सुनसुना/स.कामागार	3030	0	41114
4	6130	पी.बी.नाईकवडे/सफाई कामगार	3170	0	28890
5	6375	पी.एम.खाडे/बिगारी	8060+1900	0	23220
6	6410	एस.आर.वाघ/आया	8200+1800	0	37793
7	6562	व्ही.डी.देसेले/हेल्पर	7330+1800	0	42290
8	6634	ए.एम.खाडे/मजदूर	6630+1800	0	34855
9	6744	एन.डी.गायकवाड/स.कामगार	8020+1800	0	42930
10	7106	आर.वाय.नांद्रे/लिपिक	8840+2400	0	9607
11	7264	एच.डी.रांबाडीया/स.कामगार	2750	0	0
12	8080	एस.डी.पाटील/फारसीस्ट	9860+4200	0	62657

उदाहरणादाखल वरिल कर्मचारी हे महानगरपालिकेतील आस्थापना अंतर्गत असल्याने त्यांची सेवा खंडीत झाली की, ते असाधारण रजेवर आहेत किंवा सेवानिवृत्त झाले आहेत याबाबत कोणताच तपशील बृहतपत्रक व लेजरवर नमूद नसल्याने त्यांची वर्गणी वसूल का झाली नाही, याबाबत तपासणी करता आलेली नाही. तरी अशा प्रकारच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील असलेल्या नोंदीबाबत विभागाने खात्री करून आवश्यक तेथे वर्गणी वसूलीबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) भविष्य निर्वाह निधीची कमाल रक्कम कर्मचा-याच्या मासिक वेतनाच्या मूळ वेतन व गेड पे पेक्षा जास्त नसावी परंतू एम.आर.बागडे/डायव्हर खाते क्र 3870 यांचे मूळ वेतन + गेड पे (16830+4200) एवढी असून त्यांच्या भविष्य निर्वाह निधीची कमाल रक्कम रु. 21030 पेक्षा जास्त नसावी परंतू सदर कर्मचा-याची सन 2014-2015 या वित्तीय वर्षात मासिक वर्गणी रू.23000 एवढी कपात करण्यात आली आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 1, Hmm No : 1)

90 गुंतवणूक निधी व गुंतवणूकीच्या नोंदवहीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिलकी रकमांची गुंतवणूक शासन मान्य बँकेत करणे आवश्यक आहे; त्याप्रमाणे निधीनिहाय, बँकनिहाय, दिनांक निहाय गुंवणूकीच्या नोंदी दिसून येत नाही. गुंतवणुक नोंदवहीतील सर्व रकाने भरलेले नाहीत. मुदत पूर्ण झाल्यानंतर मूळ मुदत ठेव पावती बॅकेत जमा केल्यावर त्यांची छायांकित प्रत व रक्कम बँकेत जमा होण्यासंबंधात बँक स्क्रोलची प्रत नस्तीस संलग्न केलेली नाही.

राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता प्रकरण 20 मध्ये नमुना क्रमांक IN-(पृष्ठ क्रमांक 20.19) गुंतवणूक नोंदवहीचा नमुना विहित केलेला आहे. नाशिक महानगपालिकेतील लेखा विभागाने गुंतवणूक नोंदवही महाराष्ट्र लेखा संहिता 1971 मधील नियम 187 (नमुना क्रमांक 142) नुसार परीरक्षित केलेली आहे. सन 2014-2015 मधील गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1) नोंदवहीतील सर्व रकान्यांमध्ये माहिती भरलेली नाही. पुनर्गुंतवणूक करण्यात आली असल्यास त्याबाबत कोणताही तपशिल नमूद केलेला नाही.

2) महानगरपालिकेकडे घसारा निधी, निवृत्ती वेतन निधी, वृक्ष निधी, विकास निधी, मनपा निधी, मनपा वेल्फेअर फंड, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी विविध प्रकारचे निधी असतात, त्याप्रमाणे केंद्र / राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झालेले असते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 92 (1) नुसार महानगरपालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिलकी रकमांची गुंतवणूक शासन मान्य बँकेत करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे निधीनिहाय, बँकनिहाय, गुंवणूकीच्या नोंदी दिसून येत नाही. मार्च 2015 अखेर गुंतवणूकीसंदर्भात बँक निहाय, निधी निहाय, दिनांकानुसार तपशिल वेळोवेळी मागणी करूनही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे निधीनुसार योग्य रितीने गुंणवणूक झाल्याची खात्री करता येत नाही.

3) नोंदवहीत मंजूरी प्राधिकार, व्याज इत्यादी नोंदी घेतलेल्या नाहीत व संबंधितांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

4) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता प्रकरण 20.30 नुसार विभाग प्रमुखाने प्रत्येक महिन्याच्या शेवटी गुंवणूक नोंदवहीमध्ये गुंतवलेल्या रकमा व प्रत्यक्ष निधीच्या रकमा यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे, परंतू अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

5) घसारा निधी, निवृत्ती वेतन निधी, भविष्य निर्वाह निधी, वृक्ष निधी, इत्यादी सर्व निधींचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे प्राप्त झालेल्या व्याजाच्या रकमा, गुंतवणूक यांच्या अचुकतेबाबत तपासणी करता आलेली नाही.

6) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम 221 नुसार सक्षम अधिकारी वित्तीय वर्ष सप्टेंबर अखेर व वर्षाअखेरीस गुंतवणूकांची प्रत्यक्ष पडताळणी करील. गुंतवणूक नोंदवहीमध्ये दर्शविलेले शिल्लक आणि खाते नोंदवहीतील शिल्लक यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

7) गुंतवणूक करताना बँकेत धनादेश दिल्यावर धनादेशाची छायांकित प्रत नस्तीस जोडण्यात आलेली नाही.

8) मुदत पूर्ण झाल्यानंतर मूळ मुदत ठेव पावती बॅकेत जमा केल्यावर त्यांची छायांकित प्रत व रक्कम बँकेत जमा होण्यासंबंधात बँक स्क्रोलची प्रत नस्तीस संलग्न केलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 28, Hmm No : 190)

91 नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेसंबंधी लेखे न ठेवलेबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सीपीएस/1007/18/एसईआर 04 दि. 07/07/2007 अन्वये दिनांक 1 नोव्हेंबर 2005 नंतर शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (DCPS) लागू करणेत आली असून सदर शासन निर्णयानुसार कर्मचा-यांचे लेखे ठेवण्यात ओलेले नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सीपीएस/1007/18/एसईआर 04 दि.07/07/2007 अन्वये दिनांक 1 नोव्हेंबर 2005 नंतर शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (DCPS) लागू करणेत आलेली आहे. सन 2013-2014 या वित्तीय वर्षात DCPS योजना लागू असलेल्या कर्मचा-यांची एकूण संख्या त्यांचे ब्रॉडशिट, लेजर लेखे तयार केलेले नाहीत. DCPS कपात केलेली रक्कम कर्मचाऱ्यांचे खाती जमा होवून मनपाने जमा केलेले समतुल्य अंशदान मिळून जमा झालेल्या रकमेवर व्याजाची आकारणी करून ते व्याज कर्मचा-यांचे खाती जमा केलेबाबतचा अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झालेला नाही. शासन निर्णयात नमूद DCPS लागू असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची (FORM 1 मध्ये भरणेत आलेली) माहिती तसेच DCPS लागू असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचा DCPS खाते क्रमांकाचा दिलेला नाही व (FORM R3) चे वाटप करणेत

आलेले नाही. वित्तीय वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीची गुंतवणूक केल्याबाबतचा अभिलेख उपलब्ध झालेला नाही. सदरची नवीन परिभाषीत अंशदान योजना पालिकेमध्ये कधीपासून लागू करणेत आली आहे, त्याचा संवर्गनिहाय कर्मचा-यांचा गोषवारा तयार केलेला नाही तसेच सदर योजना उशीरा लागू केली असल्यास थकबाकीची रक्कम संबंधिताच्या खात्यावर जमा केली असल्याबाबतचे लेखे तयार केलेले नाहीत.

DGPVJTM8301 (Ref No : 30, Hmm No : 30)

92 दिनांक 31.03.2015 अखेर अपूर्ण असलेल्या विकास कामांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9ड

अपूर्ण कामांसाठी (spill over) साठी रुपये 104908.31 लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचा विचार करता बांधील खर्च वजा जाता अपूर्ण कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होवु शकणार नाही. त्यामुळे नवीन कामे हाती घेताना योग्य ते आर्थिक नियोजन करणे क्रमप्राप्त आहे. कार्यादेश दिलेले अपूर्ण कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे. अपूर्ण कामांवर यापूर्वी केलेला खर्च व्यर्थ ठरणार नाही, या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात सन 2014-15या वित्तीय वर्षात किंवा त्यापूर्वी सुरु करण्यात आलेल्या तथापि दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण असलेल्या विकास कामांची विभागनिहाय व लेखाशीर्षनिहाय सविस्तर माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 5 दिनांक 05.01.206 अन्वये मागणी करण्यात आली होती. तथापि लेखापरीक्षण कालावधीत अपूर्ण विकास कामांच्या याद्या अर्धसमास ज्ञापनात नमूद केलेल्या नमुन्यात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत.

विवरणपत्र क्र. 7 नुसार अपूर्ण कामांची माहिती सादर करण्यात आलेली असून दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण असलेले कामांची संख्या 210 व रक्कम रु. 841.28 कोटी नमूद करण्यात आली आहे. सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या सुधारीत व सन 2015-16 या वित्तीय वर्षाच्या मूळ अर्थसंकल्पासोबत जोडण्यात आलेल्या स्पिल ओव्हर कामांची यादी पाहता, विवरणपत्र क्र. 7 मधील माहितीत तफावत आहे. अर्थसंकल्पासोबत जोडण्यात आलेल्या स्पिल ओव्हर कामांची यादी नुसार खालीलप्रमाणे विकास कामे दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण असल्याचे दिसून येते.

(रक्कम र. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	संगणक कोड	अपूर्ण कामांची संख्या	रक्कम रुपये लाखात
1	पथदिप विद्युतीकरण	2576	45	470.12
2	उद्यान विद्युतीकरण	2577	1	1.76
3	इमारत विद्युतीकरण	2578	5	8.35
4	सिग्नल विद्युतीकरण	2579	2	9.58
5	ले आऊट डिपॉझिट	2582	2	7.55
6	इमारत बांधणे	2584	86	5344.89
7	रस्ते बांधणे	2585	303	7541.94
8	संडास मुता-या बांधणे	2586	17	242.60
9	पुल व सांडवे बांधणे	2587	4	132.38
10	आयलैंड बांधणे	2588	2	2.89
11	स्मशान सुधारणे	2589	9	229.32
12	क्रीडांगण तयार करणे	2590	18	1100.11
13	गोदावरी परिसर सुधारणा	2591	5	51.04
14	पुतळे व स्मारके उभारणे	2593	19	321.80
15	विशेष अनुदान	2594	8	112.18
16	पालिका बाजार	2600	1	20.00
17	जमिन संपादन	2599	4	2527.59
18	उद्यान विकास	2596	82	453.34
19	उद्यानात खेळणी व बेंचेस बसविणे	2834	5	22.74
20	डी.पी.डी.सी. अनुदानातुन शहर विकास कामे	4038	3	9.72

21	संगणक कक्ष	2755	29	416.66
22	खुल्या जागा	2757	44	362.28
23	दवाखाने नाविन उपकरणे खरेदी.	2861	4	1026.15
24	वाहने यंत्र गाड्या व साहीत्य खरेदी	2597	2	5.98
25	अग्निशमन दला करिता यंत्रे व साहित्य खरेदी	2672	18	590.00
26	मागासवर्गीय वस्तीत कल्याणकारी विकास	2598	56	1667.41
27	सिंहस्थ कामे	2657	87	60543.76
28	वितरण व्यवस्था	2604	77	1179.63
29	जलदाय व्यवस्था (प्रकल्प)	2605	16	2266.14
30	जलदाय व्यवस्था (यांत्रिकी)	2606	28	657.23
31	जलदाय (विंकास शुल्क)	2641	6	136.26
32	मलवाहीका	2608	77	563.44
33	मलनिस्सारण व्यवस्था (यांत्रिकी)	2610	3	66.79
34	गोदावरी नदी व उपनद्यांना मिळणारे सांडपाणी अडविणे व वळविणे.	2900	2	901.40
35	महिलांसाठी विशेष विकास कामे	2867	4	39.74
36	दलित वस्ती	4013	5	95.45
37	वृक्षारोपन करणे	4008	10	160.65
38	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान महाअभियान	4047	1	400
39	पावसाळी गटार योजना जनरल निधी अंतर्गत	2749	18	225.92
40	भुयारी गटार योजना	3001	3	571.92
41	भुयारी गटार योजना-पॅकेज 2	3011	14	3234.19
42	पाणी पुरवठा प्रकल्प	3002	4	92.36

43	जमिन संपादन (सिंहस्थाकरिता)	2899	3	4741.13
44	शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (जे.एन.एन.यु.आर.एम)	3013	12	5915.67
45	शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (जे.एन.एन.यु.आर.एम) मनपा 5% मधुन	2860	9	438.25
			1153	104908.31

उपरोक्त महानगरपालिका निधी व शासन अनुदान यामधून हाती घेण्यात आलेल्या तथा दिनांक 31.3.2015 रोजी अपूर्ण असलेल्या विकास कामांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महानगरपालिका निधीतून हाती घेण्यात आलेल्या एकूण 1153 विकास कामे दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण आहेत. त्यासाठी एकूण रक्कम रुपये104908.31/- लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे. विहित नमुन्यात अपुर्ण कामांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने, अपूर्ण विकास कामांची संख्या, सदर कामांसाठी सन 2014-15 या वित्तीय वर्षाअखेर किती निधी खर्च करण्यात आलेला आहे तसेच किती कामांच्या मूळ मुदती संपूष्टात आलेल्या आहेत, इत्यादीबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

2.महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता उपरोक्त अपूर्ण कामांसाठी (स्पिल ओव्हर)पुरेसा निधी उपलब्ध होणे अवघड असल्याने उपरोक्तपैकी कार्यादेश दिलेल्या तसेच यापूर्वी काही निधी खर्च केलेल्या विकास कामांना प्राधान्य देवून पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच अपूर्ण कामांवर यापूर्वी खर्च केलेला निधी व्यर्थ ठरणार नाही, याद्दष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3.केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत शासन योजनेची दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण असलेल्या बहुतांशी कामांच्या मूळ मुदती तसेच मंजूर केलेल्या वाढीव मुदती संपूष्टात येवूनही सदर कामे पूर्ण झालेली नाहीत.

4.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 181 व 182 नुसार नमुना क्रमांक 138 व 139 मधील नोंदवहीत सर्व बांधकामांचा हिशोब ठेवणे आवश्यक असल्याने सदर नोंदवह्या अद्यावत करुन त्यानुसार दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण विकास कामांची यादी निश्चित करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेची प्रत्यक्ष उत्त्पन्न पाहता पुढील आर्थिक वर्षात बांधील खर्च वजा जाता अपूर्ण कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होवु शकणार नाही. त्यामुळे नवीन कामे हाती घेताना योग्य ते आर्थिक नियोजन करणे क्रमप्राप्त आहे.

तरी दिनांक 31.3.2015 अखेर अपूर्ण असलेल्या महानगरपालिका तसेच राज्यशासन व केंद्रशासन अनुदानातील विकासकामांची यादी निश्चित करुन सदरची विकासकामे प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे

93 घसारा निधित पुरेशी तरतूद नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात रक्कम रू300 लक्ष इतकी रक्कम सर्व मालमत्तांची घसारा म्हणून घसारा निधीत वर्ग केली असुन ती कोणत्या मालमत्तेवर किती दराने परीगणित केलेली आहे. याचा तपशिल उपलब्ध झाला नाही. रु. 1547.10 लक्ष इतकी रक्कम घसारा निधित शिल्लक असून नाशिक महानगरपालिकेच्या मालमत्तेचे स्वरूप बघता ती फार पुरेशी नसल्याचे दिसून येते. तरी महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेचे खरेदी मुल्य विचारात घेऊन घसारा तरतुद करणे आवश्यक आहे.

रस्ते, पुल, इमारती, वाहने, कार्यालयीन फर्निचर इत्यादीची नित्यनियमाने देखभाल दुरूस्तीसाठी दरवर्षी आर्थिक तरतुद करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आयुमर्यादा संपते त्यानंतर नवीन प्रकल्प उभारणेस किंवा मालमत्त विकत घेणेस निधी उपलब्ध नसतो. त्यासाठी दरवर्षी नियमाप्रमाणे घसारा निधी स्वतंत्रपणे तयार करून त्यामध्ये पुरेशी तरतुद करणे गरजेचे आहे. उदा. वाहन खरेदी नंतर ठराविक वर्षे किंव किलो मीटर फिरती झाल्यानंतर वाहन निर्लेखित करावे लागते. परंतु अशा वेळेस निधी उपलब्ध नसेल तर अडचण निर्माण होते. म्हणून मालमत्तेच्या खरेदी मुल्यांवर निश्चीत प्रतीशत घसा-याची तरतुद करून रक्कम घसारा निधी मध्ये आवश्यक आहे. मालमत्तेची किंमत, मालमत्तेचे आयुष्य, मालमत्तेच्या नुतणीकरणावर झालेला खर्च, निरोपयोगी ठरलेल्या मालमत्तेच्या लिलावा पासून मिळणारी विक्रीची रक्कम इत्यादीवर घसारा रक्कम अवलंबुन असून त्याच्या वेगवेगळयापध्दती अवलंबविण्यात येतात. उदा. स्थायी हप्ता पध्दती, -हासमान पध्दत, वार्षिक वृध्दी पध्दती इत्यादी.

नाशिक महानगरपालिकेने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात रक्कम रू.300 लक्ष इतकी रक्कम घसारा (इमारत) निधीत वर्ग केली आहे. सदरील घसारा रक्कम ही कोणत्या मालमत्तेवर किती दराने परीगणित केलेली आहे. याचा तपशिल उपलब्ध झाला नाही. नाशिक महानगरपालिकेच्या मालमत्तेचे स्वरूप बघता ती फार पुरेशी नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 नियम 415 प्रमाणे घसारा निधीत मध्ये खाली नमुद केलेल्या दरानुसार रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

1) संयंत्र व यंत्र सामुग्री - यंत्राच्या प्रकारानुसार 10 ते 20 टक्के

2) हत्यारे - 20 टक्के

3) फर्निचर - 6 टक्के

4) वाहने - 15 टक्के

5) विदयुत मोटारी व संयंत्रे - 5 टक्के

घसारा निधी (इमारत) या निधित (संगणक कोड 4004) रु. 1547.10 लक्ष रक्कम शिल्लक असल्याचे दिसते. घसारा निधी (वाहन व यंत्र) या निधित (संगणक कोड 4005) जमा असलेली रक्कम निरंक आहे.

तरी महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेचे खरेदी मुल्य विचारात घेऊन घसारा तरतुद करणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 136, Hmm No : 177)

94 इतर विकास निधी अंतर्गत तरतूद करून केलेल्या खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत स्वतंत्र नावाने वाढीव नगरसेवक निधी उपलब्ध केला असुन सदर निधी हा नियमानुसार 2 टक्के पेक्षा जादा असुन तो नियमबाहय आहे. इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधीतून 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रक्कमेची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 च्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात इतर विकास निधी अंतर्गत केलेल्या विविध विभागाकडील विकासकामांचे दर्शविलेल्या खर्चाची पडताळणी केली असता, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षाकरीता मुळ अर्थसंकल्पात इतर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत महासभेने मंजूर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात रू. 194.75 कोटी तरतुद केली, प्रत्यक्षात

खर्च मात्र निरंक नोद्विण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधी म्हणून नगरसेवकांच्या शिफारशीनुसार विकास कामे मंजुर केलेली आहेत. त्याचा प्रत्यक्ष खर्च हा कामाच्या स्वरूपाशी निगडीत लेखाशिर्षात नोंदविण्यात आलेला आहे.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एएमसी-14200/2264/प्र.क्र.144/नवि-24, मुंबई 32, दिनांक 01 जानेवारी, 2002 नुसार राज्यातील महानगरपालिकांच्या वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणा-या नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा ठरविणेबाबतच्या तरतुदी नुसार नगरसेवक निधी हा महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या 2 टक्के इतका असून तो सर्व नगरसेवकांत समान वाटप करावयाचा आहे. तथापि, नाशिक महानगरपालिकेने इतर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत स्वतंत्र नावाने वाढीव नगरसेवक निधी उपलब्ध केला असुन सदर निधी हा नियमानुसार 2 टक्के पेक्षा जादा असुन तो नियमबाहय आहे.

2) तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एएमसी14200/2264/प्र.क्र.144/ नवि-24, मुंबई-32, दिनांक 26 फेब्रुवारी, 2001 नुसार नगरसेवक निधी अंतर्गत मंजूर निधीतून प्रत्येकी 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रकमेची कामे मंजुर करता येत नाही तथापि, इतर विकास निधी अंतर्गत नगरसेवक निधीतून 2 लक्ष पेक्षा जास्त अंदाजपत्रकीय रक्कमेची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.

DATDTBM7001 (Ref No : 138, Hmm No : 182)

95 सन 2014-2015 या कालावधीत कर्मचा-यांना संगणक अग्रिम मंजूर केलेल्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

संगणक अग्रिम अदा केलेल्या कर्मचा-यांच्या नस्ती लेखापरिक्षणास उपलबध न झाल्यने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अग्रिम-1011/प्र.क्र.50/2011/विनियम, मंत्रालय, मुंबई दिनांक 3 फेब्रुवारी 2012 मध्ये नमूद केलेल्या मुददा 2, 3, 4, 6, 7, 8, 9, 10, 15 नुसार कार्यवाही झाल्याबाबची पडताळणी लेखापरीक्षणास करता

आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याच्या अनुषंगाने सन 2014-2015 या कालावधीकरिता संगणक अग्रिमाकरिता 3 कोटी एवढया रकमेची तरतूद केलेली आहे. त्यापैकी सदर कालावधीत 246 कर्मचा-यांना संगणक अग्रिम मंजूर करण्यात आला असून त्याकरिता रक्कम रू. 49,20,000/- एवढा खर्च झाला आहे. लेखापरिक्षणास कर्मचा-यांचे संगणक अग्रिम बृहतपत्रक व वार्षिक गोषवारे सादर करण्यात आले.

लेखा विभागाने लेखापरिक्षणाकडे सन 2014-2015 या कालावधीचे संगणक अग्रिम वसुली बृहतपत्रक सादर केले याबाबात अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 12/4/2016 अन्वये विभागास अग्रिम मंजूर केलेल्या नस्ती लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता सदर नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत यामुळे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक -अग्रिम -1011 /प्र.क्र.50 /2011/विनियम, मंत्रालय, मुंबई दिनांक 3 फेब्रुवारी 2012 मधील मुद्दा क्र 2, 3, 4, 6, 7, 8, 9,10,15 नुसार कार्यालयाने कार्यवाही केली असल्याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 2, Hmm No : 2)

96 सन 2014-2015 या वर्षात घर दुरुस्ती करीता अग्रिम दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या नस्तीमधील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2014-15 या वित्तीय वर्षात घर दुरुस्तीकरीता अग्रिम मंजूर करताना राहत्या घरात अंतर्गत सजावट व रंगरंगोटी इत्यादी कामासाठी नियमबाहयपणे अग्रिम मंजूर करण्यात आलेले आहे.. वैयक्तिक बंधपत्र, जामीनखत व गहाणखत अपुर्ण जमा केलेले आहेत. वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक घबांअ/1090/(18)/ विनियम,मंत्रालय, मुंबई दिनांक.11/07/90 व दि.27/02/2012 नुसार कार्यवाही होणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करण्याची अनियमितता झालेली आहे.

सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात आस्थापना शाखेतील सन 2014-15 या वर्षात घर दुरुस्ती

करीता अग्रिम मंजूर प्रकरणांची पडताळणी केली असता महानगरपालिका आदेश क्रमांक 11 दिनांक: 29/05/14 अन्वये 6 कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यात आले होते. सदर नस्तीची पडताळणी केली असता राहत्या घरात नवीन सोयी करुन घेणे किंवा अंतर्गत सजावट करणे, किचन ट्रॉलीज बसविणे रंगरंगोटी करणे, किचन ओटा बदलणे इत्यादी कामांकरीता खालील कर्मचाऱ्यांना घरदुरुस्ती अग्रिम देण्यात आलेले आहे.

1) श्री.सचिन एल.निमोणकर, कनिष्ठ लिपिक, कर्मचारी क्रमांक - 7786 यांना घरबांधणी अग्रिम आदेश क्रमांक 720 दिनांक:16/11/2004 अन्वये तयार घर खरेदीसाठी रक्कम रुपये 3,00,000/- मंजूर करण्यात आले होते.

त्यानंतर आदेश क्रमांक 11 दिनांक : 29/05/2014 अन्वये घर दुरुस्ती करणेकामी रक्कम रुपये 2,00,000/- मंजूर करुन अदा करणेत आलेली आहे. सदरहू कर्मचारी यांनी मेसर्स जीतेंन्द्र एम. उगांवकर यांचे रक्कम रुपये 4,11,500/- चे अंदाजपत्रक जोडलेले असून त्यात खालील बाबींचा समावेश करण्यात आलेले आहेत.

Remove Flooring, Skirting, electrification Plumbing, Dados	Plumbibng Fixer etc.	Waterprofing for bath Wc
Flooring 2"*2" fitting with skirting	Granite kitchen Platform with dado	Colouring
Dado for Bath Wc Basin	Safty Doors, Grills	P.O.P. falls celling
Electrification	Slidding Window	Furnishers

त्याचप्रमाणे वैयक्तिक बंधपत्र, जामीन यासंबंधीची कागदपत्रे अपुर्ण आहेत.

2) श्री.सुनिल छोटुसिंग ठाकूर, कनिष्ठ लिपिक कर्मचारी क्रमांक 7102 यांना घरबांधणी अग्रिम आदेश क्रमांक 116 दिनांक: 21/11/2011 अन्वये तयार घर खरेदीसाठी रक्कम रुपये 3,00,000/- मंजूर करण्यात आले होते.

त्यानंतर आदेश क्रमांक 11 दिनांक : 29/05/2014 अन्वये घर दुरुस्ती करणेकामी रक्कम रुपये 2,00,000/- मंजूर करुन अदा करणेत आलेली आहे. सदरहू कर्मचारी यांनी मेसर्स गायकवाड असोसिएटस यांचे रक्कम रुपये 3,50,000/- चे अंदाजपत्रक जोडलेले असून त्यात खालील बाबींचा समावेश करण्यात आलेले आहेत.

Providing & Fixing Dimond spartec tiles 24"*24"	Providing & Fixing window marble box + moulding + polish	Providing & Fixing Granite Kitchen otla
Providing & Fixing Bath wall tiles + flooring	Providing & Fixing pop works	Labor charges kitchen otla
Flooring tiles labour +cement +sands etc	Providing & Fixing Royal color Painting	Safety Door

Providing & Fixing sliding window 3 track powder coating	Providing & Fixing Electric fitting	Providing & Fixing Bathroom Sintex Door

शासन निर्णय क्रमांक घबांअ/1090/(18)/विनियम, मंत्रालय, मुंबई दिनांक.11/07/1990 अन्वये सध्याचे राहते घर निवासयोग्य करण्यासाठी असाधारण व विशेष दुरुस्ती करणे यात असाधारण व विशेष दुरुस्ती म्हणजे पूर, वादळ, आग, अगर भुकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पोहचलेले घर पुन: निवासयोग्य करण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती होय. राहात्या घरात नवीन सोयी करुन घेणे किंवा अंतर्गत सजावट करणे म्हणजे असाधारण व विशेष स्वरुपाची दुरुस्ती नव्हे व अशा कामांसाठी अग्रिम अनुज्ञेय नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र, जामीन यासंबंधीची कागदपत्रे जमा करण्याबाबत स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वित्त विभाग यांचे शासन निर्णय क्र.घबांअ-10.11/प्र.क्र.56/2011/विनियम, मंत्रालय, मुंबई दि.27/02/2012 अन्वये कर्मचाऱ्यास/ अधिकाऱ्यास संपुर्ण शासकीय सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय असेल. मात्र शासनाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या/ खरेदी केलेल्या घराचा विस्तार किंवा त्याचा नैसर्गिक आपत्तीतून उद्भवलेल्या दुरुस्तीकरीता अग्रिम अनुज्ञेय असताना उपरोक्त कर्मचाऱ्यांस नियमबाहयपणे घरदुरुस्तीकरीता अग्रिम देण्याची अनियमितता झालेली आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 चे नियम 62 मधील नमुना क्रमांक 22 नुसार कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या अग्रिमांची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना सदर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

सन 2013-14 या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 32 अन्वये या संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. सदर आक्षेपात नमूद अनियमिततांची पुनरावृत्ती झालेली आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 31, Hmm No : 08)

97 सन 2014-15 या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम व्याज आकारणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

वित्त विभागाच्या दि.10 मे 2012 च्या शासन निर्णयानुसार घरबांधणी अग्रिमावरील व्याजाची परिगणना सरसकट 9.50 टक्के एकरुप दराने करणे आवश्यक असताना नाशिक महानगरपालिकेत 9 टक्के दराने व्याजाची आकारणी केलेली आहे. यामुळे शासनाचे तत्कालिन प्रचलित दर व महानगरपालिकेचे दर यामध्ये

तफावत आढळून आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापना शाखेतील लेखा परीक्षणात सन 2014-15 या वर्षातील निवडक कर्मचाऱ्यांचे घरबांधणी / घरदुरुस्ती अग्रिमांची पडताळणी केली असता त्यांच्या व्याजाची परिगणना 9 टक्के दराने आढळून आले आहे.

मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचे आदेश क्र.443 अन्वये दि.01/04/1991 पासून घर खरेदी / घर बांधणी / दुरुस्ती / प्लॅट खरेदी / जागा खरेदी कामी महानगरपालिकेकडून कर्जाऊ रकमांवर 9 टक्के दराने व्याजाची आकारणी करणेबाबत आदेशित केलेले आहे व त्यानुसार सन 2014-15 च्या अग्रिमाच्या व्याजाची 9 टक्के दराने आकारणी केलेली आहे.

वित्त विभाग यांचा शासन निर्णय घबांअ (व्याजदर)-1012/प्र.क्र.7/2012/विनियम दिनांक. 10 मे 2012 अन्वये घरबांधणी अग्रिमाच्या प्रयोजनांकरीता दि.27 फेब्रुवारी 2012 ते मार्च 2012 व दि.01 एप्रिल 2012 ते पुढील आदेशापर्यंत घरबांधणी अग्रिमावरील व्याजाची परिगणना सरसकट 9.50 टक्के एकरुप दराने निश्चित करण्यात येत आहे असे आदेशित केलेले असताना नाशिक महानगरपालिकेमध्ये 9 टक्के दराने व्याजाची परिगणना केलेली आहे. तरी शासनाचे तत्कालिन प्रचलित दर व महानगरपालिकेचे दर यामध्ये तफावत असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 32, Hmm No : 34)

98 निवृत्तीवेतनाशी संबंधित नोंदवहयातील उणिवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन शाखेत निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही विहीत नमुन्यात ठेवलेली नाही तसेच उपदान नोंदवही, निवृत्तीवेतन अतिप्रदान वसुली नोंदवही व मंजुर निवृत्तीवेतन प्रकरणांची नोंदवही इ.नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत. हयातीच्या दाखल्याची नोंद लेखापरीक्षण नोंदवहीत घेतली जात नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या आर्थिक़ वर्षातील आस्थापना विभागातील निवृत्तीवेतन शाखेतील

निवृत्तीवेतनाशी संबंधित नोदंवहयाची पडताळणी केली असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1) प्राप्त निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवहीत शाखेतील सर्व आवक पत्रांच्या नोंदी घेतल्या जातात असे पडताळणी वेळी निदर्शनास आलेले आहे. निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही विहीत नमुन्यात व स्वतंत्र ठेवणे आवश्यक असताना तशी ठेवण्यात आलेली नाही. (महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 परिशिष्ठ 4 नियम 466 (5)) नमुना 92)

2) कुटूंब निवृत्तीवेतन धारकाची नोंदवही स्वतंत्र ठेवलेली नाही.

3) मर्यादित कालावधीच्या मंजूर निवृत्तीवेतन प्रकरणांची नोंदवही स्वतंत्र ठेवलेली नाही.

4) लेखापरीक्षा नोंदवही विहीत नमुन्यात ठेवलेली नाही. (महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 परिशिष्ठ

4 नियम 466 (5)) नमुना 97)

5) उपदान नोंदवही स्वतंत्र ठेवलेली नाही. (महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 परिशिष्ठ 4 नियम 466

(5)) नमुना 96)

6) निवृत्तीवेतन अतिप्रदान रक्कम वसुलीची नोंदवही ठेवलेली नाही.

7) नोंदवहयातील नोंदीवर संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या आदयाक्षरे / स्वाक्षरी केलेली नाहीत.

8) हयातीच्या दाखल्याची नोंद लेखापरीक्षण नोंदवहीत घेतली जात नाहीत.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्रान्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 33, Hmm No : 37)

99 निवृत्ती वेतन अतिप्रदान रकमा विलंबाने लेख्यात जमा होणेबाबत व निवृत्तीवेतन देयकातील प्रमाणपत्राबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

निवृत्तीवेतन अतिप्रदान प्रकरणी बँकेकडून धनादेश महापालिकेत संबंधित शाखेत प्राप्त झाल्यावर सदरील रकमा विलंबाने लेख्यात जमा झाल्या आहेत. मासिक निवृत्ती वेतन देयकात महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 परिशिष्ट 4 (नियम 466(5)) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र दिले जात नाही.

निवृत्ती वेतन शाखेतील निवड महिन्यांच्या मासिक निवृत्ती वेतन देयकांची व निवृत्ती वेतन अतिप्रदान प्रकरणांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1) निवृत्तीवेतन अतिप्रदान प्रकरणी बँकेकडून धनादेश महापालिकेत संबंधित शाखेत प्राप्त झाल्यावर सदरील धनादेश लेखा शाखेस वर्ग केले जातात व लेखा शाखेकडून सदरील धनादेश महानगरपालिकेच्या बँक खात्यात जमा केले जातात. निवडक महिन्यांच्या प्रकरणांची पडताळणी करताना अतिप्रदान रकमेचे धनादेश महानगरपालिकेच्या लेख्यात विलंबाने जमा होत असल्याचे निदर्शनास आले त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	निवृत्तीवेतनधारकाचे नाव	बँकेचे नाव	धनादेश क्रमांक	धनादेश दिनांक	रक्कम रुपये	लेखा शाखेकडे हस्तांतरीत दिनांक	बँकेत जमा दिनांक
1	कै.प्रकाश जाधव	SBI	936671	12/02/15	1561/-	24/03/15	24/03/15
2	कै.इंदुबाई यशवंत साळवे	SBI	926198	23/03/15	1144/-	24/03/15	24/03/15
3	कै.सखुबाई बाळूराव जाधव	देना बँक	521217	24/03/15	484/-	24/04/15	--/04/15
4	कै.अशोक झुंबर वारे	BOM	945233	25/03/15	12399/-	24/04/15	--/04/15
5	कै.पार्वतीबाई मधुकर तेजणे	SBI	180246	17/02/15	15156/-	24/04/15	--/04/15

2) निवडक महिन्यांच्या निवृत्तीवेतन देयकांची पडताळणी करताना निवृत्तीवेतनाचे देयकात महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 परिशिष्ट 4 (नियम 466(5)) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र दिले जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

MINVAJM6901 (Ref No : 42, Hmm No : 38)

100 निवृत्तीवेतन प्रदान करताना झालेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

152 निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्ती वेतन हयातीचे दाखले अप्राप्त असूनही नोव्हेंबर 2015 ते मे 2016 पर्यत त्यांना निवृत्ती वेतन अदा केलेले आहे. निवृत्तीवेतन धारकांपैकी 98 निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन आयकर पात्र असून त्यांचे निवृत्तीवेतनातून आयकर कपातीची कार्यवाही केलेली नाही. कुटुंबनिवृत्तीवेतन, मर्यादित कालावधीचे निवृत्तीवेतन यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही.

निवृत्तीवेतन धारकांची संख्या, प्राप्त व अप्राप्त हयातीचे दाखले, मनी ऑर्डरदवारे निवृत्ती वेतन घेणारे निवृत्तीवेतन धारक, आयकर पात्र निवृत्तीवेतन धारक, मर्यादित कालावधीचे निवृत्तीवेतन प्रकरणे, पुनर्विवाह बाबत प्रमाणपत्र पात्र न झालेली प्रकरणे यांची दिनांक 31.03.2015 अखेरची संख्यात्मक माहिती अर्धसमास क्रमांक 36 दिनांक 23.05.2016 नुसार मागविली असता ती प्राप्त झाली असून त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 136 (13) नुसार दरवर्षी माहे नोव्हेंबर महिन्यात नमुना 105 मध्ये हयातीचा दाखला घेणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. 152 निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्ती वेतन हयातीचे दाखले अप्राप्त असल्याने जून 2016 पासून तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आलेले आहे, तथापि नोव्हेंबर 2015 ते मे 2016 पर्यत त्यांना निवृत्ती वेतन अदा केल्याने वित्तीय अनियमितता झालेली आहे.

2. निवृत्तीवेतन धारकांपैकी 98 निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन आयकर पात्र असून त्यांचे निवृत्तीवेतनातून आयकर कपातीची कार्यवाही केलेली नाही. आयकर कायदा 1961, कलम 192 नुसार आयकर कपातीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. मर्यादित कालावधी, कुटुंब निवृत्तीवेतन, पुनर्विवाह व पुनर्नियुक्ती प्रकरणे यांबाबत प्रत्येकी स्वंतत्ररित्या निवृत्तीवेतन नोंदवही ठेवलेली नाही, त्यामुळे निवृत्तीवेतन अतिप्रदान होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

4. अदयापही 12 निवृत्तीवेतन धारकांना मनी ऑर्डरदवारे निवृत्तीवेतन अदा केले जात आहे. या सर्व निवृत्तीवेतन धारकांना बॅकेमार्फत निवृत्तीवेतन अदा करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 43, Hmm No : 36)

101 महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर रकमा शासनाकडे भरणा करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर शासकीय भरणा केलेल्या चलनांच्या प्रती परिक्षणास उपलब्ध करून दिलेल्या नाहीत यास्तव सदर रकमा विहित वेळेत शासनास भरणा केल्याची पडताळणी करता आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या पश्चिम विभागीय कार्यालयाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करण्यात आले असता, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम 1962 मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर हे दोन्ही कर मालमत्ता धारकांकडून आकारणी होऊन महानगरपालिकेने सदर कराच्या रकमा वेळोवेळी वसूल करुन 2 टक्के रिबीट रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम अधिनियमातील कलम 17 नुसार सत्वर शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

तथापि महानगरपालिकेने सन 2014-2015 या कालावधीमध्ये वसूल केलेला महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर शासनास भरणा केलेल्या चलनांच्या प्रती परिक्षणास उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. यामुळे सदर रकमा विहित वेळेत शासनास भरणा केली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 3, Hmm No : 40)

102 विविध कर विभागातील मागणी नोंदवहीमधील उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 4

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 327 नुसार प्रत्येक करासंबंधी मागणी नोंदवही ठेवणे

आवश्यक आहे. विविध कर विभागामधील सर्व जमा रकमा त्याच शिर्षाअंतर्गत जमा झाल्याचा ताळमेळ घेतला जात नाही. जमा किर्दमध्ये वसुल झालेल्या रकमांचे मासिक व वार्षिक गोषवारे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित केले जात नाहीत, त्यामुळे एकूण भरणा बरोबर असल्याची खात्री करता येत नाही. तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेच्या भाडयाच्या आकारणीची सत्यता करता आली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या पुर्व विभागीय कार्यालयाचे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे विविध कर विभागाचे लेखा परीक्षण केले असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 327 नुसार प्रत्येक करासंबंधी मागणी नोंदवही ठेवणे आवश्यक असून त्यात कर निर्धारण नोंदवहीत नमूद केलेल्या व्यक्तींकडून केलेल्या मागणीच्या संबंधात मागणी करण्यात आलेली रक्कम, वसुल करण्यात आलेली रक्कम, थकीत रक्कम इत्यादी तपशिलाची नोंद करण्यात येते. त्याअनुषंगाने वर्षाअखेरीस वार्षिक गोषवारे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित करणे आवश्यक आहे. परंतु इमारत गाळे व खुल्या जागा भाडे फी, सर्व्हीस टॅक्स, सरकारी शिक्षण कर व रोजगार हमी कर यांच्या मागणी नोंदवहीमधील दि.31/03/2015 च्या अखरेच्या थकीत भाडे / फी या वसुल रकमांच्या वर्षाअखेरीस वार्षिक गोषवारा काढलेला नाही. मागणी नोंदवहीमधील आरंभिची शिल्लक, चालू वर्षातील मागणी व अखेरची शिल्लक इत्यादी नोंदी विभागीय अधिकारी यांनी मागील नोंदीवरुन बरोबर असल्याचे तपासून प्रमाणित केलेले नाही. तसेच मागणी नोंदवहीवरील अखेरच्या शिल्लक रकमा पेन्सिलने नमूद केलेल्या आहेत. विभागीय अधिकारी यांनी मागणी नोंदवहीमधील नोंदी बरोबर व अचूक असल्याची खात्री करुन नोंदी साक्षांकीत करणे आवश्यक आहे.

2) विविध कर विभागामध्ये विविध करांच्या रकमा वसूल केल्या जातात व त्या वसुल रकमांची दैनंदिनी व वापरलेली पावती पुस्तके यावरुन कर अधिक्षकाने पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतु सन 2014-2015 या वर्षामध्ये अशा प्रकारची तपासणी केली नसल्याचे आढळून आले आहे. तसेच विविध कर विभागामध्ये सर्व करांच्या व इतर शिर्षाअंतर्गत वर्षभरात जमा झालेल्या रकमांचा भरणा विभागीय कोषागारात त्याच शिर्षाअंतर्गत (संगणक कोड) जमा झाला असल्याचा ताळमेळ घेतला जात नाही तसा ताळमेळ घेऊन सर्व जमा रकमा यथोचितरित्या महानगरपालिका फंडात जमा झाल्याची खात्री विभागाने करणे आवश्यक आहे.

3) विविध करांच्या जमा होणारी फी च्या नोंदी जमा किर्द मध्ये घेताना दिवसाअखेर लेखे बंद करतेवेळी प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह बंद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच जमा किर्दमध्ये वसुल झालेल्या रकमांचे मासिक व वार्षिक गोषवारे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेले नाहीत. त्यामुळे वर्षभरात वेगवेगळया लेखा शिर्षाअंतर्गत जमा झालेली एकूण वसूलीचा भरणा बरोबर असल्याची खात्री करता आली नाही, तरी विभागाने याबाबत वसुल झालेल्या रकमा बरोबर व अचूक असल्याची खात्री करुन साक्षांकीत करणे आवश्यक आहे.

4) महानगरपालिकेच्या मालकीचे मालमत्तेवर उदा. गाळे, समाज मंदिरे, व्यायामशाळा व वाचनालय इत्यादींच्या भाडयाच्या मागणी नोंदवहीतील नोंदीसमोर केलेल्या भाडयाच्या आकारणीची सत्यता करारनामे, आदेश व ठराव

लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत.

DGPVJTM8301 (Ref No : 5, Hmm No : 67)

103 महानगरपालिका हद्दीतील वाहतुक करणारे टॅक्सी व रिक्षा स्टॅण्ड फी आकारणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2014-2015 या वित्तीय वर्षाअखेर परिवहन विभागाकडून महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण किती रिक्षा, टॅक्सी, टेम्पो व बस याकरीता थांबे (स्टॅण्ड) मंजूर केले त्यानुसार त्यांच्या मालकांकडून मोटार स्टॅण्ड फी वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती अप्राप्त आहे.

नाशिक महानगरपालिका अंतर्गत असलेल्या सहा विभागीय कार्यालयांना सन 2014-2015 या वित्तीय वर्षाअखेरीस परिवहन विभागाकडून महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण किती रिक्षा, टॅक्सी, टेम्पो व बस याकरीता थांबे (स्टॅण्ड) मंजूर केले आहेत व त्यानुसार विभागीय कार्यालयांनी त्यांचे हद्दीमधील थांब्याच्या रिक्षा, टॅक्सी, टेम्पो व खाजगी बस इत्यादींच्या मालकांकडून मोटार स्टॅण्ड फी वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 41, 69 तसेच 81 अन्वये सर्व संबंधीत विभागीय कार्यालयांना कळविण्यात आले होते. तथापि उपरोक्त माहिती लेखापरीक्षणास प्राप्त करुन दिलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 7, Hmm No : 69)

104 सन 2014-2015 या कालावधीतील पश्चिम विभागीय कार्यालयातील विवाह नोंदणी विभागातील उणिवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 127050.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 127050.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 7 नियम 80 मध्ये नमूद केल्याप्रमाणे पावती पुस्तकांच्या साठयांची नोंद नमुना 57 ठेवलेली नाही. नोंदणी फी+शास्तीची रक्कम रू1,27,050/- एवढी वसूल केली आहे. सदरची रक्कम नमूद नियमानुसार शासकीय कोषागारात भरणा केल्याची पडताळणी करता आली नाही.

पश्चिम विभागीय कार्यालयातील सन 2014-2015 या कालावधीत विवाह नोंदणी विभागात खालीलप्रमाणे उणिवांबाबत निदर्शनास आलेल्या आहेत.

1) नाशिक महानगरपालिका पश्चिम विभागीय कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याची पडताळणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 7 नियम 80 मध्ये नमूद केल्याप्रमाणे पावती पुस्तकांच्या साठयांची नोंद नमुना 57 मध्ये घेण्यात येवून पावती पुस्तके देण्यासंबंधिच्या व पूर्ण झाल्यानंतर त्या परत करण्यासंबंधिच्या तपशीलची नोंद घेण्यात यावी असे नमूद आहे, पंरतू पश्चिम विभागीय कार्यालयातील विवाह नोंदणी कार्यालयाचे लेखे तपासले असता पावती पुस्तकांच्या साठयांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही

2) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 12 नुसार निबंधकाकडे आलेली सर्व फी आणि शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत. पश्चिम विभागीय कार्यालयाने सन 2014-15 या कालावधीत फॉर्म फी + विवाह नोंदणी फी+शास्तीची रक्कम रू.1,27,050/- एवढी वसूल केली आहे. सदर रक्कम नमूद नियमानुसार शासकीय कोषागारात भरणा केल्याची पडताळणी लेखापरीक्षणास करता आली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 8, Hmm No : 72)

105 घरपट्टी कर व पाणीपट्टी कर वसूलीचे धनादेश न वटल्याबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1162451.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1162451.00/-

महानगरपालिकेच्या पुर्व विभागीय कार्यालयातील 57 मालमत्ता धारकांनी घरपट्टी कर / पाणीपट्टी कराची रक्कम रुपये 11,62,651/- धनादेशाद्वारे महानगपालिकेस भरणा केलेले आहेत. मात्र सदर धनादेश वटलेले नसताना मालमत्ताधारकांना वसुलीची पावती देण्यात आलेली आहे.

नाशिक महानगर पालिकेच्या पूर्व विभागीय कार्यालयातील सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील घरपट्टी कर / पाणीपट्टी कर वसुली रकमांच्या निवडक प्रकरणांची पडताळणी केली असता लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेल्या पावती पुस्तक, भरणा किर्द, न वटलेले धनादेश नोंदवही इत्यादी अभिलेख्याचे लेखापरीक्षणात सन 2014-2015 या कालावधीत न वटलेले धनादेश नोंदवहीवरून सोबत जोडलेल्या यादीतील 41 मालमत्ता / पाणीपट्टी धारकांनी मालमत्ता व पाणीपट्टीची वसूली एकूण रक्कम रू 11,62,451/- धनादेशाद्वारे महानगपालिकेस भरणा केलेली आहेत. मात्र सदर धनादेश संबंधित बॅकेत सादर केल्यानंतर मालमत्ताधारकांच्या बॅक खाती पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अथवा इतर कारणास्तव धनादेश वटलेले नाहीत परंतू सदर धनादेश प्राप्त होताच मालमत्ता / पाणीपट्टी धारकांना त्याच दिवशी वसूलीची पावती देण्यात आलेली आहे.

CHEQUE BOUNCE LIST 2014-2015

अ.क्र	इंडेक्स क्रमांक	धनादेश क्र.	दिनांक	बॅकेचे नाव	रक्कम
1	80600195 80801097	11537	5/8/2014	MUOLION BANK	2575
2	80900477	25782	5/8/2014	IDBI BANK	5236
3	80101112	662258	7/7/2014	CANARA BANK	33610
4	80103952	662259	7/7/2014	CANARA BANK	26516
5	80100796	198709	21/7/2014	NAMCO BANK	10556
6	80701006	696080	16/7/2014	CORPORATION BANK	24641
7	80103999	65199	22/5/2014	IDBI BANK	1899
8	80400365	15019	25/7/2014	NAMCO BANK	2443
9	82107284	720956	25/7/2014	STATE BANK OF INDIA	6209
10	80101348	153087	20/8/2014	IDBI BANK	4852
11	82104651 82104650 82104657 82104654	962244	21/8/2014	HDFC BANK	6571

12	82160396 82160395	961079	11/8/2014	STATE BANK OF INDIA	4690
13	82100996	2795	27/8/2014	VISHWAS CO-OP BANK	382
14	80602345	20723	8/8/2014	ICICI BANK	6411
15	82102421	27198	3/9/2014	BANK OF MAHARASHTRA	5346
16	80600123	15812	3/9/2014	JALGOAN JANTA SAHAKARI BANK	426
17	80602118	1795	30/9/2014	UNION BANK	94609
18	82105632	716885	2/12/2014	CORPORATION BANK	25448
19	82106623	360560	10/12/2014	NAMCO BANK	5000
20	81904203	640415	15/12/2014	AXIS BANK	43305
21	80702434	53	15/12/2014	HDFC BANK	25000
22	82101056	982296	1/1/2015	STATE BANK OF INDIA	5352
23	80800288	15508	31/12/2014	INDIAN BANK	640
24	80102770	303725	27/12/2014	NAMCO BANK	5000
25	81902584 81902587	448701	31/1/2015	ICICI BANK	9761
26	80101208	343223	23/1/2015	JANKALYAN SAHAKARI BANK	472
27	30501848	343244	23/1/2015	JANKALYAN SAHAKARI BANK	1936
28	82107460	40119	11/2/2015	TJSB BANK	4672
29	81106435	436267	10/2/2015	INDIAN OVERSEAS BANK	23240
30	81107878	466550	14/2/2015	CORPORATION BANK	6659
31	80401315	401215	25/2/2015	THE NASIK MERCHANT BANK	2037
32	80904566	75077	11/3/2015	SARSWAT BANK	5000
33	81108183	45165	24/2/2015	STATE BANK OF INDIA	10757
34	80103483	652108	11/3/2015	PUNJAB NATIONAL	35000

				BANK	
35	82106392	19	3/3/2015	HDFC BANK	1719
36	81107785	40	14/3/205	HDFC BANK	5000
37	80103192	278093	19/3/2015	NAMCO BANK	20000
38	80600930	145903	19/8/2015	FEDERAL BANK	1223
39	80601469 TO80	42954	20/3/2015	UNION BANK	44951
40	80701014	796424	22/3/2015	STATE BANK OF INDIA	34782
41	80102928	507173	16/3/2015	SHRI SAMARTH SAHAKARI BANK	14702
42	80102023	543593	31/3/2015	INDIAN BANK	42064
43	80100948	135503	31/3/2015	VIJAYA BANK	7410
44	80400933 AND OTHER	135552	30/3/2015	SARSWAT BANK	79645
45	80400123	106262	31/3/2015	NASIK DISTRCT INDUSTRIAL BANK	5000
46	80602169	66273	29/3/2015	SHRI SAMARTH SAHAKARI BANK	39469
47	80702998	38874	26/3/2015	KALLAPANNA AWADE BANK	10000
48	80703016	352240	27/3/2015	BUSINESS BANK	30000
49	80701556	580775	31/3/2015	STATE BANK OF INDIA	100000
50	80900783	34258	27/3/2015	AXIS BANK	127980
51	81104174	8003	24/3/2015	BANK OF MAHARASHTRA	15000
52	81104355	74598	30/3/2015	THE SYAMRAM VITTHAL SAH.BANK	20000
53	81200590	646379	29/3/2015	NASIIK MERCHANT BANK	50000
54	81900690	924701	26/3/2015	STATE BANK OF INDIA	10703
55	81906293	13974	31/3/2015	NASIK MERCHANT BANK	3000

56	81900693	871892	28/38/2015	NASIK MERCHANT BANK	23552
57	82100659	203788	27/3/2015	IDBI BANK	30000
					1162451

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदरचे धनादेश न वटल्याने सोबत जोडलेल्या यादीतील नमूद रक्कम प्रत्यक्षात मालमत्ता / पाणीपट्टी धारकांकडून वसूल करण्यात आली किंवा कसे? याबाबतच्या नोंदी धनादेश नोंदवही घेण्यात आलेल्या नाहीत. यामुळे सदरची पडताळणी लेखापरिक्षणास करता आलेली नाही.

2) सदर रक्कम वसूल न झाल्यास पुन्हा मागणीमध्ये वाढ करण्यात आल्याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

3) सदर रक्कम मालमत्ता / पाणीपट्टी धारकांनी विलंबाने भरणा केली असल्यास नियमानुसार शास्तीची रक्कम वसुली किंवा शास्तीची रक्कम मागणीमध्ये वाढविण्यात आल्याबाबतची तसेच दंडाची वसुली केल्याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.

4) न वटलेले धनादेशाबाबत संबंधित मालमत्ता / पाणीपट्टी धारकांवर बॅक नियमानुसार तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार न्यायिक अथवा दंडनीय कार्यवाही करण्यात आली किंवा कसे? याबाबतची माहिती सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 73 नुसार विचारणा केली असता माहिती लेखापरीक्षपणास सादर केलेली नाही. तरी याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 11, Hmm No : 73)

106 नाशिक महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयातील विवाह मंडळाच्या नोंदणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेतील विविध विभागातील विवाह मंडळाची नोंदणी/ नुतणीकरण फी आकारणी न केल्याने शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान होत असल्याने त्याबाबतची वसुलीची योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम, 1998 व महाराष्ट्र विवाह मंडळ विनियम व विवाह नोंदणी नियम, 1999 मधील नियम 3 नुसार कार्यक्षेत्रातील विवाह जुळविणारी वधू-वर सूचक मंडळाची नोंदणी निबंधकाकडे करणे अनिवार्य व कायद्याने बंधनकारक आहे. निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील कार्यरत विवाह मंडळे यांची नोंदणी निबंधकाकडे करणे आवश्यक आहे व रक्कम रूपये 5000/- प्रती प्रकरण या विहित दराने फी आकारून तसेच नोंदणी करण्यात आलेल्या तारखेपासून दर दोन वर्षांनी नुतणीकरणाची विहित फी आकारून सबंधित विवाह मंडळांना नमुना "अ" मध्ये नोंदणी प्रमाणपत्र देऊन नमुना "ह" नोंदवहीत संबंधित विवाह मंडळाची नोंद घेण्याचे स्पष्ट निर्देश आहेत.

दिनांक 01/05/2008 पासून विवाह नोंदणीचे कामकाज महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे. उपरोक्त बाब पाहता सन 2014-2015 या आर्थिक वर्षात विभागात किती विवाह मंडळाची नोंदणी झाली किंवा नुतणीकरण झाले किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 94 अन्वये विचारणा केली असता सदरची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. सदर कालावधीत विवाह मंडळाचे नोंदणी अथवा नुतणीकरणाचे काम न केल्याने शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान झाले आहे. विभागीय कार्यालयाने नियमातील तरतूदीप्रमाणे आपल्या कार्यालयाक्षेत्रातील कार्यन्वीत विवाह मंडळे यांची नोंदणी/नुतणीकरण विहीत नमुन्यातील प्रपत्रात करून संबंधिताकडून पूर्वलक्षी प्रभावाने अनुज्ञेय होणारी विहीत दराने फी आकारणी करून रक्कम वसूलात आणून सत्वर शासकीय कोषागारात भरणा करण्याची नियमोचीत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DGPVJTM8301 (Ref No : 12, Hmm No : 94)

107 विदयुत विभागासाठी सोडीयम चोक व इग्नायटर खरेदी व वार्षिक दर मंजुर करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष : विजेचे दिवे व केबल स मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 7709800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7709800.00/-

प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा रू8,88,600/- इतका जास्त खर्च करण्यात आला आहे. साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस-1088(2522)/उद्योग-6/दि. 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट अकरा नुसार इलेक्ट्रीक साहित्य लघु उद्योगाकडुन खरेदी केल्याचे दिसून येत नाही. भांडारामध्ये / विभागामध्ये/उपविभागात पडुन असलेल्या

निरुपयोगी भांडार साहित्याची नोंदवही उपलब्ध केली नाही.

1	कामाचे नांव	पथदिप दूरूस्तीसाठी विविध प्रकारचे सोडीयम व्हेपर चोक व इग्नायटर खरेदी करणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 853 दिनांक04/01/2014 रु.68,21,200/-
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	अधिक्षक अभियंता क्र. व दिनांक / / नमूद नाही रु.1,35,22,400/- 2010-11
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 68,21,200/-
5	लेखाशीर्ष	विजेचे दिवे व केबल सामुग्री खरेदी
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	1. दै.दिव्यमराठी दि.14/01/2014 2. दै.नवशक्ती दि.14/01/2014
8	निविदा विक्री कालावधी	दि.03/02/2014 ते 07/02/2014 मुदत 10/02/2014
9	ई-निविदा	निविदा क्र. 499-2013 नोटीस क्रमांक 10/2
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 15/02/2014 प्राप्त निविदा (6)
11	न्युनतम निविदा	न्युनतम दरपुरवठादार 1) मे.युनिक एन्टरप्राईजेस, नाशिक 2) मे.बी.जे.इलेक्ट्रॉनिक कं.नाशिक 3) मे.अल्फा लाईट इलेक्ट्रीक एन्टरप्राईजेस, मुंबई 4) मे.किसान केंद्र 5) मे.शक्ती फिक्चर्स प्रा.लि.
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 10 दि.10/07/2014
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	न्युनतम पुरवठादार 1) मे.युनिक एन्टरप्राईजेस, नाशिक रू.323900/- 2) मे.बी.जे.इलेक्ट्रॉनिक कं.नाशिक रू.1878000/- 3) मे.अल्फा लाईट इलेक्ट्रीक एन्टरप्राईजेस, मुंबई रू.345000/-, 4) मे.किसान केंद्र रू.1098100/- 5)

		मे.शक्ती फिक्चर्स प्रा.लि. रू.982000/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	वर्षभरात वेळोवेळी पुरवठा आदेशानुसार
15	कामाची मुदत	पुरवठा आदेश निर्गमित झालेपासून 15 दिवसांत.
16	मुदतवाढ	------
17	काम पूर्ण दिनांक	साहित्याजमा केलेच्या तारखेस
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	---
19	कामावर झालेला एकूण खर्च	7709800/-

नाशिक महानगरपालिका हद्दीतील पथदिप देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे विविध वॅटचे चोक व इग्नायटर इ.साहित्य खरेदी करणेकामी सन 2012/13 या मध्ये महासभा ठराव क्रमांक 188 दि.18/10/2012 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असता, स्थायी समिती ठराव क्रमांक 724 दि.18/02/2013 व आयुक्त आदेश क्रमांक 201 दि.08/05/2013 अन्वये वित्तीय मान्यता घेऊन साहित्य खरेदी केले होते. परंतु सदरचे साहित्य संपत आले असल्याने पुढील कालावधीमध्ये पथदिप देखभाल दुरूस्तीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी मंजूर ए.टी.आर. दराने त्याआर्थिक वर्षासाठी निविदा पध्दतीने दर मंजुर करून खरेदी करणेकामी सन 2011-2012 चे चालू मंजूर दराने प्राकलन तयार केले असून ते रक्कम रू.1,35,22,400/- इतके आहे. त्यास मंजूरी घेण्यासाठी डॉकेट तयार करून मा.आयुक्तांना सादर केले असता, दि.30/09/2013 रोजीच्या आयुक्तांसमवेत झालेल्या चर्चेनुसार रक्कम रू.1,35,22,400/- ऐवजी रक्कम रू.68,21,200/- चे प्राकलन तयार करून त्यास महासभा ठराव क्रमांक 853 दि.04/01/2014 अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. सदरचा खर्च जाहीर निविदा मागवून करण्यासाठी निविदा काढून आवश्यकते नुसार निविदा धारकांकडून साहित्य खरेदी करीता निविदा मागविल्या असतांना विहीत मुदतीत एकूण 6 पुरवठादारांनी ई-निविदा व्दारे निविदा सादर केलेल्या होत्या, त्या पैकी न्युनतम दर असलेल्या पुरवठादारांना त्यांनी सादर केलेले दर पुनश्च कमी करणे बाबत कार्यकारी अभियंता यांच्या दि.21/02/2014 रोजीच्या पत्रान्वये कळविले असता, त्यांनी कमी करून दिलेल्या दरांची तुलना प्राकलनदर व चालू दरसुची सन 2013-14 यांचेशी केली असता, मागील निविदा दरापेक्षा जास्तीचे आहेत. सन 2013-14 च्या चालू दरसुचीशी तुलना केली असता, पुरवठादारांनी सादर केलेले दर 0.93 टक्के ते 60.24 टक्के below असल्याचे नुसार सदर न्युनतम दर असलेले पुरवठादार मे.युनिक एन्टरप्राईजेस, नाशिक र.रू.3,23,900/-, मे. बी.जे.इलेक्ट्रीक कंपनी, नाशिक, यांचेकडून र.रू.18,78,000/- तसेच मे.अल्फा लाईट इलेक्ट्रॉनिक एन्टरप्रायजेस,, मुंबई योचंकडून र.रू.3,45,500/-, मे.किसान केंद्र यांचे कडून र.रू.10,98,100/- व मे. शक्ती फिक्चर्स प्रा.लि. यांचे कडून र.रू.9,82,000/- असे एकूण खर्च रक्कम रू.46,27,000/- चे खरेदी करणेस व प्राप्त दरांस मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार खालील विवरणपत्रातील वेळोवेळी विविध प्रकारच्या विद्युत साहित्याची खरेदी केलेली आहे.

अ.	खरेदीचा	रक्कम	पुरवठादार	महासभा	स्थायी	साठा नोंदवही	पुरवठा	मापन पुस्तक

क्र.	तपशिल	रु.		ठराव	समिती ठराव	जमा दिनांक	आदेश	क्रमांक
1	70/150/250/400 watt Ignitor suitable for Son-T Lamp with switch off function sky lite make 9000 Nos.x74.90/-= Rs.674100/- 24 watt T-5 Electronic choke -Sky lite make 2000 Nos x 212/-= Rs.424000/-	1098100	मे.किसन केंद्र, धूळे	853 दिनांक 04/01/2014	10 दि. 10/07/2014	95/ 86,135	179/40 दि .10/08/2014	2221 दि.19/09/2014
2	150 watt SV Copper choke Philips make 2000 Nos x 8601/- = Rs.1720000/- 400 watt SV copper choke 100 Nos x 1580/- = Rs.158000/-	1878000	मे.बी.जे.ईलेक्ट्रॉनिक कं.नाशिक	--"--	10 दि. 10/07/2014	95/ 31, 76	179/38 दि. 16/08/2014	2221 दि.17/9/2014
3	24 watt Energy Officent Fluo Alpha lite make 10000 Nos x 89.75/-= Rs.897500/-	897500	मे.अल्फा लाईट इले.कं.	--"--	301दि. 10/07/2014	94/ 112	179/43 दि.--- नस्ती मध्ये आढळून आले नाही	2221 दि.17/9/2014

4	36 watt electronics choke 250 volts Crompton make 1000 Nos x 154/- = Rs.154000/- 70/150/250/400 watt metal Halide Ignitor with switch off function cromption make 1500 Nos.x 99/-= Rs.148500/- 28 watt TS choke for 28 wath fluo tube cromption make 100 nos.100 x 214/- = 21400/-	323900	मे.यूनिक एन्टरप्रायजेस, नाशिक	--"--	10 दि 10/07/2014	95 /126,121,151	179/39 दि. 16/08/2014	2098 दि.30/03/2015
5	150 watt HPSV copper Ballast Philips make 825 Nos.x 860/- =Rs.709500/- 400 watt HPSV	1025500	मे.बी.जे. इलेक्ट्रीक कं. नाशिक	--"--	527दि. 11/02/2015	95 /34,77	179/45 दि. 27/02/2015	2098 दि.30/08/2015

	copper Ballast Philips make 200 Nos x 1580/-= Rs.316000/-							
6	70 watt HPSV copper ballast shakti make 1800Nos.x 491/- = Rs.883800/-	883800	मे.शक्ती फिक्च्र्स प्रा.लि.	--"--	527 दि. 11/02/2015	95 /05	179/49 दि. 07/03/2015	2098 दि.30/03/2015
7	250 watt HPSV copper ballast Alpha lite make 200 Nos x 1380/- = Rs.276000/-	276000	मे.अल्फा लाईट इले.एन्टरप्रायजेस	--"--	527 दि. 11/02/2015	95 / 62	179/46 दि. 27/02/2015	2098 दि.30/03/2015
8	70 watt HPSV copper choke - Shakti make 2000 Nos x 491/- = Rs.982000/-	982000	मे.शक्ती फिक्च्र्स प्रा.लि.	--"--	10 दि.10/07/2014	--	179/42 दि. 25/08/2014	--
9	250 watt HPSV copper choke - Shakti make 250 Nos x	345000	मे.अल्फा लाईट इले.एन्टरप्रायजेस	--"--	10 दि. 10/07/2014	--	179/41 दि. 20/08/2014	--

	1381/- = Rs.345000/-							
	एकूण	7709800						

उपरोक्त विवरणपत्रात नमुद केलेल्या रक्कम रू.77,09,800/- च्या साहित्याच्या खरेदी बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महासभा ठराव क्रमांक 853 दि.04/01/2014 अन्वये रक्कम रु.68,21,200/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असतांना उपरोक्त विवरणपत्रानुसार एकूण रक्कम रू.77,09,800/- इतका खर्च करण्यात आला असून प्रशासकीय माण्यतेपेक्षा रू.8,88,600/- इतका जास्त खर्च करण्यात आला आहे.

2) उपरोक्त विवरणपत्रातील पुरवठा झालेले साहित्य साठा नोंदवहीमध्ये जमा केल्याबाबतचा शेरा नस्ती मध्ये संलग्न उपप्रमाणकावर नोंदविण्यात आलेला आहे. सदरचा पुरवठा स्पेसिफीकेशन व मान्यता प्राप्त मानकानुसार प्राप्त झाल्याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3) सदर साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्याने साठा नोंदवहीमध्ये मागील शिल्लक असलेले व वरील पुरवठा झालेले व वितरीत केलेले साहित्य इ. बाबतचा ताळमेळ घेता आलेला नाही.

4) सदर विवरणपत्रामध्ये नमुद केलेल्या साहित्य खरेदींची मुळ प्रमाणके,प्रमाणक क्रमांक व दिनांक उपलब्ध झाली नाहीत. प्रमाणकांची प्रमाणित प्रत विभागाकडे असणे आवश्यक आहे.

5) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस-1088(2522)/उद्योग-6/दि. 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट अकरा नुसार फल्युरोसंट टयुब्स,चोक्स,स्टार्टर, स्ट्रीट लाईट,फिक्चर,पीव्हीसी अँड व्ही आय आर केबल्स, स्ट्रीट लाईट फिटिंग्ज इ. साहित्य लघुउद्योगाकडून खरेदीसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या आहेत. असे असुनही उपरोक्त विवरणपत्रातील नमूद इलेक्ट्रीक साहित्य लघु उद्योगाकडुन खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

6) उद्योग उर्जा विभागाच्या दि. 2/1/1992 च्या शासननिर्णयानुसार खरेदीच्या प्रचलित पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसून येत नाही,

7) मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन कार्यालय, उपविभाग व भांडारातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

8) भांडारामध्ये / विभागामध्ये/उपविभागात पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

108 पथदिप देखभाल दुरुस्तीसाठी विविध प्रकारचे सोडीयम व्हेपर बल्ब टी-5 टयुब सीएफएल खरेदी करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष : विजेचे दिवे व केबल स मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 6205450.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6205450.00/-

प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा रू6,74,830/- इतका जास्त खर्च करण्यात आला आहे. साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस-1088(2522)/उद्योग-6/दि. 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट अकरा नुसार इलेक्ट्रीक साहित्य लघु उद्योगाकडुन खरेदी केल्याचे दिसून येत नाही. भांडारामध्ये / विभागामध्ये/उपविभागात पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याची नोंदवही उपलब्ध केली नाही.

1	कामाचे नांव	पथदिप देखभाल दुरुस्तीसाठी विविध प्रकारचे सोडीयम व्हेपर बल्ब टी-5 टयुब सीएफएल खरेदी करणे.
2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रमांक 854 दिनांक04/01/2014 रु.55,30,620/-
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	अधिक्षक अभियंता क्र. व दिनांक / / नमूद नाही रु.1,07,05,700/- ATR Rate 2012-13
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 55,30,620/-
5	लेखाशीर्ष	विजेचे दिवे व केबल सामुग्री खरेदी
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1

7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	1. दै.दिव्यमराठी दि.14/01/2014 2. दै.नवशक्ती दि.14/01/2014
8	निविदा विक्री कालावधी	दि.03/02/2014 ते 07/02/2014 मुदत 10/02/2014
9	ई-निविदा	निविदा क्र.500-2013 नोटीस क्रमांक 10/2
10	निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 15/02/2014 प्राप्त निविदा (5)
11	न्युनतम निविदा	न्युनतम दरपुरवठादार 1) मे.बी.जे.इलेक्ट्रॉनिक कं.नाशिक 2) साई केबल 3)शक्ती फिक्चर्स प्रा.लि. 4) मे.युनिक एन्टरप्राईजेस, नाशिक
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 25 दि.10/07/2014
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	न्युनतम पुरवठादार 1) मे.बी.जे.इलेक्ट्रॉनिक कं.नाशिक रू.313800/- 2) साई केबल रू.2775000/- 3)शक्ती फिक्चर्स प्रा.लि. रू.628250/-4) मे.युनिक एन्टरप्राईजेस, नाशिक रू.2488400/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	वर्षभरात वेळोवेळी पुरवठा आदेशानुसार
15	कामाची मुदत	पुरवठा आदेश निर्गमित झालेपासून 15 दिवसांत.
16	मुदतवाढ	------
17	काम पूर्ण दिनांक	साहित्याजमा केलेच्या तारखेस
18	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	---
19	कामावर झालेला एकूण खर्च	6205450/-

नाशिक महानगरपालिका हद्दीतील पथदिप देखभाल व दुरुस्तीसाठी सन 2013/14 या आर्थिक वर्षासाठी निविदा पध्दतीने दर मंजुर करून खरेदी करणेकामी सन 2012-2013 चे चालू मंजूर दराने प्राकलन तयार केले असून ते रक्कम रू.1,07,05,700/- इतके आहे. परंतु दि.07/10/2013 रोजीच्या कार्यालयीन टिपणीत नमूद केल्या प्रमाणे मा.आयुक्तांच्या झालेल्या चर्चेनुसार प्राकलन र.रू. 1,07,05,700/- ऐवजी र.रू.55,30,620/- चे तयार करून पुढील कालावधीसाठी लागणारे साहित्यास मंजूरी घेण्यासाठी डॉकेट तयार करून मा.आयुक्तांना सादर केले असता, त्यास महासभा ठराव क्रमांक 854 दि.04/01/2014 अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. सदरचा खर्च जाहीर निविदा मागवून करण्यासाठी निविदा काढून आवश्यकते नुसार निविदा धारकांकडून साहित्य खरेदी करीता निविदा मागविल्या असतांना विहीत मुदतीत एकूण 5 पुरवठादारांनी ई-निविदा व्दारे निविदा सादर केलेल्या होत्या, त्या पैकी न्युनतम पुरवठादार 1) मे.बी.जे.इलेक्ट्रॉनिक कं.नाशिक रू.313800/- 2) साई केबल रू.2775000/- 3)शक्ती फिक्चर्स प्रा.लि. रू.628250/-4) मे.युनिक एन्टरप्राईजेस,

नाशिक रू.2488400/- खरेदी करणेस येणारा एकूण खर्च रक्कम रू.62,05,450/- चे खरेदी करणेस व प्राप्त दरांस स्थायी समिती ठराव क्र.25 दि.10/07/2014 अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कालावधीसाठी खरेदी करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या विद्युत साहित्याचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	खरेदीचा तपशिल	रक्कम रु.	पुरवठादार	महासभा ठराव	स्थायी समिती ठराव	साठा नोंदवही जमा दिनांक	पुरवठा आदेश	मापन पुस्तक क्रमांक
1	70 watt SV lamp Son-T 250 volt Surya Roshani make 7500 Nos x 230/-= Rs.1725000 /- 250 watt SV lamp Son-T 250 volt Surya Roshani make 3000 Nos x 350/-= Rs.1050000 /-	2775000	मे.साई केबल, नाशिक	854 दिनांक 04/01/2014	25 दि. 10/07/2014	94/ 1, 36	179/35 दि. 01/08/2014	2598 दि. 10/09/2014
2	150 watt SV lamp Son-T 250 volt Crompton make 6000 Nos x 323.50 Rs.1941000 /- 400 watt SV lamp Son-T 250	2488400	मे.यूनिक एन्टरप्रायजेस, नाशिक	854 दिनांक 04/01/2014	25 दि. 10/07/2014	94/ 36,91,101,106,97, 99	179/34 दि.1/08/2014	2598 दि. 10/09/2014

	volt Crompton make 800 Nos x 433/- Rs.346400/- 250 watt Metal Halido lamp 250 volt single ended Crompton make 120 Nos x 650 Rs.78000/- 400 watt Metal Halido lamp 250 volt single ended Crompton make 100 Nos x 675 Rs.67500/- 70 watt M.H. lamp single ended Crompton make 50 Nos x 550/-= Rs.27500/- 150 watt M.H. lamp single ended Crompton							

	make 50 Nos x 560 Rs.28000/-							
3	28 watt TS Tube 250 volts 100Nos x 90= Rs.9000/- CFL 9 watt 200 Nos x 97/-= Rs.19400/- CFL 11 watt 200 Nos.x 98/-= 19600/- CFL 14 watt 300 Nos.x 100/-= Rs.30000/- CFL 36 watt x 100 Nos x 343/-= Rs.34300/- Flue Tube 36 watt 2000 Nos 2000 x 51/-= 102000/- 500 watt Halogen Tube 50 Nos x74/-= Rs.3700/- 1000Watt Halogen tube 50	313800	मे.बी.जे. इलेक्ट्रीक कं. नाशिक	854 दिनांक 04/01/2014	25 दि. 10/07/2014	देयाकात नोंद नाही	179/37 नमूद नाही	2221 दि. 03/02/2015

	Nos.x98/-= Rs.4900/- 60/40 watt clear bulb 300 Nos.x14/-= Rs.4200/- 100watt comptalux bulb 100 Nosx 270/- = Rs.27000/- 160 watt blended bulb 60 Nos x 240/- = Rs.14400/- 500 watt Fuzy lamp 100 Nos x 345/- = Rs.34500/- 40 watt starter for 40 w fluo tube 900 nos.x 12/-= Rs.10800/-							
4	24 watt T-5 Tube 250 volts shakti make 7000 Nos x 89.75= Rs.628250/-	628250	मे.शक्ती फिक्च्र्स प्रा.लि.	854 दिनांक 04/01/2014	25 दि. 10/07/2014	94/ 111	179/36 दि. 01/08/2014	2221 दि. 03/02/2015
	Total	6205450						

उपरोक्त विवरणपत्रात नमुद केलेल्या रक्कम रू.62,05,450/- च्या साहित्याच्या खरेदी मध्ये खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या आहेत.

1. महासभा ठराव क्रमांक 854 दि.04/01/2014 अन्वये रक्कम रु.55,30,620/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असतांना उपरोक्त विवरणपत्रानुसार एकूण रक्कम रू.62,05,450/- इतका खर्च प्रत्यक्षात करण्यात आला असून रक्कम रू.6,74,830/- इतका जास्तीच्या खर्च प्रशासकीय मंजुरी विना करण्यात आला आहे

2. उपरोक्त विवरणपत्रातील पुरवठा झालेले साहित्य साठा नोंदवहीमध्ये जमा केल्याबाबतचा शेरा नस्ती मध्ये संलग्न उपप्रमाणकावर नोंदविण्यात आलेला आहे. सदरचा पुरवठा स्पेसिफीकेशन व मान्यता प्राप्त मानकानुसार प्राप्त झाल्याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3. सदर साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्याने साठा नोंदवहीमध्ये मागील शिल्लक असलेले व वरील पुरवठा झालेले व वितरीत केलेले साहित्य इ. बाबतचा ताळमेळ घेता आलेला नाही.

4. सदर विवरणपत्रामध्ये नमुद केलेल्या साहित्य खरेदींची मुळ प्रमाणके,प्रमाणक क्रमांक व दिनांक उपलब्ध झाली नाहीत. प्रमाणकांची प्रमाणित प्रत विभागाकडे असणे आवश्यक आहे.

5. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भाखस-1088(2522)/उद्योग-6/दि. 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 व परिशिष्ट अकरा नुसार फल्युरोसंट टयुब्स,चोक्स,स्टार्टर, स्ट्रीट लाईट,फिक्चर,पीव्हीसी अँड व्ही आय आर केबल्स, स्ट्रीट लाईट फिटिंग्ज इ. साहित्य लघुउद्योगाकडून खरेदीसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या आहेत. असे असुनही उपरोक्त विवरणपत्रातील नमूद इलेक्ट्रीक साहित्य लघु उद्योगाकडुन खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

6. उद्योग उर्जा विभागाच्या दि. 2/1/1992 च्या शासननिर्णयानुसार खरेदीच्या प्रचलित पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसून येत नाही,

7. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन कार्यालय, उपविभाग व भांडारातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

8. भांडारामध्ये / विभागामध्ये/उपविभागात पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

109 सातपुर विभागात प्रभाग क्रं.19 ब मधील MSDCL कंपनीच्या तारा भुमिगत करणे व केबलही भुमिगत करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष : रस्त्यावरील पोल हलवि मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 4800494.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4800494.00/-

सदरचे काम दि.20/09/2013 रोजी मा.स्थायी समिती व मा.नगरसेवक यांचे चर्चेनुसार कामाला लागणारा निधी दोन वर्षात व दोन भागात विभागून करणे आवश्यक असतांना सदरचे काम सन 2014-2015 पावेतो दोन भागात काम पूर्ण झालेले दिसून आले नाही. सदर कामाची मुदत दि.13/11/2014 पावेतो करण्याबाबत कार्यादेश असतांना व सदरच्या विदयुत तारांमुळे वेळोवेळी उपघातामुळे लोकांचे बळी गेले असतांना सदर काम मुदतीत पूर्ण झालेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विदयुत विभागाकडील सातपुर विभागात प्रभाग क्रं.19 ब मधील MSDCL कंपनीच्या तारा भुमिगत करणे व केबलही भुमिगत करणे या कामाची पडताळणी केली. उपरोक्त कामाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1	कामाचे नाव	सातपुर विभागात प्रभाग क्रं.19 ब मधील MSDCL कंपनीच्या तारा भुमिगत करणे व केबलही भुमिगत करणे.
2	प्रशासकिय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्रं.991 दि.01/01/2014 रु.69,97,501/-
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	अधिक्षक अभियंता क्रमांक व दिनांक नमूद नाही रु.69,97,501/- (दरसूची 2011-12)
4	अंदाजपत्रकीय रक्कम रूपये	रु. 69,97,501/-
5	लेखाशिर्ष	रस्त्यावरील पोल हलविणे/ मिटरींग/ कोटेशन
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी - 1
7	जाहिरात प्रसिध्दी (वृत्तपत्र व दिनांक)	दै.दिव्य मराठी दि.14/01/2014 दै.नवशक्ती दि.14/01/2014

8	निविदा विक्री कालावधी	दि. 03/02/2014 ते दि.07/02/2014 मुदत दि.10/02/2014
9	ई निविदा	निविदा क्र.498-2013 नोटीस क्र.10/2013
10	निविदा उघडल्याचा दि.व प्राप्त निविदा	दि.15/02/2014 प्राप्त निविदा (03)
11	न्यूनतम निविदा	श्री.आर.डी. इलेक्ट्रीकल्स, नाशिक 5.4% जास्त दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्रमांक 5 दि. 10/07/2014
13	मक्तेदाराचे नाव व स्विकृत निविदा दर	श्री.आर.डी. इलेक्ट्रीकल्स, नाशिक अंदाजपत्रकीय दराच्या 5 % कमी दराने रक्कम रु.66,47,626/-
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	147/2013 दिनांक 06/08/2013
15	करारनामा	रू.5800/- च्या मुद्रांकावर दि.17/04/2014
16	कामाची मुदत	04 महिने दि.17/07/2014 ते 13/11/2014 पर्यंत
17	मुदतवाढ	
18	काम पुर्ण दिनांक	काम माहे मार्च 2015 पावेतो झालेले दिसून येत नाही.
19	मोजमाप पुस्तिका क्रमांक व पा.क्रमांक	1136 (पा.क्र 169 ते 173)
20	कामावर झालेला एकुण खर्च (रूपये)	रु.48,00,494/-
21	अंतिम प्रमाणक क्रमांक, दिनांक व रक्कम रूपये	प्रथम धावते देयक रक्कम रू.4800494/-

उपरोक्त कामासाठी सातपुर विभागात वार्ड क्रं.54 मधील नगरसेवक (सेना गटनेता) यांचे दि.23/12/2010 रोजीच्या पत्राव्दारे वार्डात अनेक ठिकाणी MSEB च्या सगळया विदयुत तारा गेलेल्या आहेत. त्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी विविध ठिकाणच्या MSEB च्या तारा भुमिगत करून केबल टाकूण देण्यात यावी सदरचा खर्च माझ्या नगरसेवक निधी मधून किंवा इतर विकास निधी या मधून करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार विभागाने दि.23/12/2010 रोजी कार्यलयीन टिपणी सादर केली असता, सदर कामास अंदाज रक्कम रू.30 ते 35 लक्ष पर्यंत खर्च अपेक्षित असल्याचे कळविले होते. प्राकलन तयार करुन सादर करणे बाबत आदेशीत केल्याप्रमाणे सन 2009-2010 प्रमाणे प्राकलन एकूण रक्कम रू.1,49,25,144/- इतके केले असता सदरचा खर्च पोल हलविणे मिटरींग या सदरातून अधिक्षक अभियंता यांनी म.रा.वि.कं.ने र.रू.57,85,736/- व सुपरव्हिजन चार्जेस र.रू.75,214/- इतक्या रकमेचे प्राकलन दिले आहे. त्यानुसार मनपाने दरसुची 2009-10 प्रमाणे प्राकलन तयार केले असून ते रक्कम रू.1,49,25,144/- इतके होत असून ते मान्यतेकामी सादर केले असता, अधिक्षक अभियंता यांनी प्रस्तावित सदरी अर्थसंकल्पीय तरतुद किती आहे. आजपर्यंत

झालेला खर्च व उपलब्ध शिल्लक. MSEDCL च्या Infrastructure development मध्ये हे काम घेणे आहे काय याबाबत MSEDCL कडे विचारणा करून फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत आदेशित केल्याप्रमाणे मराविविकं. यांना सदरच्या भागात Infrastructure development मध्ये कोणतेही काम प्रस्तावित न केल्याबाबत पत्र क उपका.अ/सातपुर/ आस्था/2239 दि.27/06/2011 नुसार कळविले आहे.

त्यानुसार दरसुची 2009-10 नुसारचे दर योग्य असल्याचे सादर केले होते. दि.11/10/2011 रोजीच्या अभिप्रायानुसार लेखा विभागाने पोल हलविणे या महसुली लेखा शिर्षाखाली सन 2011-12 साठी एकूण तरतुद 200 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे व ती आक्टोबर 2011 अखेर संपलेली आहे असे कळविले आहे.

आजपावेतो रक्कम रू.346.43 लक्षचे दायित्व असून मार्च 2012 अखेर र.रू.150.00 लक्ष खर्च अपेक्षित असून सन 2011-12 चे अंदाजपत्रक सादर करतांना र.रू.500/- लाखाची मागणी केली होती.

त्यानंतर विभागाने 2 ते 2.5 वर्षाचे कालावधी पावेतो सदरची नस्ती प्रलंबीत ठेवलेबाबत दि.17/08/2013 रोजीच्या कार्यालयीन टिपणीतील मुख्य लेखाधिकारी यांच्या अभिप्रायानुसार दिसून येते व प्रलंबीत ठेवल्याची माहीतीची सदर अभिप्रायानुसार विचारणा केली असता, विभागाने सदर कामाबाबत मा.सभापती यांच्याशी चर्चा झाल्याप्रमाणे सदर कामाचा निधी एका वर्षात उपलब्ध होत नसल्याकारणामुळे सदर कामाचा निधी चालू व पुढील वर्षाच्या निधीतून करणेत यावे असे सुचित केलेले असल्याने त्याकरीता एकूण निधी रू.70 लक्ष ही चालू वर्षाच्या निधीतून करावा किंवा कसे ? याबाबत सदर कामाकरीता निधी उपलब्ध नसल्याने सदर नस्ती प्रलंबीत असल्याचे दि.17/08/2013 रोजीच्या अभिप्रायानुसार कळविले आहे. त्यानुसार दि.20/09/2013 रोजी मा.स्थायी समिती व मा.नगरसेवक यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर कामाला लागणारा निधी दोन वर्षात व दोन भागात विभागून करण्याचे ठरल्यामुळे प्राकलन फेर सादर केले व त्यास मान्यता मिळणे बाबत दि.15/10/2013 रोजी टिपणीव्दारे सादर केले असता, पोल हलविणे या लेखा शिर्षाखाली उपलब्ध निधी पेक्षा जादा रकमेचा प्रस्ताव असल्याचे मुलेअ यांचा अभिप्राय आहे.

तसेच सातपुर विभागात प्रभाग क्रं.19 ब मधील MSDCL कंपनीच्या तारा भुमिगत करणे व केबलही भुमिगत करणे बाबत तेथील नगरसेविका यांनी दि.18/07/2013 रोजी पत्राव्दारे विदयुत विभागाच्या विजवाहिका अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. सदरच्या विजवाहक तारांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे आणि छोटीमोठी अपघातही घडलेले आहेत या कारणास्तव प्रभागातील नागरीकांनी वारंवार तक्रार केल्यामुळे महावितरणाशी वारंवार पत्रव्यवहार करून सदर विभागाने त्याची दखल घेत त्यांच्या वरीष्ठ कार्यालयास मंजूरीसाठी सादर केले होते. परंतु सदरचे काम नाशिक मनपाने स्वखर्चाने करण्याचे संमती पत्र सादर केल्यास 1.3 टक्के सुपरव्हिजन चार्जेस या योजने अंतर्गत उपरोक्त काम करण्यास महावितरण त्वरीत मंजुरी देईल अशी दि.10 एप्रिल 2013 रोजीच्या पत्राव्दारे लेखी हमी दिलेली आहे. (नगरसेविकाच्या पत्रासोबत जोडलेले आहे.) तरी आपणास विनंतीपूर्वक मागणी आहे की, या संदर्भातील संबंधित विभागाकडून आदेशित करून त्वरीत या कामास मंजुरीस्तव सादर करण्याबाबत सदर नगरसेविकाने कळविले आहे.

त्यानुसार दर सूची सन 2011-12 नुसार एकूण प्राकलन रक्कम रू.69,97,501/- सादर केले होते. दि.30/12/2013 टिपणीनुसार मा.आयुक्तांच्या सुचनेनुसार सदर भागाची फेर पहाणी करून सदरच्या लाईनच काढणे गरजेचे आहे व दि.31/12/2013 रोजी या भागात एका मुलाचा विजेच्या धक्क्याने परत मृत्यु झाला आहे. तरी नागरीकांच्या मागणी नुसार सदर काम तातडीने करणे गरजेचे झाले असल्याचे आयुक्तांच्या मान्यतेने महासभा ठराव क्र. 991 दि.01/01/2014 रु.69,97,501/- मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार निविदा दै.दिव्य मराठी दि.14/01/2014 दै.नवशक्ती दि.14/01/2014 रोजी प्रसिद्ध करण्यात आली. निविदा विक्री कालावधी दि.03/02/2014 ते दि.07/02/2014 असा होता. निविदा सादर करण्यासाठी अंतिम मुदत दि.10/02/2014 पर्यंत देण्यात आली होती. विहित मुदतीत 03 निविदा प्राप्त झाल्या होत्या. तुलनात्मकदृष्टया मक्तेदार श्री.आर.डी. इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांची निविदा प्राकलन दरापेक्षा 5.4% जास्त दराची होती. सदर कामाचे दरपृथकरण सादर करणे बाबत व दर कमी करणे बाबत व वाटाघाटी करणे करीता सदर मक्तेदारास पत्र क्रमांक मनपा/पापुवि/74 दि.24/02/2014 अन्वये समक्ष चर्चेस बालविले असता, मक्तेदार यांनी दि.25/02/2014 रोजीच्या पत्रात सदरचे काम निविदा दरापेक्षा 5 टक्के कमी दरानेच करण्याचे लेखी कळविले होते. त्यानुसार मा.स्थायी समिती आदेश क्र.5 दि.10/07/2014 अन्वये रक्कम रू.66,47,626/- रकमेची श्री.आर.डी. इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांची निविदा स्वीकृत करून त्यांना कार्यादेश देण्यात आला.

उपरोक्त कामाचे प्राकलन, निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका ई. ची पडताळणी करून माहे मार्च 2015 पावेतो झालेला खर्च रु.48,00,494/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त काम दि.23/12/2010 रोजीच्या नगरसेवकांच्या पत्रानुसार विदयुत विभागाच्या विजवाहिका अत्यंत धोकादायक स्थितीत होत्या व सदरच्या विजवाहक तारांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्यामूळे आणि छोटीमोठे अपघातही घडलेले आहेत या कारणास्तव प्रभागातील नागरीकांनी वारंवार तक्रार केलेली असतांना सदरच्या कामासाठी निधी त्वरीत/ तातडीने उपलब्ध होणे आवश्यक होते. परंतु कामाचे गांभीर्य लक्षात न घेता व सदरचे काम त्वरीत करण्याकरीता आवश्यक निधीची उपलब्धता केलेली दिसून येत नाही. सदरची बाब अनियमित आहे.

2. सदरचे काम दि.20/09/2013 रोजी मा.स्थायी समिती व मा.नगरसेवक यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर कामाला लागणारा निधी दोन वर्षात व दोन भागात विभागून करण्याचे ठरल्यामुळे प्राकलन फेर सादर करून त्यास मान्यता मिळणे बाबत दि.15/10/2013 रोजी टिपणीव्दारे सादर केले होते. त्यानुसार सदर कामास रक्कम रू.69,97,501/- च्या रकमेस तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रकीया राबविली आहे. परंतु सदरचे काम सन 2014-2015 पावेतो दोन भागात काम पूर्ण झालेले दिसून आले नाही.

3. मा.स्थायी समिती आदेश क्र.5 दि.10/07/2014 अन्वये रक्कम रू.66,47,626/- रकमेची श्री.आर.डी. इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांची निविदा स्वीकृत करून त्यांना जा.क्र.147/2013 दिनांक 06/08/2013 अन्वये कामाची मुदत दि.13/11/2014 पावेतो करण्याबाबत कार्यादेश देण्यात आला असतांना व सदरच्या विदयुत तारांमुळे वेळोवेळी उपघात झाले काही लोकांचे बळी गेले असतांना सदर काम मुदतीत पूर्ण झालेले नाही. मुदतवाढीसह काम पूर्ण होणे आवश्यक आहे.

4. उपरोक्त कामासाठी मक्तेदारास प्रथम धावते देयकान्वये रक्कम रू.48,00,494/- माहे सप्टेंबर 2014 मध्ये प्रदान केलेले आहे. परंतु सदरचे काम अदयाप पावेतो पूर्ण झालेले नसल्याने मनपा निधीची उपरोक्त रक्कम रू.48,00,494/- विनाकारण गुंतून पडलेली दिसत आहे.

5. सदर कामाकरीता मक्तेदाराने सादर केलेल्या कंत्राटी कामाच्या विम्याची मुदत दि.16.11.2014 पर्यंत (with maintenance period 16/05/2015 पर्यंत) होती. त्या मुदतीनंतरही काम अपूर्ण असुन त्यापुढील कालावधीचा संपुर्ण विमापत्र नस्तीसोबत जोडलेले नाही. मक्तेदाराकडुन कामाच्या संपूर्ण मुदतीसाठी ग्राहय विमापत्र प्राप्त केलेले नाही.

6. कामपुर्णत्वाचा दाखला नस्ती मध्ये आढळून आलेला नसल्यामुळे सदरचे काम पुढे केव्हा पूर्ण झाले. तसेच मापनपुस्तकात देखील पहिल्या धावत्या देयकानंतर पूढे कामाची नोंदणी झालेली नसल्याने कामाच्या पुढील बाबी विषयी

पडताळणी करता आली नाही.

110 विद्युत विभागाकडील नाशिक पूर्व विकास कामांचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष : पथदीप विद्युतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नगरसेवक निधीतून द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही. जिल्हा दरसुचीतील specification नुसार पुरविलेल्या सर्व पोलचे वजन असले बाबतच्या पावत्या संचिकेत निदर्शनास आल्या नाहीत.तसेच अ.क्र.05 वरील संचिके सोबत जोडण्यात आलेल्या पोलचे वजनाची पावतीनुसार वजन 70 Kg असल्याचे निदर्शनास आले. अ.क्र.02 येथील मूळ अंदाजपत्रकातून Supplying and erecting street light 150 watts HPSV lamp ही बाब वगळण्यात आली आहे. तथापि सदर बाब वगळण्यामुळे अंदाजपत्रकात योग्य त्याठिकाणी दुरुस्त्या करण्यात आलेल्या नाहीत. अ.क्र.02,03 व 05 या कामाचे मोजमापे अनुक्रमे मोजमाप पुस्तिका क्र.2902,3532, व 1526 मध्ये नोंदवली आहेत तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. जिल्हा दरसुचीतील सूचना नुसार Energy efficient and energy saving devices वापरणे आवश्यक आहे तथापि असे devices वापरल्या बाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत. जिल्हा दरसुचीतील Standard and specification नुसार मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदविल्यानंतर The above work has been carried out as per specification असे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही. जिल्हा दरसुचीतील Standard and specification नुसार ERDA,CPRT किंवा केंद्र किंवा राज्याच्या Approved laboratory कडून साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विदयुत विभागाकडील नाशिक शहरातील विद्युत विभागाकडील (नाशिक पूर्व) विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु

5897765/- इतका खर्च केला आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता क्र. दि. रक्कम	तांत्रिक मान्यता क्र. दि.रक्कम	कामाचे आदेश क्र. दि.व मुदत	मंजूर निविदा दर	कामावर झालेला खर्च
1	नाशिक पूर्व विभागातील पथदीप वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	महासभा ठराव क्र.1022 दि. 04.02.14 रु. 2763480	अधिक्षक अभियंता क्र. 03 दि. निरंक रु. 2763480	12/2014 दि.25.07.14 मुदत-04 महिने	3% कमी दराने	2680206
2	नाशिक पूर्व प्र.क्र.38 हिरेनगर,लिंगायत कॉलनी,गणेश नगर परिसरात पथदीप सोय करणे.	महासभा ठराव क्र. 733 दि. 18.03.13 रु. 842420	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 842420	16/2013 दि.10.09.13 मुदत-02 महिने	7% कमी दराने	782263
3	प्र.क्र.26 खडकाळी भद्रकाली पोलीस स्टेशन परिसरात पथदीप सोय करणे.	महासभा ठराव क्र. 585 दि. 19.09.13 रु. 919180	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 919180	43/2014 दि.01.03.14 मुदत-02 महिने	5% कमी दराने	863809
4	नाशिक पूर्व प्र.क्र.39 मधिल विविध ठिकाणी पथदीप सोय करणे.	महासभा ठराव क्र.736 दि. 18.03.13 653016	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 653016	15/2013 दि.29.08.13 मुदत- 02 महिने	7% कमी दराने	607305
5	नाशिक पूर्व प्र.क्र.26 मधिल विविध ठिकाणी पथदीप सोय करणे	महासभा ठराव क्र. 560/ 17.01.2013 983035	कार्यकारी अभियंता क्र. निरंक दि. निरंक रु. 846150	08/2013 दि.05.06.13 मुदत-03 महिने	2% जादा दराने	964182
	एकूण					5897765

उपरोक्त कामाचे उपलब्ध अभिलेख्याची पडताळणी करून कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रु.5897765 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त विकास कामे नगरसेवक निधी मधून करण्यात आलेली आहेत.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग परिपत्रक दिनांक-26.02.2001 नुसार नगरसेवक निधीतून द्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत रु. 2 लक्ष्य पेक्षा जास्त असता कामा नये अशा स्पष्ट सूचना असतांना सदर शासन निर्देशाचे पालन झालेले नाही.

2. सदर विकासकामासाठी वापरण्यात आलेल्या पोलचे वजनाची नमुना दाखल एक एक पावती संचिकेत संलग्न केली आहे. जिल्हा दरसुचीतील specification नुसार पुरविलेल्या सर्व पोलचे वजन असले बाबतच्या पावत्या संचिकेत निदर्शनास आल्या नाहीत.तसेच अ.क्र.05 वरील संचिके सोबत जोडण्यात आलेल्या पोलचे वजनाची पावतीनुसार वजन 70 Kg असल्याचे निदर्शनास आले.जिल्हा दरसुचीतील specification नुसार वजन 73 Kg असणे आवश्यक होते.

3. उपरोक्त अ.क्र.02 येथील मूळ अंदाजपत्रकातून Supplying & erecting street light 150 watts HPSV lamp ही बाब वगळण्यात आली आहे.तथापि सदर बाब वगळण्यामुळे अंदाजपत्रकात योग्य त्याठिकाणी दुरुस्त्या करण्यात आलेल्या नाहीत.

4. उपरोक्त अ.क्र.02,03 व 05 या कामाचे मोजमापे अनुक्रमे मोजमाप पुस्तिका क्र.2902,3532, व 1526 मध्ये नोंदवली आहेत तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध केल्या नाहीत.

5. जिल्हा दरसुचीतील सूचना नुसार Energy efficient & energy saving devices वापरणे आवश्यक आहे तथापि असे devices वापरल्या बाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

6. जिल्हा दरसुचीतील Standard & specification नुसार मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदविल्यानंतर “The above work has been carried out as per specification” असे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही.

7. जिल्हा दरसुचीतील Standard & specification नुसार ERDA,CPRT किंवा केंद्र/राज्याच्या Approved laboratory कडून साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही.

8. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

111 नविन नाशिक वार्ड क्र.84 डी.जी.पी. नगर रस्त्यावर अष्टकोणी पोलसह पथदीप सोय करणे, या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष : पथदीप विद्युतीकरण म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सदर कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.8 Supplying and erecting sreet light 250 watt HPSV lamp fitting Without lamp 82 नग व Supplying and erecting HPSV lamp 230 or 250 watt या बाबींचे काम करण्यात आलेले नाही म्हणजे फक्त खांब उभारून वायरिंग करण्यात आलेली आहे. जिल्हा दरसूची सन 2009-10 मधिल सर्वसाधारण सूचना क्र.04 नुसार विद्युत साहित्य वापरण्यापूर्वी ते गुणवत्तापूर्वक असल्याचे खात्री करणे आवश्यक आहे व तशी खात्री केल्याबाबतचे अभिलेखे जतन करणे आवश्यक आहे. तथापि असे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत. जिल्हा दरसूची सन 2009-10 मधिल सर्वसाधारण सूचना क्र.04 नुसार विद्युत साहित्य वापरण्यापूर्वी ते गुणवत्तापूर्वक असल्याचे खात्री करणे आवश्यक आहे व तशी खात्री केल्याबाबतचे अभिलेखे जतन करणे आवश्यक आहे. तथापि असे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत. Energy efficient and energy saving devices वापरणे आवश्यक आहे तथापि असे devices वापरल्या बाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत. मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदविल्यानंतर The above work has been carried out as per specification असे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही. ERDA व CPRT किंवा केंद्र किंवा राज्याच्या Approved laboratory कडून साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही. जुने साहित्य मनपाच्या भांडारात जमा केल्याचे दिसून येत नाही. सदर विकास कामाचे निविदा प्रसिध्दी बाबतचे वृत्तपत्र तसेच ई निविदा अहवाल संचिकेत निदर्शनास आला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विदयुत विभागाकडील नाशिक शहरातील नविन नाशिक वार्ड क्र.84 डी.जी.पी. नगर रस्त्यावर अष्टकोणी पोलसह पथदीप सोय करणे या विकास कामांची तपासणी केली असता सदर कामावर रक्कम रु 2776833/- इतका खर्च केला आहे.

1	कामाचे नांव	नविन नाशिक वार्ड क्र.84 डी.जी.पी. नगर रस्त्यावर अष्टकोणी पोलसह पथदीप सोय करणे.

2	प्रशासकीय मान्यता क्रमांक	महासभा ठराव क्र.202 दिनांक- 24/05/2011 रक्कम रु.2828132
3	तांत्रिक मान्यता क्रमांक	1.अधिक्षक अभियंता क्र. निरंक दिनांक -निरंक रु.2828132 दरसूची-2009-10
4	अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये- 2828132
5	लेखाशीर्ष	पथदीप विद्युतीकरण
6	निविदा / दरपत्रक प्रकार	बी-1
7	जाहिरात प्रसिध्दी(वृत्तपत्र व दिनांक)	अनुपलब्ध
8	निविदा विक्री कालावधी	अनुपलब्ध
9	ई निविदा	अनुपलब्ध
10	निविदा उघडल्याचा दिनांक	अनुपलब्ध
11	न्युनतम निविदा	मार्को इलेक्ट्रिकल्स 10.20% जादा दराने
12	निविदा स्वीकृती	स्थायी समिती ठराव क्र.24 दि.03.05.2013
13	मक्तेदाराचे नांव व स्वीकृत निविदा दर	मार्को इलेक्ट्रिकल्स 10.20 % जादा दराने रु. 2776833
14	कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता (विद्युत) क्र.19/2013 दिनांक-03.07.2013
15	कामाची मुदत	06 महिने दिनांक-03.07.13 ते 27.01.14
15	मुदतवाढ	---
16	काम पूर्ण दिनांक	27.01.2014
17	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	1. क्र. 1446 पृष्ठ क्र. 156 ते 161 2. क्र. 2710 पृष्ठ क्र. 85 ते 87
18	कामावर झालेला एकूण खर्च	रुपये-2776833

19	प्रदानाचा तपशिल	1.प्रथम धावते देयक -रु. 1837121 2. दुसरे अंतीम देयक -रु. 939712

उपरोक्त कामाचे उपलब्ध अभिलेख्याची पडताळणी करून कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रु. 2776833 बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.8 Supplying & erecting sreet light 250 watt HPSV lamp fitting (IP 66) Without lamp 82 नग व Supplying & erecting HPSV lamp 230/250 watt (son type) या बाबींचे काम करण्यात आलेले नाही म्हणजे फक्त खांब उभारून वायरिंग करण्यात आलेली आहे.

2. सार्वजनिक बांधकाम जिल्हा दरसूची सन 2009-10 मधिल सर्वसाधारण सूचना क्र.04 नुसार विद्युत साहित्य वापरण्यापूर्वी ते गुणवत्तापूर्वक असल्याचे खात्री करणे आवश्यक आहे व तशी खात्री केल्याबाबतचे अभिलेखे जतन करणे आवश्यक आहे. तथापि असे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

3. जिल्हा दरसुचीतील सूचना क्र.05 नुसार Energy efficient & energy saving devices वापरणे आवश्यक आहे तथापि असे devices वापरल्या बाबतचे अभिलेखे संचिकेत आढळले नाहीत.

4. जिल्हा दरसुचीतील Standard & specification क्र.9 नुसार मोजमाप पुस्तिकेत कामाची मापे नोंदविल्यानंतर “The above work has been carried out as per specification” असे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाही.

5. जिल्हा दरसुचीतील Standard & specification क्र.4 नुसार ERDA,CPRT किंवा केंद्र/राज्याच्या Approved laboratory कडून साहित्य BIS नुसार वापरल्याची खात्री करणे आवश्यक असतांना अशी खात्री केलेली दिसून येत नाही.

5. सदर कामास दिलेल्या तांत्रिक मान्यतेवर क्रमांक व दिनांक नमूद नाही.

6. सदर कामात जुने 06 मीटर लांबीचे 41 पोल व Fluroscent फिटिंग काढून त्याजागी नवीन पोल व फिटिंग बसविल्या आहेत.तथापि जुने साहित्य मनपाच्या भांडारात जमा केल्याचे दिसून येत नाही.

7. सदर कामाचे मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.1440 पान क्र.156 ते 161 मध्ये नोंदविले आहेत तथापि सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

8. सदर विकास कामाचे निविदा प्रसिध्दी बाबतचे वृत्तपत्र तसेच ई निविदा अहवाल संचिकेत निदर्शनास आला नाही.त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी दिलेबाबत खात्री करता आली नाही.

9. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 164 नुसार देयकावर व मोजमाप पुस्तिकेत धनादेश क्रमांक व दिनांक व्दारे प्रदान केल्याची नोंद करणे आवश्यक आहे असे असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

112 मनपाचे सर्व जलशुध्दीकरण केंद्र व तरण तलाव, मलनिस:सारण केंद्र येथील पाणी निर्जंतुकीकरणासाठी क्लोरीन टनर्सचा पुरवठा करणे, या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 13

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 881536.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 881536.00/-

क्लोरीन टनर्सचा पुरवठा करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करारा बाबत खात्री केली नाही. निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी केली नाही. विभागास मंजूर निविदाधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा केल्याचे मागणी पत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. साठा नोंदवही अभावि, जमा साहित्य व वाटप साहित्य यांचा ताळमेळ व साहित्य वापराचा दैनंदिन लेख्याची पडताळणी करता आली नाही. मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणीपुरवठा (यांत्रिकी) विभागाकडील मनपा जलशुध्दीकरण केंद्र व तरण तलाव, मलनिस:सारण केंद्र येथील पाणी निर्जंतुकीकरणासाठी क्लोरीन टनर्सचा पुरवठा करणे या कामासाठी उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली.

अ) मनपा जलशुध्दीकरण केंद्र,जलतरण तलाव व मलनिस:सारण केंद्र येथील पाणी निर्जंतुकीकरणासाठी क्लोरीन टनर्सचा पुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे जाहिर निविदा काढून पुरवठा आदेश दिला आहे व सदर कामाबाबतचा इतर तपशिल खालील प्रमाणे आहे.

1	प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्रमांक 551 दि. 19.9.2013 रुपये 46,72,500/-
2	तांत्रिक मान्यता	अधिक्षक अभियंता (तांत्रिक) पा.पु. रक्कम रू.46,72,500/- क्रमांक व दिनांक नमूद नाही. दरसुची 2012-13 व बाजारभावानुसार
3	अंदाजपत्रकीय रक्कम	रू.46,72,500/-

4	लेखा शिर्ष	केमीकल खरेदी (संगणक कोड - 727)
5	निविदा / दरत्रक प्रकार	बी-1
6	जाहीरात प्रसिध्दी व निविदा कालावधी	प्रथम निविदा दै.सकाळ दि14/11/2013 कालावधी 20/11/2014 ते 30/11/2014 फेर निविदा दै.भ्रमर दि.04/01/2014, दै.दिव्यमराठी दि.04/01/2014, कालावधी दि 08/01/2014 ते 16/01/2014 मुदत दि.21/01/2014.
7	ई-निविदा	प्रथम निविदा सुचना क्र.12 सन 2013-14 फेर निविदा सुचना क्र.13 सन 2013-14
8	निविदा उघडयाची दिनांक	फेर निविदा दि.27/01/2014 प्राप्त निविदा 04
9	न्युनतम निविदा	1. मे. सदर्न केमिकल्स,अंबरनाथ 60 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 2 टक्के कमी दराने मंजुरी 2. मधुमेय उद्योग, मुंबई 40 टक्के पुरवठा निविदेतील अटी व शर्तीनुसार दोन पुरवठाधारकांची नियुक्ती करावयाची असल्याने मधुमेय उद्योग यांच्या 2 टक्के कमी या मंजूर दराने पुरवठा आदेश दिला आहे.
10	स्थायी समिती ठराव क्र.	841 दि.14/02/2014
11	कार्यारंभ आदेश क्रमांक व दि.	1) मे. सदर्न केमिकल्स,अंबरनाथ 60 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 2 टक्के कमी दराने मंजुरी, पुरवठा आदेश क्रमांक NMC/WSD/236/14, Dt. 28/02/2014 2) मधुमेय उद्योग, मुंबई 40 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 2 टक्के कमी दराने मंजुरी, पुरवठा आदेश क्रमांक NMC/WSD/237/14, Dt. 28/02/2014
12	कामाची मुदत	पुरवठा आदेश निर्गमित झालेपासून दि.28/02/2014 पासून वेळोवेळी मागणीनुसार दि.27/02/2015 पावेतो (1 वर्षा पावेतो) व जास्तीत जास्त पुढील 3 महिन्याच्या मुदवाढी पावेतो.
13	मुदतवाढ	दि.28/02/2015 ते 27/08/2015 पावेतो 50 टक्के मुदतवाढ विनादंड मंजुरी दि.02/10/2014 रोजी टिपणीव्दारे देण्यात आली आहे.
14	काम पूर्ण दिनांक	मे.मधुमेय उदयोग, मुंबई यांचे कामासंदर्भात दि.14/07/2015 रोजी काम पूर्ण झाल्याचा दाखला दि.12/08/2015 रोजी निर्गमित केला आहे.

15	मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक	3153 पृष्ठ.क्र. 22 ते 26, 27 ते 31, 44 ते 49 व 50 ते 54
16	देयकांचा तपशिल	पहिले धावते देयक र.रू.414642/- दुसरे धावते देयक र.रू.466894/- तीसरे धावते देयक र.रू.514595/- सदरचे देयक सन 2015-16 मध्ये अदा केले. चौथे व अंतिम देयक र.रू.432509/- वरील प्रमाणे

अ.क्र.	पुरवठादार	साहित्याचा तपशील	परिमाण	दर	रक्कम
1	मधुमेय उदयोग, मुंबई	900 केजी क्लोरीन टनर्स	27 एम.टन	14715 च्या 2% कमी 14420.70 अन्वये	389358.9
		100 केजी क्लोरीन टनर्स(सिलेंडर)	600 के.जी (6 नग)	4300 च्या 2% कमी 4214/- अन्वये	25284
			एकूण प्रदान रक्कम		414642
2	मधुमेय उद्योग मुंबई	900 केजी क्लोरीन टनर्स	31.5 एम.टी	14420.70	454252
		100 केजी क्लोरीन टनर्स(सिलेंडर)	300 केजी (3 नग)	4214/-	12642
			एकूण प्रदान रक्कम		466894
3	मधुमेय उद्योग मुंबई	900 केजी क्लोरीन टनर्स	35.1 एम.टी	14420.70	506166.57
		100 केजी क्लोरीन टनर्स(सिलेंडर)	200 केजी (2 नग)	4214/-	8428
			एकूण प्रदान		514595

			रक्कम		
4	मधुमेय उद्योग मुंबई	900 केजी क्लोरीन टनर्स	29.7 एम.टी.	14420.7	428294.79
		100 केजी क्लोरीन टनर्स(सिलेंडर)	100 केजी (1 नग)	4214/-	4214
			एकूण प्रदान रक्कम		432509
				एकूण	1828640

वरीलप्रमाणे मधुमेय उद्योग मुंबई या पुरवठाधारकास 1 ते 4 धावत्या देयकानुसार रक्कम रुपये 18,28,640 एवढी रक्कम अदा करण्यात आली असून सन 2014-2015 अखेर एकूण रककम रू. 881536/- अदा करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. साहित्याची खरेदी करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री केल्याचे दिसून येत नाही. तशी खात्री न करताच खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

2. निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त/मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत/वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली दिसून येत नाही.

3. मधुमेय उदयोग, मुंबई यांनी निविदा सादर करतांना निविदेसोबत इतर महानगरपालिकेस व संस्थेस क्लोरीन टर्नसचा पुरवठा केल्याबाबतचा तपशिल जोडला आहे. उदा.जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीन गॅसचा पुरवठा 900 कि.ग्रॅ. साठी रक्कम रू.7297/- या दराप्रमाणे, पुरवठा आदेश ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना पुरवठा केल्याबाबतचा कार्यादेश क्र.178 दि.28/10/2013 ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. सदरचा पुरवठा आदेशात नमूद दर (रु.7297/-) नाशिक महानगरपालिकेस पुरवठा केलेल्या दरापेक्षा (रु.14420.70) बराच कमी आहे. नाशिक महानगरपालिकेने मधुमेय उदयोग, मुंबई यांचे निविदा दर मंजुर करतांना सदर तफावत/बाब विचारात घेणे आवश्यक होते.

4. स्थायी समिती ठराव क्रमांक 841 दिनांक 14/02/2014 अन्वये निविदा अटी शर्तीनुसार 60:40 टक्के पुरवठा करणेकामी प्रथम मंजुर निविदाधारकास पुरवठा आदेश क्र. क्रमांक NMC/WSD/ 236/14, Dt. 28/02/2014 नुसार 1) मे. सदर्न केमिकल्स,अंबरनाथ 60 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 2 टक्के कमी दराने रक्कम रू.27,47,430/- व 2) व्दितीय मंजुर निविदाधारकास पुरवठा आदेश क्रमांक NMC/WSD/237/14, Dt. 28/02/2014 नुसार मधुमेय उद्योग, मुंबई 40 टक्के पुरवठा प्राकलनाच्या 2 टक्के कमी दराने रक्कम रू.18,31,620/- इतक्या रकमेचा करावयाचा आहे. सर्वसाधारण निविदा अटी शर्तीनुसार अट क्र.8 नुसार पुरवठा हा पुरवठा आदेश निर्गमित केल्यापासुन मागणीनुसार 1 वर्ष दि.27/02/2015 पावेतो अथवा जास्तीत जास्त पुढील 3 महिने मनपाच्या मागणी नुसार करावयाचा आहे. असे असतांना प्रथम मंजुर निविदा धारकाकडून 60 टक्के साहित्यांचा पुरवठा करणे आवश्यक असतांना व्दितीय मंजुर निविदाधारकाकडून (40 टक्के) प्रथम पुरवठयाची मागणी विहीत मुदतीत केली नाही. सदरची बाब अनियमित आहे.

5. कामाची मुदत दि.27/02/2015 पावेतोची असतांना दि.27/08/2015 पावेतो विनादंड 50 टक्के मुदतवाढ ही पुरवठादाराचा मुदतवाढीचा लेखी अर्ज न घेता दि.02/10/2014 रोजीच्या कार्यालयीन टिपणी नुसार अधिक्षक अभियंता यांनी दिलेली आहे.

6. दि.27/08/2015 पावेतो 50 टक्के विनादंड मुदतवाढ देऊन देखील मे.सदर्न केमिकल्स,अंबरनाथ 60 टक्के साहित्याचा पुरवठा केलेला नाही. तथापि, अंदाजपत्रक तयार करतांना वर्षभरासाठी 900 केजी क्लोरीन टर्नस 300 एम.टी. व 100 केजी लिक्वीड क्लोरीन सिलेंडर 60 नगाची आवश्यकता असतांना प्रत्यक्षात पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासुन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील फक्त 40 टक्केच पुरवठा झालेला आहे. म्हणजेच अंदाजपत्रक तयार करतांना अनावश्यक/वाढीव मागणी दर्शवून तयार केल्याचे दिसून येते.

8. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूचीमधील सर्वसाधारण सूचनेनुसार साहित्यावरील 3 टक्के जकात कंत्राटदाराने जकातीच्या पावती प्रत्यक्ष सादर केल्यानंतर अदा करावयाची आहे. त्यानुसार सदर नस्ती मधील पहिले धावते देयकातील साहित्य पुरवठा केलेल्या डिलेव्हरी चलनासोबत एकूण रक्कम रू.12439/- इतका स्था.सं.कराची रक्कम जमा केल्याच्या पावत्या नस्तीसोबत जोडण्यात आलेल्या आहेत. परंतु दुसरे धावते ते चौथे धावते व अंतिम देयकांची एकूण रक्कम रू.14,13,998/- इतक्या रकमेचा पुरवठा केलेल्या साहित्यांच्या चलनांसोबत स्था.सं.कर जमा केल्याच्या पावत्या आढळून आल्या नाहीत. स्था.सं.कर भरल्या बाबतची पावती लेखापरीक्षणास दर्शवावी अन्यथा 3 टक्के स्था.सं.कराची रक्कम रू.42420 संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

9 .मे.मधुमेय उदयोग,मुंबई यांची टॅक्सा इन्हॉइस क्र.एम.व्ही.134/15-16 दि.24/07/2015 नुसार एकूण रक्कम रू.501615.94 इतक्या रकमेचे असून त्यामध्ये नमूद चलन क्र.MV-133 व 134 नुसार 900 केजी क्लोरीन टर्नस प्रती 1.8 MT प्रमाणे रू.14420.7 नुसार एकूण 3.6 MT ची एकूण रक्कम रू.51,914.52 चा समावेश आहे. परंतु सदरचे चलने नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

10. विभागास मंजूर निविदाधारकाने (मे.मधुमेय उदयोग)वेळोवेळी व आवश्यकतेनुसार परिमाणासह केलेला पुरवठा कोणत्या पत्रानुसार केला, विभागाचे मागणीपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही. त्यामुळे कार्यादेशात नमुद केलेला एकूण परीमाणाची प्रत्यक्ष पुरवठा झालेल्या परीमाणाचा ताळमेळ घेता आला नाही.

11. साहित्य खरेदी देयकाचा प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम इ. तपशील देण्यात आलेला नाही.

12. साहित्याच्या जमा नोंदी धावते देयक 1 ते 3 नुसार पुरवठा झालेल्या साहित्यांची नोंद स्टॉक रजिस्टरवर घेण्यात आल्याबाबतचा शेरा डिलेव्हरी चलनांवर घेण्यात आला आहे. तसेच 4 थे धावते व अंतिम देयकानुसार पुरवठा झालेल्या साहित्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेतल्या बाबतचा डिलेव्हरी चलनांमध्ये शेरा नमूद केलेला नाही. तसेच साठानोंदवही लेखा परीक्षणास उपलबध केले नसल्याने साहित्य वापराचा दैनंदिन लेख्याची पडताळणी करता आली नाही.

13. मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केले नाही.

113 यांत्रिकी विभागाकडील लेखापरीक्षणात आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 9

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3915311.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3915311.00/-

कामांमधील कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व तारीख नमूद केलेली नाही. सन 2012-2013 व सन 2011-2012 ची दरसुची अभावि अंदाजपत्रकातील व प्रत्यक्ष केलेल्या कामावरील साहित्यांचे दराची पडताळणी करता नाही. साहित्याचा चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. मोजमाप पुस्तिका अभावि मोजमाप पुस्तकातील नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्केवारीची तपासणी इ. बाबत पडताळणी करता आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणीपुरवठा यांत्रिकी विभागाकडील देखभाल दुरूस्ती व इतर कामांवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्यावरून खालील विवरणपत्रानुसार एकूण रक्कम रू. 3915311/- इतका खर्च केला आहे.

अ. क्र.	कामाचा तपशिल	प्रशासकीय मंजूरी	मंजूर निविदा व मंजुर दर आयुक्त यांचे मंजूरी आदेश व कार्यादेश क्र.व दिनांक	प्रदान केलेली रक्कम रुपये	लेखाशिर्ष	शेरा
1	पंचवटी जलशुध्दीकरण केंद्र ए.पी.एफ.सी. पॅनल स्टार्टर इतर पॅनल व ॲक्युएटरसाठी स्पेअर पार्टस पुरविणे व विदयुत विषयक कामे करणे	आयुक्त आदेश क्रं.1043 दि.22/10/2013 रु.1000000/-	श्री. इंजिनियर्स, नाशिक, नाशिक अंदाजपत्रकीय दराच्या 0.74 टक्के कमी दराने रक्कम रु.992600/- चालू दरसूची सन 2012-13 नुसार 0.74% कमी दराने, मनपा/पापुवि/यांत्रिकी/293/2014 दिनांक 25/02/2014	991855	मशिनरी व पंपाची कार्यक्षमता वाढविणे	मापन पुस्तक क्रमांक 2538 (पा.क्र 78 ते 85 व 94 ते 101)

	बाबत.					
2	चेहडी पंपींग स्टेशन येथील ऑईल लुब्रिकेटेड व्हर्टिकल टर्बाइन पंप दुरूस्ती बाबत.	आयुक्त आदेश क्रं.529 दि.16/07/2013 रु.500000/-	मे.महाजन ब्रदर्स, नाशिक वाटाघाटी अंती 5 टक्के जादा दराने रक्कम रु.525000/- चालू दरसूची बाजारभावा नुसार परंतु मान्यता 5 लक्षच्या मर्यादेला, कार्यकारी अभियंता मनपा/पापुवि/यांत्रिकी/177/2013 दिनांक 13/12/2013	500000	मशिनरी व पंपाची कार्यक्षमता वाढविणे	मापन पुस्तक क्रमांक 531 (पा.क्र 141 ते 146 व 157 ते 163)
3	चेहडी बॅरेज येथील धरण व्दाराचे नियमित देखभाल व आवश्यक दूरूस्ती कामा बाबत.	आयुक्त आदेश क्रं.1351 दि.26/12/2013 रु.2482189/-	मे.तुळजाई एन्टरप्राईजेस, नाशिक 2.3 टक्के कमी दराने रक्कम रु.2425098/-, कार्यकारी अभियंता मनपा/पापुवि/यांत्रिकी/14/2014 दिनांक 21/07/2014	2423456	मशिनरी व पंपाची कार्यक्षमता वाढविणे	मापन पुस्तक क्रमांक 2216 (पा.क्र 156 ते 171)
			एकूण	3915311		

उपरोक्त विवरणपत्रात नमुद केलेल्या रक्कम रू. 3915311/- च्या खर्चा बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त तक्त्या मधील सर्व कामांमधील कामाची तांत्रिक मान्यता देतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करतांना क्रमांक व तारीख नमूद केलेली नाही.

2. उपरोक्त तक्त्या मधील अ.क्र. 1 व 3 मधील कामावरील साहित्यांचे दर अनुक्रमे दरसुची 2012-2013 व दरसुची 2011-12 नुसार करून त्यानुसार अंदाजपत्रक तयार केलेले आहे. परंतु सन 2012-2013 व सन 2011-2012 ची दरसुची लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नसल्याने अंदाजपत्रकातील व प्रत्यक्ष केलेल्या कामावरील साहित्यांचे दर दरसुचीविना बरोबर असल्याची पडतळणी करता नाही.

3. तक्त्या मधील अ.क्र. नं.3 मधील कामाची निविदा स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास प्राप्त 3 निविदा दिनांक 21/05/2014 रोजी उघडल्या होत्या व कामाचे आदेश दिनांक 21/07/2014 रोजी देण्यात आले होते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 36 नुसार निविदा उघडल्याच्या दिनांका पासून एक आठवड्यात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक आहे. तथापि सदर प्रकरणी अशी कार्यवाही विलंबाने करण्यात आलेली असल्याने सदरनियमाचे पालन झालेले नाही.

4. तत्क्यामधील अ.क्र. 3 मधील कामावरील वापरण्यात आलेल्या साहित्यांच्या Tax Invoice मुद्रांकीत नसून त्यावर

सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र व साहित्यांची नोंद साठा नोंदवहीत घेतल्याबाबत नोंद केलेली नाही.

5. उपरोक्त तक्त्या मधील सर्व कामांमधील कामांसाठी वापरण्यात आलेले साहित्याचा चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

6. तक्त्या मधील अ.क्र.1 ते 3 मधील कामावरील जुने साहित्य बदलल्यानंतर ते परत भांडार विभागात जमा केल्या बाबतची नोंद नस्ती मध्ये आढळून आलेली नाही. उदा. उपरोक्त तक्त्या मधील अ.क्र. 1 मधील कामावरील विविध पॅनल, स्टॉर्टर, अक्युएटर वेळोवेळी सर्व्हीसींग करतांना त्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट बदलेले जातात. त्यावेळी बदललेले जूने स्पेअर पार्ट भांडारात जमा केल्याबाबतची नोंद नस्ती मध्ये आढळून न आल्यामुळे जुने वापरलेल्या साहित्यांची विल्हेवाट कशी लावली याची शहानिशा करता आली नाही.

7. तक्त्या मधील अ.क्र. 1 मधील अंदाजपत्रकानुसार बाबवार कामे न करता इतर बाबींवर वाढीव कामे केलेली असून अंदाजपत्रकातील एकूण बाब क्र. 1 ते 120 पैकी बाब क्र.8,50 ते 53, 55,56,59, 60 ते 64, 68,70,71अ, 73,74,81-अ,83,84,117 व 119 इत्यादी बाबींकरीताच कामे करण्यात आलेली आहेत. अंदाजपत्रकानुसार कामे न केल्यामुळे अनावश्यक बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याचे दिसून येते.

8. तक्त्या मधील अ.क्र. 2 मधील अंदाजपत्रकानुसार Part "A" - Repairing to 60 H.P.V.T. Pump च्या कामाचे 1 ते 11 बाबवार कामे व Part "B"(a) Repairing of 175 HP/215 HP VT Pump मधील 1 ते 15 बाबींचे बाबवार कामे तसेच Part "B" (b)- Repairing HPVT Pump मधील बाब क्र. 1 ते 15 प्रमाणे बाबवार कामे नमूद केलेली आहेत.

परंतु प्रत्यक्ष कामे करतांना सदरचे काम अंदाजपत्रकानुसार नमूद बाबींच्या नगावार कामे न करता Part A व B (b) मधील कामांकरीता वाढीव नग वापरून कामे केलेली आहेत. तसेच Part "B" (b)- Repairing HPVT Pump मधील बाब क्र. 1 ते 15 बाबीचे एकूण रक्कम रू.77545 कामे केलेली नाही. म्हणजेच अंदाजपत्रकात अनावश्यक बाबींचा समावेश केल्याचे दिसून येते.

9. उपरोक्त तक्त्यामधील सर्व कामांची नोंद शेरा रकान्यात नमूद केलेल्या मोजमाप पुस्तकांवर नोंदविल्याचे नमूद आहे. तथापि मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे त्यामधील नोंदविलेली मापे उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी केलेली विहित टक्के तपासणी इ. बाबत पडताळणी करता आलेली नाही.

114 पाणी लेखापरीक्षण / उर्जा लेखापरीक्षण केले नसलेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेने सन 2014-2015 मधील अंदाजपत्रकात रू.30 लाख इतकी तरतुद केली असतांना पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम इत्यादी केले नसल्याचे दिसून येते.

राज्यातील नागरी पाणी पुरवठा योजनेतील हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी करणे तसेच पाणी पुरवठा योजनेतील उपांगे कार्यक्रम कार्यक्षम करून वीजेचा खर्च कमी करण्यासाठी पाणी पुरवठा योजनेचे पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन हा कार्यक्रम राबविणे नागरी संस्थांना शासन निर्णय पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्र.नापापु-2008 /प्र.क्र. 98/पापु 22 दिनांक 02/08/2008 नुसार बंधनकारक केले आहे.

या कार्यक्रमामुळे पाणी पुरवठा योजनांमधील हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी होवुन काही कालावधीसाठी नवीन / वाढीव योजनेची गरज पुढे ढकलता येते. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांचे पाणी लेखा परीक्षण, उर्जा लेखा परीक्षण व पुनर्वसन करून पाण्याची गळती कमी करणे, उर्जा उपांगे कार्यक्षम करणे इत्यादी असून त्यामुळे वीजेचा खर्च कमी करून शासनाच्या नवीन योजनांच्या अनुदानावरील भुर्दड कमी होईल.

नाशिक महानगरपालिकेने सन 2013-2014 मधील मूळ अंदाजपत्रकात वाटर ऑडीट साठी रू 305 लाख तर सुधारित अंदाजपत्रकात रू.30 लाख तरतुद यासाठी केलेली होती. तथापि यासाठी केलेला खर्च निरंक असुन लेखापरीक्षण केले नसल्याचे दिसून येते. महानगरपालिकेने वरील प्रमाणे लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम पूर्ण केला नाही तर, नवीन/वाढीव नागरी पाणी पुरवठा योजनेसाठी अनुदान मिळणार नाही. तरी महानगरपालिकेने अस्तित्वातील पाणी पूरवठा योजनेचे पाणी लेखा परीक्षण, उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम राबविण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 139, Hmm No : 183)

115 माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी केलेल्या खर्चावरील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 686766.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 186766.00/-

वार्षिक सभा/सभारंभ प्रित्यर्थ मनपा मार्फत 5,00,000/- एवढा खर्च करणे आवश्यक असताना माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी रक्कम रूपये 2,11,396/- खर्च केला आहे व नगर सचिव विभागाने याच प्रयोजनासाठी आकस्मिक खर्चातून रक्कम रूपये 4,75,370/- खर्च केला आहे यामुळे सभा/सभरंभाकरिता रक्कम रू1,86,766/- एवढा जादा खर्च केलेला आहे. निविदा प्रकीया राबवून एखादया मक्तेदारास पुरवठा करण्याबाबत मक्ता दिल्यास त्याच मक्तेदाराकडून खरेदी करणे आवश्यक असताना इतर पुरवठादाराकडून खरेदी केलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे माहिती व जनसंपर्क विभागातील सभा/सभारंभ खर्चाच्या नस्तीच्या निवडक प्रकरणांचे लेखापरिक्षण केले असता माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/ सभांरभासाठी रक्कम रूपये 2,11,396/- एवढी रक्कम सभा/सभारंभासाठी विविध बाबींसाठी खर्च केली आहे.

अ.क्र.	मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक व दिनांक	खर्चाची बाब	रक्कम
1	आदेश क्रमांक 03 दिनांक 15/7/2014	दसरा, दिवाळी विविध जयंती निमित्त पुषहार, गुलाब पाकळया व फुलांची सजावट	13600
2	आदेश क्रमांक 07 दिनांक 15/7/2014	विविध शिष्टमंडळाचे पदाधिकारी यांच्या स्वागतासाठी बुके मे.पष्पमिलन	24750
3	आदेश क्रमांक 0 दिनांक 15/7/2014	मनपा छायाचित्रीककरण, व्हिडीओ शुटींग	14560
4	आदेश क्रमांक 04 दिनांक 15/7/2014	पुण्यतिथी, मनपाचे विविध कार्यक्रमाप्रसंगी फोटो काढणे व व्हिडीओशुटींग	15154
5	आदेश क्रमांक 06 दिनांक 15/7/2014	पुण्यतिथी, मनपाचे विविध कार्यक्रमाप्रसंगी फोटो काढणे व व्हिडीओशुटींग	21092
6	आदेश क्रमांक 16 दिनांक 28/11/2014	फेच नागरीक यांचा सत्कार चहापान, नास्ता बुके इतर	6218
7	आदेश क्रमांक 15 दिनांक 28/11/2014	सौ.कोकरे यांच्या शौयाबद्दल सत्कार	3465
8	आदेश क्रमांक 17 दिनांक 29/11/2014	15 ऑगस्ट 2014 रोजी ध्वजारोहना निमित्त शहनाई वादन	3500
9	आदेश क्रमांक 18	नुतन स्थायी समिती सदस्यांची निवड	1926

	दिनांक 2/12/2014	झाल्याने बुके व फोटोचा खर्च	
10	आदेश क्रमांक 19 दिनांक 2/12/2014	शासनादवारे जाहिर शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सत्कार	4730
11	आदेश क्रमांक 33 दिनांक 17/3/2015	प.पु.श्री.श्री.रविशंकरजी यांच्या सत्कारांसाठी देण्यात आलेल्या स्मृतीचिन्ह तयार करण्यासाठी खर्च	10283
12	आदेश क्रमांक 26 दिनांक 17/3/2015	विविध कार्यक्रमासाठी व्हिडीओ शुटींग	20131
13	आदेश क्रमांक 38 दिनांक 30/3/2015	हार, शाल, बुके व्हिडीओ शुटींग	12500
14	आदेश क्रमांक 27 दिनांक 17/3/2015	प.पु.श्री.श्री.रविशंकरजी यांच्या सत्कारासाठी शाल, बुके श्रीफळ व स्मृतचिन्ह	24627
15	आदेश क्रमांक 24 दिनांक 24/2/2015	मनपा चंदिगड अधिकारी यांची दिनांक 10/6/14 रोजी भेट पुषगुच्छ, शाल, नास्ता	8160
18	आदेश क्रमांक 10 दिनांक 20/8/2014	1 मे 2014 रोजी निमित्त शहनाई वादन	5000
19	आदेश क्रमांक 11 दिनांक 26/8/2014	विविध शिष्टमंडळाचे पदाधिकारी यांच्या स्वागतासाठी बुके मे.पष्पमिलन	11000
21	आदेश क्रमांक 21 दिनांक 13/1/2015	विविध जयंती निमित्त हार, फुले व गुलाब पाकळया खरेदी शंकर फुल भंडार	10700
		एकूण	211396

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात आहेत.

1) शासन अधिसुचना क्र.1007/प्र.क्र.376/नवि-26, दिनांक 22/02/2008 नुसार व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 66(41) अन्वये महानगरपालिकेतर्फे करण्यात येणा-या वार्षिक समारंभप्रित्यर्थ खर्चाची वार्षिक रक्कम रू. 5,00,000/- इतकी करण्यात आली आहे. परंतू माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी रक्कम रूपये 2,11,396/- खर्च केला आहे व नगरसचिव विभागाने याच प्रयोजनाकरीता आकस्मिक खर्चातून रक्कम रूपये 4,75,370/- खर्च केला आहे, असा नाशिक महानगरपालिकेने सन 2014-2015 या कालावधीत एकूण रक्कम रू.6,86,766/- एवढा खर्च केला आहे. नाशिक महानगरपालिकेने सदर शासन अधिसूचनेची अंमलबजावणी न केल्यामुळे सभा/सभरंभाकरिता रक्कम रू.1,86,766/- एवढा जादा खर्च

केलेला आहे.

2) अ.क्र.2 मध्ये नमूद खर्च कार्यक्रमासाठी शाल, फुले, नारळ, तोरण, सनई वादक, तुतारी वादक, रांगोळी, इत्यादी वस्तु खरेदीसाठी असून ई कोटेशन दवारे मक्तेदार सेलेब्रेशन इव्हेन्टस (श्री अमर वझरे) यांना आदेश क्रमांक 54 दिनांक 30/5/2014 नुसार मक्ता दिला होता. परंतू आदेशात आवश्यक त्या वस्तु या सेलेब्रेशन इव्हेन्टस (श्री अमर वझरे) यांच्या कडून न खरेदी करता पुष्पामिलन नाशिक यांच्याकडून खरेदी केलेल्या आहेत. सदरबाब नियमाधीन नाही. सदरची खरेदी ही सेलेब्रेशन इव्हेन्टस (श्री अमर वझरे) यांच्याकडूनच करून घेणे आवश्यक आहे. एखादया मक्तेदारास पुरवठा करण्याचा मक्ता दिला असल्यास त्यांनी नकार दिला तरच इतर पुरवठा दाराकडून सदर खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू सेलेब्रेशन इव्हेन्टस (श्री अमर वझरे) यांनी नकार दिल्याबाबतचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

3) अ.क्र. 5 मध्ये नमूद खर्च विविध कार्यक्रमासाठी छायाचित्रे व व्हिडीओ चित्रीकरण करणेसाठी वस्तुंसाठी ई कोटेशन मक्तेदार श्री.स्नेह ॲडस (श्री समीर रहाणे) यांना आदेश क्रमांक 58 दिनांक 30/5/2014 नुसार मक्ता दिला होता, पंरतू सदरचे काम हे श्री.स्नेह ॲडस (श्री समीर रहाणे) यांच्या कडून न करता श्री.शैलेंद्र पी. साळी यांच्याकडून करून घेतले आहे. सदरचे काम हे श्री.स्नेह ॲडस (श्री समीर रहाणे) यांच्याकडूनच करून घेणे आवश्यक आहे. एखादया मक्तेदारास पुरवठा करण्याचा मक्ता दिला असल्यास त्यांनी नकार दिला तरच इतर पुरवठा दाराकडून सदर खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू सेलेब्रेशन इव्हेन्टस (श्री अमर वझरे) यांनी नकार दिल्याबाबतचे पत्र नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 17, Hmm No : 123)

116 अग्निशमन दलासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 43519115.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 43519115.00/-

सर्व कामासाठी तांत्रिक मान्यता घेतल्याचे आढळून आला नाही. केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री न करता खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही. निविदा प्रक्रियेव्दारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली नाही. साहित्याचे शासनमान्य तृतीय पक्षीय तपासणी अहवाल घेतलेला नसल्याने

सदरचे साहित्य योग्य व दर्जेदार असल्याचे प्रमाणित होत नाही. विभागामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात अग्निशमन विभागा करीता अग्निशमन दलासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबत या उपलब्ध करण्यात आलेल्या अभिलेख्यांच्या कामांची पडताळणी केली असता सदर कामांवर रक्कम रू. 4,35,19,115/- इतका खर्च केला आहे. सदरचा खर्च अग्निशामक दल यंत्रे व साहित्य खरेदी या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	अग्निशमन विभागा रिमोट ऑपरेटेड पोर्टेबल ऑस्कीलेटींग मॉनिटर एकूण 6 नग खरेदी करणे रु.60,00,000/-	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.6000000/-) अग्निशामक दल यंत्रे व साहित्य खरेदी	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/472/2014 दि.26/08/2014.	मे.फायरटेक्स प्रोटेकटिव्ह टेक्नोलॉजिस प्रा.लि. यांची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक 110 दि.31/07/2011 33.18 टक्के जादा दराची रू.79,90,740/- होती. वाटाघाटाअंती 5 टक्के जास्तदराची रू.63,00,000/- रकमेची स्विकृत	6300000
2	अग्निशमन दलास कुलिंग	महासभा ठराव क्र.177	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/354/2014	मे.श्री.दिपक एक्सपोर्ट, मुंबई	24333755

	वेस्ट एकूण 125 नग या साहित्याची खरेदी करणे.	दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.33,75,000/-)		दि.08/07/2014	यांची निविदा स्थायी समिती ठराव क्रमांक 41 दि.21/05/2014 प्राकलनाच्या दरापेक्षा 24.85 टक्के कमी दराने रू.25,36,375/- वाटाघाटाअंती 27.90 टक्के कमी दराची रू.24,33,375/- रकमेची स्विकृत	
3	अग्निशमन दलास ब्रिदींग ॲपरेटस सिलेंडर्स रिफलिंग काँप्रेसर एकूण 2 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.12,08,104/-)	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/452/2014 दि.16/08/2014.	मे.ज्योटेक इंजिनिअरींग ॲण्ड मार्केटिंग कन्सलटंस गौतम बुध्द नगर, उत्तर प्रदेश यांची निविदा आयुकत आदेश क्रमांक 365 दि.23/07/2014 वाटाघाटाअंती 19.5 टक्के कमी दरानेच रू.9,77,985/- रकमेची स्विकृत	977985
4	अग्निशमन दलासाठी फायर प्रोक्सिमिटी सुटस् एकूण 125 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/471/2014 दि.26/08/2014.	मे.फायरटेक्स प्रोटेकटिव्ह टेक्नॉलॉजिस प्रा.लि.मुंबई यांची निविदा स्थायी समिती ठराव क्र. 202 दि.20/08/2014	11907375

		रू.1,13,75,000/-)			प्राकलनाच्या 9.48 टक्के जादा दराने रू.12453730/- दराची वाटाघाटाअंती 4.68 टक्के जादा दराने रू.1,19,07,375/- रकमेची स्विकृत.	
					एकूण	43519115

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु. 4,35,19,115/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त तक्त्यातील सर्व कामासाठी तांत्रिक मान्यता घेतल्याचा तपशिल नस्ती मध्ये आढळून आला नाही.

2. उपरोक्त तत्क्यातील सर्व उपरोक्त साहित्य खरेदी करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री केल्याचे आढळून येत नाही. दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री न करता खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

3. उपरोक्त तक्त्यातील सर्व कामां करीता निविदा प्रक्रियेव्दारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली नाही.

4. तक्त्यातील अ.क्र. 1,3,4 मधील कामाच्या नस्ती मध्ये जोडण्यात आलेल्या मुख्य लेखा परीक्षक यांचे पत्र क्र.668 दि.11/03/2015 अन्वये साहित्य पुरवठा करणे मुदत अनुक्रमे दि.26/08/2014, दि.16/08/2014, दि.09/11/2014 पासून 60 दिवसापर्यंत होती. साहित्याचा पुरवठा उशिरा झाला असल्याने दंड कपात केला आहे. परंतु दंड कपाती मा.आयुक्त यांचे आदेश क्र. 673 दि.02/02/2015 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. आयुक्तांचे पत्र नस्ती सोबत जोडण्यात आलेले नसल्याने सदर दंड कपात बरोबर झाल्याच्या कार्यवाही बाबत पडताळणी करता आली नाही.

5. तक्त्यातील अ.क्र. 1 मधील कामाचे सदर साहित्य खरेदी करण्यापूर्वी सदर यंत्रणा हाताळण्याबाबत प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग असल्याची अथवा त्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले असल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्ती मध्ये नसल्याने सदरची यंत्रणेचा वापर योग्यरीत्या केला जातो किंवा कसे. याबाबतची पडताळणी करता आली नाही.

6. तक्त्यातील अ.क्र. 1 मधील कामाचे साहित्याचे तृतीय पक्षीय तपासणी अहवाल शासन मान्य संस्थेचा नसुन अहमदाबाद महानगरपालिकेतील मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून प्राप्त केलेला आहे.

7. तक्त्यातील अ.क्र. 1 व 2 मधील कामाचे निविदा अटी शर्तीनुसार साहित्याची गॅरंटी/वॉरंटी 3 वर्षाची असल्याचे नमूद आहे. परंतु गॅरंटी/वॉरंटीचे प्रमाणपत्र नस्ती साबत आढळून आले नाही.

8. तक्त्यातील अ.क्र. 1 मधील कामाचे पुरवठादारास रक्कम प्रदान करतांना नस्ती मधील दि.05/02/2015 रोजीच्या कार्यालयीन टिपणीत नमूद केल्या प्रमाणे देयकाची एकूण रक्कम रू.63,00,000/- मधून 3 टक्के स्था.सं.कराची रक्कम रू.1,89,000/-, 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम रू.3,15,000/- व दंडाची रक्कम रू.2,33,100/- कपाती बाबत अभिप्राय नमुद केला आहे. परंतु प्राप्ती कराची 2 टक्के रक्कम रू.1,26,000/- कपात केल्याचा अभिप्राय नसल्याने व नस्ती सोबत देयकाची प्रत जोडण्यात आलेली नसल्याने प्राप्ती कर कपात केल्या बाबत पडताळणी करता आली नाही. विभागाने याबाबत योग्य ती पडताळणी करून प्राप्ती कर कपात केला नसल्यास रक्कम रू.1,26,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

9. तक्त्या मधील अ.क्र. 2 व 3 मधील कामासाठी न्यूनतम मक्तेदार यांची अनुक्रमे अंदाजपत्रकीय दराच्या अनुक्रमे 27.90 टक्के कमी, 19.05 टक्के कमी दराची निविदा स्विकारण्यात आली तथापि 10% पेक्षा कमी दराची निविदा स्विकृत करताना निविदादाराकडून दरपृथ:करण प्राप्त करून त्याबाबत तांत्रिक अधिकारी यांनी समर्थन नमूद करणे आवश्यक असतांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मुद्दा 187 (ए) टीप 6 नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी/जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

10. तक्ता अ.क्र. 4 मधील कामामध्ये मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट कामाचा करारनामा रू.10 लाखा पर्यंतसाठी रू.100/- चे मुद्रांकावर व 10 लाखाचे वर असेल तर रू.100/- अधिक 10 लाखाचे पुढील प्रत्येक लाखासाठी रू.100/- अधिकत्तम रू.5 लक्ष च्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.फायरटेक्स प्रोटेकटिव्ह टेक्नॉलॉजिस प्रा.लि.मुंबई यांचे कडून रु.11,900/- इतक्या रकमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रू.11,100/- च्या मुद्रांकावर केल्याने रू.800/- चा कमी मुद्रांक शुल्क वसुल करून "0030" मुद्रांक व नोंदणी या शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

11. तक्त्यातील अ.क्र.2 मधील पुरवठादारास रक्कम प्रदान करतांना नस्ती जोडण्यात आलेले देयकांनुसार प्रमाणक क्रमांक 6592 दि.31/12/2014 नुसार करंट बीलाची रक्कम रू.10,00,000/- त्यामधून सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा जाता एकूण रक्कम रू.8,56,999/- इतकी रक्कम धनादेश क्र.366510 दि.31/12/2014 नुसार (धनादेशाची छायांकित प्रत जोडण्यात आली आहे.) प्रदान केले असून पुरवठादाराची देयकाच्या प्रती मुद्रांकित पोच घेण्यात आली आहे. तथापि, नस्ती मध्ये जोडण्यात आलेले प्रमाणक क्रमांक 7517 दि.20/02/2015 नुसार देयकाची रक्कम रू.24,33,375/- त्यामधुन सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा करून निव्वळ रक्कम रू.21,90,037/- पुरवठादारास प्रदान केले आहेत. सदरचे देयक तयार करतांना करंट बीलाची रक्कम (प्रमाणक क्रमांक 6592 दि.31/12/2014 नुसार अदा झालेली रक्कम रू.856999/-) वजा केलेली नसल्याने पुरवठादारास दुबार रक्कम प्रदान झालेले दिसत आहे. तरी याबाबत विभागाने योग्य ती पडताळणी करून पुरवठादारास जादा प्रदान झालेले असल्यास सदरची रक्कम रू.8,56,999/- वसुल होणे आवश्यक आहे.

12. उपरोक्त सर्व कामांच्या बाबतीत साहित्याचे शासनमान्य तृतीय पक्षीय तपासणी अहवाल घेतलेला नसल्याने सदरचे साहित्य योग्य व दर्जेदार असल्याचे प्रमाणित होत नाही.

13. उपरोक्त सर्व कामांच्या बाबतील साहित्य हे भारताबाहेरील असल्याने व कामाचे आदेशातील अटी प्रमाणे कस्टम डयुटी क्लिअरन्स सर्टिफिकेट मुळ प्रतीत आढळून आले नाही.

14. .उपरोक्त तक्त्याल सर्व कामांच्या प्राप्त साहित्यांची नोंद मनपा अग्निशामक दल माल नोंदणी बुका मध्ये घेण्यात आल्याचा शेरा कार्यालयीन टिपणीव्दारे नमूद आहे. परंतु सदरची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध नसल्याने सदर

नोंदीची पडताळणी करता आलेली नाही.

15. माल नोंदणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्यामुळे प्राप्त झालेले व मागील शिल्लक साहित्य तसेच जमा केलेला पुरवठा व वाटप यांचा ताळमेळ बाबत पडताळणी करता आलेली नाही.

16. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन अग्निशमन विभागातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

17. अग्निशमन विभागामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल तसेच निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

117 अग्निशमन दलासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 15

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 9401905.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9401905.00/-

सर्व कामासाठी तांत्रिक मान्यता घेतल्याचे आढळून आला नाही. केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री न करता खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही. निविदा प्रक्रियेव्दारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली नाही. साहित्याचे शासनमान्य तृतीय पक्षीय तपासणी अहवाल घेतलेला नसल्याने सदरचे साहित्य योग्य व दर्जेदार असल्याचे प्रमाणित होत नाही. विभागामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात अग्निशमन विभागा करीता अग्निशमन

दलासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबत या उपलब्ध करण्यात आलेल्या अभिलेख्यांच्या कामांची पडताळणी केली असता सदर कामांवर रक्कम रू. 94,01,905/- इतका खर्च केला आहे. सदरचा खर्च अग्निशामक दल यंत्रे व साहित्य खरेदी या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. 1

अ.क्र.	कामाचे नांव व अंदाजपत्रकीय रक्कम रू.	प्रशासकीय मान्यता व लेखा शिर्ष	तांत्रिक मान्यता	कार्यादेश क्रमांक व दिनांक	मक्तेदाराचे नांव व निविदा स्वीकृत आदेश क्रमांक व दिनांक, स्विकृत निविदा दर	कामावर झालेला एकूण खर्च रक्कम रू.
1	अग्निशमन दलासाठी पेट्रोल ड्रिव्हन डायमंड चेन सॉ मशिन एकूण 5 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.35,71,425/-)	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/3571/2014 दि.08/07/2014.	मे.इंटेग्रल सेफ्टी इंजिनिअर्स, मुंबई यांची निविदा आयुकत आदेश क्र.37 दि.21/05/2014 प्राकलनाच्या 47.06 टक्के कमी दराने रू.18,90,535/- रकमेची स्विकृत	1890565
2	अग्निशमन दलासाठी दैनंदिन वापराकरीता ॲल्युमिनाइस्ड फायर एन्ट्री सुटस एकूण 12 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.47,76,000/-)	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/466/2014 दि.25/08/2014.	मे.दिपक एक्सपोर्ट, मुंबई यांची निविदा स्थायी समिती ठराव क्र. 108 दि.31/07/2014 प्राकलनाच्या 12.286 टक्के कमी दराने रू.41,89,200/- दराची वाटाघाटाअंती 17.315 टक्के कमी दराने	3949020

					रू.39,49,020/- रकमेची स्विकृत	
3	अग्निशमन दलासाठी दैनंदिन वापराकरीता फ्लोटींग पम्प एकूण 5 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.13,20,000/-)	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/356/2014 दि.08/07/2014.	मे.फायरटेक्स प्रोटेकटिव्ह टेक्नोलॉजिस प्रा.लि.भांडुप (पूर्व) मुंबई. यांची निविदा आयुक्त आदेश क्र. 40 दि.21/05/2014 प्राकलनाच्या 21.7 टक्के जास्त दराने रू.16,06,800/- दराची वाटाघाटाअंती 18.18 टक्के जास्त दरानेच रू.15,60,000/- रकमेची स्विकृत	1560000
4	अग्निशमन दलासाठी दैनंदिन वापराकरीता हाय एक्सपैंशन फोम जनरेटर एकूण 6 नग या साहित्याची खरेदी करणे.	महासभा ठराव क्र.177 दि.15/06/2013 रु.20.00 कोटी तरतुद केली आहे. (सदर उपकरणाकरीता रू.20,00,000/-)	निरंक	अशा/वशि/कक्ष-1/358/2014 दि.08/07/2014.	मे. सेफ्टी अण्ड फायर इंजिनिअर्स, डोंबिवली मे.सेफ्टी अण्ड फायर इंजिनिअर्स, डोंबिवली.यांची निविदा आयुक्त आदेश क्र. 38 दि.21/05/2014 प्राकलनाच्या 0.116 टक्के जास्त दराने रू.20,02,320/- रकमेची स्विकृत	2002320
					एकूण रक्कम रू.	9401905

उपरोक्त कामांचे लेखापरीक्षणा साठी उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर कामांवर झालेला खर्च रक्कम रु.94,01,905/- बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. उपरोक्त तक्त्यातील सर्व कामासाठी तांत्रिक मान्यता घेतल्याचा तपशिल नस्ती मध्ये आढळून आला नाही.

2. उपरोक्त तत्क्यातील सर्व उपरोक्त साहित्य खरेदी करण्यापूर्वी केंद्र/राज्य शासनाचा दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री केल्याचे आढळून येत नाही. दर करार अस्तित्वात असल्याबाबत खात्री न करता खुल्या बाजारातून निविदा मागवून खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भाखंस-1088/ 2522/उद्योग-6 दिनांक 2.1.1992 मधील तरतूदींचे पालन झालेले नाही.

3. उपरोक्त तक्त्यातील सर्व कामां करीता निविदा प्रक्रियेव्दारे मंजूर केलेले दर हे बाजारभावाशी सुसंगत व वाजवी असल्याची पडताळणी विभागाने केलेली नाही.

4. तक्त्यातील अ.क्र. 2 मधील कामाच्या नस्ती मध्ये जोडण्यात आलेल्या मुख्य लेखापरीक्षक यांचे कडील पत्र क्र.748 दि.10/03/2015 नुसार साहित्य पुरवठा करणे मुदत दि.25/08/2014 पासून 60 दिवसापर्यंत होती. साहित्याचा पुरवठा उशिर झाला असल्याने दंड कपात केला आहे. परंतु दंड कपाती मा.आयुक्त यांचे आदेश क्र. 673 दि.02/02/2015 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. आयुक्तांचे पत्र नस्ती सोबत जोडण्यात आलेले नसल्याने सदर दंड कपात बरोबर झाल्याच्या कार्यवाही बाबत पडताळणी करता आली नाही.

5. तक्त्यातील अ.क्र. 4 मधील नस्ती मधील कामाचा कार्यादेश दि.08/07/2014 रोजी असल्याने कामाची मुदत 60 दिवस दि.05/09/2014 रोजी पुर्ण होत असतांना विभागाच्या तपासणी अहवालात नमूद केल्याप्रमाणे सदर साहित्याचा पुरवठा दि.12/09/2014 रोजी प्राप्त झाल्याचे नमूद असल्याने साहित्याचा पुरवठा होण्यास विहीत मुदतीपेक्षा एकूण 7 दिवसांचा विलंब झालेला असल्याने निविदा अटी शर्ती प्रमाणे दंडाची होणारी रक्कम प्रती हजारी रू.1/- प्रमाणे एकूण रक्कम रू.14000/- वसुल केलेला नाही. तरी सदरची रक्कम संबंधित पुरवठादाराकडून वसुल होणे आवश्यक आहे.

6. तक्त्यातील अ.क्र. 1,2,3 व 4 मधील कामाचे निविदा अटी शर्तीनुसार साहित्याची गॅरंटी/वॉरंटी 3 वर्षाची असल्याचे नमूद आहे. परंतु गॅरंटी/वॉरंटीचे प्रमाणपत्र नस्ती साबत आढळून आले नाही.

7. तक्ता अ.क्र. 1, 2, 3 मधील कामासाठी न्यूनतम मक्तेदार यांची अनुक्रमे अंदाजपत्रकीय दराच्या अनुक्रमे 47.06 टक्के कमी, 41.315 टक्के कमी, 18.18 टक्के जादा दराची निविदा स्विकारण्यात आली तथापि 10% पेक्षा कमी/जास्त दराची निविदा स्विकृत करताना निविदादाराकडून दरपृथःकरण प्राप्त करून त्याबाबत तांत्रिक अधिकारी यांनी समर्थन नमूद करणे आवश्यक असतांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मुद्दा 187 (ए) टीप 6 नुसार शहर/कार्यकारी अभियंत्यांनी 10% पेक्षा कमी/जास्त प्राप्त दराबाबतचे समर्थन करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

8. तक्त्यातील अ.क्र.3 मधील पुरवठादारास रक्कम प्रदान करतांना नस्ती मध्ये जोडण्यात आलेले देयकांनुसार प्रमाणक क्रमांक 6605 दि.31/12/2014 नुसार करंट बीलाची रक्कम रू.5,00,000/- त्यामधून सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा जाता एकूण रक्कम रू.4,18,200/- इतकी रक्कम धनादेश क्र.366523 दि.31/12/2014 नुसार (नस्ती मध्ये धनादेशाची छायांकित प्रत जोडण्यात आली आहे.)प्रदान केले असून पुरवठादाराची देयकाच्या प्रती मुद्रांकित पोच घेण्यात आली आहे तथापि, नस्ती मध्ये जोडण्यात आलेले प्रमाणक क्रमांक 7442 दि.18/02/2015 नुसार देयकाची रक्कम रू.15,60,000/- त्यामधुन सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा करून निव्वळ रक्कम रू.14,04,000/-

पुरवठादारास प्रदान केले आहेत. सदरचे देयक तयार करतांना करंट बीलाची (प्रमाणक क्रमांक 6605 दि.31/12/2014 नुसार अदा झालेली रक्कम रू.418200/-) रक्कम वजा केलेली नसल्याने पुरवठादारास दुबार रक्कम प्रदान झालेले दिसत आहे. तरी याबाबत विभागाने योग्य ती पडताळणी करून पुरवठादारास जादा प्रदान झालेले असल्यास सदरची रक्कम रू.4,18,200/- वसुल होणे आवश्यक आहे.

9. तक्त्यातील अ.क्र. 4 च्या कामाच्या नस्तीतील पुरवठादारास रक्कम प्रदान करतांना नस्ती जोडण्यात आलेले देयकांनुसार प्रमाणक क्रमांक 6606 दि.31/12/2014 नुसार करंट बीलाची रक्कम रू.7,00,000/- त्यामधून सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा जाता एकूण रक्कम रू.5,90,930/- इतकी रक्कम धनादेश क्र.366524 दि.31/12/2014 नुसार (नस्ती मध्ये धनादेशाची छायांकित प्रत जोडण्यात आली आहे.) प्रदान केले असून पुरवठादाराची देयकाच्या प्रती मुद्रकित पोच घेण्यात आली आहे. तथापि, नस्ती सोबत जोडण्यात आलेले प्रमाणक क्रमांक 7459 दि.18/02/2015 नुसार देयकाची रक्कम रू.20,02,320/- त्यामधुन सुरक्षा अनामत व इतर शासकीय कपाती वजा करून निव्वळ रक्कम रू.18,02,088/- पुरवठादारास प्रदान केले आहेत. सदरचे देयक तयार करतांना करंट बीलाची रक्कम (प्रमाणक क्रमांक 6606 दि.31/12/2014 नुसार अदा रक्कम रू.590930/-) वजा केलेली नसल्याने पुरवठादारास दुबार रक्कम प्रदान झालेले दिसत आहे. तरी याबाबत विभागाने योग्य ती पडताळणी करून पुरवठादारास जादा प्रदान झालेले असल्यास सदरची रक्कम रू.5,90,930/- वसुल होणे आवश्यक आहे.

10. उपरोक्त सर्व कामांच्या बाबतीत साहित्याचे शासनमान्य तृतीय पक्षीय तपासणी अहवाल घेतलेला नसल्याने सदरचे साहित्य योग्य व दर्जेदार असल्याचे प्रमाणित होत नाही.

11. उपरोक्त सर्व कामांच्या बाबतील साहित्य हे भारताबाहेरील असल्याने व कामाचे आदेशातील अटी प्रमाणे कस्टम डयुटी क्लिअरन्स सर्टिफिकेट मुळ प्रतीत आढळून आले नाही.

12. .उपरोक्त तक्त्याल सर्व कामांच्या प्राप्त साहित्यांची नोंद मनपा अग्निशामक दल माल नोंदणी बुका मध्ये घेण्यात आल्याचा शेरा कार्यालयीन टिपणीव्दारे नमूद आहे. परंतु सदरची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध नसल्याने सदर नोंदीची पडताळणी करता आलेली नाही.

13. माल नोंदणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्यामुळे प्राप्त झालेले व मागील शिल्लक साहित्य तसेच जमा केलेला पुरवठा व वाटप यांचा ताळमेळ बाबत पडताळणी करता आलेली नाही.

14. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार दरवर्षी जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी व जडसंग्रह व्यतिरिक्त इतर साधनसामुग्री व कन्झ्युमेबल्स साहित्याची पडताळणी विभागप्रमुखाने करणे आवश्यक आहे. अशी पडताळणी विभागामध्ये करुन अग्निशमन विभागातील साहित्य बरोबर असल्याची पडताळणी केल्या बाबत व तसे प्रमाणपत्र नोंदविलेले बाबत तसेच महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.266 ते 274 मधील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही.

15. अग्निशमन विभागामध्ये पडुन असलेल्या निरुपयोगी भांडार साहित्याचा तपशिल तसेच निरुपयोगी साहित्या बाबत निर्लेखनाची कार्यवाही केली अथवा नाही याची नोंदवही अभावी, पडताळणी करता आली नाही.

118 अग्नीशमन यंत्रणेकडुन अग्नीप्रतीबंधक उपाययोजना करून घेणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 4

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 च्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालय, हॉटेल, लॉजेस, रेस्टॉरंट व्यवसायीक इमारती, 15 मिटर उंचीवरील निवासी इमारती, समिश्र वापराच्या इमारती, दवाखाने प्रसुतीगृहे (नर्सिंग होम), औदयोगिक इमारती गोदामे इत्यादी मध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करून सदरच्या उपाययोजना दुरूस्त व कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र वर्षातुन दोन वेळा मुख्य अग्नीशमन अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, नाशिक महानगरपालिके हद्दीमधील कोणत्या इमारती मालकांनी / भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केल्याबाबतची माहीती सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे प्रकरण 7 संकीर्ण महसूल (परवाना शुल्क) नियम 102 (2) नुसार वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही अस्तित्वात असल्याबाबत आढळून आले नसल्याने, नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या आस्थापनांची तपशिलवार बाब लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक 06/01/2008 पासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 हा लागु करण्यात आला आहे. उपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय कार्यालय, हॉटेल, लॉजेस, रेस्टॉरंट व्यवसायीक इमारती, 15 मिटर उंचीवरील निवासी इमारती, समिश्र वापराच्या इमारती, दवाखाने प्रसुतीगृहे (नर्सिंग होम), औदयोगिक इमारती गोदामे इत्यादी मध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करून सदरच्या उपाययोजना दुरूस्त व कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र वर्षातुन दोन वेळा मुख्य अग्नीशमन अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. कायदयातील तरतुदीनुसार इमारतीचे मालक/ भोगवटादार यांनी अग्नीशमन यंत्रणेकडुन फायर ऑडीट विहीत केलेले अग्नीशमन शुल्क भरुन करणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये अश्या उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या इमारती, व्यावसायीक व औदयोगीक इमारती,हॉटेल व निवारा गृहे, असेम्बी हाऊस, दवाखाने व नर्सिंगहोम आहेत व त्यापैकी किती इमारत

मालकांनी/ भोगवटादारकांनी आग प्रतीबंधक उपाय योजना केल्या आहेत याचा तपशिल अग्नीशमन विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्या इमारती मालकांनी / भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केलेल्या नाहीत याची माहीती सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही.

नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये उदयापही ब-याच दवाखाने, नर्सिग होम व्यावसायीक व अन्य भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केलेल्या दिसुन येत नाही. त्यांना या अधिनियमाच्या कलम 6,7,8 नुसार कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे प्रकरण 7 संकीर्ण महसूल (परवाना शुल्क) नियम 102 (2) नुसार आलेल्या रकमेची, नमुना क्र. 76 प्रमाणे असलेल्या अनुज्ञप्ती पुस्तकात नोंद घेतली पाहीजे. निरनिराळया अनुज्ञप्ती/परवान्यांसाठी वेगवेगळी पृष्ठे ठेवण्यात यावीत असे नमुद केले आहे. तसेच नियम 104 नुसार कर भरणा, संकलन आणी जमेवर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेली पध्दती शुल्क वसुलीचे लेखा लेखनासाठी लागु राहील, असे नमुद केले आहे. तथापी, सन 2014-15 करीता तसेच त्यापुर्वीच्या कालावधीकरीता अग्निशामन विभागाकडून वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही अस्तित्वात आल्याचे आढळून आले नाही. नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त प्रमाणे विभागाने मागणी व आकारणी नोंदवही परिरक्षित केली नसल्याने, नाशिक महानगरपालिके हद्दीमध्ये आग प्रतीबंधक उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या इमारती, व्यावसायीक व औदयोगीक इमारती, हॉटेल व निवारा गृहे, असेम्बी हाऊस, दवाखाने व नर्सिंगहोम इ. आस्थापनांची तपशिलवार बाब लेखा परीक्षणात पडताळता आलेली नाही.

तरी वार्षिक फी/नुतनीकरण शुल्क विहीत दराने वसुलीबाबत तसेच नियमानुरुप वार्षिक तपासणी करुन अभिलेखे अद्यावत होणे आवश्यक आहे.

4) नाशिक महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीमध्ये उदा. विभागीय कार्यालये, मुख्य इमारत, दवाखाने इत्यादी मध्ये अदयापही आग प्रतीबंधक उपाययोजना परीपुर्ण केलेल्या दिसून येत नाही. अग्नीशमन उपाययोजना करणे ही नागरीकांच्या जीवीताशी निगडीत बाब असुन त्याबाबत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 112, Hmm No : 100)

119 नाशिक महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांसाठी लागणारे सुचर मटेरीयल खरेदी करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या सर्व दवाखाने, रुग्णालये व प्रसुतिगृह येथील रुग्णांवर औषधोपचारासाठी लागणारे आवश्यक सुचर मटेरीयल खरेदी करताना शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व दिनांक 04/02/2003 मधील तरतूदी मधील शासनाच्या दर करारानुसार व शासनाचे दरकरार अस्तित्वात असल्याची खात्री न करता खुल्या बाजारातून जाहिर निविदा मागवून खरेदी केलेली आहे त्यामुळे विहित केलेल्या खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परिक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ.सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणा-या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे सुचर मटेरीयल खरेदी करणेबाबत नस्तीची पडताळणी केली असता जाहिर ई निविदा मागवून न्यूनतम दरांचा प्रस्तावास मंजूरीसाठी विलंब लागत असल्याने व मनपा दवाखाने व प्रसुती गृह रूग्णालयात दैनदिन येणा-या रूग्णांवर औषधोपचार करणेकामी व्यत्यय निर्माण होवू नये म्हणून गरजेुसार सूचर मटेरियल मा.आयुक्त यांचे आदेश क्र.1664 दिनांक 22/3/2013 नुसार मागील वर्षामध्ये खरेदी करण्यात आलेल्या पुरवठादाराकडून न्युनतम दराने यापूर्वी सुचर मटेरियल इ. खरेदी करण्यासाठी मा.आ.आदेश क्र.1450,दिनांक 22/01/14 व मा.आ.आदेश क्र.364,दिनांक 23/07/14 नुसार औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या सदरातून अदा करणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे. सदर सुचर मटेरीयल खरेदीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठा दाराचे नाव
1	19 दिनांक 4/4/14	368217	मा.आ.आदेश क्र.1450,दिनांक 22/01/14	मे.वृषभ ट्रेडींग कंपनी
2	54 दिनांक 26/09/14	612818	मा.आ.आदेश क्र.364,दिनांक 23/07/14	मे.वृषभ ट्रेडींग कंपनी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6,दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6,दिनांक 04/02/2003 नुसार शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक असताना जाहिर निविदा प्रक्रीया दवारे प्राप्त झालेल्या न्युनतम दराने खरेदी केली आहे. त्यामुळे विहित केलेल्या भांडार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब झाल्याचे दिसून येत नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 23, Hmm No : 165)

120 नाशिक महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांसाठी लागणारे सिरप, लिक्वीड स्वरूपातील औषधे जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 2257313.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2257313.00/-

नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध रुग्णालये, प्रसुतिगृह व दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे सिरप, लिक्वीड स्वरुपातील औषधे जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करताना दि:02/01/1992 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना प्राधान्य देऊन त्यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परिक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ.सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणा-या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे सिरप, लिक्वीड स्वरूपातील औषधे खरेदी करण्यासाठी मा.महासभा ठराव क्रमांक 916, दिनांक 4/01/2014 अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. सदर पारीत ठराव अन्वये दिनांक 11/6/2014 ते दिनांक 1/7/2014 अन्वये विविध प्रकारचे सिरप लिक्वीड स्वरूपातील औषधे इ. चे दर मागविणेकामी जाहिर ई निविदा देण्यात आली असून मा.स्थायी समिती ठराव क्र. 565, दिनांक 24/02/2015 अन्वये मंजूर जाहिर ई निविदा न्युनतम दराने सन 2014-2015 या कालावधीसाठी तसेच पुढील वर्षाचे जाहिर ई-निविदा दर मंजूर होईपर्यत 40 लक्ष सिरप, लिक्वीड स्वरूपातील औषध खरेदी करण्यसाठी औषधे खरेदी व उपकरणे देखभाल दुरूस्ती या सदरातून अदा करणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे. सदर सिरप, लिक्वीड स्वरूपातील औषधे खरेदी तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठा दाराचे नाव
1	10 दिनांक 4/4/14	430032	स्थायी आ.क्र.731,दिनांक 18/02/13	मे.श्री.स्वामी समर्थ
2	26 दिनांक 23/5/14	281248	मा.आ.आदेश क्र.1548,दिनांक 5/02/14	मे.श्री.स्वामी समर्थ

3	30 दिनांक 23/5/14	1237996	मा.आ.आदेश क्र.1548,दिनांक 5/02/14	मे.पी.एस.फार्मा
4	33 दिनांक 23/5/14	185288	स्थायी आ.क्र.731,दिनांक 18/02/13	मे.अस्टीन हेल्थ सेंटर
5	56 दिनांक 26/9/14	91664	मा.आ.आदेश क्र.1548,दिनांक 05/02/14	मे.वृषभ ट्रेडींग कंपनी
6	64 दिनांक 14/7/14	31085	मा.आ.आदेश क्र.1548,दिनांक 5/02/14	मे.पी.एस.फार्मा
	एकूण	2257313		

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6,दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6,दिनांक 04/02/2003 नुसार शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक असताना जाहिर निविदा प्रक्रीया दवारे प्राप्त झालेल्या न्युनतम दराने खरेदी केली आहे. त्यामुळे विहित केलेल्या भांडार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब झाल्याचे दिसून येत नाही.

2) वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक डिपीआर-2003/सीआर-373/प्रशासन दि.08/09/2009 नुसार हाफकीन जीव औषधी निर्माण महामंडळ मर्यादीत, मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव या शासन अंगीकृत उपक्रमाने उत्पादीत केलेली औषधी व इतर उत्पादने निविदा पध्दतीने खरेदी न करता विकत घ्यावी असा निर्णय घेण्यात आला असून त्यात वेळोवेळी मुदत वाढही देण्यात आली आहे.

हाफकीन जीव औषधे निर्माण महामंडळ मर्यादीत मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याने तसेच हिदुस्तान अँटीबायोटिक्स लिमिटेड पुणे ही केंद्र शासनाची अंगीकृत कंपनी असल्याने त्यांच्या विविध प्रकारच्या औषध निर्मीतीस प्रोत्साहान देणे खरेदी प्रक्रीयेतील क्लिस्टता व विलंब टाळण्याच्या दृष्टीने व औषधे पुरवठयामधील फसवणुक टाळण्याच्या उद्देशाने मक्तेदारी असलेल्या संस्थेच्या गरजेच्या 75 टक्के औषधी व मक्तेदारी नसलेली गरजेच्या 37.5 टक्के औषधी प्राधान्याने वरील संस्थेकडून खरेदी करणे दिनांक.08/09/2009 नुसार बंधनकारक केले आहे. परंतु महानगरपालिकेने खाजगी पुरवठादारांकडून निविदा पध्दतीने खरेदी केली आहेत. वरील संस्थेकडून पुरवठा करणे शक्य नसल्यास मागणीपत्र मिळाल्यापासून 8 ते 10 दिवसांत संबंधित मागणी करणाऱ्या संस्थेस कळविणे आवश्यक असून त्यानंतरच अप्राप्त औषधी उपलब्ध करण्यासाठी शासकीय संस्था, केंद्रिय कामगार विमा योजनेच्या व बृहमुंबई महानगरपालिकेच्या दर संहितेचा वापर करणे आवश्यक आहे.वरील प्रमाणे महानगरपालिकेने कार्यवाही न केल्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही व खाजगी पुरवठादारांकडून खरेदीपोटी जादा रक्कम दयावी लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

121 सन 2014-2015 या कालावधीतील नाशिक महानगरपालिका हददीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकीची शुश्रुषा गृहांची नोंदणी व नुतणीकरण न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

वैदयकीय विभागात त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्याच शुश्रुषा गृहांची संख्या उपलब्ध आहे पण अदयापपर्यंत ज्या शुश्रुषा गृहांची नोंदणीच महानगरपालिकेकडे केलेली नाही अशा शुश्रुषा गृहांवर नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.

मुंबई शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम 1949 नियम 5 व त्यातील तरतुदी (सुधारणा) अन्वये महानगरपालिका हददीमध्ये खाजगी व ट्रस्टच्या मालकीचे खाजगी शुश्रुषा गृहांची नोंदणी व नुतणीकरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदरची माहिती लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.166, दिनांक 7/11/2016 अन्वये विचारणा केली असता वैदयकीय विभागाने लेखापरीक्षणास त्यांचे पत्र क्रमांक 3571, दिनांक. 23/11/16 नुसार सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्षात एकूण किती शुश्रुषा गृहांची संख्या आहे याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही, वैदयकीय विभागाकडे फक्त त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या शुश्रुषा गृहांचीच संख्या उपलब्ध आहे, परंतु अदयापपर्यंत ज्या शुश्रुषा गृहांची नोंदणीच महानगरपालिकेकडे केलेली नाही, अशा शुश्रुषा गृहांवर मुंबई शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम 1949 व त्यातील सुधारणा नियम 5 अन्वये महानगरपालिका हददीमध्ये येणाऱ्या खाजगी व ट्रस्टच्या मालकीच्या सर्व शुश्रुषा गृहांची (Nursing Home) नोंदणी करणे बंधनकारक असून अधिनियमाच्या परिच्छेद क्रमांक 6 अन्वये नोंदणी न करणाऱ्या शुश्रुषा गृहाच्या चालकास 6 महिने कारावास किंवा रूपये 10,000/- इतकी शिक्षा लादण्याची तरतूद आहे, परंतु नाशिक महानगरपालिकेने अशी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. याकरीता नाशिक महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम राबवून सदरची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात 525 नोंदणीकृत रूग्णालय असून मार्च 2014 पर्यंत 309 रुग्णालयांचे नुतणीकरण झालेले आहे व उर्वरित 216 रूग्णालयांचे नुतणीकरण करणे अदयाप शिल्लक असल्याचे कळविले आहे, सदर रूग्णालयांचे नुतणीकरणाअभावी रक्कम रूपये 1,11,500/- एवढी थकबाकी वसूल होणे बाकी आहे,

परंतू मार्च 2015 पर्यतची थकबाकीची माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

DGPVJTM8301 (Ref No : 25, Hmm No : 166)

122 नाशिक महानगरपालिका क्षेत्रात मोफत अंत्यसंस्कार योजना राबविण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 20175000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 20175000.00/-

देयकांच्या स्थळप्रती व नोंदवहया उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. मृतदेहाची संख्या अमरधाम मधील नोंदवही प्रमाणे किंवा जन्म/मृत्यु विभागाकडील नोंदीनुसार बरोबर असल्याची विभागीय कार्यालयाने तपासणी केल्याबाबतची संबंधित दस्तऐवजे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 नुसार सर्व नागरीकांसाठी मोफत अंत्यसंस्कार करणे या विषयाचा समावेश नाही. महानगरपालिकेच्या महासभेने ठराव पारित केलेला आहे, परंतू त्यासाठी महानगरपालिकेने शासनाची मंजुरी घेतलेली नाही.

नाशिक महानगरपालिका हददीतील महानगरपालिकेच्या प्राधिकृत अमरधामाध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 1324, दिनांक 7.02.2003 अन्वये मोफत अंत्यसंस्कार योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 07, दिनांक 13.05.2010 अन्वये वखारमालक/पुरवठादार यांना प्रथम वर्षाकरिता रूपये 1100/- प्रतिमृतदेह व 5 ते 10 वर्षाच्या बालमृत्यु करिता रूपये 550/- प्रतिमृतदेह व पुढील दोन वर्ष या दरात 10 टक्के वाढ अदा करण्याबाबत मंजूरी देण्यात आली होती, सदरची मुदत दिनांक 31.05.2013 रोजी सपुष्टात आली आहे.

त्याअनुषंगाने महासभा ठराव क्रमांक 100, दिनांक 15.06.2013 अन्वये परंपरागत काम करणारे इच्छुक पूरवठादार यांचेकडून अभिस्वारस्य प्रस्ताव (एक्सप्रेशन ऑफ इन्टरेस्ट) मागविणेस प्रशासकीय मंजूर देण्यात आली आहे.

स्थायी समिती ठराव 686, दिनांक 31.12.2013 अन्वये सन 2013-2014 पासून पुढील तीन वर्षाकरिता सर्व धर्मियासाठी मोफत अंत्यसंस्कार योजना राबविण्याकामी परंपरागत काम करणारे ईच्छुक

वखारमालक/पुरवठादार यांचे कडून दिनांक 1.08.2013 रोजीचे दै.लोकमत आणि दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रात प्रथम अभिस्वारस्य प्रस्ताव सूचना प्रसिध्दीनुसार व दिनांक 14.08.2013 रोजीचे दै.गांवकरी व दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये फेर अभिस्वारस्य प्रस्ताव (एक्सप्रेशन ऑफ इन्टरेस्ट) मागविणे करिता फेर अभिस्वारस्य प्रस्ताव सूचना प्रसिध्द केली असता मुदतीत एकूण 18 अभिस्वारस्य प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी पात्र अभिस्वारस्य प्रस्तावधारकांशी सदर प्राप्त दर कमी करून न्युनतम दरांत दुसऱ्या वर्षी 10 टक्के दरवाढ व दोन्ही मिळून येणाऱ्या रकमेवर तिसऱ्या वर्षी 10 टक्के दरवाढ देणेस मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार प्रथम वर्षाकरिता खालीलप्रमाणे दर निश्चित केले आहेत.

अ.क्र.	दहन अंत्यविधी	दफनविधी लिंगायत,गोसावी, नागपंथी, गवळी समाज	दफन विधी मुस्लिम समाज	दफन विधी ख्रिश्चन समाज
1	1,741/-	1,800/- (आडवा खडडा) 1,600/- (उभा खडडा)	2,200/- (फक्त सिडको , मदिना सोशन एज्युकेशन ट्रस्ट येथे 2,100/-)	1,450/-

वरील दरानूसार वय वर्ष 5 ते 10 वर्षाचे बाल मृतदेहांचे दहन अंत्यसंस्कारासाठी निम्मा दर मंजूर करण्यात आला आहे.

सन 2013-2014 करिता अंदाजपत्रकात तरतूद रू. एक कोटीचे खर्चास मंजूरी देण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर योजनेतून प्रदान झालेल्या देयकांच्या स्थळप्रती व नोंदवहया उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. यामुळे मृतदेहाची संख्या अमरधाम मधील नोंदवही प्रमाणे किंवा जन्म/मृत्यु विभागाकडील नोंदीनुसार बरोबर असल्याची विभागीय कार्यालयाने तपासणी केल्याबाबतची संबंधित दस्तऐवजे उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आलेली नाही. तथापि अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्चानुसार मोफत अत्यंसस्कार योजना राबविण्यासाठी सन 2013-2014 मध्ये 88,79,000/- व सन 2014-2015 मध्ये 1,12,96,000/- एवढा खर्च झाल्याचे दिसून येते. सन 2013-2014 व 2014-2015 मध्ये एकूण 2,01,75,000/- एवढा खर्च झालेला दिसून येतो. यामुळे सन 2014-2015 मध्ये सदर रकमेस प्रशासकीय मान्यता घेतल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही.

2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 नुसार महानगरपालिकेने करावयाच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्ये नमुद केली आहेत. यामध्ये प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठेवणे, त्या बदलणे व त्यांचे नियमन करणे आणि उक्त प्रयोजनासाठी जागांची तरतुद करणे व बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावणे इत्यादीचा समावेश आहे. सर्व नागरीकांसाठी मोफत अंत्यसंस्कार करणे या विषयाचा समावेश नाही. महानगरपालिकेच्या महासभेने याबाबतीत ठराव पारीत केलेला आहे. परंतु त्यासाठी शासनाची मंजुरी घेण्यात आलेली नसल्यामुळे मंजुरी बाबत कार्यवाही करावी.

123 नाशिक महानगरपालिकेच्या विविध रुग्णालये, प्रसुतीगृहे, फिरता दवाखाना, आरोग्य केंद्रे व मोफत रोगनिदान शिबीरे या ठीकाणी येणाऱ्या रुग्णांवर औषध उपचार करणेकामी इंजेक्शन्स व इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, विविध प्रकारचे सर्जिकल साहीत्य, व एक्स-रे फील्म्स व केमिकल्सची खरेदी जाहिर ई-निविदा मागवून करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 13489085.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13489085.00/-

नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध रुग्णालये, प्रसुतिगृह व दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारे इंजेक्शन्स व इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, विविध प्रकारचे सर्जिकल साहीत्य, व एक्स–रे फील्म्स व केमिकल्सची सन 2014-15 या कालावधीत जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करताना निविदा प्रक्रीयेस बराच विलंब झाल्याने सन 2012-13 मधील दरानेच खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे काही औषधांच्या कमी किंमतीचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही. दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना प्राधान्य देऊन त्यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना खाजगी पुरवठादारांकडून खरेदी करण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या कालावधीतील वैदयकीय विभागाच्या निवडक बाबींचे लेखा परीक्षण केले असता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व रूग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने, फिरते दवाखाने, श.आ. सेवा केंद्रे, आर.सी.एच.केंद्रे. व मोफत रोग निदान शिबीरे इ. ठिकाणी येणाऱ्या रूग्णांवर औषधोपचाराकामासाठी लागणारी इंजेक्शन्स, इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स इत्यादी औषधे व साहीत्य जाहिर ई-निविदा मागवून खरेदी करणेबाबतच्या नस्तींची पडताळणी केली असता सन 2014-2015 या कालावधीकरिता विविध औषधोपचारासाठी लागणारे औषधे व साहीत्य खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. त्यास खालीलप्रमाणे मा.महासभा व मा.स्थायी समिती यांची मान्यता मिळालेली आहे.

अ.क्र.	विषय	मा.महासभा ठराव क्रमांक व दिनांक	मा.स्थायी समिती ठराव क्रमांक व दिनांक
1	इंजेक्शन्स खरेदी	918 / 04.01.2014	567 / 24.02.2015
2	इंजेक्शन्स (ARV, ASVS & I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे खरेदी	917 / 04.01.2014	568 / 24.02.2015
3	सर्जिकल साहीत्य खरेदी	922 / 04.01.2014	564 / 24.02.2015
4	एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदी	920 / 04.01.2014	908 / 31.03.2015

उपरोक्त प्रमाणे मा.स्थायी समितीची मंजुरी विलंबाने मिळाल्यामुळे सदरच्या निविदा दरानुसार सन 2015-16 मध्ये खरेदी करण्यात आली असून सदरच्या निविदा दराचा लाभ सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये मिळालेला नाही. त्यामुळे सन 2012-13 मध्ये मंजुर झालेल्या निविदेतील दरानेच औषधे व इतर साहीत्यांची खरेदी करण्यात आलेली आहे.

अ) इंजेक्शन्स खरेदीचा तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	13 दिनांक 4/4/14	588242	स्थायी आ.क्र.799, दिनांक 22/02/13	मे.गेटवेल डिस्ट्रीब्युटर्स
2	63 दिनांक 4/10/14	1151928	मा.आ.आदेश क्र.320, दिनांक 15/07/14	मे.पी.एस.फार्मा
3	69 दिनांक 10/11/14	7736	स्थायी आ.क्र.731, दिनांक 18/2/13	मे.राहूल एन्टरप्रायझेस
4	71 दिनांक 10/11/14	206702	मा.आ.आदेश क्र.320, दिनांक 15/07/14	मे.राहूल एन्टरप्रायझेस

ब) इंजेक्शन्स (ARV, ASVS & I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे खरेदी तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	4 दिनांक 4/4/14	321750	स्थायी आ.क्र.799, दिनांक 22/03/13	मे.सागर मेडीकल

2	5 दिनांक 4/4/14	330000	स्थायी आ.क्र.799, दिनांक 22/02/13	मे.राहूल एन्टरप्रायझेस
3	37 दिनांक 30/6/14	140728	मा.आ.आदेश क्र.1394, दिनांक 15/02/13	हाफकीन बायोफार्मा
4	62 दिनांक 14/10/14	2286467	मा.आ.आदेश क्र.318, दिनांक 15/07/14	मे.सागर मेडीकल
5	70 दिनांक 10/11/14	109525	स्थायी आ.क्र.799, दिनांक 22/3/13	मे.राहूल एन्टरप्रायझेस

क) सर्जिकल साहीत्य खरेदीचा तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	3 दिनांक 4/4/14	168000	स्थायी आ.क्र.798,दि. 22/02/13	मे.ए.पी डिस्ट्रीब्युटर्स
2	7 दिनांक 4/4/14	1239266	स्थायी आ.क्र.730,दि. 18/02/13	मे.सागर मेडीकल
3	8 दिनांक 4/4/14	184212	स्थायी आ.क्र.730,दि. 18/02/13	मे.सागर मेडीकल
4	14 दिनांक 4/4/14	152819	स्थायी आ.क्र.1718,दि. 30/12/11	मे.राहूल एन्टरप्रायझेस
5	16 दिनांक 4/4/14	167400	निरंक	मे.ए.पी.एंटरप्रायझेस
6	23 दिनांक 8/5/14	650500	निरंक	मे.एक्सेल कॉरपोरेशन
7	27 दिनांक 23/5/14	88500	स्थायी आ.क्र.730,दि. 18/2/13	मे.ए.पी एन्टरप्रायजेस
8	28 दिनांक 23/5/14	43750	स्थायी आ.क्र.730,दि. 18/2/13	मे.प्लास्टी सर्जिकल इंडिया प्रा लि
9	29 दिनांक 23/5/14	169615	स्थायी आ.क्र.730,दि. 18/2/13	मे.अशोका डिस्ट्रीब्युशन
10	32 दिनांक 23/5/14	26482	स्थायी आ.क्र.730,दि. 18/2/13	मे.सागर मेडीकल
11	38 दिनांक 21/7/14	804846	स्थायी आ.क्र.799,दि. 22/02/13	मे.मातोश्री डिस्ट्रीब्युटर्स
12	47दिनांक 15/09/14	75600	मा.आ.आदेश क्र.319,दि. 15/07/14	मे.ए.पी.एंटरप्रायझेस

13	48दिनांक 15/09/14	367340	मा.आ.आदेश क्र.319,दि. 15/07/14	मे.मातोश्री डिस्ट्रीब्युटर्स
14	55 दिनांक 26/9/14	311700	मा.आ.आदेश क्र.319,दि. 15/07/14	मे.वृषभ ट्रेडींग कंपनी
15	57दिनांक 26/09/14	18000	स्थायी आ.क्र.730,दि. 18/02/13	मे.वृषभ ट्रेडींग कंपनी
16	60 दिनांक14/10/14	1740576	मा.आ.आदेश क्र.319,दि.15/07/14	मे.सागर मेडीकल
17	65 दिनांक18/10/14	140728	मा.आ.आदेश क्र.1394, दिनांक. 15/02/13	मे.हफकीन बायोफार्मा लि.

ड) एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदीचा तपशिल -

अ.क्र	बील क्र व दिनांक	रक्कम	आदेश क्र. व दिनांक	पुरवठादाराचे नाव
1	2 दि.4/4/14	740000	मा.आ.आदेश क्र.1230, दिनांक. 6/12/13	मे. एस. ॲण्ड सी असोशिएटस
2	11 दि.4/4/14	260613	मा.आ.आदेश क्र.1230, दिनांक. 06/12/13	मे.सागर मेडीकल
3	42 दि.10/09/14	407740	मा.आ.आदेश क्र.363, दिनांक. 23/07/11	मे.एस ॲण्ड सी. असोसिएटस
4	61 दि.14/10/14	588320	मा.आ.आदेश क्र.363, दिनांक. 23/07/14	मे.सागर मेडीकल

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सन 2014-2015 या कालावधीकरीता विविध औषधोपचारासाठी लागणारे इंजेक्शन्स, इंजेक्शन्स (ARV, ASVS and I.V.FLUIDS) स्वरुपातील औषधे, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स इत्यादी औषधे व साहीत्यांची खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असता मा.स्थायी समितीची मंजुरी विलंबाने मिळाल्यामुळे सदरच्या निविदेतील दराचा लाभ सन 2014-15 मध्ये मिळालेला नाही. त्यामुळे सन 2012-13 मध्ये मंजुर झालेल्या निविदेतील दरानेच खरेदी करण्यात आलेली आहे. सन 2012-13 च्या मंजूर दराने इंजेक्शन्स स्वरुपातील औषधे, इंजेक्शन्स, सर्जिकल साहीत्य व एक्स-रे फील्म्स व केमिकल्स खरेदी केल्यामुळे ज्या औषधांची व साहीत्यांची किंमती कमी झाल्या आहेत. त्यांचा फायदा महानगरपालिकेस मिळू शकलेला नाही.

2) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6, दि.02/01/1992 च्या शासन निर्णयातील परिशिष्ठ सात नुसार पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते मुळ आदेशाच्या तारखेपासून सहा

महिन्याच्या अवधीतच देण्यात यावे असे स्पष्ट असताना सन 2012-13 चे निविदेतील दराने सन 2014-15 मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे.

3) महानगरपालिका अधिनियमातील अनुसुचीतील प्रकरण 2 नुसार कोणत्याही प्रस्तावास अधिनियमातील तरतुदींन्वये स्थायी समितीने पंचेचाळीस दिवसाच्या आत मंजुरी देणे आवश्यक असताना सदर ठरावास मा.महासभेची मंजुरी दिनांक. 04/01/2014 रोजी मिळालेली असताना मा.स्थायी समितीने दिनांक 24/02/2015 व दि.31/03/2015 रोजी म्हणजेच 14 महिन्यांनी ठरावाला मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे निविदा प्रकीयेस विलंब लागलेला आहे.

4) उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/2512/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय क्र.भाखंस-2002/2990/उदयोग-6,दिनांक 04/02/2003 नुसार शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक असताना जाहिर निविदा प्रक्रीया दवारे प्राप्त झालेल्या न्युनतम दराने खरेदी केली आहे. त्यामुळे शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या भांडार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब झाल्याचे दिसून येत नाही.

5) वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांक डिपीआर-2003/सीआर-373/प्रशासन दि.08/09/2009 नुसार हाफकीन जीव औषधी निर्माण महामंडळ मर्यादीत, मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव या शासन अंगीकृत उपक्रमाने उत्पादीत केलेली औषधी व इतर उत्पादने निविदा पध्दतीने खरेदी न करता विकत घ्यावी असा निर्णय घेण्यात आला असून त्यात वेळोवेळी मुदत वाढही देण्यात आली आहे.

हाफकीन जीव औषधे निर्माण महामंडळ मर्यादीत मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल्स, जळगांव हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याने तसेच हिदुस्तान अँटीबायोटिक्स लिमिटेड पुणे ही केंद्र शासनाची अंगीकृत कंपनी असल्याने त्यांच्या विविध प्रकारच्या औषध निर्मीतीस प्रोत्साहान देणे खरेदी प्रक्रीयेतील क्लिस्टता व विलंब टाळण्याच्या दृष्टीने व औषधे पुरवठयामधील फसवणुक टाळण्याच्या उद्देशाने मक्तेदारी असलेल्या संस्थेच्या गरजेच्या 75 टक्के औषधी व मक्तेदारी नसलेली गरजेच्या 37.5 टक्के औषधी प्राधान्याने वरील संस्थेकडून खरेदी करणे दिनांक.08/09/2009 नुसार बंधनकारक केले आहे. परंतु महानगरपालिकेने खाजगी पुरवठादारांकडून निविदा पध्दतीने खरेदी केली आहेत. वरील संस्थेकडून पुरवठा करणे शक्य नसल्यास मागणीपत्र मिळाल्यापासून 8 ते 10 दिवसांत संबंधित मागणी करणाऱ्या संस्थेस कळविणे आवश्यक असून त्यानंतरच अप्राप्त औषधी उपलब्ध करण्यासाठी शासकीय संस्था, केंद्रिय कामगार विमा योजनेच्या व बृहमुंबई महानगरपालिकेच्या दर संहितेचा वापर करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे महानगरपालिकेने कार्यवाही न केल्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही व खाजगी पुरवठादारांकडून खरेदीपोटी जादा रक्कम दयावी लागल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 168, 169, 170 व 171 दिनांक - 08/11/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

124 नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट व भटक्या श्वानांवर निर्बीजीकरणांची शस्त्रक्रिया करणेबाबतच्या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 म.न.पानिधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 6122700.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6122700.00/-

निविदेस दुसऱ्यांदा मुदतवाढ अथवा फेरनिविदा मागविण्यात आली नाही. द ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्स) रु सन 2001 मधील नियम 4 नूसार मॉनिटरींग कमिटी स्थापन करण्यात आली नाही. ॲनिमल वेलफेअर बोर्ड यांचेकडून 50 टक्के अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी कोणताही प्रस्ताव सादर केला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या पूर्व विभागीय कार्यालयातील सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट व भटक्या श्वानांवर निर्बीजीकरणांची शस्त्रक्रिया करण्याचा व ई निवीदा मागविण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची सविस्तर विवरण खालीलप्रमाणे आहे-

1	निविदा विक्री दिनांक	13.8.2013 ते 27.8.2013 निविदा फॉर्मची किंमत रु.7500/-
2	निविदा उघण्याचा दिनांक	28.8.2013
3	ई निविदा सुचना क्रमांक	04/2013
4	प्रशासकीय मंजूरी	महासभा ठराव क्रमांक 73/ वि.क्र.70/15.6.2013 रु.75,00,000/-
5	दै.देशदुत दि.13.8.2013 व दै.गांवकरी 13.8.2013 दि.28.8.2013 जाहिर निविदा 24/2013 व्दारे एकच निविदा प्राप्त. म्हणून पुनश्च अल्पमुदत फेर निविदा मागविण्यासाठी प्रस्ताव सादर.	
6	मा. आयुक्तयांची मंजूरी	2.9.2013
7	निविदा विक्री दिनांक	4.9.2013 ते 11.9.2013
8	निविदा उघडणे	19.9.2013

9	निविदा दर	रु.981/श्वान (एकच निविदा प्राप्त)

दि.20.9.2013 रोजी ठेकेदार सोसायटी फॉर दी प्रिव्हेंशन ऑफ क्रुएलटी टू ॲनिमल, उदगीर यांना दि.23.9.2013 रोजी वाटाघाटी साठी बोलावून रु.900/- अंतिम दर मान्य करणेत आले.

महासभा ठराव क्रमांक 73/16.11.2013 रोजी पारीत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 562, दि.16.11.2013 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. करारनामा दि.1.12.2013 रु.100/- च्या बॉण्ड पेपर वर करण्यात आला असून खर्च जानेवारी 2014 ते मार्च 2015 या कालावधी मध्ये एकुण 9565 श्वानांवर शस्त्रक्रिया करणेत आली असून त्यासाठी एकूण रु.8608500/- खर्च करणेत आलेला आहे.

परंतू दि.1.4.2014 ते 31.3.2015 या कालावधीमध्ये एकुण 6803 श्वानांवर शस्त्रक्रिया करणेत आली असून त्यासाठी एकूण रु.6122700/- खर्च करणेत आलेला आहे.

उक्त प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.-

1.सदरील कामासाठी दोन वेळेस ई निविदा मागवून देखील एकच निविदा प्राप्त झाली आहे तेव्हा तिसरी वेळेस इ निविदा देऊन जे दर व निविदा येतील त्या अंतिम करणेत आवश्यक होते परंतू दोन वेळेसच निविदा मागविल्या, हे नियम बाहय आहे.

2.द ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्स्) रु सन 2001 मधील नियम 4 नूसार मॉनिटरींग कमिटी स्थापन करावयाची असून सदर समितीच्या नियोजनानूसार सदर योजना राबविणे आवश्यक असतांना अशी समिती स्थापन केलेली दिसून येत नाही. श्वान पकडणे निर्बीजीकरणे शस्त्रक्रिया करून श्वान पान व्यवस्था, श्वानांवर कलर कोडींग व ओळखखूण करणे व त्यांना परत सोडून देणे इ. बाबत समितीने निगराणी करणे आवश्यक आहे.

3.श्वान पकडण्यासाठी श्वान पथकामध्ये श्वान वाहनाच्या वाहनचालक, दोन प्रशिक्षीत कर्मचारी व ॲनिमल वेलफेअर संघटनेचा प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. श्वान पकडतांना शहराच्या ज्या भागातून त्यांना पकडण्यात येत आहे. त्या ठिकाणी सार्वजनिक दवंडीव्दारे किंवा अन्य स्थानिक नागरीकांना याबाबत सुचित करणे आवश्यक आहे. जेणे करून नागरीकांना श्वान बर्थ कंट्रोल कार्यक्रमाबाबत जागरूक शिक्षीत होऊन महानगरपालिका नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य त्या उपाययोजना करीत असल्याचे ज्ञात होईल तसेच शस्त्रक्रियेनंतर ज्या ठिकाणावरुन त्यांना पकडून आणले आहे, त्याच ठिकाणी ॲनिमल वेफेअर संघटनेच्या प्रतिनिधी समक्ष त्यांना सोडणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

4.द ॲनिमल बर्थकंट्रोल (डॉग्स्) रु सन 2001 मधील नियमावली नूसार खालील अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे.
-

1) Pre Operative Assesement

2) Driver Record Sheet

3) Surgery cae record sheet

4) Office Daily record sheet

5) Medicine Inventory record sheet

6) Detail of monthly expenditure

तरी मनपाने वरीलप्रमाणे अभिलेखे ठेवल्याचे दिसून येत नाही.

5.सचिव, ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया, भारत सरकार यांचेकडील सर्व नगरपालिका / महानगरपालिका यांना उद्देशून लिहलेल्या अर्ध शासकीय पत्र क्रमाक 12/2010 दि.28.5.2010 मधील सुचनेनूसार सदरचा कार्यक्रम राबविण्यासाठी 50 टक्के खर्च ॲनिमल वेलफेअर बोर्ड यांचेकडून देणेत येईल व उर्वरीत 50 टक्के खर्च स्थानिक संस्थेने करणे आवश्यक होते, मनपाने सदरील 50 टक्के अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी कोणताही प्रस्ताव सादर न करता विना निविदा दर निश्चिती करून सर्व खर्च मनपानिधीतून केला आहे. त्यामुळे सन 2014-15 मध्ये झालेल्या खर्चाच्या 50 टक्के रक्कम म्हणजेच रु.4304250/- एवढी मनपा प्राप्त होण्यापासून वंचित राहीली आहे.

DATPDMM6101 (Ref No : 169, Hmm No : 121)

125 श्वानांवरील कर व बॅच विक्रीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 म.न.पानिधी निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 80000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 80000.00/-

आरोग्य विभागातील पशु संवर्धन विभागाचे लेखा परीक्षणांत पशु संवर्धन विभागाने श्वानांवरील कर व बॅच विक्रीबाबत सन 2014-15 या आर्थीक वर्षात रु 80000/- ची तरतूद केली परंतू श्वानांवरील बॅचची विक्री न केल्याने महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापासून वंचित रहावे लागले आहे.

आरोग्य विभागातील पशु संवर्धन विभागाचे लेखा परीक्षणांत पशु संवर्धन विभागाने श्वानांवरील कर व बॅच विक्रीबाबत सन 2014-15 या आर्थीक वर्षात रु 80000/- ची तरतूद केली आहे.

आरोग्य विभागाने महानगरपालीका क्षेत्रातील पाळीव श्वानांच्या नोंदणीसाठी रु. 80000/- ची तरतूद सन 2014-15 साठी केली असून सन 1.1.2013 ते 31.12.2013 या कालावधीत एकूण 182 पाळीव व श्वानांची

नोंदवणी केल्याचे नमूद केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1.पशुसंवर्धन विभागात पाळीव श्वानांवरील कर व बॅच विक्रीपासून जमा होणारा महसूली जमा विचाराणा केली असता कर व बॅच विक्री केली नसल्याचे सांगणयात आले तसेच अंदाजपत्रकात सन 2014-15 मध्ये 182 श्वानांची आकडेवारी कशी दाखविली याबाबत अनुपालन सादर केले नाही.

2.अंदाजपत्रकात दर्शवीलेल्या बांबीवर महसूली व भांडवली उत्पन्नापासून महानगरपालीकेचे महसूली व भांडवली खर्चाचे अंदाज बांधता येतात व त्यानुसारच जनतेसाठी सोई सवलती देणे शक्य असते तेव्हा अंदाजपत्रकात जमेची तरतूद करुन देखील कर व बॅच विक्री का केली नाही. तसेच शहरातील पाळीव प्राण्यांना देखील (उदा. म्हैस, गाय, बैल, शेळी, गाढव ई.) बॅच विक्री वाढवून उत्पन्नात वाढ करता येणे शक्य होते. परंतू अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

DATPDMM6101 (Ref No : 170, Hmm No : 125)

126 जैवीक कचरा विल्हेवाट कामातील अनियमिततेबाबत.

00
लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2012-2013 लेखापरिक्षणात परिच्छेद क्रमांक 48 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महागनपालिकेचे झालेले नुकसान रक्क्म रूपये 1,08,68,020/- भरून काढण्यासाठी महानगपालिकेने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. विमा काढल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणास सादर केलेली नाहीत. नोंदणीकृत वैद्यकीय अध्यापनामधील खांटाच्या संख्येची पडताळणी करारानाम्यानुसार दर 6 महीन्याने करणे आवश्यक आहे अशी पडताळणी विभागाने केल्याचे दिसुन आले नाही. जैवीक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 1998 मध्ये Schedule 1 schedule 5 (rule 5) मध्ये नमुद केल्याप्रमाणे जैवीक वैद्यकीय कच-याचे संकलन वाहतुक, विलीनीकरण व विल्हेवाट लावली जाते व कसे, ठरवुन दिलेला कचरा विल्हेवाटीचे Standard राखले जाते काय त्याचे पर्यवेक्षण करारनाम्यानुसार सल्लागार समीतीने व आरोग्य विभागाने केल्याबाबत तपशिल उपलब्ध झालेला नाही. महासभेच्या ठरावात जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाचा स्पष्ट उल्लेख आढळून येत नाही. करारनामा व निविदेतील काही अटीमध्ये तफावत दिसून येते.

जैवीक कचरा विल्हेवाट प्रकल्प मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांना BOO (Build Operate and Own) या तत्वावर चालु

करण्यास देण्यात आला. सदरचा ठेका संबंधीतास 2001 साली देण्यात आला. ठेकेदारासोबत सन 2005 मध्ये नविन करारनाम्यावरुन त्यातील अट क्र. 15 नुसार जैवीक कचरा विल्हेवाट प्रकल्प सेवाशुल्कात प्रत्येक दोन वर्षानंतर 10% कर वाढ करण्याबाबत उल्लेख आहे मागील दरवाढ एप्रील 2007 मध्ये करण्यात आली असुन त्यानंतर एप्रील 2011 मध्ये दरवाढ करण्यात आली.

ठेकेदाराने मनपाला 15% रॉयल्टी देण्याची मान्य केले होते तसेच सभासद फीस सेवाशुल्क वसुलकरण्याची जबाबदारी ठेकेदारावर सोपवण्यीत आली. सन 2005 पासुनच सदरचा प्रकल्प BOO (Build Operate and Own) या तत्वावर 21 वर्षे चालवीण्यास दिला.

यावर खालील प्रमाणे अभीप्राय देण्यात येतात.

1. सन 2012-2013 लेखापरिक्षणात परिच्छेद क्रमांक 48 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महागनपालिकेचे झालेले नुकसान रक्कम रूपये 1,08,68,020/- भरून काढण्यासाठी महानगपालिकेने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच सभासदांकडे योग्य तो पाठपुरावा करून थकीत सेवाशुल्कांची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

2.ठेकेदाराने विमा संरक्षण (ESIS) संपुर्ण प्रकल्पातील कर्मचा-यास देणे आवश्यक असुन त्यांची छांयाकीत प्रत महानगरपालीकेस देणे आवश्यक आहे. परंतु याबाबत विमा काढल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणात पहावयास मिळाली नाहीत.

3.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक, संचालक, ठेकेदार व भारती वैद्यकीय असोशीयशन चा अध्यक्ष अशी समीती निश्चीत करुन सदरची समीती महीन्यातुन एकदा मा.आयुक्त यांना अहवाल सादर करेल. असे नमुद असतांना प्रकल्पाला या समीतीने भेट दिली कींवा कसे व असा अहवाल मा.आयुक्त यांना सादर केल्याचे सादर केल्याचे दिसुन आले नाही.

4.संपुर्ण प्रकल्प, मशिनरी, विवीध साधने यांचे चोरांपासुन व नैसर्गिक वातावरणापासुन संरक्षण होईल अशी विम्याची अभिलेखे पहावयास मिळाली नाही.

5.मा.महा लेखा परीक्षक मनपा यांचे पत्र क्र. 190 दि 19.07.2010 च्या पत्रान्वये सदर प्रकल्प राबविण्यास मा.स्थाई समीती ठराव क्र. 1157 दि 11.01.2001 नुसार मंजुरी दिल्याचे दिसुन येते तथापी या प्रकल्पास मा. महासभेची मान्यता घेतल्याचे दिसुन आले नाही. विभागास विचारणा केली असता त्यांनी 1099 / 12.07.2010 नुसार महासभा ठराव क्र. 1288 दि 29.1.2001 नुसार मान्यता असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर ठरावात जैवीक कचरा विल्हेवाट संदर्भात स्पष्ट उल्लेख नसुन प्लास्टीक इंजेक्शन्स व वापरलेल्या सुयांच्या विल्हेवाटी बाबत उल्लेख आहे. मा. स्थायी समीती ठराव क्र.1278 / दि 15.01.2001 नुसार वॉटर ग्रेस प्रॉडक्टस यांना वाटाघाटी अंती प्राप्त दराने काम करण्यास मंजुरी दिली होती त्याअनुषंगाने दि 20.12.2001 रोजी करारनामा करण्यात आला त्यात खालील प्रमाणे विसंगती दिसुन येते.

1.कराररनाम्यातील अटक्र. 9 नुसार सेवाशुल्क वसुलीची जबाबदारी मनपाचे असल्याचे नमुद आहे. तथापी ठरावात याबाबत स्पष्ट उल्लेख नसुन मा. आयुक्त यांचेकडुन अनुमोदीत इंग्रजी अहवालानुसार अटी व नियमग्राहय धरण्यात आले आहेत. सदर अनुमोदीत अहवालानुसार निवीदेतील पृष्ठ क्र. १ अट क्र. ई. नुसार ही जबाबदारी मक्तेदाराची असल्याचे नमुद आहे.

या व्यतीरीक्त 2 ,3 मुद्यांबाबत त्रुटी / दुरुस्ती बाबत उल्लेख केल्याचे पत्रात नमुद आहेत याबाबत आवश्यक ते अनुपालन सादर केलेले नाही.

6.कंत्राटदाराचा परवाना/ कालावधी / हजेरी रजीस्टर ठेवणे / रजेचे रजीस्टर ठेवणे वेतन रजीस्टर / पीएफ चालान / ESIC चालान / बोनास वाटप रजीस्टर /व गणवेशाबाबतची अभीलेखे लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाहीत.

7.सदर प्रकल्पाचा विमा काढल्याची सन 2013-14 व 2014-15 चे अभीलेखे लेखापरीक्षणात पहावयास मिळाली नाहीत तसेच विमा विलंबाने काढण्यास किंवा न काढल्यास दंडाची तरतुद करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे अटी व शर्तीचे पालन झाल्यास दिसुन आले नाही.

8.नोंदणीकृत वैद्यकीय अध्यापनामधील खांटाच्या संख्येची पडताळणी करारानाम्यानुसार दर 6 महीन्याने करणे आवश्यक आहे अशी पडताळणी विभागाने केल्याचे दिसुन आले नाही. व त्यामुळे खांटाच्या संख्येत झालेली वाढ व आकारणी रककम यांत तफावत होऊ शकते.

9.जैवीक वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 1998 मध्ये Schedule 1 schedule 5 (rule 5) मध्ये नमुद केल्याप्रमाणे जैवीक वैद्यकीय कच-याचे संकलन वाहतुक, विलीनीकरण व विल्हेवाट लावली जाते व कसे, ठरवुन दिलेला कचरा विल्हेवाटीचे Standard राखले जाते काय त्याचे पर्यवेक्षण करारनाम्यानुसार सल्लागार समीतीने व आरोग्य विभागाने केले कींवा कसे याचा तपशील लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही.

10.BOO (Build Operate and Own) या तत्वावर जो ठेका ठेकेदारास देण्यात आला होता तो सन 2005 मध्ये नवीन करारनामा करुन त्यातील अट क्र. 15 नुसार जैवीक कचरा विल्हेवाट प्रकल्प सेवाशुल्कात प्रत्येक दोन वर्षानंतर 10 % कर वाढ करण्यात आली परंतु नंतर 2009 मध्ये दरवाढ न करता एकदम 2011 मध्ये दरवाढ करण्यात आली म्हणजेच 2007 ची दरवाढ एकदम 20% करणे अपेक्षित होते परंतु तसे केल्याचे / झाल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे महानगरपालीकेस उत्पन्न कमी झाल्याचे दिसुन येते.

DATPDMM6101 (Ref No : 172, Hmm No : 146)

127 मजूर संस्थांना वाटप केलेल्या कामाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33% व 34% कामे

देणे आवश्यक होते. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही.

उदयान विभागातील सन 2014-15 मधील लेख्यांची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, उदयान, देखभाल, दुरुस्ती, वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास इत्यादी रक्कम रुपये दोन लक्षाच्या आतील कामे निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक 18/07/1996 नुसार नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांना देणेबाबत कामकाज वाटप समितीला प्राधिकृत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सीएटी-07/06/प्र.क्र.14/इमारती-2, दिनांक 19/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33% व 34% कामे दयावयाचे आहेत. सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना निविदा न मागविता कामे वाटप करावयाची आहेत. वाटप करावयाची कामे कामवाटप सभेच्या सात दिवस अगोदर महानगरपालिकेच्या बेवसाईटवर / नोटीसबोर्डवर जाहीर करुन त्यांचे वाटप लॉटरी पध्दतीने करणे (महागनरपालिका अधिनियमानुसार) आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

2) मजुर सहकारी संस्थांना रोस्टर पध्दतीने कामे देणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही तसेच लेखापरीक्षण पथकास रोस्टर नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध झालेली नाही.

3) कामकाजवाटप समिती नियुक्ती, त्यांच्या सभा सभेतील विषय, सभेचे इतिवृत्त, कामे वाटप करताना अवलंबिण्यात आलेली पध्दत याचा कोणताही तपशिल / दस्ताऐवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत.

4) पात्र मजुर संस्था, सुशिक्षित बेरोजगार व नोंदणीकृत कंत्राटदार यांची यादी सक्षम अधिकाऱ्याकडून घेतली जात असल्यास त्याबाबतची दस्ताऐवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे त्यांचे अधिकृतता / सत्यता याबाबत कोणतीही खात्री करता आली नाही.

5) काम मागणीबाबत संस्था व बेरोजगार अभियंता यांचे कोणतेही अर्ज / पत्र संबंधित नस्तीस नाहीत.

MINVAJM6901 (Ref No : 54, Hmm No : 142)

128 उदयान विभागातील विविध कामांवरील खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 15

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1705540.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1705540.00/-

मूळ नस्तीत प्रस्ताव सादर केलेले नाहीत. उदयाने मालकी संबंधी, देयकातून वसूली संबंधी कोणतीही दस्ताऐवजे नस्तीत संलग्न नाहीत. ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिले आहे. गुणवत्ता चाचणी अहवाल व तांत्रिक तपासणी अहवाल मोघम स्वरूपात दिले आहे. नस्तीस छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाअंतर्गत विविध कामावर खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र / दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ क्रमांक
1	985/07.03.15	गोसावी नगर	श्री.एन.डी.भगत	कंम्पाउंड वॉल, जॉगिंग ट्रॅक इत्यादी कामे	678574	2681/132 ते 152
2	1012/12.03.15	विधाते नगर	श्री.अमित धामणे	कंम्पाउंड वॉल असलेल्या जागेत पाथवे करणे	303445	1012/ ----
3	1052/23.03.15	मखमलाबाद	कौशल्या मजूर बांधकाम सोसायटी	पाथवे बनविणे	193766	943/--
4	1010/10.03.15	एसबीआय कॉलनी	चे.जोतिबा मजूर बांधकाम सोसायटी	अंतर्गत सुशोभिकरण व देखभाल	30000	960/191
5	433/ 22.06.14	लोकमान्य नगर	ज्योती मजूर बांधकाम सोसायटी	नाशिक रोड वॉर्ड क्रमांक 73 मधील लोकमान्य नगर उदयानाचे नुतणीकरण कामांतर्गत	499755	2255/ --

				सुशोभिकरण करणे		
				एकूण	1705540	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) देयक क्रमांक - 985 - निविदेसंबंधी कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. करारनामा नस्तीस संलग्न नाहीत. कंत्राटदाराचा पॅन क्रमांक घेतल्याचे दिसून येत नाही. करारनामा रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आला आहे. धनाकर्ष क्र.33509 दि.26/09/2014 रुपये 4426/- संचालक, विमा यांना पाठवून कामाचा विमा काढल्याचे दिसून येते. परंतु सदर विमा विलंबाने काढलेला आहे असे दिसून येते.गौण खनिज वसूलीबाबत चलन रुपये 104100/- दि.13.03.2014 श्री.राजेंद्र कुंदनलाल शर्मा यांचे नावे असून त्यावरुन कोणतीही खात्री करता येत नाही. देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. काम पुर्ण झाल्याचे प्रतिवृत्त येथे फरकाचे स्पष्टीकरण दिलेले नसून त्यावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

2) देयक क्रमांक - 1012 - आयुक्तांचे दि.25/06/2008 च्या आदेशानुसार पुर्ततेबाबत विभागाने खात्री करावी. मुळ संचिकेवर प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे तथापि सदर काम यापुर्वी केले नसल्याची खात्री विभागाने करावी असे नस्तीत नमूद केलेले असले तरी आदेशाची प्रत नस्तीस संलग्न नाही व या विषयी कोणतीही कार्यवाही झालेली नाही असे दिसून येते. प्राकलनात खाडाखोड केलेले असून स्वाक्षरी नाहीत. करार करणेबाबत दि.04/10/2013 रोजी कंत्राटदाराला पत्र पाठविले होते. करारनामा विलंबाने व रु.120/- ऐवजी रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेला आहे. करारनामा क्रमांक 218 दि.27/11/2013 आहे. करारनामा विलंबाने केल्याने तो वैध नाही कमी रकमेच्या स्टॅम्पची वसुली करुन रक्कम शासकीय खजिन्यात भरण्यात यावी. करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाहीत. जामीननामा येथे पत्ता, व्यवसाय इत्यादी माहिती भरलेली नाही. कार्योदेशात नमूद केल्याप्रमाणे गौण खनिजे व कामाच्या विम्याबाबत कार्यवाही झालेली नाही. देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. रु.800/- ची वसुलीबाबत माहिती व चलनाची प्रत नस्तीस संलग्न नाही. काम पुर्णत्वाचा दाखला दि.09/04/2014, गुणवत्ता नियंत्रण दाखला दि.07/03/2015 व ना हरकत प्रमाणपत्र दि.12/03/2015 म्हणजेच विलंबाने दिलेले आहेत. ते मोघम स्वरुपात असून त्यावर रक्कम, देयक, तपशिल इत्यादी माहिती नमूद नाही. काम पुर्ण झाल्याचे प्रतिवृत्त येथे फरकाचे स्पष्टीकरण दिलेले नसून त्यावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

3) देयक क्रमांक - 1052 - नस्तीस सर्व छायाप्रती लावलेल्या आहेत. तांत्रिक तपासणी अहवाल व गुणवत्ता नियंत्रण अहवाल येथे फेरफार केलेले असून ते विलंबाने अनुक्रमे दि.20.03.2015 व दि.18.03.2015 रोजी दिलेले आहेत. प्रत्यक्ष काम दि.14.04.2013 रोजी पुर्ण झाले असून ना हरकत प्रमाणपत्र ही विलंबाने दि.23.03.2015 रोजी दिलेले आहे. देयकातून विम्याची रक्कम रुपये 1938/- व गौण खनिजाची रक्कम रुपये 3058/- वसुल केली असली तरी त्यासंबंधी कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न नाहीत.

4) देयक क्रमांक - 1010 - मोजमाप पुस्तक क्रमांक 960/191 यावर देयक पारीत करण्याबाबत अभिप्राय नाही. कार्योदेश येथे मुदत दोन महिनेतर, अटी शर्ती व करारनामा येथे मुदत तीन महिने दर्शविलेले आहे. जामीननाम्यावर तपशील नाही व सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत. कार्योदेशात विमा रक्कम व गौण खनिज याबाबतची रक्कम वसुलीबाबत नमूद असले तरी त्या अनुषंगाने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. देयकावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

5) देयक क्रमांक - 433 - मोजमाप पुस्तक क्रमांक 2255 लेखापरीक्षणावेळी उपब्ध न झाल्याने त्यात नमूद नोंदी विषयी खात्री करता आलेली नाही. सदरील काम महानगरपालिकेच्या सहा विभागात केल्याचे नमूद असून त्याबाबतीतही अश्या त्रुटी असण्याची शक्यता आहे. निविदा प्रक्रीया संबंधी नस्तीत काहीही नमूद नाही व दस्तऐवजेही नाहीत. वृक्ष संरक्षक नोंदवही ठेवलेली नाही, त्यामुळे त्यातील नोंदी, जमा, वापर, शिल्लक साठा इत्यादीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. वृक्ष संरक्षक दुरूस्तीचे काम मे.कल्पना एन्टरप्रायजेस, नाशिक यांना देण्याबाबत दिनांक 18.03.2013 मंजूरी होती, असे नमूद असले तरी त्याची प्रत नस्तीस सलग्न नाही. सदरील काम सहा विभागात चालू असल्याचे, काम संथगतीने करत असल्याचे, कंत्राटदार कल्पना एन्टरप्रायजेस यांनी मुदतीत पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्याचे, 855 नगाचा पुरवठा केल्याचे व त्यामुळे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी चेअरमन ज्योती मजूर बांधकाम सोसायटी यांचेकडून करण्यास मंजूरी असल्याचे इत्यादी सर्व बाबी नस्तीत नमूद केलेल्या आहेत. त्यासंबधी कोणताही खुलासा, दस्तएवजे नस्तीस सलग्न नसून या विषयी कोणतीही माहिती लेखापरीक्षणावेळी प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता असूनही अशी कार्यवाही झालेली नाही. दिनांक 1.03.2014 चे कामाचे आदेशात करारनाम्याचा संदर्भ नमूद केलेला नाही. करारनामा रूपये 100/- स्टॅप पेपरवर केलेला असून त्याचा क्रमांक 301, दिनांक 01.03.2014 असा दर्शविला आहे, प्रत्यक्षात दिनांक 03.03.2014 रोजी स्टॅप ची विक्री झाली असून करारनामा त्यापूर्वी दिनांक 01.03.2014 रोजी दर्शविल्याने करार वैध नाही. करारनामा करण्याबाबतचे पत्र नस्तीस नाही. कार्यादेशात वृक्ष संरक्षक नोंदवही त्याची माहिती ठेवणेबाबत नमूद असले तरी अशी माहिती ठेवल्याबाबत किंवा संबंधिताकडून त्यासंबधी कोणतीही माहिती/अहवाल/नोंदवही घेतल्याचे दिसूत येत नाही. देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. अटी/शर्ती व जामिननाम्यावर संबधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तांत्रिक अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल, नाहरकत प्रमाणपत्र, काम पूर्णत्वाचा दाखला हे मोघम स्वरूपात दिले असून त्यात सविस्तर तपशिल नमूद नाही.

6) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

7) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

8) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

9) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

10) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

11) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

12) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

13) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

14) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

15) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 60, Hmm No : 152)

129 वृक्ष गणनेची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

वृक्ष गणना सन 2007 च्या अहवालानुसार महानगरपालिका हददीतील, रस्त्यावरील व उदयानातील एकूण फळझाडांची संख्या 54,687 इतकी होती, त्यानंतर वृक्ष गणना झाली नाही. सदर फळझाडांची वार्षिक हर्रासी/लिलाव न केल्याने महानगरपालिकेचे फळ झाडांपासून होणाऱ्या उत्पन्नाचे नुकसान झालेले आहे.

वेळोवेळी वृक्ष गणनेची माहिती लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आली होती. परंतु माहिती प्राप्त झालेली नाही त्यामुळे नाशिक महानगरपालिका हददीतील रस्त्यावरील व उदयानातील फळझाडांची संख्या याबददल माहिती उपलब्ध झाली नाहीत. सन 2007 मधील वृक्षगणना अहवालातील आकडेवारीनुसार महानगरपालिका हददीतील विविध 30 प्रकारच्या फळझाडांची संख्या 54,687 एवढी तर एकूण वृक्षांची संख्या 11,41,751 इतकी होती. सन 2014-15 मध्ये त्यात मोठया प्रमाणावर वाढ झाली असण्याची शक्यता आहे. सदरील वृक्षांपैकी उन्मळून पडलेले, तोडलेले व वाळलेली वृक्षे यांचे वार्षिक लिलाव करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक होते. परंतु याबाबत काही माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

फळझाडांचे वार्षिक लिलाव केल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात मोठया प्रमाणात व नियमित वाढ झाली असती.

MINVAJM6901 (Ref No : 52, Hmm No : 140)

130 उदयाने व खुल्या जागेमध्ये विविध प्रकारची खेळणी, बेंचेस बसविण्याच्या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 987624.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 987624.00/-

सन 2008-2009 चे मंजूर दराने सन 2014-2015 मध्ये खर्च केलेला आहे. मूळ नस्तीत प्रस्ताव सादर केलेले नाहीत. उदयानाच्या मालकी हक्कासंबंधी व देयकातून वसूल रकमा संबंधी कोणतीही दस्तऐवजे नस्तीत संलग्न नाहीत. खरेदी संबंधी कोणतीही दस्तऐवजे नस्तीस नसून प्राप्त साहित्याची तपासणी योग्य रितीने झाल्याचे दिसून येत नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखा परिक्षणाच्या वेळी विविध उदयानात व खुल्या जागांमध्ये खेळणी, बेंचेस बसविण्याची कामे केल्याचे निदर्शनास आले त्यांचा तपाशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	देयक क्र. व दिनांक	उदयानाचे नाव	मक्तेदाराचे नाव	रूपये	मोजमाप पुस्तक क्र./पृष्ठ क्र.
1	578/31.07.2014	वॉर्ड क्रमांक 93 - विविध ठीकाणी बेंचेस बसविणे	मे.गणेश फॅब्रिकेशन वर्क्स	493812	2239/--
2	982/07.03.2015	नाशिक पश्चिम प्रभाग क्रमांक 23 - विविध उदयानात डीलक्स बेंचेस बसविणे	मे.दीपक एजन्सीज	493812	3219/--
			एकूण	987624	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) देयक क्र. 578 नुसार केलेल्या कामांची मूळ प्रमाणके मोजमाप पुस्तके नोंदवहया मूळ नस्ती इतर अनुषंगिक दस्तऐवजे वारंवार मागणी करूनही लेखापरिक्षण पथकास उपलब्ध झाले नाही त्यामुळे या खर्चाबाबत खात्री करता आलेली नाही.

2) देयक क्रमांक 982 - 58 डिलक्स बेंचेस प्रत्येकी रक्कम रुपये 8514/- या प्रमाणे एकूण रक्कम रुपये 493812/- चे कामास दि.20/01/2014 च्या आदेशानुसार दिपक एजन्सी नाशिक यांचेकडून काम करुन घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. नस्तीस मंजुरीच्या छायाप्रती असून डीलेव्हरी चलन नस्तीस संलग्न नाहीत. साठा नोंदवही क्रमांक 208 पृष्ठ क्रमांक 2 येथे नोंद घेतल्याचे नमूद केले असले तरी नोंदवही लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत. पुर्णत्वाचा दाखला दि.04/06/2014 रोजी मोघम स्वरुपात व त्यानंतर विलंबाने दि.06/03/2015 रोजी ना - हरकत प्रमाणपत्र मोघम स्वरुपात देण्यात आले आहे. देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. निविदा प्रक्रीया संबंधी कोणतेही दस्ताऐवजे व दिनांक 09/05/2013 च्या मंजूरी आदेशाची प्रत नस्तीस संलग्न नाहीत. मोजमाप पुस्तक क्रमांक 3219 उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

3) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने व खुल्या जागेमध्ये विविध प्रकारची खेळणी बसविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.1410 दिनांक 8/5/2008 नुसार सात मक्तेदाराचे वार्षिक दर मंजूर करण्यात आले होते. सन 2008-2009 चे वार्षिक मंजूर दराने सन 2014-2015 उपरोक्त खरेदी करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.भांखड 1088/2522/उदयोग-6/दिनांक 2/1/1992 मधील परिशिष्ट सात नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ

आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकृत आहेत याचा शहानिशा करणे आवश्यक होते तसेच याबाबत संबंधित कागदपत्रासह माहिती खरेदी करणाऱ्या समितीपुढे सादर करणे आवश्यक असूनही अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते.

4) केंद्र व राज्य शासनाचा याबाबत दर करार अस्तित्वात असलेबाबत कोणतीही खात्री न करता उपरोक्त खरेदी केलेली आहे.

5) नगरसेवक, डिपीडीसी इत्यादी निधीच्या खर्चाबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही सन 2014-2015 मधील सर्व खर्च निविदा न मागविता सन 2008-2009 मंजूर वार्षिक दराने केला आहे. त्यामुळे खेळणी व बेंचेस बसविण्याच्या कामी केलेला सर्व खर्च वाजवी व स्पर्धात्मक दराने झाला असे म्हणता येणार नाही.

6) विविध उदयानात बसविण्यात आलेली खेळणी, बेंचेस ही अंदाजपत्रकातील योग्य त्या दर्जाचे व वजनाचे असल्याचे दर्जात्मक तपासणी केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

7) नस्त्यांना महानगरपालिकेच्या मालकी हक्काबाबत कोणतीही संबंधित दस्तएवजे संलग्न नाहीत. नस्त्यांना मंजूरीबाबत सर्व छायांकित प्रती लावलेल्या आहेत. मूळ नस्तीत प्रस्ताव केलेले नाहीत मूळ नस्ती पडताळणी वेळी उपलब्ध झालेली नाही.

8) उपरोक्त खरेदीबाबत निविदा प्रकीयेशी संबंधित कोणतीही दस्तएवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाही.

9) उपरोक्त कामांबाबत साहित्य प्राप्त होणेबाबत डिलीव्हरी चलन तसेच इनव्हाईस इत्यादी दस्तएवजे नस्तीस संलग्न नसल्याने प्रत्यक्ष प्राप्त साहित्य त्याची मुदत, रक्कम, प्रमाणपत्र, देयके पारीत करण्याचे अभिप्राय, साठानोंदवहीतील नोंदी देयकातून वसूली केलेल्या रकामांविषयी कोणतीही दस्तएवजे व त्यांचा तपशिल उपलब्ध न झाल्याने वसूली रकमांच्या भरणा केल्याबाबत खात्री करता आलेली नाही .

10) साठानोंदवही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने खरेदी साहित्याच्या नोंदीबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही.

131 मुळ दस्ताऐवजे, प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

नस्तीला टिपण्णी, मंजूरी आदेश, प्राकलन, करारनामे इत्यादी दस्तऐवजांच्या छायांकित प्रती जोडल्या जातात. मूळ प्रती लेखापरीक्षणावेळी अप्राप्त आहेत.

उदयान विभागातील सन 2014-15 मध्ये लेख्यांची तपासणी करताना असे निदर्शनास आले की, नस्तीस मुळ दस्ताऐवजे, प्रमाणके लावली जात नाहीत. नस्तीला टिपणी, मंजुर आदेश, प्राकलन, करारनामे इत्यादी दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती जोडल्या जातात. लेखापरीक्षणावेळी मागणी करुनही मुळ प्रती प्राप्त झालेल्या नाहीत तसेच कोणत्याही नस्तीस प्रमाणकांच्या प्रती लावल्या जात नाहीत तसेच शासकीय व इतर वसुल रकमांच्या संबंधात भरणा केलेली दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केली जात नसल्याने त्याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. नस्तीला सर्व मुळ प्रती लावणे आवश्यक आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे, त्याचे पालन झाले नाही.

नस्त्यांची तपासणी करताना नस्तीत खालील बाबी नमूद केल्याचे निदर्शनास आलेले आहेत.

1) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर न करता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केली जाते.

2) काम न करता पैसे अदा केले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

3) विभागात समांतर नस्ती कार्यवाहीत नाही याची खात्री करावी.

4) दुबार प्रदान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

5) कामाचे प्रमाणात पैसे न देता जादा पैसे जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

6) एजन्सी बदल झाल्याची व त्या प्रमाणात पैसे दिल्याची खात्री करावी.

उपरोक्त 1 ते 6 प्रकरणी सन 2014-15 ची माहिती त्याचप्रमाणे खाली नमूद केलेली माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 141, दिनांक 20/09/2016 अन्वये कळविण्यात आले होते, परंतू सदरची माहिती प्राप्त झालेली नाही.

1) उदयान विभागात चोरी, हानी, अफरातफर, पोलिस केस इत्यादी प्रकरणे असल्यास त्याचा सविस्तर तपशील व सदयस्थिती माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेली नाही.

2) मक्तेदारावर कारवाई केल्याचे प्रकरणाचा तपशिल उपलब्ध झालेला नाही.

132 उदयान विभागातील नोंदवहयातील त्रुटींबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तकांचा ताळमेळ घेतला जात नाही. वृक्ष संरक्षकांची मोठया प्रमाणावर खरेदी केली जाते, परंतू जडसंग्रह नोंदवही नसल्याने त्यांच्या संख्येबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. जडसंग्रह नोंदवही विभाग निहाय व एकत्रित नोंदवही मुख्यालय स्तरावर ठेवणे आवश्यक आहे.

उदयान विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षण करताना नोंदवहयांमध्ये खालीलप्रमाणे उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1) महानगरपालिकेच्या ताब्यात सदयस्थितीत 400 पेक्षा अधिक उदयाने असून मोठया प्रमाणावर नवीन उदयाने विकसित केली जात आहेत अस्तित्वात असलेल्या उदयानांचे नुतणीकरण केले जात आहे. उदयाने, जॉगिंग ट्रॅक, कारंजे, खेळणी इत्यादींवर देखभाल व दुरुस्तीसाठी मोठया प्रमाणावर निधी खर्च केला जातो. त्यामुळे उदयाननिहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात प्रकल्पाचे नाव, क्षेत्रफळ, रोपे, वृक्ष व त्यांचा तपशिल, जंगम मालमत्ता, दरवर्षी होणारा खर्च, देखभाल व दुरुस्तीचा तपशिल याबाबत सर्व माहितीची नोंद करण्यात यावी त्यामुळे उदयानावरील होणारा खर्च, त्यावरील नियंत्रण तेथील कामाचे नियोजन करणे सोयीचे होईल तसेच एखादया कामाची रक्कम चुकून दुबार प्रदान होणार नाही याची दक्षता घेणे शक्य होईल.

2) जंगम मालमत्ता व साठा मालमत्ता यांच्या नोंदवहया विभागनिहाय व उदयाननिहाय ठेवण्यात येऊन मुख्यालयात मध्यवर्ती नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.सदरील साहीत्याची पडताळणी करुन दरवर्षी जुन अखेर जडसंग्रह / जंगम साहीत्याची, सप्टेंबर व मार्च या महिन्याअखेर कंझ्युमेबल साहीत्याची पडताळणी करुन निष्कर्षासह प्रमाणपत्र वरीष्ठांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका परिशिष्ठ 24 नुसार मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मोजमाप पुस्तकांचा ताळमेळ घेतला जात नाही. (वापरलेली व कोरी मोजमाप पुस्तके) पुर्ण झालेली मोजमाप पुस्तके विभागाकडून जतन केली जात नाहीत. सर्व मोजमाप पुस्तकांची (वापरलेली व कोरी मोजमाप पुस्तके) पडताळणी करुन सर्व मोजमाप पुस्तके पुस्तकी शिलकीप्रमाणे अस्तित्वात असल्याची खात्री करावी.

4) वृक्ष / रोपे लागवडीसाठी वृक्ष संरक्षकाची मोठया प्रमाणावर गरज असल्याने उदयाने विभागाकडे मोठया

प्रमाणावर वृक्ष संरक्षक आहेत तसेच त्यांची वेळोवेळी गरजेनुसार खरेदी केली जाते. परंतु याबाबत वृक्ष संरक्षक जडसंग्रह नोंदवही ठेवलेली नसल्याने त्याच्या नोंदी, संख्येबाबत कोणतीही खात्री करता येत नाही. वृक्ष संरक्षकांची संख्या विभागनिहाय, एकत्रित संख्या इत्यादीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही.

5) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता यातील नमुना क्रमांक GEN 30 व 31 नुसार जंगम मालमत्ता नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आला असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 156 तसेच महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 95 ते 103 नुसार जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी प्रत्येक वर्षी जून अखेर व इतर साहित्याची सहामाही पडताळणी सप्टेंबर व मार्च अखेर करणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 55, Hmm No : 143)

133 महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 अन्वये वृक्ष उपकर बसविणे व त्याच्या वसुलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

वृक्ष प्राधिकरणासाठी प्रत्यक्ष महसुली जमा रकमेवर 0.5 टक्के येणारी रक्कम रूपये 193.33 लक्षापैकी रूपये 69.87 लक्ष निधी खर्च केला आहे. वृक्ष प्राधिकरण निधीचा उपयोग नवीन वृक्षाचे लागवडीसाठी करणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे उदयान विभागाचे लेखापरीक्षणात महाराष्ट्र नागरीक्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे कलम 18(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबद्ध कायदयान्वये जेथे नागरी स्थानिक प्राधिकरण इमारतीत आणि जमिनीवर मालमत्ता कर बसवित असेल तेथे संबद्ध कायदयामध्ये काहीही अंतर्भुत असल, तरी वृक्ष प्राधिकरणाने विनंती केल्यास या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी इमारतीवर आणि जमिनीवर प्राधिकरण ठरवील अशा मालमत्तेच्या करपात्र मुल्याच्या एक टक्क्याहून अधिक नसणाऱ्या दराने “वृक्ष उपकर” नावाचा अतिरिक्त कर प्राधिकरणाने बसवणे कायदेशीर असेल . त्याचप्रमाणे उक्त अधिनियमातील कलम 18(1)(क) अधिनियमान्वये जेथे नागरी स्थानिक प्राधिकरण इमारतीवर आणि जमिनीवर भांडवली मुल्यानुसार मालमत्ता कर बसवित असेल तेथे पोटकलम (1) अन्वये बसविण्यात

येणारे वृक्ष उपकर राज्य शासन राजपत्रातील अधिसुचनेव्दारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे इमारतीच्या व जमिनीच्या भांडवली मूल्याच्या 0.5 टक्क्याहून अधिक असणार नाही अशा दराने बसविता येईल असे स्पष्ट नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे उक्त् अधिनियमातील कलम 15(ड) अन्वये वृक्ष प्राधिकरणाला वर विनिर्दिष्ट केलेल्या सर्व मार्गांनी मिळालेल्या एकुण जमा रक्कमा नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या एकुण अर्धा टक्क्यापेक्षा कमी असतील तर नागरी स्थानिक प्राधिकरण प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी तुटीची रक्कम वृक्ष प्राधिकरण निधीकडे जमा खाती घालील असे स्पष्ट नमुद असतांना नाशिक महानगरपालिकेची सन 2014-2015 मधील प्रत्यक्ष महसुली जमा रकमेवर 0.5 टक्के येणारी रक्कम रूपये 193.33 लक्ष असताना वृक्ष प्राधिकरण निधी मध्ये रूपये 193.33 लक्ष निधी जमा केला आहे. वृक्ष प्राधिकरण निधीमधून रूपये 69.87 लक्ष निधी खर्च केल्याचे लेखापरीक्षणास सादर केलेल्या लेख्यावरून दिसून येते. वृक्ष प्राधिकरण निधीचा उपयोग नवीन वृक्षाचे लागवडीसाठी करणे आवश्यक आहे.

MINVAJM6901 (Ref No : 56, Hmm No : 144)

134 उदयान विभागाशी संबंधित नसलेल्या कामावर केलेल्या खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 63850.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 63850.00/-

उदयानाशी संबंधित नसलेल्या बाबींवर उदयान निधीमधून खर्च केल्याचे देयक नोंदवहीवरून दिसून आले. सदर देयके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाशी संबंधित नसलेल्या कामावर उदयानाशी संबंधित निधीतून खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	देयक क्र /दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ क्रमांक

1	1060/24.03.15	------	एअरटेल मोबाइल बील	भ्रमणध्वनी देयक (क्रमांक-9890986667)	650	-------
2	1095/31.03.15	--------	मे.भाग्यश्री इलेक्ट्रिकल्स नाशिक	सुरक्षा अनामत रक्कम परत करणे	63200	-------
				एकूण	63850	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) उपरोक्त नमूद प्रकरणी केलेला खर्च उदयानाशी संबंधित नसूनही उदयान निधीतून सदरील खर्च केल्याचे निदर्शनास येते. सुरक्षा अनामत नोंदवही उपलब्ध झाली नाही त्यामुळे त्या संबंधी जमा रकमा परतावा इत्यादीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

2) देयक क्रमांक 1060 व 1095 - हि देयके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाहीत तसेच सुरक्षा अनामत रकमेबाबत कोणतीही नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे रक्कम परताव्याबाबत, जमा रकमेच्या अनुषंगाने कोणतीही खात्री करता येत नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 58, Hmm No : 150)

135 उदयान विभागातील वाहन खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 10

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 199500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 199500.00/-

सन 2008-2009 मधील मंजूर दराने सन 2014-2015 मध्ये वाहन खर्च केलेला आहे. वाहनसंबधी कोणतीही वैध कागदपत्रे नस्तीस सलग्न नाहीत, तसेच वाहतूकी संबंधात तपशिलवार नोंदीची नोंदवही ठेवलेली नाही. अटी व शर्तींची पूर्तता झालेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखापरीक्षणावेळी उदयान

विभागाअंतर्गत वाहनांवर खर्च करण्यात आला असून त्यांसंबंधीच्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र /दिनांक	विभागाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक/ पृष्ठ क्रमांक
1	977/02.03.2015	नाशिक रोड	चे.मृत्युंजय मजूर बांधकाम सोसायटी	उदयान विभागातील विविध कामे करण्याकरीता भाडे तत्वावर ट्रॅक्टर घेणेबाबत.	199500	1311/--
	एकूण				199500	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) आदेश क्रमांक - 1532 दि.29/05/2008 नुसार ट्रॅक्टर भाडयाबाबतचे दर मंजूर असल्याचे नस्तीवरुन दिसून येते. दर निश्चितीबाबत कोणतीही दस्ताऐवजे उपलब्ध झाली नाहीत. जुनेच वार्षिक दर मंजूर आहे. शासन निर्णय क्रमांक.भाखसं-1088/2512/उद्योग-6/मंत्रालय, मुंबई दिनांक.02/01/1992 मधील परिशिष्ठ 7 नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यापर्यंत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकृत आहेत याची शहानिशा करणे आवश्यक असताना व याबाबतची टिपण्णी संबंधित कागदपपत्रासह खरेदी करणाऱ्या समितीपुढे सादर करणे गरजेचे असताना अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

2) ट्रॅक्टर संबंधी कोणतीही वैध कागदपत्रे, विमा, आर.सी.बुक, इतिवृत्त नोंदवही इत्यादी नस्तीस संलग्न नाहीत.

3) ट्रॅक्टरच्या वाहतूकीसंबंधी ठीकाण, दिनांक, काम, वेळ, अंतर, तास, मजुरांचे हजेरी पुस्तक यासंबंधी नोंदी घेऊन नोंदवही ठेवणे आवश्यक होते. परंतु अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही.

4) अटी व शर्ती यांचे पालन झाल्याबाबत खात्री करुन देयकाच्या रकमेचे प्रदान करणे आवश्यक होते. परंतु ना हरकत प्रमाणपत्र देताना याबाबत कोणतीही खात्री करण्यात आली नाही मोघम स्वरुपात ना - हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.

5) अटी व शर्ती क्रमांक - 4 नुसार ट्रॅक्टरची वैध कागदपत्रे घेणे आवश्यक होते तसेच क्रमांक - 5 नुसार अपघात / विमा उतरविणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते. याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

6) वाहन उपलब्धतेबाबत वाहन विभागाचे प्रमाणपत्र / अभिप्राय घेतलेले नाहीत.

7) रुपये 2,00,000/- च्या मर्यादेत कामे होण्यासाठी निविदा न मागविता तुटकरित्या कामे केल्याचे निदर्शनास येते.

8) मोजमाप पुस्तक क्र.1311 लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

9) वार्षिक दरानुसार 1 ते 14 कामाच्या बाबींकरीता ट्रॅक्टर ट्रॉली भाडयाने पुरविणे (ड्रायव्हर + चार कामगार) - प्रति दिन 8 तास दर रु.1500/- मंजुर असल्याचे व त्याचा तपशिल बाब क्र.10 मध्ये नमूद आहे. सदरील कामासाठी मे.आकार कन्स्ट्रक्शनस, मे.जे.के.कन्स्ट्रक्शनस, डी.एस.चोप्रा, श्री.संजय जी.सोनजे, मे.आनंद कन्स्ट्रवेल प्रायव्हेट लि., श्री.एन.एन.वर्मा, श्री.एन.के.वर्मा, मे.पॉल कन्स्ट्रक्शन व श्री.अशोक एस.सोनजे यांच्या नावास मंजूरी होती प्रत्यक्षात काम चे.मृत्युंजय मजूर बांधकाम सोसायटी यांना देण्यात आलेले आहे. याबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीत नाहीत.

10) आदेश क्रमांक - 1406 चे दिनांकात फेरफार केल्याचे दिसून येते. देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. कामाच्या नोंदी साध्या नोंदवहीत घेतल्या असून त्यावर पृष्ठांकन नाही, प्रमाणपत्र नाही, महिना अखेर व शेवटी फक्त गोषवारा काढला आहे त्यात दिनांक, कामाचे विवरण, ट्रिप संख्या, अंतर, वेळ, कामाचे तपशिल इत्यादी कोणतीही माहिती नमूद नसल्याने या विषयी कोणतीही खात्री करता येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 59, Hmm No : 151)

136 उदयान विभागामार्फत महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये झाडांची गणना पाच वर्षातून एकदा न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये झाडांची गणना पाच वर्षातून एकदा करणे आवश्यक असून सन 2007 नंतर वृक्ष गणना झालेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणावेळी उदयान विभागाने महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 चे कलम 7(ख) अन्वये वृक्ष प्राधिकरणाने डिसेंबर 1996 पुर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातून त्यांच्या अधिकारीतेतील जमीनीवरील सर्व वृक्षांची गणना करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात उदयान विभागाने सन 2007 मध्ये वृक्ष गणना केली त्यानंतर सन 2012 मध्ये वृक्ष गणना करणे आवश्यक असूनही याबाबत कार्यवाही अदयापही झालेली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 62, Hmm No : 154)

137 उदयान विभागाचे लेखापरीक्षणात देयके, मुळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे उपलब्ध न होणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2436213.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2436213.00/-

उदयान विभागाअंतर्गत विविध कामांवर झालेल्या खर्चाची देयके, खर्चाची मुळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे, मोजमाप पुस्तके, नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाल्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागाअंतर्गत विविध कामांवर झालेल्या खर्चाची देयके, खर्चाची मुळ नस्ती, प्रमाणके व इतर अनुषंगिक दस्तऐवजे, मोजमाप पुस्तके, नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेल्या नाहीत त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	देयक क्र /दिनांक	उदयानाचे नाव	कंत्राटदाराचे नाव	कामाचा तपशील	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	458/2 0.05.2014	लोकमान्य नगर	श्री.एन.डी.भगत	सुशोभिकरण करणे	597086	2926/--
2	736/ 04.10.2014	-------	श्री.डी.डी.चुंबळे	नवीन नाशिक विभागातील वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करणे	762421	2112/--

3	817/ 28.10.2014	वार्ड क्रमांक 21 येथील उदयान	श्री.भुषण खरोटे	संरक्षक भिंत बांधणे	778242	2271/--
4	1009/ 10.03.2015	यशवंत नगर	नवश्या गणपती मजूर बांधकाम सोसायटी	उदयान विषयक विविध कामे करणे	99504	960/188
5	1048 /20.03.2015	पाटील पार्क	कालिका माता मजूर बांधकाम सोसायटी	कंम्पाउंड वॉल दुरुस्ती, रंगरंगोटी इत्यादी कामे	198960	3219/--
				एकूण	2436213	

उपरोक्त नमूद खर्चाची देयके, मुळ नस्ती, प्रमाणके, इतर अनुषंगिक दस्ताऐवजे, संबंधित नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने झालेल्या कामांच्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 63, Hmm No : 155)

138 नाशिक पूर्व प्रभाग क्रमांक 38 मधील विविध उदयानांमध्ये जॉगिंग ट्रॅक येथे 58 नग डिलक्स बेंचेस बसविणे रूपये 4,93,812/- कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 493812.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 493812.00/-

सन 2008-2009 चे मंजूर दराने सन 2014-2015 मध्ये खर्च केलेला आहे. मूळ नस्तीत प्रस्ताव सादर केलेले नाहीत. उदयानाच्या मालकी हक्कासंबंधी व देयकातून वसूल रकमा संबंधी कोणतीही दस्तऐवजे नस्तीत संलग्न नाहीत. खरेदी संबंधी कोणतीही दस्तऐवजे नस्तीस नसून प्राप्त साहित्याची तपासणी योग्य रितीने

झाल्याचे दिसून येत नाही. संबंधीत कंत्राटदारास मंजूरी आदेशानुसार काम देण्यात आलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील लेखा परिक्षणाच्या वेळी विविध उदयानात डिलक्स बेंचेस बसविण्याची कामे केल्याचे निदर्शनास आले त्यांचा तपाशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	देयक क्र. व दिनांक	उदयानाचे नाव	मक्तेदाराचे नाव	रूपये	मोजमाप पुस्तक क्र./पृष्ठ क्र.
1	806 / 26.11.2014	विविध उदयाने	मे.स्काय एन्टरप्रायजेस	493812	1132 / -
			एकूण	493812	

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने व खुल्या जागेमध्ये डिलक्स बेंचेस बसविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.1410 दिनांक 8/5/2008 नुसार सात मक्तेदाराचे वार्षिक दर मंजूर करण्यात आले होते. सन 2008-2009 चे वार्षिक मंजूर दराने सन 2014-2015 उपरोक्त खरेदी करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.भांखड 1088/2522/उदयोग-6/दिनांक 2/1/1992 मधील परिशिष्ट सात नुसार पुन:प्रत्ययी आदेश हे मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यत देता येतात तसेच बाजारातील दर/किमती मूळ आदेशापेक्षा कमी होणार नसतील किंवा स्थिर आहेत किंवा प्रमाणिकृत आहेत याचा शहानिशा करणे आवश्यक होते तसेच याबाबत संबंधित कागदपत्रासह माहिती खरेदी करणा-या समितीपुढे सादर करणे आवश्यक असूनही अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते.

2) केंद्र व राज्य शासनाचा याबाबत दर करार अस्तित्वात असलेबाबत कोणतीही खात्री न करता उपरोक्त खरेदी केलेली आहे.

3) नगरसेवक, डिपीडीसी इत्यादी संबंधी स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही सन 2014-2015 मधील सर्व खर्च निविदा न मागविता सन 2008-2009 मंजूर वार्षिक दराने केला आहे. त्यामुळे खेळणी व बेंचेस बसविण्याच्या कामी केलेला सर्व खर्च वाजवी व स्पर्धात्मक दराने झाला असे म्हणता येणार नाही.

4) विविध उदयानात बसविण्यात आलेली बेंचेस ही अंदाजपत्रकातील योग्य त्या दर्जाचे व वजनाचे असल्याचे दर्जात्मक तपासणी केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

5) देयकाबाबत कामांची मूळ प्रमाणके मोजमाप पुस्तके नोंदवहया मूळ नस्ती इतर अनुषंगिक दस्ताएवजे वारंवार मागणी करूनही लेखापरिक्षण पथकास उपलब्ध झाले नाही त्यामुळे या खर्चाबाबत खात्री करता आलेली नाही.

6) नस्त्यांना महानगरपालिकेच्या मालकी हक्काबाबत कोणतीही संबंधित दस्तएवजे संलग्न नाहीत. नस्त्यांना मंजूरीबाबत सर्व छायांकित प्रती लावलेल्या आहेत. मूळ नस्तीत प्रस्ताव केलेले नाहीत मूळ नस्ती पडताळणी

वेळी उपलब्ध झालेली नाही.

7) उपरोक्त खरेदीबाबत निविदा प्रकीयेशी संबंधित कोणतीही दस्तएवजे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाही.

8) उपरोक्त कामांबाबत साहित्य प्राप्त होणेबाबत डिलीव्हरी चलन तसेच इनव्हाईस इत्यादी दस्तएवजे नस्तीस संलग्न नसल्याने प्रत्यक्ष प्राप्त साहित्य त्याची मुदत, रक्कम, प्रमाणपत्र, देयके पारीत करण्याचे अभिप्राय, साठानोंदवहीतील नोंदी देयकातून वसूली केलेल्या रकामांविषयी कोणतीही दस्तएवजे व त्यांचा तपशिल उपलब्ध न झाल्याने वसूली रकमांच्या भरणा केल्याबाबत खात्री करता आलेली नाही .

9) साठानोंदवही क्रमांक 208 व मोजमाप पुस्तक क्रमांक 1132 लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने खरेदी साहित्याच्या नोंदीबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही.

10) मा.आयुक्तांचे दिनांक 27/01/2010 च्या आदेशानुसार कार्यवाही होणेबाबत नस्तीत नमूद असले तरी प्रत्यक्षात आदेश तपासणी वेळी प्राप्त झाले नाहीत व नस्तीस ही सलग्न नाहीत.

11) बेंचेसच्या आवश्यकतेबाबत व सुरक्षिततेबाबत विभागाने खात्री करण्याबाबत नस्तीत नमूद केलेले असून त्याचा दर्जा व गुणवत्ता बाबत दक्षता घेणेविषयी नस्तीस नमूद केले आहे, परंतू या विषयी कार्यवाही झालेली नाही.

12) देयक नोंदवहीतील नोंद व प्रत्यक्ष देयकातील नोंद - कंत्राटदाराचे नाव, रक्क्म यात तफावत असल्याचे दिसून येते.

13) दिनांक 8/05/2008 मधील वार्षिक दर विविध सात कंत्राटदारांसाठी मंजूर करण्यात आले होते, त्यानुसार मे.उदय क्रिएशन, नागपूर यांना हे काम देणे आवश्यक होते तथापि प्रत्यक्ष काम मे.दिपक एजन्सी, नाशिक यांना देण्यात आले आहे. मंजूरी नसताना अशा प्रकारे कंत्राटदार बदलण्यात आला आहे.

14) आदेशात नमूद केल्यानुसार समाधानकारक कामाचा गुण नियंत्रणाचा दाखला सदस्यांकडून घेणे, सर्वेक्षण अहवाल, काम जबाबदाराने तपासणे इत्यादी बाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

15) करारनामा रूपये 100/- च्या स्टॅंप पेपरवर करण्यात आला आहे, अटी व शर्ती येथील माहिती भरलेली नसून त्यावर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

16) ना हरकत प्रमाणपत्र दिनांक 20/10/2014 रोजी देण्यात आले असून त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. काम पूर्णत्वाचा दाखला दिनांक 22/9/2014 रोजी तर गुणवत्ता नियंत्रणाचा दाखला दिनांक 3/11/2014 रोजी दिल्याचे दिसून येते. यावरून गुणवत्ता नियंत्रण व कामपूर्णत्वाचा दाखला होण्यापूर्वीच ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे निदर्शनास येते.

17) देयकावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. देयकातून रूपये 4938/- विम्याची रक्कम वसूल केली असली तरी त्याबाबत चलन व विम्याची प्रत नस्तीस सलग्न नाही.

139 उदयानांवरील देखभालीच्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 25

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1489808.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1489808.00/-

सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33%, 33% व 34% कामे देणे आवश्यक होते. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही. मूळ नस्तीस प्रस्ताव सादर केलेले नाहीत. नस्तीस छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. उदयानांच्या मालकी संदर्भात व देयकातून वसूल केलेल्या रकमा संबंधात कोणतीही दस्तऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. देखभालीच्या दर निश्चितीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी देयक नोंदवहीवरुन विविध उदयानातील देखभालीवर खर्च केल्याचे दिसून आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	रक्कम रुपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक
1	978/2.03.15	गो.ह.देशपांडे उदयान	जिजाई मजूर बांधकाम सोसायटी	90000	3528/-
2	979/2.03.15	नवीन नाशिक रस्ता दुभाजक देखभाल	त्रिमुर्ती मजूर बांधकाम सोसायटी	57750	2112/-
3	980/2.03.15	भूवन अपार्टमेंट	पंचशील मजूर बांधकाम सोसायटी	59500	2112/-
4	992/9.03.15	धर्माजी कॉलनी	श्री. पु. यु. चवरे	23435	3004/-
5	1006/10.3.15	उत्तरानगर नंबर 2	माता धनदाई मजूर	25000	960/183

			बांधकाम सोसायटी		
6	1007/10.3.15	उत्तरानगर नंबर 1	विजय राज मजूर बांधकाम सोसायटी	30000	960/184
7	1083/27.3.15	वृंदावन कॉलनी	श्री. पु. यु. चवरे	25740	3005/-
8	1085/27.3.15	राधाकृष्ण मंदिर	क्रांती मजूर बांधकाम सोसायटी	25616	3005/-
9	1049/20.3.15	एच.डी.एफ.सी जॉगींग ट्रॅरक	जिजाई मजूर बांधकाम सोसायटी	86100	1132/191
10	1051/20.3.15	शिवम नगर	भिमाई मजूर बांधकाम सोसायटी	15000	3005/-
11	1080/27.3.15	गुरूदत्त मंदिर	श्री. पु. यु. चवरे	35700	3005/-
12	1082/27.3.15	डीजीपी नगर, स्वाती नगर	श्री. पु. यु. चवरे	37728	3005/-
13	1084/27.3.15	शुभम पार्क	श्री. पु. यु. चवरे	28048	3005/-
14	749/4.10.14	पंचवटी	प्रसाद नर्सरी	950191	2681/-
			एकूण	1489808	

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 संविदा 2 (1) नुसार काम करणे, सामुग्री किंवा माल पुरविणेसाठी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च होणार असेल तेंव्हा सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देऊन निविदा मागविणे किंवा दोन लाखापेक्षा कमी खर्च होणार असल्यास सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन दिसून येत नाही.

2) उदयान विभागातील उदयान देखभाल, दुरुस्ती,वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास या लेखाशिर्षांतर्गत रुपये दोन लाखापर्यंतची कामे विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक.18/07/1996 नुसार नियुक्त केलेल्या कामकाजवाटप समितीला प्राधिकृत केल्याबाबत नस्तीवरुन दिसून येते. परंतु त्याबाबतचे दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाही. सन 2014-15 मध्ये आयुक्त यांनी स्थापन केलेल्या समितीमार्फत कामाचे वाटप केल्याचे दिसून येत नाही.

दि.16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33 टक्के, 33 टक्के व 34 टक्के कामे दयावयाची आहेत. याबाबत कार्यपध्दती अवलंबण्यात आल्याची दिसून येत नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून पात्र अधिकृत संस्थांच्या यादया घेणेबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

4) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

5) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

6) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत. मुळ करारनामा नस्तीस जोडणे आवश्यक आहे. बऱ्याच प्रकरणी करारनामे रु.100 व काही करारनामे रु.120 च्या स्टॅम्पपेपरवर केलेले आहेत. उदा. देयक क्रमांक - 156 चा करारनामा रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर केला आहे त्यामुळे जेथे असे कमी रकमेचे स्टॅम्प लावलेले आहेत त्याची माहिती लेखापरीक्ष्ण पथकास उपलब्ध करुन दयावी व लेखापरीक्षण कालावधीतील सर्व प्रकरणे अशी सर्व रक्कम वसुल करुन “0030 मुद्रांक व नोंदणी” या शासन लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावे.

7) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

8) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

9) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

10) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

11) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही.

12) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक - जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक.03/11/2003 व विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक - प्रीविनि-2305/सहविमा /साव्हावि/फ-2,दिनांक- 12/09/2005 नुसार कंत्राटी कामाच्या कालावधीचा विमा उतरविणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने कंत्राटीकामाचा विमा न उतरविल्यास कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कार्योदेशात याबाबत नमूद केलेले असले तरी देयकाची रक्कम अदा करताना कंत्राटदाराने विमा रक्कम भरल्याचे खात्री केली जात नाही. सन 2014-15 या कालावधीतील अशा सर्व प्रकरणी किती रक्कम भरावयाची बाकी आहे याची माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दयावी व त्याचा भरणा शासनाकडे करण्यात यावा.

13) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

14) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

15) उदयान देखभालीसाठी जुनेच दर सन 2002 मध्ये मंजुर केल्याचे नस्तीवरुन दिसते. त्यानुसार अर्धा एकर क्षेत्रासाठी रु.3500/- प्रति महिना तर एक एकर क्षेत्रासाठी रु.7000/- प्रति महिना दर मंजूर आहेत. त्या दरात दिनांक - 01/01/2013 पासून सुधारणा झाली असून ते अनुक्रमे 7000/- व 10000/- प्रति महिना इतके करण्यात आले असल्याचे दिसून येते तथापि सदरील दर कोणत्या आधारे निश्चित केले. या संबंधी शासनाच्या संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार केला होता का याविषयी कोणतेही दस्ताऐवजे माहिती लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत.

16) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

17) काही देयकांवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

18) करारनाम्यातील अटी व शर्ती, कामाचे आदेशात नमूद बाबी, हजेरी पुस्तक या अनुषंगाने कोणतेही अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत व नुकसानीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

19) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस

संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

20) देयक क्रमांक 978- करारनामा करणेबाबतचे पत्र नस्तीस नाही. करारनामा रूपये 110/- च्या स्टॅंपवर केला असून त्यावर क्रमांक व दिनांक नाही. करारनामा व जामीननामा येथे दिनांक, स्थळ इत्यादी माहिती नमूद नसून स्वाक्ष-या नाहीत. देयकावर सक्षम अधिका-याची स्वाक्षरी नाही. देखभालीचा दर रूपये 15,000/- कोणत्या आधारे निश्चित केला याबाबत कोणतीही माहिती नस्तीस नाही व लेखापरीक्षणवेळी याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच काम केलेबाबत अहवाल/अभिप्राय, नोंदी, नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षणावेळी प्राप्त झाले नाहीत.

21) देयक क्रमांक 1007 - प्राकलनाची छायाप्रत नस्तीस असून ती प्रमाणित नाही. 7/12 उताऱ्याची छायाप्रत नस्तीस असून त्यावर श्री. अशोक पिंगळे, श्री. राजेंद्र शाह, श्री. बाळू जाधव, श्रीमती शारदाबेन शाह, श्री. चंद्रशेखर शाह, श्री. विठठल पिंगळे यांची नावे दिसून येतात त्यामुळे मनपाची मालकी नसतानाही खर्च केल्याचे दिसून येते. लेखापरीक्षणावेळी याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. कार्यादेशात उदयान विकसित करण्याचे काम असून त्याची मुदत दोन महिने होती. करारनामा येथे मुदत तीन महिने दर्शविली आहे, पंरतू मंजूरीविना देखभालीचे काम करण्यात आले असून ते सुमारे तीन वर्ष करून घेण्यात आले. करारनाम्यातील अटी/शर्ती या उदयान विकसित करण्याच्या असून देखभाली संबंधी अटीचा त्यात कोणताही उल्लेख नाही.

22) नस्तीला निविदा जाहिराती संबंधी वर्तमानपत्राची प्रत नाही. टिपणी, प्राकलन, करारनामा, कार्यादेश इत्यादी सर्व छायाप्रती आहेत. प्राकलन प्रमाणित नाही. करारनामा करण्याबाबत पत्र नस्तीला नाही. करारनामा रूपये 100/- च्या स्टॅप पेपरवर केला आहे. करारनामा येथे दिनांक, मुदत नमूद नाही. अटी/शर्ती येथे स्वाक्ष-या नाहीत. कार्यादेश दिनांक 9.05.2011 मध्ये नमूद कालावधी दिनांक 9.05.2011 ते 8.01.2012 असा होता, त्यावर फेरफार करून 60 महिने दर्शविला असून त्यावर स्वाक्षरी नाही. निविदा जाहिरात फक्त उदयान विकसित करण्याची होती, त्यामुळे याप्रकरणी अनियमितता झालेली आहे.

23) देयक क्रमांक 979, 980, 992, 1006, 1049, 1051, 1080, 1082, 1084, 1085, 749 लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाली नाहीत तसेच त्यासंबंधी नस्ती, दस्तएवजे नोंदवहया इत्यादी लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने उपरोक्त कामे व त्याअनुषंगिक झालेला खर्च यासबंधी कोणतीही खात्री करता आलेली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

24) मोजमाप पुस्तक क्रमांक 3528, 2112, 3004, 3005, 3329, 2681 लेखापरीक्षणावेळी उपब्ध न झाल्याने त्यातील नोंदीबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही.

25) मोजमाप पुस्तक क्रमांक 960/पृष्ठ क्रमांक 183 येथे प्रमाणपत्र दिलेले नाही. पृष्ठ क्रमांक 184 येथे सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. मोजमाप पुस्तक क्रमांक 1132/पृष्ठ क्रमांक 191 येथे देयक पारित करणेबाबत अभिप्राय नाहीत.

140 मूळ मुदत ठेव पावत्या/धनादेश नस्त्यांना मुदतीनंतरही तसेच पडून असल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 62969.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 62969.00/-

मूळ मुदत ठेव पावत्या/धनादेश नस्त्यांना मुदतीनंतरही संलग्न आहेत. लेखापरीक्षणावेळी याबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी नस्त्यांची तपासणी करताना मूळ मुदत ठेव पावत्या/धनादेश मुदत संपल्यानंतरही नस्तीस सलग्न असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्रमांक / दिनांक	कंत्राटदार नाव	बॅकेचे नाव/ शाखा	मुदत ठेव पावती क्र.	व्याज दर	कालावधी	गुंतवणूक रक्कम	मुदत नंतरची रक्कम
1	1076/27.3.15	महारूद्र एन्टरप्रायजेस	सारस्वत को. ऑप. बॅक. लि.	464464	8.50%	28.9.13 ते 28.10.15	53500	62969
एकूण							53500	62969

उपरोक्त विषयी खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मूळ मुदत ठेव पावती नस्तीस सलग्न आहे, सदर पावती नस्तीस ठेवण्याचे कोणतेही कारण उपलबध् दस्तएवजावरून दिसून आले नाही, तसेच लेखापरीक्षणावेळी याविषयी कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. सदरील रकमा व त्यावरील व्याज यांचा विचार करता या रकमा वेळीच महानगरपालिकेच्या लेख्यात जमा केल्या असत्या तर महानगरपालिकेस आर्थिक लाभ झाला असता. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले

आहे.

2) सदरील रक्कम कंत्राटदारास परत दिली किंवा कसे याची कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही, याबाबत नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सदरील रक्क्म कंत्राटदारास परत केली असल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे व सदर रक्कम वसूल करावी लागेल.

3) निवड महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना उपरोक्त् बाबी निदर्शनास आल्या असून लेखापरीक्षण कालावधी सन 2014-2015 मधील इतरही नस्त्यांना अशा मूळ मुदत ठेव पावत्या व धनादेश तसेच सलग्न असतील तरी त्याची माहिती व कारणे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावी.

4) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 67, Hmm No : 159)

141 उदयान विकसित करण्याच्या कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 26

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 7282505.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7282505.00/-

निविदा, जाहिरात, तुलनात्मक दर तक्ता, मालकी हक्कासंबंधी दस्तऐवजे, देयकातून वसूल रकमांसबंधी दस्तऐवजे नस्तीस संलग्न नाहीत. मूळ नस्तीत प्रस्ताव सादर केलेले नाहीत. नस्तीस छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. करारनामा करण्याबाबत पत्र नस्तीस संलग्न नाहीत. कामकाज वाटपाबाबत विहित कार्यपध्दती अवलंबिण्यात आलेली नाही. कामकाज वाटप समितीबाबत कोणताही तपशिल लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेला नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या उदयान विभागातील सन 2014-2015 मधील निवड महिन्यांचे लेखा परिक्षणाच्या वेळी नस्त्यांची तपासणी करताना उदयान विकसित करण्यासाठी झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	देयक क्रमांक / दिनांक	उदयान नाव	कंत्राटदार नाव	अदा रूपये	मोजमाप पुस्तक क्रमांक / पृष्ठ क्रमांक

1	487/4.06.2014	राजीव नगर	मे.रोहन सुभाष पाटील	1797197	2258 / -
2	500/13.06.2014	राजीव नगर	मे.रोहन सुभाष पाटील	1797198	2239/ -
3	598/22.8.2014	स्वामी नगर,अंबड	श्री. पी. यु. चवरे	1853007	3332/ -
4	631/25.8.2014	सहदेव नगर	श्री. चंद्रशेखर बी. सावंत	739660	2258/ -
5	975/2.03.2015	आनंद नगर	श्री. एन. डी. भगत	470273	2754/ -
6	984/7.03.2015	आनंद नगर	श्री. एन. डी. भगत	448706	2681/153 ते 167
7	1008/10.3.2015	हार्मोनि अपार्टमेंट	प्रगती मजूर बांधकाम सोसायटी	69995	960/185
8	1011/10.3.2015	सातपूर सर्वे नं.56/1	श्री. एन. डी. भगत	73395	3529/ -
9	1050/20.3.2015	सर्वे नं.319/2/अ मोकळी जागा	महारूद्र एन्टरप्रायजेस	33074	1132/193
	एकूण			7282505	

याबाबत खालीलप्रामणे अभिप्राय देण्यात आहेत.

1) देयक क्रमांक 975 व 984 निविदा, जाहिरात, तुलनात्मक दर तक्ता इत्यादी दस्ताएवजे सलग्न नसून लेखापरीक्षणावेळी प्राप्त झालेले नाही, प्राकलन प्रमाणित नाही, जामिननाम्यावर तपशिल नमूद नाही, कार्यादेश व करारनामा येथे मुदत सहा महिने नमूद केले असून जामिननाम्यात मुदत दर्शविली आहे. गौण खनिज रक्कम रूपये 104100/- दिनांक 13/03/2014 भरल्याचे नमूद असून त्याची छायांकित प्रत नस्तीस आहे, त्यावर गट नंबर 92 1 मधून दगड काढणे असे दर्शविलेले आहे. भरणा करणाऱ्याचे नाव श्री. सुरेंद्र कुंदललाल वर्मा आहे याबाबत कोणतीही माहिती/दस्ताएवजे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे गौणाखनिज रक्कम शासकीय खजिन्यात भरल्याबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. देयकातून विम्याची रक्कम रूपये 2663/- वसूली केली असली एकूण कामाच्या 1 टक्के इतकी रक्क्म विमा विभागाकडे भरल्याबाबत नस्तीस कोणतीही दस्ताएवजे सलग्न नाहीत. त्यामुळे सदरील रक्कम शासकीय खजिन्यात भरल्याबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. देयकावर सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

2) देयक क्रमांक - 1008 प्राकलन प्रमाणित केलेले नाही. नस्तीस सर्व छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. करारनामा करण्याबाबत कंत्राटदारास पाठविलेल्या पत्राची प्रत नस्तीस संलग्न नाही. करारनामा रूपये 100/- स्टॅप पेपरवर करण्यात आला आहे. कराराच्या वैधतेबाबत खात्री करता येत नाही. कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे विमा रक्कम, गौण खनिज रक्कम यांच्या रकमा शासकीय खजिन्यात भरण्याबाबत देयकांच्या रक्कमा कंत्राटदारास प्रदान करण्यापूर्वी खात्री करणे आवश्यक होते. परंतू अशी कार्यवाही झालेली नाही. मंजूरी नसताना, कार्यादेशात नमूद नसताना देखभालीचे काम करून घेण्यात आले आहे. ना हरकत प्रमाणपत्रावरही देखभाली संबधी कोणताही उल्लेख नाही.

3) अ.क्र. 1 ते 4, 9, 10 येथील देयके, मुळ खर्चाची नस्ती, प्रमाणके, अनुषंगिक दस्तऐवजे, संबंधित नोंदवहया, मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने झालेली कामे व खर्चाबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्याचे पालन झाले नाही.

4) मोजमाप पुस्तक क्रमांक - 2258, 2239, 3332, 2754, 3529, लेखापरीक्षणावेळी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोंदींबाबत खात्री करता आली नाही.

5) मोजमाप पुस्तक क्रमांक 960/185 येथे देयके पारित करण्याबाबत अभिप्राय नाहीत तसेच मोजमाप पुस्तक क्रमांक 1132 पृष्ठ क्रमांक 193 येथे 5 टक्के, 100 टक्के तपासणीच्या व देयक पारित करण्याच्या संबधी अभिप्रायाच्या नोंदी नाहीत.

6) महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 संविदा 2 (1) नुसार काम करणे, सामुग्री किंवा माल पुरविणेसाठी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च होणार असेल तेंव्हा सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देऊन निविदा मागविणे किंवा दोन लाखापेक्षा कमी खर्च होणार असल्यास सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजांवरुन दिसून येत नाही.

7) उदयान विभागातील उदयान देखभाल, दुरुस्ती,वृक्ष प्राधिकरणाकडील कामे, उदयान विकास या लेखाशिर्षांतर्गत रुपये दोन लाखापर्यंतची कामे विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 641 दिनांक.18/07/1996 नुसार नियुक्त केलेल्या कामकाजवाटप समितीला प्राधिकृत केल्याबाबत नस्तीवरुन दिसून येते. परंतु त्याबाबतचे दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाही. सन 2014-15 मध्ये आयुक्त यांनी स्थापन केलेल्या समितीमार्फत कामाचे वाटप केल्याचे दिसून येत नाही.

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.सीएटी/प्र.क्र.94/इमारत-2,मंत्रालय, मुंबई दि.16/11/2006 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नियमित कंत्राटदार यांना अनुक्रमे 33 टक्के, 33 टक्के व 34 टक्के कामे दयावयाची आहेत. याबाबत कार्यपध्दती अवलंबण्यात आल्याची दिसून येत नाही. सक्षम अधिकाऱ्याकडून पात्र अधिकृत संस्थांच्या यादया घेणेबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

8) उदयाने महानगरपालिकेच्या नावावर असल्याबाबत मालकी हक्काचे दस्तऐवजे (7/12 उतारे दस्तऐवजे) नस्तीस लावलेले नाहीत. त्यामुळे उदयानाच्या मालकी हक्काबाबत, क्षेत्राबाबत व त्या अनुषंगाने होणाऱ्या

खर्चाबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

9) नस्त्यांना मुळ प्रतीऐवजी छायाप्रती जोडलेल्या आहेत -- टिपणी, करारनामा, मंजुरी, आदेश, प्राकलन इत्यादी मुळ दस्तऐवजे नस्तीस जोडणे आवश्यक आहे.

10) खर्चाची मुळ प्रमाणके नस्तीस जोडलेली नाहीत. वसुल रकमांबाबत कोणतेही दस्ताऐवजे नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे देयकातून वसुल रकमा - विविध कर हे संबंधित प्राधिकाऱ्याकडे विहीत कालावधीत जमा केले जातात किंवा केले जात नाहीत याबाबत कोणतीही खात्री करता येत नाहीत.

11) कंत्राटदारास करार करणेबाबत पाठविलेले पत्र नस्तीस संलग्न केले जात नाहीत. त्यामुळे विहीत कालावधीत व संबंधित कंत्राटदाराशी करार केल्याबाबत / वैधतेबाबत खात्री करता येत नाहीत. तसेच मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 (1) नुसार अंदाजपत्रकीय रकमेप्रमाणे करारनामा विहीत रकमेच्या मुद्रांकावर केल्याबाबत खात्री करता येत नाहीत.

12) करारनामा, अटी व शर्ती, जामीननामा येथे सर्व पृष्ठांवर संबंधित कंत्राटदार, सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे तसेच पॅन क्रमांकासह रक्कम, कालावधी, दिनांक, नाव, ठिकाण इत्यादी माहिती त्यात नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

13) ना - हरकत प्रमाणपत्र तांत्रिक तपासणी अहवाल, गुणवत्ता चाचणी अहवाल हे अत्यंत मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते तसेच बऱ्याच प्रकरणी ते विलंबाने ही दिल्याचे दिसून येते. त्यात निविदा देयक रक्कम, कामाचे स्वरुप, दंडात्मक कारवाई गरज असल्यास इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

14) नस्तीला निविदेसंबंधी सर्व दस्ताऐवजे संलग्न करणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

15) कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत घेण्याबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद केली जात नाहीत तसेच याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राप्त व दिलेल्या रकमा याबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

16) प्रशासकीय, वित्तीय मंजुरी / खर्च मंजुरी आदेशात कालावधी, कंत्राटदार, संस्थेचे नाव इत्यादी नमूद केलेले नसल्याने त्या अनुषंगाने खात्री करता येत नाही. कार्योदेशावर दिनांक नमूद केलेले नाही.

17) मुळ नस्तीत प्रस्ताव सादर केले न जाता प्रत्येक वेळी नव्याने नस्ती केल्याचे दिसून येते तसेच याबाबत कोणतीही नोंदवही ठेवली जात नाही. प्रत्येक उदयान निहाय इतिवृत्त नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यात उदयान विकास, देखभाल, दुरुस्ती, जड संग्रह साहीत्य इत्यादी सर्व नोंदी घेण्यात याव्यात. त्यामुळे उदयानावरील खर्च व इतर सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य राहील. अन्यथा साहीत्याची हानी, नुकसान होऊ शकते व दुबार प्रदान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

18) काम पुर्णत्वाचा दाखला दिल्यावर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने दिल्याचे बऱ्याच प्रकरणी दिसून येते. जर काम समाधानकारकरित्या पुर्ण केलेले असेल तर ना हरकत प्रमाणपत्र विलंबाने देण्याचे प्रयोजन कळत नाही.

19) प्रस्ताव सादर करताना जागेच्या मालकीबाबत कोणतीही खात्री केली जात नाही तसेच या सबंधी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतले जात नाहीत असे दिसून येते. त्याचप्रमाणे तरतूदी नसताना, तांत्रिक मंजूरी व खाते प्रमुखांची मंजुरी न घेता प्राकलन प्रमाणित नसतानाही प्रस्ताव सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले.

20) काही नस्त्यांना देयकाची प्रत सोडून सर्व दस्तऐवजे मूळ न जोडता छायाप्रती जोडलेल्या आहेत. याबाबत लेखापरीक्षणावेळी मूळ दस्तऐवजे उपलब्ध झाली नाहीत व कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

21) कंत्राटदाराकडून करुन घेतलेले कामाच्या संदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कोणतेही अहवाल वेळोवेळी घेतल्याचे दिसून येत नाहीत तसेच हजेरीसंदर्भात उदयानात नोंदवही ठेवली जात नाही असे दिसून येते.

22) कंत्राटदाराने कामावर नियुक्त केलेले कामगार / सेवक यांना अनुज्ञेय रक्कम धनादेशाद्वारे तसेच त्यांचे ईएसआय, ईपीएफ, व्यवसाय कर, कामगार निधी इत्यादी रकमा संबंधित प्राधिकारणाकडे जमा केल्याबाबत विभागाकडून खात्री करणे आवश्यक होते परंतु नस्तीतील उपलब्ध दस्ताऐवजावरुन अशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

23) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यप्रणालीबाबत मा.आयुक्तांनी दिनांक - 26/01/2012 रोजी मंजुरी दिल्याचे नस्तीत नमूद असले तरी याविषयी कोणतीही माहिती, दस्ताऐवजे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झालेले नाहीत.

24) करारनाम्यातील अटी व शर्ती, कामाचे आदेशात नमूद बाबी, हजेरी पुस्तक या अनुषंगाने कोणतेही अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत व नुकसानीबाबत कोणतीही खात्री करता येत नाही.

25) नस्तीस विमा, सेवाकर, आयकर, गौण खनिजे इत्यादी वसुलीबाबत तपशिल / चलनांच्या प्रती नस्तीस संलग्न नसल्याने या रकमांचा भरणा संबंधित विभागाकडे होणेबाबत खात्री करता येत नाही.

26) 10 टक्के पेक्षा कमी अधिक दराची निविदा स्वीकृत करताना निविदाधारकाकडून दर पृथ:ककरण प्राप्त करुन त्याबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांनी समर्थन नमूद करणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 68, Hmm No : 160)

142 कालबाहय झालेले उपकरणे निर्लेखित न करणेबाबतची अनियमितता

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 02

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

शासन निर्णय- दि.4.01.2008 अन्वये संगणक, लॅपटॉप, प्रिटर्स, सर्व्हर इत्यादी आयटी उपकरणांचे आयुष्यमान ठरवून कालबाहय झालेल्या उपकरणांसंबंधी त्यांची विल्हेवाट लावण्याबाबत करावयाच्या कार्यवाही केलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेमधील संगणक विभागाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीनूसार, त्यांचे वापरात असलेल्या ईलेक्ट्रॉनिक उपकरणांचा मार्च 2014 अखेर तपशिल खालीलप्रमाणे आहे. -

Item name	Computer	Printers	Xerox Machine/ A-3 Size	Servers	UPS	Dot Matrix Printers - 1170	Dot Matrix Printers - 300	Other (Laptop, Tablet)	Multi functional Printers	All in One Desktop	Hard disk 1.0 TB	Led TV
No.	134	66	1	22	86	25	25	3	16	21	1	1

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.-

1. संगणक विभागाने जड वस्तू संग्रह नोंदवही आणि वर नमुद केलेल्या वस्तूच्या लेखापरिक्षण कालावधीतील इतिहास पुस्तिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे सदर वस्तू कधी खरेदी करणेत आल्या याची पडताळणी करता आलेली नाही.

2. महानगरपालिकेने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मातंस/नस्ती-7/89/39, दि.4.01.2008 अन्वये संगणक, लॅपटॉप, प्रिटर्स, सर्व्हर इत्यादी आयटी उपकरणांचे आयुष्यमान ठरवून कालबाहय झालेल्या उपकरणांसंबंधी त्यांची विल्हेवाट लावण्याबाबत करावयाच्या कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत सदर शासन निर्णयातील सुचनांनूसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 80, Hmm No : 131)

143 अधिकारी / कर्मचा-यांकडून प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत.

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9ड

प्रतिभूती बंधपत्र न घेतल्याबाबत झालेली अनियमितता.

नाशिक महानगरपालिकेमधील संगणक विभागामध्ये काम करीत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून सन 2014-15 साठी प्रतिभूती बंधपत्र घेण्यांत आलेले नाही. महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियम - 1965 मधील नियम क्रमांक 51 नुसार, शासकीय कार्यालयातील भांडारपाल, उपभांडारपाल, भांडार लिपीक, कर्मचारी की ज्यांचेवर मालमत्ता खरेदी करणेची किंवा सांभाळण्याची जबाबदारी सोपविण्यांत आलेली असते, अशा कर्मचा-यांकडून खालील प्रकारांपैकी एकामध्ये प्रतिभूती बंधपत्र सिक्यूरीटी बॉड घेणे आवश्यक असते. अशा प्रतिभूतीच्या रकमेबाबत सक्षम अधिका-याने, प्रत्येक प्रकरणी, स्थानिक परिस्थिती पाहून योग्य तो निर्णय घ्यावयाचा असतो.

प्रतिभूतीचे प्रकार -

1. प्रतिभूती बंधपत्र - दोन जामिनदार
2. कोणत्याही शासनमान्य विमा संस्थेचा "इमान हमी योजना" (फिडीलीटी गॅरंटी पॉलिसी)
3. रोख स्वरुपात किंवा मासिक वेतन देयकातुन कपात
4. पोस्टाची विमा पॉलिसी किंवा सावधी विमा पॉलिसी
5. पोस्टाच्या बचत बॅकेतील ठेवी.

परंतू महानगरपालिकेने संबधितांकडून कोणत्याही स्वरूपात प्रतिभूती बंधपत्र घेतलेले नाहीत.

CCFNKKM8401 (Ref No : 81, Hmm No : 132)

144 महानगरपालिकेच्या वापरात असलेल्या विविध आज्ञावलींचे सेक्यूरीटी ऑडिट बाबतची माहिती सादर करणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेत व विभागीय कार्यालयांमध्ये वापरात विविध संगणक आज्ञावलींचे शासन नियमवलीनूसार सेक्यूरीटी ऑडीट केल्याबाबतची माहिती सादर केली नाही.

नाशिक महानगरपालिकेमधील वापरात असलेल्या विविध आज्ञावलीचे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक डीआयटी-2012/प्रक्र.188/39 दि.1.2.2012 अन्वये सिक्यूरीटी ऑडीट करणेत आल्याबाबतची माहिती अर्धसमास पत्र

क्रमांक 133 दिनांक 6/9/2016 अन्वये विचारणा केली असता सदरची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. यामुळे सदरचा आक्षेप कायम करणेत येत आहे.

CCFNKKM8401 (Ref No : 82, Hmm No : 133)

145 नाशिक महानगरपालिकेसाठी ई टेंडरींग कार्यप्रणाली बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर विकसित करून चालविण्यात देण्याबाबत.

NA
लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2010 मध्ये मक्तेदाराकडून बीओटी तत्वातर विकसीत करणेत आली होती. सदर प्रकल्प बीओटी तत्वावर असल्याने, प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर, मक्तेदाराने सदर प्रकल्प महानगरपालिकेला हस्तांतरीत केला किंवा कसे, याबाबत माहिती उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यावरून होवू शकली नाही. जर महानगरपालिकेने सदर प्रकल्प त्यांचे ताब्यात घेतला असेल, तर पुन्हा त्याच कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून, नव्याने बीओटी तत्वावर आज्ञावली का विकसीत करणेत आली, यामागचे प्रयोजन समजू शकले नाही. सदर प्रकल्पाचे/ कार्यप्रणालीबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आणि त्याच्या मालकी हक्क कोणाकडे आहे, याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. महानगरपालिकेने सदर दरकरार असूनही स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून संबंधित पुरवठादाराला मक्ता दिलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेला ई टेंडरींगची सुविधा मे. ढवंगळे ईनफोटेक प्रा लि पुणे या संस्थेमार्फत दि.31.7.2013 पर्यंत पुरविण्यात आली होती.सदर मक्तेदार हि सेवा रु.197/- प्रति निविदा (सर्व करांसह) या दराने सन 2008 पासून 5 वर्षेच्या कालावधीसाठी बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर पुरवित होता. त्यानंतर महानगरपालिकेने सन 2014 ते 2017 या कालावधीसाठी E Procurement Technologies (trademark ABC procure), अहमदाबाद या संस्थेस बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वातर देण्यात आला.तत्पूर्वी प्राप्त झालेल्या निविदांमधून मे सायनेज टेक्नॉलॉजीज, पुणे या संस्थेने रु.90/- प्रति निविदा दर दिला होता. परंतू सदर संस्थेने निविदा शर्ती व अटीनूसर Performance Security Deposite ची रक्कम जमा न केल्याने तसेच मनपासोबत करारनामा न केल्याने त्यांची निविदा बाद ठरवून दुस-या क्रमांकाच्या कमी दरधारक मक्तेदार - E Procurement Technologies (trademark ABC procure), अहमदाबाद या संस्थेस वाटाघाटीसाठी बोलावून त्यांचेशी रु.90/- प्रति निविदा या दरानूसार दरकरार केला.

या कामाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे -

1	प्रशासकीय मंजूरी	आयुक्त आ क्रमांक 1694, दि.26.2.2014
2	अर्थसंकल्पीय तरतूद	नमूद नाही
3	निविदा कालावधी	1.8.2013 ते 26.8.2013
4	कामाचा कालावधी	3 वर्षे
5	मक्तेदार	E Procurement Technologies (trademark ABC procure), अहमदाबाद
6	कार्यादेश क्रमांक	54, दि.26.2.2014
7	तांत्रीक मंजूरी	घेण्यात आलेली नाही
8	मंजूर दर	रु.90/- प्रति निविदा

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे

1. सन 2010 ते 2013 या कालावधीमध्ये मे. ढवंगळे ईनफोटेक प्रा लि पुणे या मक्तेदाराकडून बीओटी तत्वातर विकसीत करणेत आली होती. सदर प्रकल्प बीओटी तत्वावर असल्याने, प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर, मक्तेदाराने सदर प्रकल्प महानगरपालिकेला हस्तांतरीत केला किंवा कसे, याबाबत माहिती उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यावरून होवू शकली नाही. जर महानगरपालिकेने सदर प्रकल्प त्यांचे ताब्यात घेतला असेल, तर पुन्हा त्याच कामासाठी निविदा प्रक्रिया राबवून, नव्याने बीओटी तत्वावर आज्ञावली का विकसीत करणेत आली, यामागचे प्रयोजन समजू शकले नाही. सदर प्रकल्पाचे / कार्यप्रणालीबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आणि त्याच्या मालकी हक्क कोणाकडे आहे, याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही.

2. महाराष्ट्र शासन, माहिती व तंत्रज्ञान विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती/2012/प्रक्र.273/39, दि.19.1.2013 व दि.26.11.2014 नूसार ई टेंडरींग सुविधेसाठी एनआयसी, मुंबई किंवा सिफी नेक्स्ट टेंडर, यांचेशीदर करार केला असून, सर्व शासकीय कार्यालये / महामंडळे इ यांनी सदर प्रकिया राबविण्यासंबंधी निर्देश देण्यात आलेले होते. तथापि, महानगरपालिकेने सदर दरकरार असूनही स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून संबंधित पुरवठादाराला मक्ता दिलेला आहे.

3. निविदेमधील Special Condition of Contract या भागातील अट क्रमांक 9 - Method for Carryout the work नूसार Officer In Charge हा मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार करून देईल, त्यानंतर मक्तेदाराने सदरचे काम करणे आवश्यक राहील, असे नमुद आहे. परंतू नस्तीमध्ये Officer In Charge ने मक्तेदाराला कामाबाबतचे schedule तयार दिल्याबाबतचे पत्र / आदेश दिसून आले नाही.

4. निविदेमधील अट क्रमांक 13 नूसार Quality Assurance Program / sample test त्रयस्थ संस्थेकडून स्वखर्चाने करून घेण्याबाबत नमूद केले आहे. परंतू, मनपाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानूसार सदरच्या चाचणी बाबतचा अहवाल दिसून आला नाही तसेच त्याबाबत टिपणीमध्येही याबाबत उल्लेख आढळून आला नाही.

5. निविदेमधील सर्वसाधारण शर्तीमधील अट क्रमांक 8 Liquidated Damages नूसार मनपाचे Engineer in charge हे मक्तेदाराचे काम हे अक्रियाशिल आणि असमाधानकारक असल्यास 10 दिवसाची कारणदर्शक सुचना मक्तेदारास बजावेल आणि त्यामध्ये सत्यता आढळल्यास मंजूर कामाच्या 10 टक्केपर्यंत रकमेचा दंड आकारू शकेल, असे नमूद आहे.

6. सदरच्या आज्ञावलीचे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक डीआयटी-2012/प्रक्र.188/39 दि.1.2.2012 अन्वये सिक्यूरीटी ऑडीट करणेत आले किंवा कसे? याबाबत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

7. सदर निविदेमधील अट क्रमांक 18 नूसार मक्तेदार हा स्वखर्चाने मनपाच्या व स्वत:च्या नावाने संयुक्त विमा मे न्यू इंडिया एशोरन्स् कंपनी, किंवा इतर शासकीय विमा संचालनालयाकडून काढेल, असे नमुद आहे. परंतू नस्तीमध्ये सदर पॉलिसीचे कागदपत्रे आढळून आले नाहीत.

8. निविदेमधील अटी व शर्तीनूसार विविध निविदाप्रकियाची सर्व माहिती / डेटा हा मक्तेदाराकडे जतन करणेत येईल तसेच त्याच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी ही सर्वस्वी मक्तेदाराची राहील असे नमुद आहे. परंतू मक्तेदाराकडे संपूर्ण नियंत्रण असल्याने सदर निविदा प्रकियेमध्ये पारदर्शकता राहील, याची खात्री पटू शकत नाही. तसेच महानगरपालिकेच्या स्तरावर प्रत्येक निविदा प्रक्रियेचा Activity Log मागवून जतन करावयास पाहिजे होता, जेणेकरून मक्तेदारावर नियंत्रण ठेवता आले असते. म्हणून महानगरपालिकेने संपूर्ण नियंत्रण स्वत: कडे ठेवणे आवश्यक होते. लेखापरीक्षणाकामी Activity Log उपलब्ध करून देण्यात आला नाही.

9. निविदा मध्ये रु.90/- प्रति कोरे निविदा यानूसार मक्तेदाराला अदायगी करणेत येईल, असे नमुद आहे. परंतू निविदा बघण्यासाठी निविदाधारकाला काही रक्कम अदा करावी लागेल किंवा कसे? तसेच निविदा विक्री व्यतिरिक्त मक्तेदाराला काही रक्कम अदा केली जाते अगर कसे, याची खात्री उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यावरून होवू शकली नाही. तसेच निविदाधारकाला टप्पानिहाय किती रक्कम अदा करावी लागते, याची माहिती उपलब्ध झालेली नाही.

10. सदर कामासाठी वेगळयाने Payment Gateway विकसित केले किंवा कसे याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

11. निविदा विक्रीमधून प्राप्त होणा-या महसुलाकरिता स्वंतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक होते, परंतू तशी स्वतंत्र नोंदवही परिरक्षित केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेला प्राप्त महसूल व झालेला खर्च यांचा ताळमेळ घेता आला नाही. ऑनलाईन निविदा फॉर्म फी स्विकारणेकरीता मनपाने आसीआयसीआय बँकेत खाते क्रमांक 002705013086 उघडले असून, त्यामध्ये सदर रक्कम जमा होते, सदर खात्यात जमा झालेली रक्कम ही मनपा निधी मध्ये वर्ग होणे आवश्यक आहे, परंतू बँक स्टेटमेंट उपलब्ध न झाल्याने उक्त खात्यामधून निधी वर्ग झाला अगर कसे, याची पडताळणी होवू शकली नाही. तसेच खात्यात जमा असलेल्या रकमेवर किती व्याज मिळाले याची माहिती होवू शकली नाही.

12. तसेच निविदा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदरच्या आज्ञावलीचा मालकी हक्क हस्तांतरीत होणे आवश्यक आहे, परंतू याबाबतची माहिती उपलब्ध होवू झालेली नाही.

146 विधी विभागामध्ये मंजूर तरतुदीपेक्षा कमी / अत्यल्प खर्च केल्याने झालेली अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेच्या विधी विभागामध्ये मंजूर तरतुदीपेक्षा कमी / अत्यल्प खर्च वजावट नोंदवहीत नोंदविलेला आहे. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अन्वये अंदाजपत्रक तयार करताना अंदाजित रकमा या शक्यतोवर प्रत्यक्ष रकमा इतक्याच असणे आवश्यक असताना मागील 4 वर्षामधील खर्चाच्या सरासरीचा प्रत्यक्ष अंदाज न घेता अनावश्यक तरतुदी करुन चुकीचा अंदाजपत्रक सादर केलेला आहे. अंदाजपत्रकात सन 2014-15 साठी 1,25,00,000/- एवढया मोठया निधीची तरतूद करण्यात आली असता प्रत्यक्ष खर्च कमी करण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेतील विधी विभागाचे सन 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणावेळी अंदाजपत्रक आणि वजावट नोंदवही तपासली असता, त्यामध्ये मंजूर तरतुदीपेक्षा कमी / अत्यल्प खर्च नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 214-15 मधील मंजूर अनुदान व झालेला खर्च याचा तपशील.						
अ.क्र.	आर्थिक वर्ष	संगणक सांकेतांक	बाब	मंजूर अनुदान	झालेला खर्च	तफावत
1	2011 - 2012	2344	दावे व खटले या लेखाशिर्षा अंतर्गत	7300000	3979828	3320172
2	2012 - 2013			10500000	4127060	6372940
3	2013 - 2014			10000000	4854105	5145895
4	2014 - 2015			12500000	9389267	3110733

1) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अन्वये अर्थसंकल्पातील खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना अंदाजित रकमा या शक्यतोवर प्रत्यक्ष रकमा इतक्याच असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंदाज प्रत्यक्ष रकमांच्या जास्तीत जास्त नजिकचे असावेत. दावे व खटले या बाबीवर योग्य मंजूरी अन्वये त्या त्या वर्षात प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करणे अपेक्षित व शक्य आहे त्याच्या आधारे तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि मागील 4 वर्षामधील खर्चाच्या सरासरीचा प्रत्यक्ष अंदाज न घेता अनावश्यक तरतुदी करुन चुकीचा अंदाजपत्रक सादर करण्याची अनियमितता झालेली आहे.

2) सन 2014-15 मध्ये रु. 31,10,733/- कमी खर्च करणेत आला. आवश्यकता नसताना अंदाजपत्रकात सन 2014-15 साठी 1,25,00,000/- एवढया मोठया निधीची तरतूद करण्याबाबतचे प्रयोजन दिसून येत नाही. जर निधीची आवश्यकता होती तर प्रत्यक्षात खर्च का केला गेला नाही.

3) उपरोक्त आर्थिक वर्षातील शिल्लक निधी पाहाता दुसऱ्या विभागासाठी शिल्लक निधीची सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करता आली असती तरी उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर करावे.

FDSRKNM8201 (Ref No : 34, Hmm No : 105)

147 वकील फी करीता दिलेल्या अग्रिमाचे समायोजन करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1500000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1500000.00/-

नाशिक महानगरपालिकेतील विधी विभागात ॲड श्री.शिवाजी एम.जाधव, मनपा वकील, मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांना महानगरपालिकेतर्फे कामकाज पाहण्याकरीता रक्कम रु.15,00,000/- अग्रिम अदा केलेले आहे. त्याबाबतचे त्यांचे मागणीपत्र नस्तीमध्ये आढळून आलेले नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 तसेच संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रमांक 35 दिनांक.03/01/2006 नुसार अग्रीम देण्याची कोणतीही तरतूद नसताना असे अग्रिम नियमबाहयपणे प्रदान करण्यात आलेले आहे.

नाशिक महानगर पालिकेच्या विधी विभागाचे लेखापरीक्षण केले असता सन 2014-2015 या आर्थिक वर्षात ॲड श्री.शिवाजी एम.जाधव, मनपा वकील, मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांना SLP(C) No.13730/2014 व 13771/2014 श्री.संजय उत्तमराव चव्हाण व कोमल प्रताप मेहरोलिया विरुध्द नाशिक महानगरपालिका नाशिक यात नाशिक महानगरपालिकेतर्फे कामकाज पाहण्याकरीता अग्रीम फी ची मागणी केलेली आहे. परंतु श्री जाधव यांचा अग्रिम वकील फी मिळण्याबाबतचे पत्र नस्तीमध्ये दिसून येत नाही.

मा. आयुक्त यांचे आदेश क्रमांक 24 दिनांक: 21/05/2014 नुसार वकील फी पोटी रक्कम रुपये 15,00,000/- चा भारतीय स्टेट बँकेचा चेक क्रमांक 916415 दिनांक : 31/05/2014 अन्वये आगाऊ अनामत रक्कम अग्रिम म्हणून ॲड. जाधव यांना अदा केलेले आहे.

याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 तसेच संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रमांक - 35 दिनांक.03/01/2006 नुसार अग्रीम देण्याची कोणतीही तरतूद नसताना व असे अग्रीम प्रदान होणार नाही याबाबत दक्षता घ्यावयाची असताना उपरोक्त प्रमाणे नियमबाहयपणे अग्रीम देण्याची अनियमितता झालेली आहे.

2) माहे मार्च - 2015 अखेरपर्यंत अग्रीमाचे समायोजन झालेले नाही अथवा वसुलीही करण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेची मोठी रक्कम लेख्याबाहेर राहण्याची अनियमितता झालेली आहे. तरी याबाबत

प्राधान्याने पाठपुरावा होऊन अग्रीमाचे समायोजन करणे आवश्यक आहे.

3) अग्रीम रक्कम वसुलीसाठी स्थायी निर्देश क्रमांक - 35 नुसार 15 दिवसात अग्रीमाची रक्कम महानगरपालिकेकडे जमा न केल्यास विहीत दराने निर्देशित केलेल्या व्याज रकमेसह सदरची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

तरी नियमबाहयपणे प्रदान झालेली अग्रीम रक्कम रुपये 15,00,000/- संबंधितांकडून समायोजित अथवा वसुल करुन घेणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 35, Hmm No : 106)

148 महानगरपालिका वर्धापनदिनानिमित्त करण्यात आलेल्या खर्चातील उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1033871.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1033871.00/-

नाशिक महानगरपालिकेच्या वर्धापनदिन व गणोशोत्सव पारितोषिक वितरण सोहळयानिमित्त क्रीडा विभागाच्या लेखाशिर्षातून रक्कम रुपये 3,47,105/- रकमेचे साहीत्य विनानिविदा बाजारभावाप्रमाणे खरेदी केलेले आहे. दिनांक 22/02/2008 च्या शासन अधिसुचनेनुसार महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या वार्षिक समारंभप्रित्यर्थ खर्चाची वार्षिक मर्यादा रक्कम रू5,00,000/- इतकी करण्यात आली असताना माहिती व जनसंपर्क विभाग, नगरसचिव विभाग व क्रीडा विभाग असे तिन्ही विभागातून रक्कम रू10,33,871/- एवढा खर्च केलेला आहे. उपरोक्त खर्च हा माहिती व जनसंपर्क विभागाचा असून तो क्रिडा विभागाच्या लेखाशिर्षातून चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेला आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या आर्थिक वर्षात दि.07 नोव्हेंबर 2014 रोजी महानगरपालिकेचा 32 वा वर्धापन दिन व गणोशोत्सव पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आले होते.

अ.क्र	आदेश क्रमांक	कंत्राटदाराचे नाव	साहीत्याचा तपशील	रक्कम रुपये

1	मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक. 323 दि. 30/06/2015 देयक क्रमांक. 951 दि.06/11/2014	आझाद मजूर व बांधकाम सहकारी संस्था	स्मृतिचिन्ह, फ्रेम, प्रमाणपत्र, कलर प्रिंट लॅमिनेशन, बॅचेस	235700
2	मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक. 323 दि. 30/06/2015 देयक क्रमांक. 21 दि.09/11/2014	सेलीब्रेशन इव्हेंन्ट्स	बुके, शाल, नारळ, तोरणमाळ, रांगोळी, पाणीबॉटल,चहा / कॉफी	111405
			एकूण	347105

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) आझाद मजूर व बांधकाम सहकारी संस्था यांना ई - कोटेशन घेऊन काम करण्यास आदेशित केलेले आहेत. परंतू सदरचा खर्च हा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र.भाखंस-1088 /2512/उद्योग-6 दिनांक.02/01/1992 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारणा 2013 मधील अनुसूची "ड" प्रकरण 5(2) नुसार करणे आवश्यक होते. दि.02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार खरेदीची एकाच वेळची किंवा वार्षिक मर्यादा रक्कम रुपये 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त) पेक्षा जास्त असेल तेंव्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. खरेदीचे स्पर्धात्मक, तुलनात्मक व वाजवी दर उपलब्ध व्हावेत हा निविदेमागील उद्देश असतो तसे न केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

2) अ.क्र. 2 मधील बुके, शाल, नारळ, तोरणमाळ, रांगोळी, पाणी बॉटल, चहा व कॉफी या साहित्यावर रक्कम रुपये 1,11,405/- एवढा खर्च विना दरपत्रके व विना निविदा बाजारभावाप्रमाणे मा.आयुक्तांच्या अधिकारात केलेला आहे. सदरचा खर्च हा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागवून करणे अपेक्षित होते. तसे न केल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

3) शासन अधिसुचना क्र.1007/प्र.क्र.376/नवि-26, दिनांक 22/02/2008 नुसार व महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमामधील कलम क्रमांक 66(41) अन्वये महानगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या वार्षिक समारंभप्रित्यर्थ खर्चाची वार्षिक रक्कम रू.5,00,000/- इतकी करण्यात आली आहे. परंतू माहिती व जनसंपर्क विभागाने सभा/सभारंभासाठी रक्कम रूपये 2,11,396/- खर्च केला आहे, नगरसचिव विभागाने याच प्रयोजनाकरीता आकस्मिक खर्चातून रक्कम रूपये 4,75,370/- खर्च केला आहे व क्रिडा विभागाने सुध्दा वार्षिक समारंभप्रित्यर्थ रक्कम रुपये 3,47,105/- खर्च केलेला आहे. असे नाशिक महानगरपालिकेने सन 2014-2015 या कालावधीत एकूण रक्कम रू.10,33,871/-- एवढा खर्च केला आहे. नाशिक महानगरपालिकेने सदर शासन अधिसूचनेची अंमलबजावणी न केल्यामुळे सभा/सभरंभाकरिता रक्कम रू.5,33,871/- एवढा जादा खर्च केलेला आहे.

4) सदर कामासाठी करारनामा करण्यात आलेला नाही त्यामुळे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 63 परिच्छेद क्रमांक 1 नुसार रक्कम रुपये 100/- इतक्या शासकीय मुद्रांक रकमेचे नुकसान झालेले आहे. सदर

रक्कम वसुलपात्र असून पुरवठाधारकांकडून वसूल करुन शासन जमा करावी.

5) सदरचा खर्च माहिती व जनसंपर्क विभागाचा असून तो क्रिडा विभागाच्या लेखाशिर्षातून करण्यात आलेला आहे. सदरचा खर्च हा चुकीच्या पध्दतीने केलेला आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 36, Hmm No : 124)

149 क्रिडा क्षेत्रावर महसूली उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम खर्च न करण्याची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख् या : 0

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नगरविकास विभागाच्या दि.09/03/1998 च्या परीपत्रकान्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधनकारक असताना एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रुपये 272,92,28,000/- असून क्रिडा विभागासाठी 5 टक्के रक्कम रु.13,64,61,400/- राखून ठेवणे आवश्यक असताना महानगरपालिकेने रक्कम रु.5,60,00,000/- एवढीच तरतूद केलेली आहे. तसेच क्रिडा विभागाने सदर कालावधीत रक्कम रु.13,25,919/- एवढाच खर्च केलेला आहे.

नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन-1098/प्र.क्र.21/98/नवि-24, मंत्रालय, मुंबई दि.09/03/1998 अन्वये महानगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी किमान 5 टक्के खर्च क्रिडाक्षेत्रासाठी करावे असे बंधनकारक आहे.

महानगरपालिकाचे सन 2014-15 या कालावधीत एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रुपये 272,92,28,000/- असून क्रिडा विभागासाठी 5 टक्के रक्कम रु.13,64,61,400/-राखून ठेवणे आवश्यक असताना महानगरपालिकेने रक्कम रु.5,60,00,000/- एवढीच तरतूद केलेली आहे. तसेच क्रिडा विभागाने सदर कालावधीत रक्कम रु.13,25,919/- एवढाच खर्च केलेला आहे. नाशिक महानगरपालिकेने क्रिडा क्षेत्रासाठी विविध लेखा शिर्षामधून खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	तरतूद रक्कम (रुपये)	झालेला खर्च (रुपये)
1	महापौर चषक	25000000	------
2	क्रिडा साहीत्य व सांस्कृतिक कार्यक्रम / लोक	6000000	1325919

	शिक्षण व क्रिडा स्पर्धा		
3	क्रिडांगणे दुरुस्ती	10000000	------
4	जॉगींग ट्रक दुरुस्ती	10000000	-----
5	कर्मचारी क्रिडा स्पर्धा	5000000	-----
		56000000	1325919

उपरोक्त वर्षामध्ये 5 टक्के विहित करण्यात आलेला निधी केवळ योजना न राबविल्यामुळे शिल्लक राहिल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर योजना प्रत्येक वर्षात प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

FDSRKNM8201 (Ref No : 37, Hmm No : 129)

150 निवडणूक कामी दिलेल्या अग्रीमाच्या समायोजनातील उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 18064.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18064.00/-

नाशिक महानगरपालिकेच्या नाशिक रोड येथील प्रभाग क्रमांक 61 अ च्या पोटनिवडणूकीकामी लागणारे स्टेशनरी, चहापान व इतर अनुषंगिक खर्चाकरीता श्री.एम.टी.आंबेकर, अधीक्षक यांना रक्कम रुपये 18,064/- इतक्या रकमेचे अग्रिम देण्यात आले असताना श्री.आंबेकर यांनी बीलांच्या प्रती सादर केलेल्या नाहीत. अग्रिम मंजुरीची टिपणी नस्ती मध्ये दिसून येत नाही तसेच अग्रिम मंजुरीबाबत मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या नाशिक रोड येथील प्रभाग क्रमांक - 61 अ च्या पोटनिवडणूकीकामी लागणारे स्टेशनरी, चहापान व इतर अनुषंगिक खर्चाकरीता महानगरपालिका आदेश क्रमांक -13 दिनांक.21/06/2014 अन्वये श्री.एम.टी.आंबेकर, अधीक्षक यांचे नावे प्रमाणक क्रमांक - 1292 दिनांक.24/06/2014 अन्वये रक्कम रुपये 10,000/- चे अग्रिम देण्यात आले होते.

श्री.एम.टी.आंबेकर, अधीक्षक यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आदेशान्वये दि.03/06/2014 ते

दि.30/06/2014 अखेर रक्कम रुपये 18,064/- इतका खर्च केलेला आहे. उपरोक्त अग्रिमापेक्षा जादा खर्च झाल्याकारणाने रक्कम रुपये 10,000/- चे समायोजन करुन उर्वरित रक्कम रुपये 8,064/- श्री.आंबेकर यांना अदा करणेत आलेले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सदर नस्ती सोबत रक्कम रुपये 18,064/- ची अदा केलेली बीलांची प्रत दिसून येत नाही त्यामुळे ज्या कारणांसाठी अग्रीमाची रक्काम दिली आहे त्याच कारणासाठी सदरची अग्रिम रक्कम खर्च झाली किंवा कसे याचा बोध होत नाही.

2) नस्तीमध्ये अग्रिम मंजुरीची टिपणी दिसून येत नाही तसेच संबंधित कर्मचाऱ्याला अग्रीम देण्याबाबत मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आल्याबाबत दिसून आले नाही.

3) बिलांचा तपशील (DETAIL) नसल्याने सदरचा खर्च कसा व कोणत्या बाबींवर करण्यात आला याचा बोध होत नाही.

4) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 2011 मधील नियम 243 नुसार दिलेल्या अग्रिमाची वसुली तात्काळ किंवा अग्रिम दिल्याचे तारखेपासून शक्य तितक्या लवकर करावयाची आहे. त्या कालावधीत अग्रिमाचे समायोजन न झाल्यास लेखा प्रमुख त्याची नोंद घेईल आणि अग्रिमाचे समायोजन करण्याबाबत संबंधितांना आदेशित करतील असे असताना समायोजनाची कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

FDSRKNM8201 (Ref No : 38, Hmm No : 135)

151 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनुदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

सन 2014-15 या वर्षात सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना संपुष्टात आली असून त्याऐवजी राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची (National Urban Livelihoods Mission) अंमलबजावणी करण्यात आलेली आहे त्याअनुषंगाने संबंधित दस्तऐजवजे, मुळ नस्त्या, बँक पासबुक, देयक नोंदवही, देयके, प्रमाणके व वजावट नोंदवही लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही त्यामुळे सदर योजनेचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षातील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे लेखापरीक्षण केले असता नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.एनयुएल-2014/प्र.क्र.104/नवि-33, मंत्रालय दिनांक- 28 ऑगस्ट 2014 अन्वये केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना दि.01/04/2014 पासून संपुष्टात आली असून त्याऐवजी राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची (National Urban Livelihoods Mission) अंमलबजावणी करण्यात आली असून उपसंचालक, नगरपरीषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांच्या दि.29 नोव्हेंबर 2014 च्या पत्रान्वये शिल्लक निधी नवीन बँक खात्यात वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सन 2014-15 या आर्थिक वर्षात नाशिक महानगरपालिकेत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची (National Urban Livelihoods Mission) अंमलबजावणी करण्यात आली असून त्याबाबतची संबंधित दस्ताऐवजे व मुळ नस्त्या लेखापरीक्षण पथकास वारंवार मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

2) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअतंर्गत सन 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर बँक पासबुकानुसार रक्कम रु.90,70,198.84/- इतका निधी शिल्लक असून सन 2014-15 मध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत सदरचा निधी नवीन बँक खात्यात वर्ग करण्याबाबत कोणतीही दस्तऐवजे, बँक पासबुक इत्यादी लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत. तसेच सदरचा निधी कशा प्रकारे खर्च करण्यात आला याबाबत खर्चासंबंधी देयक नोंदवही, देयके, प्रमाणके, खर्चासंबंधी मुळ नस्ती व वजावट नोंदवही इत्यादी दस्ताऐवजे व नोंदवहया लेखापरीक्षण पथकास उपलब्ध न झाल्याने या कालावधीतील झालेल्या खर्चाबाबत / निधीच्या विनियोगाबाबत कोणतीही खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे त्याचे पालन झालेले नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक - 180 दिनांक - 24/11/2016 अन्वये विचारणा करण्यात आली असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

FDSRKNM8201 (Ref No : 40, Hmm No : 180)

152 सर्व्हे क्रमांक 73 30 मीटर डी.पी.रोड मखमलाबाद रोड ते मार्केट कमिटी भूसंपादन प्रस्ताव.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

भूसंपादन करताना बाग, फळझाडे यांचे मुल्यांकन दर ठरविण्याबाबत भूसंपादन अधिकारी यांचे पत्रात दराबाबत वर्ष नमूद नाही, तसेच विहिर संपादनाबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्रातही दराबाबत वर्ष नमूद नाही. दर निश्चितीबाबत कोणतीही माहिती नस्तीत नमूद नाही.

नाशिक महानगरपालिकेचे भुसंपादन प्रकरणांची पडताळणी करताना पुढील उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1) सर्व्हे क्रमांक 70 ते 73 मधील बाग, फळझाडे यांचे मुल्यांकन दर ठरविण्याबाबत विशेष भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.एलएसओ/वशि/756/2013 दिनांक 26/09/2013 नुसार कळविण्यात आले होते परंतु दराबाबत वर्ष त्यात नमूद केलेले नव्हते.

2) त्याचप्रमाणे विहीर संपादनाबाबत कार्यकारी अभियंता नाशिक यांना मुल्यांकन दर ठरविणेबाबत विशेष भूसंपादन अधिकारी दि.29/03/2008 च्या पत्रान्वये कळविण्यात आले. परंतु दराबाबत त्यात काहीही उल्लेख नाही.

3) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना बांधकामाचे मुल्यांकन करणेबाबत (श्री.शिवाजी कचरु मंडलिक व इतर आठ) विशेष भुसंपादन अधिकारी क्रमांक 2 यांचे दि.26/03/2004 चे पत्रान्वये कळविण्यात आले परंतु त्यात दराबाबत वर्ष नमूद नाही. बांधकामाचे मुल्यांकन रेडीरेकनर दर 14 धरुन किंमत रक्कम रुपये 5,95,511/- दर्शविल्याचे दिसून येते.

उपरोक्त तीन्ही प्रकरणेबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही व नस्तीमध्ये त्याअनुषंगाने दस्ताऐवजही उपलब्ध झालेले नाहीत.

MINVAJM6901 (Ref No : 44, Hmm No : 107)

153 मौ.नाशिक सर्व्हे क्र.771 व 778 पैकी 30 मीटर डी.पी.रोडसाठीचा भूसंपादन प्रस्ताव (मनोहर नगर ते उंटवाडी रोड) - 9450 चौ.मीटर.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

भूसंपादन प्रकरणी 7/12 उताऱ्यास महानगरपालिकेचे नाव लावून उतारा प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते, स्थायी समितीच्या मंजूरीनंतर भूसंपादन रक्कम विलंबाने अदा करण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेचे मौ.नाशिक सर्व्हे क्र.771 व 778 पैकी 30 मीटर डी.पी.रोडसाठीचा भूसंपादन प्रस्ताव (मनोहर नगर ते उंटवाडी रोड) - 9450 चौ.मीटर. बाबतची पडताळणी करताना पुढील उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1) मनोहर नगर ते उंटवाडी रोड भूसंपादन प्रकरणी दि.06/10/2005 रोजी वाटाघाटीने भूसंपादन करणेबाबत सर्वसंबंधितांची बैठक झाली त्यानंतर दि.13/02/2006 रोजी रक्कम रु.100 च्या स्टॅम्प पेपरवर (क्रमांक 882825) संमतीपत्र विलंबाने घेण्यात आले. त्यावर दि.06/10/2005 च्या सभेबाबत उल्लेख नाही. स्टॅम्प विक्रेते श्री.बागड असोसिएट्स क्रमांक 2279 दिनांक 02/01/2006 ची नोंद असून संमतीपत्रबाबत दि.-/-/2006 नमूद आहे.

2) ॲड. श्री.सुधिर एस.कोतवाल यांचे दि.03/04/2006 चे टायटल रिपोर्ट मध्ये एरीयर्स ऑफ हाऊस टॅक्स रक्कम रुपये 2,05,375/- दर्शविला असून याबाबत कोणतीही माहिती पडताळणीवेळी उपलब्ध झालेली नाही. सर्व्हे नं.771 वरुन उर्वरित क्षेत्राचे भूसंपादनाची 2/3 रक्कम रु.75,83,000/- अदा करणेबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 1523 दिनांक 29/05/2004 रोजी झाला. परंतु याबाबत मंजूरी आदेश क्र.753 दिनांक.18/07/2008 रोजी विलंबाने झाल्याचे दिसून आले. सदरील आदेशानुसार धनादेश क्रमांक 443357 दि.10/08/2008 हा मिळकत व्यवस्थापक यांनी त्यांचे दि.16/08/2008 चे पत्रान्वये विशेष भू-संपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांना पाठविले. मंजूरीनंतरही धनादेश हस्तांतरणाबाबत विलंबाने कार्यवाही झाल्याचे दिसून येते.

3) भू-संपादनाबाबत विहीत नमुन्यातील फॉर्मवर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या स्वाक्षरी नाहीत. 7/12 उताराला मालकी हक्क सदरी महानगरपालिकेचे नाव लागणेबाबत मिळकत व्यवस्थापक यांनी तलाठी नाशिक यांना पत्र क्रमांक. मि.व्य.वि./वशि/कक्ष-4/366/15 दिनांक.08/04/2015 नुसार कळविले परंतु नस्तीस 7/12 उतारा दिसून येत नाही व कोणतीही माहिती मिळत नाही. त्यामुळे 7/12 उतारा प्राप्त झाला नसावा असे वाटते. तसेच याबाबत कोणताही पाठपुरावा झाल्याचे दिसून येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 45, Hmm No : 108)

154 नाशिक सर्व्हे क्रमांक 166 भूसंपादन प्रस्ताव 30 मीटर डी.पी.रोड - गुंजाळ मळा.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

भूसंपादन अधिकारी यांनी वारंवार कळवूनही भूसंपादन रक्कम अदा होणेबाबत विलंबाने कार्यवाही झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. विशेष भूसंपादन अधिकारी यांचे पत्रानुसार विहिर मुल्यांकन दर 2013-2014 ऐवजी 2011-2012 चे दर घेवून निश्चित न करता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर सूची 2012-2013 नुसार निश्चित केले आहेत.

नाशिक महानगरपालिकेचे सर्व्हे क्रमांक 166 भूसंपादन प्रस्ताव 30 मीटर डी.पी.रोड - गुंजाळ मळा. बाबतची पडताळणी करताना पुढील उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1) 30 मीटर डी.पी. रोड (गुंजाळ मळा) बाबत भूसंपादन करण्यासाठी विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांनी पत्र क्र.विभुसंअक्र.2/केस नं.15/05/कावि/411/2008 दिनांक.10/07/2008 अन्वये रक्कम रुपये 1,53,75,000/- जमा करणेबाबत महानगरपालिकेस कळविले. त्यास दिनांक 22/07/2009 रोजी स्मरणपत्र पाठविले. सभा क्रमांक 2, विषय क्रमांक 50 व ठराव क्रमांक 50 दिनांक 26/12/2008 नुसार रक्कम रुपये 1,53,75,000/- चे खर्चास मंजूरी दिलेली होती. याबाबतचे मंजूरी आदेश क्रमांक 2836 दिनांक 02/07/2009 रोजी निर्गमित झालेले होते. बिल दिनांक 02/07/2009 रोजीस सादर करण्यात येऊन त्याबाबत दि.29/09/2009, 13/01/2010, 15/02/2010 व दि.16/04/2010 रोजी लेखा शाखेस कळविण्यात आले. स्मरणपत्र किमतीत वाढ होण्याच्या शक्यतेबाबतही कळविण्यात आले होते. त्यानंतर धनादेश क्रमांक 835992 दि.19/04/2010 रक्कम रु.1,53,75,000/- दि.28/04/2010 च्या पत्रान्वये मिळकत व्यवस्थापक यांनी विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांना विलंबाने सादर केले गेले. विविध ठीकाणी झालेल्या विलंबाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. 2) सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे दि.21/06/2014 च्या टिपणीवरुन विहीर बांधकाम मुल्यांकन महाराष्ट्र जीवन प्राधिकारण दरसूची 2012-13 नुसार रुपये 7,58,723/- केल्याचे दिसून येते. विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक 2 यांचे पत्र क्रमांक विभुसंअक्र.2/केस नं.15/05/कावि/415/14 दिनांक.01/12/2014 नुसार विहीर मुल्यांकन 2013-14 ऐवजी 2011-12 चे दर घेऊन कळविण्याबाबत विनंती केली होती. याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

MINVAJM6901 (Ref No : 46, Hmm No : 109)

155 वकील फी बाबत.- गंगापूर शिवार सर्व्हे क्र. 2 व 3 - भुयारी गटार योजना.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 10

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1700000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1700000.00/-

भूसंपादन प्रकरणात वकीलांची मागणी, मंजूरी, कामाचे स्वरूप, करार इत्यादीबाबत कोणतीही माहिती नस्तीस नसून मोठया प्रमाणात अग्रीम रकमा वकीलांना प्रदान केल्याचे दिसून येते. अग्रीम समायोजनाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. आयकर कपातीबाबत कोणतीही एकवाक्यता नाही. श्री. साळवे यांच्यासाठी रूपये 10 लक्ष अग्रीम रक्कम श्री.जाधव यांना अदा केली आहे. वकील फी दर निश्चितीबाबत लावलेले निकषांबाबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

गंगापूर शिवार सर्व्हे क्र .2 व 3 भुयारी गटार योजना भुसंपादन प्रकरणात न्यायालयीन दाव्याच्या कारणाने खालील नमूद केल्याप्रमाणे वकील फी अदा केल्याचे दिसून येते.

ॲडव्होकेट श्री .शिवाजी एम जाधव यांना व्यवसायिक फी म्हणून रक्कम रुपये 60,000/- व सुनावणीस हजेरीसाठी रक्कम रुपये 30,000/- (आदेश क्रमांक 1531 दिनांक 08/03/2013) तर ॲडव्होकेट श्री .हरीष एन साळवे यांना SLP दाखल करण्यास रक्कम रुपये 5,00,000/- (आदेश क्रमांक 1531 दि.08/03/2013) मंजूर करण्यात आले. श्री.साळवे यांचा आयकर कपात करुन उर्वरित रक्कम धनादेश क्रमांक 886312 दि.11/03/2013 रक्कम रुपये 4,50,000/- श्री.जाधव यांना देण्यात आले.

आदेश क्रमांक 499 दि.09/07/2013 नुसार ॲडव्होकेट श्री .शिवाजी एम जाधव यांना कॉन्फरन्स (रु.75,000/-) ड्रॉप्फटींग SLP (20,000/-) सुनावणी फी (45,000/-) इतर खर्च (25,000/-) याप्रमाणे रक्कम रुपये 1,65,000/- तर ॲडव्होकेट श्री .एम.एल.पाटील यांना प्रवास कॉन्फरन्स व इतर खर्चासाठी रक्कम रुपये 67,353/- याप्रमाणे एकूण रक्कम रुपये 2,32,353/- मंजूर करण्यात आले . आयकर कपातीची कार्यवाही करुन श्री.एम.एल.पाटील यांना धनादेश क्रमांक 893544 दिनांक 12/07/2013 रक्कम रुपये 60,818/- व श्री.शिवाजी एम.जाधव यांना धनादेश क्रमांक 893543 दि.12/07/2013 रक्कम रुपये 1,48,500/- देण्यात आले.

आदेश क्रमांक 502 दि.09/07/2013 नुसार ॲडव्होकेट श्री .शिवाजी एम .जाधव यांना रक्कम रुपये 7,00,000/- ॲडव्हान्स मंजूर करण्यात आला . 10 टक्के आयकर कपातीची कार्यवाही करुन रु .6,30,000/- श्री.जाधव यांना अदा करण्यात आले.

आदेश क्रमांक 921 दि.23/09/20013 नुसार ॲडव्होकेट हरीष एन .साळवे यांना रक्कम रुपये 10,00,000/- मंजूर करण्यात आले .(11174/2012, SLPNo.975/2013) 10 टक्के आयकर कपातीची कार्यवाही करुन रक्कम रुपये 9,00,000/- चा धनादेश क्रमांक 90050 दि.25/09/2013 श्री.जाधव यांना अदा करण्यात आला . रक्कम रुपये 10,00,000/- श्री.साळवे यांच्यासाठी मिळण्याची मागणी श्री .जाधव यांनी केल्याचे व सदरील रक्कम श्री.जाधव यांना अदा केल्याचे दिसून येते.

उपरोक्त नमूद प्रकरणी खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येतात.

1) वकीलांचे करारनामे केल्याचे दिसून येत नाही.

2) वकीलांचे मागणी पत्र नस्तीस दिसून येत नाही

3) श्री.जाधव यांनी रक्कम रुपये 10,00,000/-ची मागणी श्री .साळवे यांच्यासाठी केल्याचे व रक्कम श्री .जाधव यांना अदा केल्याचे दिसून येते याची प्रयोजन कळत नाही.

4) वकीलांचे दर निश्चिती व त्यांनी केलेले काम याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र दिलेले नाही.

5) शुल्क ठरविताना कोणते निकष लावलेत . मंजूर दराचे निर्धारण कोणत्या पध्दतीने केले याबाबत तपशील उपलब्ध झाले नाहीत. मंजूर दर, वाजवी व किफायतशीर असल्याचे खात्री करता आली नाही.

6) ॲडव्हान्स म्हणून रक्कम रुपये 7,00,000/- मंजूर करणेबाबत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही.

7) रक्कम रुपये 7,00,000/- व रक्कम रुपये 10,00,000/- अदा करताना आयकर कायदयानुसार आयकर कपातीची कार्यवाही झालेली नाही.

8) वकीलांचे पॅन क्रमांक घेतल्याचे दिसून येत नाही . आयकर कपातीच्या रकमा चलनाद्वारे आयकर खात्यास जमा केल्याबाबतची माहिती / दस्ताऐवजे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

9) नियमानुसार सेवाशुल्क वसुलीबाबत काय कार्यवाही केली याची कोणताही तपशील उपलब्ध झाला नाही.

10) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 5 अनुसुची ड नुसार दरपत्रके / निविदा संबंधित कायदेतज्ञाकडून मागविणे आवश्यक होते . नियमानुसार कार्यवाही झाली नाही त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झाला नाही असे दिसून येते.

MINVAJM6901 (Ref No : 47, Hmm No : 110)

156 भुसंपादन प्रकरणी आढळून आलेल्या उणीवांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

भूसंपादन प्रकीया पूर्ण झाल्यावर 7/12 उताऱ्यास महानगरपालिकेचे नाव लावून 7/12 उतारा प्राप्त करण्याबाबत

कार्यवाही केलेली नाही. भूसंपादन प्रकरणात अंतर्गत पत्रव्यवहार / अभिप्राय यामुळे 3 टक्के द.सा.द.शे. अतिरिक्त घटकाची रक्कम अदा करावी लागल्याने मोठया प्रमाणावर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. विशेष भूसंपादन अधिकारी यांना धनादेश पाठविताना आयकर कपातीची कार्यवाही करण्याबाबत स्पष्टपणे कळविणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे निवडक भुसंपान प्रकरणांची पडताळणी करताना खालील उणीवा निदर्शनास आल्या आहेत.

1) भुसंपादनाची प्रक्रिया झाल्यानंतर 7/12 उता-यास महानगरपालिकेचे नाव लावण्याबाबत व उतार प्राप्त करून घेण्याबाबत कार्यवाही होत नाही व याबाबत पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. सर्वच प्रकरणी असे घडले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा प्रकरणी भविष्यात दुबार प्रदान होण्याची शक्यता आहे.

2) भुसंपादन प्रकरणी महानगरपालिकेच्या अंतर्गत विभागांमध्ये जो पत्र व्यवहार केला जातो, त्यात विलंब होत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे द.सा.द.शे. 3 टक्के अतिरिक्त्ा घटकाची रक्कम अदा करावी लागत असल्याने सदरील रकमा खूप मोठया असल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. याबाबत कोणतीही दक्षता घेतली जात नाही. उदा. 30 मीटर डी.पी.रोड.-मखमलाबाद रोड ते मार्केट कमीटी - कोणत्याही स्वरूपाचा मोबदला न दिल्याचे खातरजमा व अभिप्रायाबाबत विशेष भुसंपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांनी त्यांचे दिनांक 07/05/2011 व स्मरणपत्र दिनांक 12/09/2011 नुसार महानगरपालिकेस कळविले, त्यावर मिळकत व्यवस्थापक यांनी दिनांक 16/05/2011, दिनांक 02/06/2011, दिनांक 28/07/2011, दिनांक 30/09/2011 रोजी पत्र/स्मरणपत्रे नगररचना विभागास पाठविले. सदरील माहिती विशेष भुसंपादन अधिकारी क्रमांक 2 नाशिक यांना दिनांक 13/01/2012 चे पत्रान्वये विलंबाने कळविण्यात आली.

3) नस्त्यामधील पत्रव्यवहार दिनांकानुसार लावला जात नाही, त्यामुळे एकूण क्षेत्र, टी.डी.आर, एफ.एस.आय. मोबदला रक्कम इत्यादीबाबत खात्री करता येत नाही.

4) विशेष भुसंपादन अधिकारी यांना धनादेश पाठविताना पत्रात आयकर कपातीबबात स्पष्टपणे नमूद केले जात नाही.

5) रक्कम अदा झाल्यावर धनादेशाची छायांकित प्रत नस्तीस जोडण्यात येत नाही.(उदा.धनादेश क्रमांक 927036, दिनांक 28/05/2014 रूपये 4 कोटी (मखमलाबाद ते मार्केट कमीटी रोड)

6) गंगापूर शिवार सर्वे न. 2, 3 भुयारी गटार योजना भुसंपादन प्रकरणात नमूद शासन निर्णय दिनांक 06/02/2003 अन्वये 7 टक्के सेवा शुल्क रूपये 1,49,45,800/- एकूण मागणी समाविष्ट केल्याचे दिसून येते याबाबतचा शासन निर्णय नस्तीस नाही. पडताळणी वेळी उपलब्ध झाला नाही व याबाबत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच शासनाचे संकेत स्थळावर सदर शासन निर्णय दिसून येत नाही. निवडक प्रकरणांची तपासणी करतेवेळी इतर प्रकरणांना असे सेवा शुल्क लावल्याचे दिसून येत नाही.

157 भांडार विभागातील नोंदवहयांतील उणीवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

देयक नोंदवही, वजावट नोंदवही, मागणी पुस्तके येथे सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. रदद केलेल्या मागणी पत्रावर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे भांडार विभागातील निवडक महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना नोंदवहयामध्ये पुढील उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

1)बील नोंदवहीत नोंदीवर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या/अदयाक्षरे नाहीत. नोंदवहीत रकान्यात नमूद केलेली माहिती भरली जात नाही.

2)वजावट नोंदवहीत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या स्वाक्षरी/अदयाक्षरे नाहीत.

3)भांडार विभगातील मागणी पुस्तक क्रमांक 264 येथील फॉर्म A 1 ते 45 येथे सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

4)भांडार विभागातील मागणी पुस्तक क्रमांक 264 फॉर्म A क्र. 20,24,45 रदद केल्याचे दिसते पंरतू रदद करण्याबाबत त्यावर सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

5)साठा नोंदवहयामध्ये ब-याच नोंदवहयावर पृष्ठे 200 पेक्षा कमी किंवा जास्त आहेत, परंतू शेवटी पृष्ठे 1 ते 200 असल्याचे प्रमाणित केलेले आहे.

MINVAJM6901 (Ref No : 49, Hmm No : 116)

158 मालमत्ता व मध्यवर्ती भांडार नोंदवहीतील उणीवांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

मध्यवर्ती साठा नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेली नाही. दरवर्षी नव्याने साठा नोंदवही केली जाते, जडसंग्रह साहित्यावर नामनिर्देशन केलेले नाही.

महानगरपालिकेतील सन 2014-2015 भांडार विभागाच्या निवडक महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना नोंदवहयांमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

1)नोंदवहीतील नोंदी (अ.क्र.1ते17) विहित नमुन्याप्रमाणे घेतल्या जात नाहीत. अ.क्र. 8 व 16 येथे अध्याक्षरी/स्वाक्षरी केली जात नाही.

2)दरवर्षी नव्याने नोंदवही केली जाते मध्यवर्ती नोंदवही नसल्याने एकूण संख्येबाबत (जमा, वापर, शिल्लक) खात्री करता येत नाही.

3)नोंदवहीत प्रत्यक्षात 108 पृष्ठे असूनही अखेरच्या पृष्ठावरील प्रमाणपत्रात पृष्ठ 1 ते 100 असल्याचे प्रमाणित केले आहे. ब-याच नोंदवहयामध्ये अशा त्रुटी निदर्शनास येतात.(उदा. ब 1 नोंदवही 1 ते 204)

4)भांडार विभागातील प्राप्त साहित्याच्या नोंदी संबंधित विभागीय कार्यालये/विभाग यांनी त्यांच्या नोंदवहीत नोंदी घेणे आवश्यक आहे.

5) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता यातील नमुना क्रमांक GEN 30 व 31 नुसार जंगम मालमत्ता नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आला असून त्याप्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 156 तसेच महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 95 ते 103 नुसार जडसंग्रह साहित्याची वार्षिक पडताळणी प्रत्येक वर्षी जून अखेर व इतर साहित्याची सहामाही पडताळणी सप्टेंबर व मार्च अखेर करणे आवश्यक आहे.

7) जडसंग्रह साहित्यावर नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

8) जुन्या साहित्याच्या निर्लेखनाबाबत कार्यवाही केली जात नाही.

MINVAJM6901 (Ref No : 50, Hmm No : 117)

159 छपाई खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 511715.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 511715.00/-

सन 2012-2013 साठी मंजूर असलेल्या जुन्या दराने छपाई खर्च सन 2014-2015 मध्ये करण्यात आलेला आहे. विविध फॉर्मसाठी सन 2011-2012 करिता मंजूर असलेल्या जुन्या दराने छपाई खर्च सन 2014-2015 मध्ये करण्यात आलेला आहे. अनुज्ञेय नसूनही पदाधिकारी/सदस्य यांचेसाठी लेटर हेड, पाकिटे, निमंत्रण् पत्रिका इत्यादीसाठी खर्च करण्यात आलेला आहे. एकत्रित साठा नोंदवही ठेवलेली नाही.

महानगरपालिकेच्या निवड महिन्याच्या देयकांची पडताळणी करताना छपाई विभागाने विविध विभागांना लागणारी स्टेशनरी साहित्याची छपाई निविदा पध्दतीने केलेल्या मंजूर दराने केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	देयक क्र./दिनांक	मंजूरी आदेश क्र./दिनांक	पुरवठादार	छपाईचा तपशील	रक्कम
1	47,दि.9/3/15	62,दि.4/6/14	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	कार्यालयीन स्टेशनरी	897
2	48,दि.9/3/15	607,दि.31/12/14	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	महापौर लेटर हेड मोठे लहान	27300
3	49,दि.9/3/15	311,दि.10/7/14	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	लेखा प्राक्लन रजिस्टर	4875
4	50,दि.9/3/15	11,दि.16/2/15	गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक	पंचवटी विभागीय कार्यालय उदघाटन निमंत्रण पत्रिका व पाकिटे	16750
5	51,दि.9/3/15	12,दि.16/2/15	गणेश एन्टरप्रायजेस,	एलबीटी रजिस्ट्रेशन फॉर्म, नोंदणी रदद प्रमाणपत्र	12763

			नाशिक		
6	52,दि.9/3/15	699,दि.9/2/15	मे.साई राजेश पेपर टच नाशिक	वॉटर मीटर देयक चलन, संगणकीय स्टेशनरी, मिळकत कर भरणा किर्द इ.	127100
7	53,दि.13/3/15	727,दि.24/2/15	मे.राका प्रिटंर्स नाशिक	अंदाजपत्रक (आयुक्त, स्थायी समिती, महासभा)	100156
8	54,दि.18/3/15	311,दि.10/7/14	मे.इंप्रिंट नाशिक	कालिदास आरक्षण नोंदवही,नगररचना बांधकाम परवानगी नोंदवही इ.	41813
9	55,दि.18/3/15	311,दि.10/7/14	मे.इंप्रिंट नाशिक	बिटको ॲडमीशन रजिस्टर, प्रवेश फी, जन्म अहवाल, मृत्यू फॉर्म, एक खिडकी जन्म दाखला इ.	61500
10	56,दि.18/3/15	10,दि.27/1/15	मे.राका प्रिटंर्स नाशिक	एक खिडकी जन्म दाखले, नावात बदल, जिजामाता इंन्डोर दाखले इ.	15750
11	57,दि.18/3/15	62,दि.4/6/14	मे.राका प्रिटंर्स नाशिक	अंबड घरपटटी नावात बदल जिजामाता दवाखाना इंन्डोर पेपर, पाणीपुरवठा टाकी लेवल रजिस्टर, मिटर दुरूस्ती फॉर्म, वैदयकीय फार्म,दवाखाना डिस्जार्ज रजिस्टर, तरणतलाव सभासद नोंद रजिस्टर इ.	21115
12	58,दि.18/3/15	12,दि.16/2/15	मे.राका प्रिटंर्स नाशिक	वैदयकीय नोंदणी फॉर्म इ.	1696
13	59,दि.30/3/15	515,दि.11/2/15	मे.साई राकेश	कार्यालयीन स्टेशनरी व	80000

			पेपर टच नाशिक	नोंदवहया इ.	
				एकूण	511715

उपरोक्त् छपाईबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ.क्र.1 बाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 46,दिनांक 12/7/2012 नुसार विविध पावती पुस्तके फॉर्म, रजिस्टर इत्यादी छपाई कामे सन 2012-2013 या वर्षाकरिता दर मंजूर होते व अ.क्र. 3, 5, 8,10 व 12 बाबत स्थायी समिती ठराव क्र.874,दिनांक 21/2/2014 नुसार पावती पुस्तके, फॉर्म, रजिस्टर, इत्यादी छपाईकामी सन 2013-2014 या वर्षाकरिता दर मंजूर होते. अ.क्र. 6 साठी स्थायी समिती ठराव क्र.65, दिनांक 28/4/11 नुसार सन 2011-2012 करिता विविध फॉर्म छपाईसाठी दर मंजूर होते, त्यामुळे पूर्वीच्याच मंजूर दराने छपाई ची कार्यवाही करण्यात आलेली आहे, याबाबत नव्याने कोणतीही मंजूरी घेतलेली नाही. आदेश क्र.62, 607, 727, 515 पडताळणीस उपलब्ध झालेले नाहीत, त्यामुळे त्यातील मंजूर दराबाबत खात्री करता आलेली नाही.

2) उपरोक्त् अ.क्र. 1 व 13 च्या नस्त्या पडताळणीस उपलब्ध न झाल्याने त्या अनुषंगाने छपाई खर्चाबाबत कोणतीही पडताळणी करता आलेली नाही.

3)पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार काम होण्याबाबत नस्तीमध्ये कोठेही सक्षम अधिका-याचे अभिप्राय नाहीत. त्याचप्रमाणे कागदाचा दर्जा आदेशात नमूद केल्याप्रमाणे आहे किंवा कसे याबाबत कोणतीही पडताळणी केल्याचे दिसून येत नाही.

4)छपाई साहित्याच्या नोंदी नोंदवहीत एकत्रित घेण्यात येत नाहीत, त्याप्रमाणे संबंधित विभागाने याबाबत नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. पंरतू अशी कार्यवाही केली जात नसल्याचे दिसून येते.

5) नस्तीसोबत छपाईच्या अनुषंगाने कोणतीही प्रमाणके लावली जात नाही. त्यामुळे प्रत्यक्ष छपाई त्यावरील शेरे, प्रदान रकमा, प्रमाणपत्र इत्यादी बाबत खात्री करता येत नाही.

6) देयक नोंदवहीतील नोंदवहीवर संबंधितांच्या स्वाक्ष-या/अध्यक्षांच्या स्वाक्ष-या नाहीत, ब-याच ठिकाणी खाडाखोड केलेले असून तेथे अदयाक्षरी नाही. नोंदवहयामध्ये पृष्ठांची संख्या कमी जास्त असूनही सरसकट 1 ते 200 पृष्ठे असल्याचे अखेरच्या पृष्ठावर प्रमाणिक केलेले आहे. (उदा. साठा एफ नोंदवही 1 ते 204)

7) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील 57 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे पालन झालेले दिसून येत नाही.

8) अ.क्र. 2 बाबतचा खर्च शासन निर्णय संकिर्ण - 2004/468/प्र.क्र. 84/4/नवि20, दिनांक 24/1/05 नुसार मानधनाच्या रकमेत लेखनसामुग्री, टपाल व दुरध्वनी खर्चाचा समावेश असल्याने सदरील खर्च अनुज्ञेय नाही.

MINVAJM6901 (Ref No : 51, Hmm No : 118)

160 बांधकाम परवाना संबंधातील माहिती उपलब्ध न केल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

पूर्णत्व प्रमाणपत्र विहित कालावधीत न घेतल्यास महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम 1949 चे कलम 150 (अ) कलम 267 अन्वये संबंधित मालमत्ताधारकांकडून कर वसूल करणे आवश्यक आहे

नाशिक महागनरपालिकेचे नगर रचना विभागाचे लेखापरीक्षण करताना खालील माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

1) नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करताना सन 2011-2012 ते 2014-2015 या कालावधीत दिलेल्या बांधकाम परवान्यांची संख्या व बांधकाम पूर्णत्वांची संख्या वर्ष निहाय उपलब्ध करून देण्याबाबत अर्ध समास पत्र क्रमांक 162 दिनांक 29.10.2016 नुसार कळविले होते, परंतू सदरील माहिती प्राप्त झालेली नाही.

2) विकास नियमावली 1986 नुसार बांधकाम परवान्याच्या दिनांकापासून तीन वर्ष वैध ठरतो, संबंधितांनी विहित कालावधीत प्रमाणपत्र घेतले नाही तर महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम 1949 चे कलम 150 (अ) कलम 267 अन्वये संबंधित मालमत्ताधारकांकडून कर वसूल करणे आवश्यक आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

MINVAJM6901 (Ref No : 70, Hmm No : 162)

161 नगररचना विभागातील बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्कांच्या वसूलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्क आकारणीबाबत सन 2012-2013 साठी मंजूर असलेल्या दरानेच सन 2014-2015 मध्ये बांधकाम परवान्यासंबंधी विविध शुल्क आकारणीबाबत कार्यवाही केलेली आहे.

नगररचना विभागातील व नाशिक रोड विभागीय कार्यालयातील बांधकाम परवान्यासंबंधी निवडक प्रकरणांची पडताळणी करतांना विविध शुल्काच्या वसूलीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. बांधकाम परवानगीसाठी परवानगीसाठी छाननी शुल्क, विकास शुल्क, वृक्ष निधी अनामत, प्लिंन्थ कंम्प्लीशन न घेतल्याबददल तडजोड फी, विनापरवाना वापराबाबत तडजोड फी, जीना अधिमुल्य, एकत्रिकरण, सत्यप्रती-अतिरिक्त् प्रतिसाठी शुल्क, ना हरकत दाखले, इंजिनिअर / स्ट्रक्चरल इंजिनिअर / सुपरवायझर यांची परवाना फी, गटार जोडणी शुल्क, विविध प्रकारचे दाखले इत्यादीसाठी आदेश क्रमांक नगररचना / वशि /354/2011, दिनांक 23.03.2011 नुसार सन 2011-2012 व सन 2012-2013 साठी दर निश्चित केल्याचे दिसून आले. त्याच जुन्या दराने आकारणी करून सन 2014-205 मध्ये विविध प्रकारच्या शुल्काची वसूली केल्याचे लेखा परीक्षणावेळी निदर्शानास आले सन 2014-2015 साठी दर मंजूर नव्हते व त्यासंबंधी कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कदाचित महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

2. बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कोणतीही टिपण्णी सादर केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही, नस्तीस शुल्क आकरणी करणेबाबत तक्ता संलग्न नाही / याबाबत कोणताही तपशील नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे शुल्क आकरणी व त्याअनुषंगिक बाबी संदर्भात सक्षम अधिकाऱ्याची मंजूरी घेतली जात नाही असे निदर्शनास येते व शुल्क आकारणी संबंधी बोध होत नाही.

3. वाढीव परवानगी बाबत प्रस्ताव मूळ नस्तीस संलग्न न करता नव्याने नस्ती करून प्रस्ताव सादर केला जातो.

MINVAJM6901 (Ref No : 71, Hmm No : 185)

162 नगररचना विभागात विविध शुल्कांपोटी वसूल केलेल्या रकमा व त्यांच्या रोखवहीतील नोंदीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 17

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

रोखवहीतील नोंदींची तपासणी केली जात नाही. नोंदींवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. विहित

पध्दतीने रोखवहीतील नोंदी केल्या जात नाहीत. व्यवहार मोठया प्रमाणावरील असूनही संगणक प्रणालीचा कोणताही वापर केला जात नाही. अचानक रोख रकमेची तपासणी सक्षम अधिकाऱ्याकडून केली जात नाही. जमा व खर्च रकमांसंबधी ताळमेळाचे कामकाज केले जात नाही.

नगररचना विभागातील सन 2014-2015 मधील निवड महिन्यांच्या लेख्यांची पडताळणी करताना रोखवहीत खाली नमूद केल्याप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 नियम 98(2) नुसार ज्या अधिकाऱ्यांना रोख रकमा स्विकारणे व हाताळणे याबाबतचे व्यवहार करावे लागतात त्यांनी पाळावयाचे नियम दिले आहेत, त्यानुसार रोखवही नमुना क्र. 4 प्रमाणे ठेवलेली नाही. रोखवहीत पैशाच्या व्यवहाराच्या नोंदी केल्यावर त्या तपासलेल्या नाहीत, तपासल्याची खूण म्हणून त्या नोंदी अनुप्रमाणित केल्या जात नाहीत. रोखवहीतील बेरजांची पडताळणी करून त्या बरोबर असल्याची अदयाक्षरी केली जात नाही. रोख पुस्तकातील शिलकेची पडताळणी केली जात नाही. त्याअनुषंगाने प्रमाणपत्र रोखवही नमूद केलेले नाहीत. बॅकेत भरणा रक्कम व शिल्लक रक्कम यांची खात्री रोखवहीत नुसार केली जात नाही. अचानक रोख रकमेची तपासणी सक्षम अधिकाऱ्याकडून केली जात नाही. रोखवहीत जमा व खर्च बाजूत याप्रमाणे लिहिणे आवश्यक असून तशी कार्यवाही केली जात नाही.

2. महानगरपालिकेतील विविध विभागात संगणकीकरणाचे काम झालेले असून संगणक प्रणालीवर त्याचे कामकाज केले जाते, नगर रचना विभागात सन 2014-2015 मध्ये प्राप्त झालेल्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	तपशील	रक्कम रूपये
1	तपासणी	15720436
2	अनामत	4583579
3	बांधकाम विकास शुल्क	219640065
4	भुखंड विकास निधी	40408877
5	इतर	181050
6	गटार जोडणी	17392799
7	गुंठेवारी	496775
8	इतर शुल्क	15069080
9	अनधिकृत बांधकाम	24545563

10	सेस चार्जेस	117597755
11	मोबाईल टॉवर चार्जेस	627951
	एकूण	456263930

एवढया मोठया प्रमाणावर रकमा नगरविकास विभागात प्राप्त होतात व त्यांचा भरणा बॅकेत केला जातो, रूपये 2 लक्ष पेक्षा जास्त रक्कम असल्यास धनादेश घेतला जातो, असे तपासणी वेळी सांगण्यात आले. एवढया मोठया प्रमाणावरील व्यवहार असूनही येथे संगणक प्रणालीचा कोणताही वापर केला जात नाही. या नोंदींची तपासणी होत नाही. त्यावर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत, म्हणजेच रोखरक्कम, रोखवही याबाबत पर्यवेक्षण होत नाही, बेरजांची तपासणी केली जात नाही, त्याप्रमाणे यावर कोणाचे नियंत्रण नाही, असे दिसून येते, त्यामुळे यात काही चुका, अफरातफर / गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. जमा व खर्च रकमांसंबधी ताळमेळाचे कामकाज केले जात नाही.

4. बॅकस्क्रोल / पासबुक उपलब्ध नसल्याने प्रत्यक्ष बँकेत रक्कम भरणा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

5. दैनंदिन व्यवहार संपल्यानंतर रोखवहीत शिल्लक रक्कम अंकी अक्षरी दर्शविली जात नाही, तेथे सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतलेली नाही.

6. महिना संपल्यानंतर महिनाअखेर मासिक व आर्थिक वर्ष संपाल्यानंतर वर्षाअखेर वार्षिक गोषवारे विहित काढलेले नाहीत.

10. सन 2014-2015 मध्ये 11,75,97,755/- एवढा सेस जमा झाल्याचे रोखवहीवरून दिसून येते, शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग बीसीए.2009/प्र.क्र.108/कामगार-7/अ दिनांक 17.06.2010 नुसार बांधकाम परवाना देताना एकूण बांधकाम खर्चाच्या 1 टक्के कामगार उप कराची रक्कम वसूल करून सदरील रक्क्म शासनाच्या खाती/लेख्यात भरणा करणे आवश्यक आहे, सेसची रक्क्म शासन खाती जमा होण्याबाबत चलन उपलब्ध न झाल्याने सदरील रक्क्म शासन खाती जमा होणेबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. तसेच ही रक्क्म वेळेत जमा झाली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

11. रोखशाखेत विविध पाच रोखवहया ठेवलेल्या आहेत, त्यात बऱ्याच ठिकाणी प्रमाणपत्रात पृष्ठांची संख्या अयोग्य नमूद केलेली आहे. उदा. प्रत्यक्षात 400 किंवा जास्त पृष्ठे असूनही 1 ते 200 पृष्ठे असल्याचे प्रमाणित केलेले आहे.

12. पावती पुस्तकातील कोऱ्या पावत्यावंर रदद करण्याबाबत शिक्के मारलेले आहेत, परंतू त्यावर सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत, त्याप्रमाणे रोखवहीतील पृष्ठे बऱ्याच ठिकाणी असून त्यावरही रदद करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. उदा. क्रमांक 326 (65 ते 100) , 593(88 ते 100), 2543(14 ते 100) चलन पुस्तक क्रमांक 1294 (88 ते 100), 1305(95 ते 100)

13. चलन पुस्तक 1305 (51 ते 75) येथे प्रमाणपत्र दिलेले नाही, तर चलन पुस्तक क्रमांक 1305(73 ते 100) येथे प्रमाणपत्र पृष्ठ 1 ते 100 असल्याचे नमूद केलेले आहे.

14. प्राप्त पावती पुस्तके, चलन पुस्तके, रोखवहया त्यांच्या नोंदींवर नोंदवहीत संबंधितांच्या स्वाक्षऱ्या /अदयाक्षऱ्या नाहीत, त्याचप्रमाणे याबाबत छपाई विभागाशी कोणताही ताळमेळ घेतला जात नाही.

15. पावत्यांच्या स्थळ प्रतीवर पावती मिळाल्याबददल पावती घेणाऱ्याची स्वाक्षरी घेतलेली नाही.

16. रोखवहीत बऱ्याच ठिकाणी कोरी जागा सोडण्यात आलेली आहे.

17. नगररचना बांधकाम परवाना शुल्क व इतर शुल्क यांच्या रोख रकमांचे नाशिक रोड विभागीय क्षेत्रातील सर्व व्यवहार नाशिक रोड विभागीय कार्यालयातून केले जातात, लेखापरीक्षणावेळी नाशिक रोड विभागीय कार्यालयातील सन 2014-2015 संबंधी रोखवही, पावती पुस्तके, चलने, इत्यादी उपलब्ध न झाल्याने त्यातील नोदींबाबत कोणतीही खात्री करता आलेली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम 1930 मधील नियम 4(अ) नुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे, त्यांचे पालन झालेले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 72, Hmm No : 186)

163 नगररचना विभागातील इमारत परवानगी नोंदवही व इतर नोंदवहयाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

इमारत परवानगी नोंदवही विहित नमुना क्रमांक 45 नुसार ठेवण्यात आलेली नाही, त्यातील नोंदीवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

महानगरपालिका नाशिकचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणावेळी नगररचना विभागाकडील नोंदवहयांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी दिर्शनास आल्या आहेत.

1. इमारत परवानगी नोंदवही विहित नमुना क्रमांक 45 नुसार ठेवण्यात आलेली नाही, त्यातील नोंदीवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

2. इमारत परवानगी नोंदवही व बांधकाम पूर्णत्व संबंधी नोंदवही एकत्र ठेवण्यात आली असून, त्यातील नोंदी एकत्रित घेण्यात आलेल्या आहेत.

3. बांधकाम पूर्ण होऊन संबंधितांनी ते ताब्यात घेतल्याबाबत दिनांकाचा तपशिल नोंदविण्यात आलेला नाही.

4. कर आकरणी झाल्याचा दिनांक व अनुज्ञेय क्षेत्रफळ इत्यादी तपशिल नोंदवहीत नोंदवण्यिात आलेला नाही, त्यामुळे कर आकारणी वेळेत झाली किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

5. हस्तांतरणीय विकास हक्क नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेली नाही, त्यातील नोंदींवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत, यातील नोंदी मोघम स्वरूपात घेण्यात आलेल्या आहेत.

6. हस्तांतरणीय विकास नोंदवही क्रमाक 694, 697 ते 706 येथे 7/12 उताऱ्यास महानगरपालिकेचे नाव लावगण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची कुठलीही नोंद घेतलेली नाही.

MINVAJM6901 (Ref No : 73, Hmm No : 187)

164 इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 265 (अ) नुसार इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 265 (अ) नुसार कोणत्याही इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासून 30 वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेत अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांनी महानगपालिकेच्या अधिकाऱ्याकडून इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे या प्रयोजनासाठी बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे.

अधिनियम कलम 265 (अ) (3) नुसार भोगवटादाराने असे प्रमाणपत्र न घेतल्यास आयुक्त यांचे आदेशानुसार बांधकाम सुस्थित प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील. कलम (अ) 4 नुसार इमारतीच्या मालाकाकडून दोषनिवारक दुरूस्त्या करण्यास कसूर केल्यास आयुक्तांना त्या दोषानिवारक दुरूस्त्या करता येतील व अशा दुरूस्त्यांवर आयुक्ताने केलेला त्यांची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास मालमत्ता कराच्या थकबाकी प्रमाणे मालक/ भोगवटादाराकडून वसूली केला जाईल. परंतू त्यानुसार प्रत्यक्षात कार्यवाही केली जात असे दिसून येते.

MINVAJM6901 (Ref No : 75, Hmm No : 189)

165 मिळकत विभागामार्फत वाटप केलेल्या मिळकती, गाळे, समाज मंदिर, व्यायाम शाळा इत्यादीबाबत अभिलेखे व माहिती उपलब्ध न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेचे मिळकत विभागामार्फत वाटप केलेल्या मिळकती, गाळे, समाज मंदिर, व्यायाम शाळा इत्यादीबाबत भाडेकरार नामे, नस्त्या, अभिलेखे लेखापरीक्षणाकामी उपलब्ध न झाल्याने भाडे करारनाम्याच्या मुदती संपुष्टात आल्या किंवा कसे याबाबत तसेच मुदत संपलेल्या गाळयाचे भाडे अधिनियमात तरतूद केल्यानुसार सुधारित करण्यात आले किंवा कसे याची खात्री करता आली नाही. याबाबत महानगरपालिकेच्या स्तरावर खात्री करून भाडे तत्वावर दिलेले गाळे, बांधील इमारत व इतर मालमत्ता इत्यादीबाबत मुदत संपल्यानंतर विहित कार्यपध्दतीने लिलावादवारे सदरील गाळे इमारती इत्यादीबाबत फेरवाटप करणे आवश्यक आहे.

1) नाशिक महानगरपालिकेचे मिळकत विभागामार्फत वाटप केलेल्या मिळकती, गाळे, समाज मंदिर, व्यायाम शाळा इत्यादीबाबत भाडेकरार नामे,नस्त्या, अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत अर्ध समास क्रमांक 172 दिनांक 09.11.2016 नुसार कळविण्यात आले होते, तथापि मालमत्ता विभागाकडून प्राप्त अनुपालनानुसार सदर अभिलेखे हे संबंधित विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील असे कळविले असता विभागीय कार्यालयात सदर बाबत मागणी केली तथापि या विषयी कोणतीही अभिलेखे लेखापरीक्षणावेळी उपलब्ध झाले नाहीत. सदर अभिलेखे उपलब्ध न झाल्याने भाडे करारनाम्याच्या मुदती संपुष्टात आल्या किंवा कसे याबाबत तसेच मुदत संपलेल्या गाळयाचे भाडे अधिनियमात तरतूद केल्यानुसार सुधारित करण्यात आले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

2) सन 2012-2013 मधील लेखा परीक्षणावेळी मिळकत विभागाने वाटप केलेल्या मिळकती / समाजमंदिर / व्यायाम शाळा / वाचनालय/ बालसंस्कार केंद्र इत्यादीबाबत माहिती संबंधित विभागाने दिलेली असून त्याबाबत सन 2012-2013 मधील लेखापरीक्षण अहवालात आक्षेप घेतल्याचे दिसून येते. अशा सर्व मिळकतींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	संस्थेचे नाव	करारनामा दिनांक	मुदत
1	क्लब हाऊस	नाशिक इंजिनिअर सोशल वेल्फेअर	27/04/1995	5 वर्षे

		असोसिएशन		
2	वाचनालय	राजीव नगर सामाजिक विकास मंडळ	26/06/1995	1 वषे
3	समाजमंदिर	आनंद एजुकेशन सोसायटी, पिंपळगाव खांब	26/07/1995	1 वर्षे
4	बांदीव नगर	मराठी लोककला प्रतिष्ठान	21/08/1995	1 वर्षे
5	समाजमंदिर	अपंग उपचार पुर्नवसन केंद्र	20/09/1995	1 वर्षे
6	व्यायामशाळा	धर्माजी पाटील शिवाजी मित्र मंडळ	21/10/1995	1 वर्षे
7	सामाजिक सभागृह	महात्मा फुले मंडळ, सिडको	22/12/1995	1 वर्षे
8	व्यायामशाळा	श्रमिक प्रगती मंडळ ट्रस्ट, सीआयटीयु	23/01/1996	1 वर्षे
9	कलामंदिर	डॉ.हेडगेवार मित्र मंडळ	25/10/1996	1 वर्षे
10	व्यायामशाळा	सिध्दीविनायक मित्र मंडळ	--------	1 वर्षे
11	बांधीव इमारत	मुलरलीदर दांतळे, शिवदर्शन सामाजिक शैक्षणिक मित्र मंडळ	25/01/2000	5 वर्षे
12	समाजमंदिर	सिंहस्थ नगर मित्र मंडळ, सिडको	17/02/2000	5 वर्षे
13	इमारत	श्री.छत्रपती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ, सिडको	18/07/2000	---
14	खुली जागा	महात्मा वाचनालय	08/08/2005	5 वर्षे
15	खुली जागा	महात्मा वाचनालय	09/08/2000	5 वर्षे
16	इमारत	श्री.छत्रपती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ, सिडको	19/09/2000	------
17	खुली जागा	शिवाजी मित्र मंडळ	03/03/2001	5 वर्षे
18	इमारत	सहयाद्री युवक मंडळ, राणे नगर	29/03/2001	1 वर्षे
19	खुली जागा	शिवाजी मित्र मंडळ, गंगापूर	03/04/2001	5 वर्षे

20	खुली जागा	श्री.वसंत यशवंत नवले, आडगांव	12/11/2003	3 वर्षे
21	सभामंडप	अध्यापक ज्ञानपीठ कामठवाडे	23/12/2003	5 वर्षे

याबाबत महानगरपालिकेच्या स्तरावर खात्री करून भाडे तत्वावर दिलेले गाळे, बांधील इमारत व इतर मालमत्ता इत्यादीबाबत मुदत संपल्यानंतर विहित कार्यपध्दतीने लिलावादवारे सदरील गाळे इमारती इत्यादीबाबत फेरवाटप करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते, त्यामुळे महानगरपालिकेस अपेक्षित वाढीव उत्पन्न् प्राप्त झालेले नाही.

MINVAJM6901 (Ref No : 76, Hmm No : 172)

166 सर्वीस लेव्हल बेंच मार्कींग बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 00 निधी
अनियमितता कलम : 9ड

13 व्या केंद्रीय वित्त आयोगाने सन 2010 मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार विशिष्ट कार्यक्षमतेच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे निर्देशांक (Indicators) व नाशिक महानगरपालिकेने त्यास अनुषंगुन ठरविलेले उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती संकलित केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे.

13 व्या केंद्रीय वित्त आयोगाने सन 2010 मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार विशिष्टकार्यक्षमतेच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणेबाबत शिफारस करण्यांत आलेली आहे.

त्यास अनुसरुन राज्य शासनाने पाणीपुरवठा, जलनि:सारण, मलनि:सारण, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन बाबत काढलेल्या अधीसूचनेनुसार गुणात्मक सेवा हे नागरी स्वराज्य संस्थेचे ध्येय असणेबाबत नमुद केलेले आहे. त्याबाबतचे निर्देशांक (Indicators) व नाशिक महापालिकेने त्यास अनुषंगुन ठरविलेले

उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती मुल्य निर्धारण व कर संकलन विभागाकडून मागितली असता, सन 2014-2015 करिता नाशिक महापालिकेस ठरवुन दिलेले निर्देशांक (Indicators), ठरविलेले उद्दीष्ट व केलेली उद्दीष्ट पुर्ती याबाबतची माहिती संकलीत केलेली नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेने केलेली उद्दीष्ट पूर्तीबबत पडताळणी करता आलेली नाही. उपरोक्त् उद्दीष्ट पुर्ती न केल्यास महानगरपालिकेस अनुदान वितरीत केले जाणार नसल्याने महानगरपालिकेस ठरवून दिलेले निर्देशांक (Indicators), ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 132, Hmm No : 173)

167 पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

शासन निर्णय क्र. संकीर्ण-2009/प्र.क्र. 207/09/न.वि. 20, मंत्रालय, मुंबई, दि. 02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. तथापी, 2011-2012, 2012-2013, 2013-2014 या मागील तीन वित्तिय वर्षातील जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा तसेच जलदाय वितरण व्यवस्था यांचा आढावा घेतला असता, जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत वसुल रक्कमेची टक्केवारी अत्यंत कमी आहे. तसेच नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने पाण्याचे व मलनिस्सारण दर ठरविणे व अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबत विशद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पुर्णत: पालन करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

शासन निर्णय क्र .संकीर्ण-2009/प्र.क्र .207/09/न.वि .20, मंत्रालय, मुंबई, दि .02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे .तथापी, सन 2011-12, 2012-13, 2013-14 या तीन वित्तिय वर्षातील जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा तसेच जलदाय वितरण व्यवस्था यांचा आढावा घेतला असता, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत व पाणीपुरवठा योजनेचा मागील तीन वर्षातील जमा व खर्च खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	जमा रक्कम (रु. लाखात)			सरासरी
		2011-12	2012-13	2013-14	
1	जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रक्कमा				
अ	महसुली जमा	4467.39	4622.78	4224.76	
ब	भांडवली जमा	1066.51	2210.13	2661.10	
	एकूण	5533.90	6832.91	6885.86	6417.55
2	जलदाय वितरण व्यवस्था				
अ	महसुली खर्च	6107.30	7052.52	7169.15	
ब	भांडवली खर्च	3735.33	3603.16	3655.45	
	एकूण	9842.63	10655.68	10824.6	10440.97
	जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत वसुल रक्कमेची टक्केवारी	56.22%	64.12%	63.61	

मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील एकूण सरासरी जमा रुपये 64.18 कोटी असताना सरासरी खर्च रुपये 104.41 कोटी एवढा झाला आहे. सन 2014-15 या वर्षी जलदाय व्यवस्थेची एकूण जमा रु .57.11 कोटी असून खर्च रु.123 कोटी आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/ न.वि.20 मंत्रालय, मुंबई दिनांक 2.8.2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे .

मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील एकूण सरासरी जमा रुपये 54.70 कोटी असताना सरासरी खर्च रुपये 91.18 कोटी एवढा झाला आहे. सन 2013-1 4या वर्षी जलदाय व्यवस्थेची एकूण जमा रु 68.85 . कोटी असून खर्च रु 108.24.कोटी आहे .

शासन निर्णय क्र .संकीर्ण-2009/प्र.क्र. 207/09/न.वि .20, मंत्रालय, मुंबई, दि .02/08/2010 अन्वये नागरी स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीने पाण्याचे व मलनिस्सारण दर ठरविणे व अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे विशद करण्यात आलेली आहे.

त्यात सार्वजनिक नळखांबे टप्प्याटप्प्याने कमी करुन काही वर्षात पूर्णपणे बंद करण्याची कार्यवाही करावी व त्याऐवजी गट नळजोडण्यांना प्रोत्साहन देण्यात यावे असे नमुद करण्यात आलेले आहे.

तथापी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नाशिक महानगरपालिका हद्दीत एकूण 1708 नळ कनेक्शन सार्वजनिक/मनपा मालकीच्या जागेत असुन उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासुन सार्वजनिक नळखांबे टप्प्याटप्प्याने कमी करुन आतापावेतो पूर्णपणे बंद करण्याची कार्यवाही होणे अपेक्षीत होते .तथापी तसे न

केल्याने पालीकेस दरवर्षी नळ कनेक्शन साईज नुसार किमान दराने साधारणपणे रक्कम रु .3373440/- चे नुकसान सोसावे लागत आहे.

अ . क्र.	विभाग	नळ कनेक्शन साईज नुसार संख्या				वार्षिक मागणी साईज नुसार				एकूण
		½"	¾"	1"	इतर	½"	¾"	1"	इतर	
1	नाशिक)पुर्व(	324	38	43	6	388800	77520	175440	0	641760
2	नाशिक)पश्चिम(	112	3	7	0	134400	6120	28560	0	169080
3	पंचवटी	397	13	93	6	476400	26520	379440	0	882360
4	ना.रोड	192	36	43	2	230400	73440	175440	0	479280
5	नाशिक)सातपुर(	158	40	50	3	614800	88440	236440	25000	964680
6	नविन नाशिक	100	27	15	0	120000	55080	61200	0	236280
	एकूण	1283	157	251	17	1964800	327120	1056520	25000	3373440

शासन निर्णयातील (I) (4) (i) अन्वये उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरी स्थानिक संस्थेने याकामी मोहीम राबवुन अनधिकृत नळ जोडण्या शोधून त्या खंडीत करुन घ्याव्यात किंवा धोरणानुरुप अधिकृत करुन घ्याव्यात असे नमुद केलेले आहे तथापी अनधिकृत नळ जोडण्या शोधण्याकरिता मोहीम राबविण्यात आलेली नाही.

शासन निर्णयातील (I) (4) (ii) अन्वये पाणी निर्मितीच्या खर्चात तसेच विद्युत खर्चात बचत करण्याच्या दृष्टीकोनातुन पाणी व उर्जा लेखापरीक्षण करावे असे नमुद केलेले आहे तथापी पाणी व उर्जा लेखापरीक्षण करण्यात आले नाही. तसेच पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातुन पाणी पुरवठा तसेच कर आकारणी विभागाने उपरोक्त नमुद शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

DATDTBM7001 (Ref No : 135, Hmm No : 176)

168 मंजूर तरतूदीपेक्षा कमी / अत्यंल्प खर्च केल्याने झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 06

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

अनावश्यक तरतूदी करून चुकीचा अंदाजपत्रक सादर करण्याची अनियमितता केली आहे, शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, कधी प्राप्त झाले, मागील शिल्लक अनुदान किती याबाबतचा तपशिल अंदाजपत्रकात नमुद करणेत आलेला नाही

लेखापरिक्षण कालावधीमधील सन 2014-15 चे अंदाजपत्रक आणि वजावट नोंदवही तपासली असता, त्यामध्ये मंजूर बाबीवर मंजूर तरतूदीपेक्षा कमी / अत्यल्प खर्च नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

आर्थिक वर्ष 2014-15 मधील मंजूर तरतूद व झालेला खर्च याचा तपशिल

अ.क्र	संगणकसंकेतांक	बाब	मंजूरतरतूद	झालेलाखर्च	तफावत
1	2515	माध्यमिक शाळा स्थायी	40000000	4119968	35880032
2	2522	ग्रंथालयसारथा आस्था	2000000	0	2000000
3	2020	हायस्कूल लायब्ररी	500000	0	500000
4	2910	मनपा माध्यमिक विद्यालय मुलींसाठी सायकल खरेदी	6000000	0	6000000
5	2708	हायस्कूल वीजबील	100000	52130	47870
6	2709	हायस्कूल पाणीबील	50000	22420	27580
7	2710	हायस्कूल टेलीफोनबील	50000	8400	41600
8	2711	हायस्कूल संगणक व प्रयोगशाळा	2000000	867066	1132934
9	2783	माध्यमिक शाळा क्रिडा स्पर्धा	1000000	36800	963200
10	2784	मनपाशाळेतील विद्यार्थीनी शिष्यवृत्ती	100000	0	100000
11	2853	गरीब विद्यार्थ्यांना गणवेश पुरवणे	100000	0	100000
12	2518	फर्निचर व साहित्य खरेदी	2500000	0	2500000
13		एकूण	54400000	5106784	49293216

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे. -

अ) कमी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत -

1. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका अन्वये अर्थसंकल्पातील खर्चाचे अंदाज तयार करतांना अंदाजीत रकमा या शक्यतोवर प्रत्यक्ष रकमां इतक्याच असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंदाज प्रत्यकक्ष रकमांच्या जास्तीत जास्त नजिकचे असावेत, प्रतयेक बाबीवर योग्य मंजूरी अन्वये त्या त्या वर्षात प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करणे अपेक्षित व शक्य आहे त्याच्या आधारे तरतूद करणे आवश्यक आहे. तथापि, मंडळाने मागील 3 वर्षामधील खर्चाच्या सरासरीचा प्रत्यक्ष अंदाज न घेता, अनावश्यक तरतूदी करून चुकीचा अंदाजपत्रक सादर करण्याची अनियमितता केली आहे.

2. मंडळाला शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, कधी प्राप्त झाले, मागील शिल्लक अनुदान किती याबाबतचा तपशिल अंदाजपत्रकात नमुद करणेत आलेला नाही, त्यामुळे मंडळाच्या आर्थिक स्थितीबाबतची अचूकता पडताळणी करणे शक्य झाले नाही.

3. अंदाजपत्रकामध्ये खर्च व उत्पन्न यांचा समावेश न करता, फक्त खर्चाचेच अंदाजपत्रक सादर केले आहे. 4. सन 2014-15ची एकूण तरतूद रु.5.44कोटी असून त्यापैकी झालेला खर्च रु.0.510 कोटी आहे, म्हणजे रु.4.92कोटी रूपये कमी खर्च करणेत आला. आवश्यकता नसतांना अंदाजपत्रकात एवढया मोठया निधीची तरतुद का करणेत आली? जर निधीचीआवश्यकता होती तर प्रत्यक्षात खर्च का गेला नाही? तरी याबाबत मंडळाने अनूपालन दर्शवावे.

ब) खर्च अत्यल्प करणे अथवा खर्च न करणेबाबत -

1. सन 2014-15 अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता, बहुतांश शिर्षाखांतर्गत तरतूद उपलब्ध असूनही कोणताच खर्च करणेत आलेला नाही.

उदा :- 1) हायस्कूल टेलीफोन बील

2) माध्यमिक शाळा क्रिडास्पर्धा

3) ग्रंथालयसारथा आस्था

CCFNKKM8401 (Ref No : 77, Hmm No : 99)

169 सुरक्षा विभागातील कार्यरत कर्मचा-यांचे अतिकालीन भत्यांसबंधी लेखा परीक्षणाकामी सादर न केल्याबाबत

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 02

मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

सुरक्षा विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे अतिकालीन भत्यांसबंधी लेखा परीक्षणाकामी सादर केलेले नाहीत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या कालावधीतील सुरक्षा विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे अतिकालीक भत्यासंबंधी लेखे संबंधितांकडून वारंवार लेखापरीक्षणाकामी सादर करणेबाबत सूचना देवूनही सदर अतिकालीक भत्याचे लेखे लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

CCFNKKM8401 (Ref No : 79, Hmm No : 130)

170 स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 मधील तरतुदी नुसार लेखापरिक्षण कालावधी पर्यंत सुमारे 11021 व्यापा-यांनी विवरणपत्र सादर केले नाही. या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. सन 2014-15 या वित्तिय वर्षात 16732 प्राप्त विवरणपत्रांच्या तुलनेत स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाच्या संख्येचे प्रमाण अत्यंत कमी असुन निर्धारणाचे काम अधीक जलद गतीने होणे आवश्यक आहे.

नाशिक महापालिकेचे सन 2014-15 या वित्तिय वर्षाचे लेखापरिक्षणात स्थानिक संस्था कर विभागाकडील निवडक कर भरणा प्रकरणांची पडताळणी केली असता, त्यामध्ये खालीलप्रमाणे उणिवा आढळून आलेल्या आहेत.

स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 नुसार प्रत्येक व्यापा-याने सहामाही व वार्षीक विवरणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल न करणे किंवा उशीराने दाखल करणे या प्रकरणी स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 48 (6) नुसार व्यापारी किंवा व्यक्तीनुसार त्यांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000/- पेक्षा अधीक नसेल इतक्या रक्कमेच्या दंडाची आकारणी करता येईल अशी तरतुद आहे.

नाशिक महापालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकडील नोंदीत व्यापारी, सन 2014-15 मधील प्राप्त विवरणपत्रे व स्थानिक संस्था कर निर्धारणाची संख्या इ. तपशील खालील प्रमाणे आहे.

एकूण नोंदीत व्यापारी	सन 2014-15 मधील प्राप्त विवरणपत्रे	31/3/2015 पावेतो स्थानिक संस्था कर निर्धारणाची संख्या	निरंक विवरणपत्र सादर करणा-यांची संख्या

27753	16732	226	10668

तथापी लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सुमारे 11021 व्यापा-यांनी विवरणपत्र सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यांचेवर उपरोक्त नियमानुसार दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच प्राप्त विवरणपत्रांपैकी 10668 व्यावसायीकांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षात स्थानिक संस्था कराचा काहीच भरणा केलेला आढळून आलेला नाही. अशा प्रकरणातील सदोष प्रकरणांचा आढावा घेऊन अशा प्रकरणी योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त तक्यात नमुद 16732 प्राप्त विवरणपत्रांच्या तुलनेत स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाच्या संख्येचे प्रमाण अत्यंत कमी असुन सदोष विवरणपत्रांवर वेळीच कार्यवाही होण्याच्या दृष्टीकोनातुन स्थानिक संस्था कर प्रकरणांच्या निर्धारणाचे काम अधीक जलद गतीने होणे आवश्यक आहे.

DATDTBM7001 (Ref No : 120, Hmm No : 54)

171 अंतर्गत लेखापरीक्षण प्रलंबित असलेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेतील विविध विभागातील व प्रभागातील जमा रकमांचे व त्यासंबंधित अनुषंगिक नोंदवहयांचे लेखापरीक्षण सन 2010-2011 पासून प्रलंबित असून सदरहू लेखापरीक्षण समयबध्दरित्या होणे गरजेचे आहे तसेच अंतर्गत लेखापरीक्षणातील 31.03.2015 अखेर एकूण 4466 परिच्छेद प्रलंबित असून त्यातील रक्कम रूपये 151789238 ची वसूली अदयाप प्रलंबित आहे. तसेच रक्कम रूपये. 712305727/- आक्षेपाधीन आहे. सदर कार्यवाही प्राधान्याने करून प्रलंबित आक्षेप निकाली काढणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 105 व 106 नुसार नाशिक महानगरपालिकेचे जमा व खर्च बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षण यामध्ये खर्चाचे पुर्व लेखापरिक्षण (प्रीऑडीट), तसेच जमा रकमांचे व त्यासंबंधीत अनुषंगीक नोंदवहया यांचे लेखापरिक्षण आर्थिक वर्ष पुर्ण झाल्यानंतर (पोस्ट ऑडीट) केले जाते.

1) सन 2014-15 या वर्षाअखेरची लेखापरिक्षणाची सध्यस्थिती.

अ.क्र.	विभागाचे नांव	लेखापरिक्षण पूर्ण झालेले वर्ष	लेखापरिक्षण प्रलंबित असलेले

			वर्ष
1)	मनपाच्या सर्व विभागांचे जमा बाजुचे व खर्च बाजूचे लेखापरिक्षण	सन 2006-07 चे लेखापरिक्षण पुर्ण झाले, अहवाल मा. स्थायी समितीस सादर केला आहे. सन 2007-08 ते 2009-2010 या वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण झाले असून, अहवाल मा. समितीस सादर करणे बाबतची कार्यवाही चालु आहे.	विविध विभागातील व प्रभागातील जमा रकमांचे व त्यासंबंधीत अनुषंगीक नोंदवहया चे लेखापरिक्षण प्रलंबित सन 2010-11 ते 2014-2015

विविध विभागातील व प्रभागातील जमा रकमांचे व त्यासंबंधीत अनुषंगीक नोंदवहया चे लेखापरिक्षण सन 2010-11 पासुन प्रलंबित असुन सदरहु लेखापरीक्षण समयबध्दरित्या होणे गरजेचे आहे.

लेखापरीक्षण ही अंतर्गत नियंत्रणाची सतत चालणारी प्रक्रिया आहे. अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये नियंत्रणाची पर्याप्तता व परिणामकारकता यांची पडताळणी व्यवहाराची अचुकता व औचित्य, मालमत्तेचे हिशोब व कार्यपध्दतीचे पालन इत्यादी बाबत अभिप्राय देणे आवश्यक असते. सन 2010-11 ते 2014-15 या कालावधीतील जमा बाजुची तपासणी करुन त्यावरील लेखापरिक्षा अहवाल लवकर पुर्ण करणे आवश्यक आहे.

2) दि. 31/3/2015 अखेर खालीलप्रमाणे अंतर्गत लेखापरिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल (संख्या) वसुलपात्र रक्कमा इ. बाबत माहिती दर्शविण्यात आलेली आहे.

गोषवारा

अ. क्र.	वर्ष	लेखापरिक्षण झालेल्या एकूण विभागांची संख्या	प्रलंबित परिच्छेदांची संख्या	वसुलपात्र रक्कम	आक्षेपाधीन
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)
1	1982 ते 1989	14	694	17553244	29434440
2	1989 ते 1992	19	285	5260913	3045763
3	1992 ते 1995	17	215	6385877	616028

4	1995 ते 2002	27	597	64109278	9917913
5	2002-2003	31	681	25854079	27485650
6	2003-2004	31	637	3363321	44085973
7	2004-2005	23	520	3054714	15402205
8	2005-2006	24	406	4793245	104727206
9	2006-2007	30	431	21414567	477590549

लेखापरिक्षण विभागाकडून प्राप्त माहीती तसेच या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परीशिष्ट क्र 1 मध्ये नमुद केल्यानुसार सन 1982-1983 ते 2006-07 या कालावधीत नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागाने जमा रकमांचे व त्यासंबंधीत अनुषंगीक नोंदवहया यांचे लेखापरिक्षण पुर्ण केलेले असुन त्यात दि.31/03/2015 अखेर 4466 आक्षेप प्रलंबित असुन, त्यात रक्कम रु. 151789238/- ची वसुली अद्याप प्रलंबित आहे. तसेच रक्कम रु. 712305727/- आक्षेपाधीन आहे. सदरहु वसुलीची रक्कम मोठया प्रमाणावर थकीत असल्याने ती विनाविलंब वसुल करण्यात येवुन आक्षेप निकाली काढणे गरजेचे आहे.

DATDTBM7001 (Ref No : 140, Hmm No : 184)

172 नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षात लेखापरीक्षणात आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 33

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

नाशिक महानगरपालिकेचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात महानगरपालिका अधिनस्त विभागांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमिततेबाबत.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात महानगरपालिका अधिनस्त

विभागांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.RMR-2005/प्र.क.201/रस्ते 1, दि.02/01/2006 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण कामाचे संदर्भात मंजुर अंदाजपत्रकातील खडी साहित्याची तरतुदीप्रमाणे जाडीचे (थर) कामे झाली किंवा कसे हे समजण्यासाठी तसेच अस्तित्वातील खडीची जाडी याची नोंद ठेवणे आवश्यक असतांना अश्या नोंदी ठेवलेल्या नाहीत. (बांधकाम विभाग)

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 171(6) नुसार निविदा उघडल्याच्या दिनांकापासून एक आठवडयात व जास्तीत जास्त एक महिन्यात त्या निकाली काढणे आवश्यक असतांना काही प्रकरणी अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.(सर्व विभाग)

3) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक गौण.खनिज/10/1009/सीआर-309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार देयकातून रु.70.67 प्रती घन मीटर दराने रॉयल्टी आकारणी व वसूल करणे आवश्यक असतांना सर्व प्रकरणी रॉयल्टी आकारणी व वसूल केलेली नाही. (बांधकाम व पाणीपुरवठा विभाग/भुमिगत गटार योजना) तसेच रॉयल्टीच्या संदर्भात काही मक्तेदारांनी महसुल विभागाकडे एकत्रिभत रॉयल्टी भरणा केल्याबाबतचे चलने सादर केलेली आहे, त्यासाठी महसूल विभाग राजपत्र दिनांक 28/02/2001 नुसार वाहतूक पास नमुना नं.ई नियम 6 किंवा महसुल विभागाकडील रॉयल्टी क्लीअरन्स सर्टीफिकेट यासारखे अधिकृत कागदपत्रे प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन नगर विभाग परिपत्रक क्रजी.ईएन/1098/1357/प्र.क्र.166/98 मवी-24 दिनांक 3.11.2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. अन्यथा सदर परिपत्रकातील अनुक्रमांक 3 नुसार कंत्राटीकमाच्या मूल्याच्या 1 टक्का दराने रक्कम कपात करणे आवश्यक आहे. तथापि काही प्रकरणी रक्कम कपात न करताच मक्तेदारास प्रदान करण्यात आले आहे. (सर्व विभाग)

5) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 23.03.2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. काही प्रकरणी अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तसेच डांबर कामाच्या चाचणी अहवालात डांबराची प्रत नमूद केलेली नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे डांबर वापरल्याची खात्री होत नाही. (सर्व विभाग)

6) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधिल परिशिष्ट 24 नियम 11 नुसार कामाचे मोजमाप उपअभियंता यांनी 100% व कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह केल्याचे मोजमाप पुस्तीकेवरून दिसून आले नाही. (सर्व विभाग)

7) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 180(3) नुसार जेव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेव्हा मोजणी पुस्तकातील संबधित नोंदीवर काट मारण्यात यावी व देयकावर आणि मोजणी पुस्तकात, त्याचा प्रती संदर्भ नमूद करण्यात यावा. तथापि अशी कार्यवाही बहुतांशी प्रकरणी करण्यात आलेली नाही.(सर्व विभाग)

8) कामाच्या स्वरूपानुसार 25/50/100 पानांच्या मोजमाप पुस्तिकांचा वापर करणे आवश्यक असून एका

मोजमाप पुस्तकेत एकाच कामाची नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केली जात नाही. तसेच काही प्रकरणी मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. (सर्व विभाग)

9) दरसूचीतील सूचनेनसार 500 घ.मी.पेक्षा जास्त खोदकामासाठी यांत्रिकी दराने आकारणी करावी असे असतांना अंदाजपत्रकात मानवी तरतूद करून त्या नुसार मक्तेदारास प्रदान करण्यात आलेले आहे.(बांधकाम विभाग)

10) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 182 नुसार नमुना नंबर 139 मध्ये कामाची नोंद घेणे आवश्यक आहे. तथापि अशी नोंदवही परिरक्षित केलेली नाही. (सर्व विभाग)

11) बहुतांशी काम पूर्णत्वाचे दाखल्यांवर अनुक्रमांक तसेच निर्गमित केल्याचा दिनांक नमुद केला जात नाही. काम पुर्णत्वाच्या कामी छापील अनुक्रमांक असलेले बांधील पुस्तक वापरणे आवश्यक आहे.

12) फेर निविदेमध्ये तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास पुरेसा प्रतीसाद नसल्याने दुसरी वेळी फेर निविदा प्रसिध्द आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली जात नाही.

13) विविध विभागाकडील विकास कामासाठी मक्तेदाराकडून प्राप्त केलेल्या विहीत नमुना बी-1 मधील करारनाम्यात पानवार मक्तेदार तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केली जात नाही.

14) शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भाखंस/2002(2990)/उदयोग-6 दिनांक 04.02.2003 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार उदयोग, उर्जा व कामगार विभागाकडील दिनांक 02.01.1992 च्या शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रिया राबविणे महानगरपालिकांना बंधनकारक केले आहे. तथापि उक्त् शासन निर्णयातील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येत नाही.

15) शासन निर्णय दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद 8:7 नुसार माल/साहित्य प्राप्त झाल्यावर उपप्रमाणकावर खालीलप्रमाणे प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक आहे.

अ) प्रमाणपत्रात मिळालेल्या वस्तू प्रत्यक्षात मिळाल्या आहेत.

ब) मालाचे प्रमाण विनिर्देशानुसार असून माल चांगल्या प्रतीचा आहे.

क) दिलेले दर हे स्वीकृत दरापेक्षा जास्त नाही.

ड) साठा नोंदवहीत मालाची नोंद झालेली आहे व त्यासाठी यापुर्वी कोणतीही रक्कम दिलेली नाही.

वरील प्रकारे प्रमाणपत्र बऱ्याच प्रसंगी दिलेले नाही.

16) देयकांचे प्रदान करताना महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 16 नुसार प्रत्येक देयकावर प्रदानार्थ मंजूर (Passed for Payment) अशास शेरा नमूद केला जात नाही. तसेच देयकाचे प्रदान झाल्यावर उपप्रमाणकावार अदा करून रदद केले (Paid & Cancelled) असा शेरा नमूद करून स्वाक्षरी केली जात नाही.

17) शासन उदयोज, उर्जा व कामगार विभाग किंवा डी.जी.एस.ॲड डी. इ. विभागांनी खरेदी करावयाच्या

वस्तुंसाठी दरकरार केलेले आहेत किंवा कसे? याबाबत प्रथम खात्री करुन नंतरच निविदा प्रसिध्दीस देणे आवश्यक असताना तशी खात्री न करता खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

18) प्रमाणकाव्दारे प्रदान करताना वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक मुविनि-1095/प्र.क्र. 5/ विनियम दिनांक 31/03/1995 नुसार खर्चास मंजूरी आदेश जोडणे आवश्यक आहे. मंजूर आदेश स्वयंपूर्ण, स्वयंस्पष्ट व परिपूर्ण असावेत, असे नमूद असताना देयकातील मंजूरी आदेश जोडण्यात येत नाहीत.

19) महानगरपालिकेने आपल्या स्तरावर मालमत्तेचा विमा उपरविणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

20) महानगरपालिकेच्या कर्मचारी जसे रोखपाल, आवक / जावक लिपीक, लेखापाल, अभियंते, वाहनचालक, भांडारपाल, वसूली करणारे कर्मचारी यांचेकडून आवश्यक त्या रकमेचे व अन्य प्रकारात जमानतनामे (तारपत्रे) घेण्यात आलेले नाहीत.

21) जून अखेर जंगम साहित्यांची व जंगम साहित्याव्यतिरिक्त इतर संग्रह साठयाची सहामाही प्रत्यक्ष पडताळणी कार्यालयप्रमुखाकडून करुन तसे विवरणपत्र पाठविले जात नाही.

22) लेखा विभागाने देयकांचे प्रदान केल्यानंतर देयकाची मूळ प्रत नस्तीबध्द केल्यावर संबंधित विभागाने त्या देयकाची दुसरी प्रतीवर प्रमाणक क्रमांक व दिनांक इत्यादी तपशीलाची नोंद घेऊन ती संबंधित विभागाकडील नस्ती मध्ये नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केली जात नाही.

23) कार्यकंत्राटा संबंधीत देयकांचे प्रदान करताना मोजमाप पुस्तिकेत प्रदानाच्या शेऱ्यावर प्रमाणक क्रमांक, प्रदान कोणत्या निधीतून केले इत्यादी तपशील नमूद केला जात नाही.

24) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 10(फ) नुसार महानगरपालिकेबरोबर महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात पालिका सदस्यांचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो पालिका सदस्य राहण्यास अनर्ह होईल. अशी तरतूद असल्याने प्रत्येक निविदाधारकाकडून त्याचे उपरोक्त् तपशीलाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

25) शासन निर्णयानुसार पंधरा लक्ष रूपयावरील कामांचे त्रययस्थ संस्थेकडून लेखापरीक्षण (Third party inspection) केले जात नाही.

26) ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर रोख रक्कम जमा केली जाते उदा. नगररचना विभाग, सर्व विभागीय कार्यालयातील कोषागार विभाग, इत्यादी ठिकाणी सर्वसाधारण रोखवहीमधील कॅश अचानक पणे (Surprise Check) तपासणी करून बरोबर असल्याचे विभाग प्रमुखांकडून प्रमाणीत केले जात नाही.

27) विविध विभागांमध्ये जमेच्या विविध लेखा शिर्षाअंतर्गत जमा होणा-या रकमा व कोषागाराने जमा केलेल्या रकमा यांचा ताळमेळ विभागीय कार्यालयामध्ये केले जात नाही.

28) विभागीय कार्यालयांमध्ये विविध कर विभाग, पाणी पूरवठा विभाग, घरपट्टी विभाग इत्यादी ठिकाणी जमा

होणारा महसुलाच्या रकमा या त्या त्या विभागातील अधिक्षकांनी पावती पूस्तकावरून बरोबर असल्याची तपासणी सर्वच ठिकाणी केली जात नाही. तसेच छपाई विभागातून प्राप्त केलेली पावती पुस्तके, वापरलेली पावती पूस्तके व शिल्लक पावती पुस्तके यांचा लेखा तपासला जात नाही.

29) विभागीय कार्यालयामार्फत् महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा लायसन्स फी ची वसूली केली जाते, भरणा विलंबाने केल्यास त्यावर शास्ती आकारली जात नाही. यामुळे वसूली महानगरपालिकेस विलंबाने प्राप्त होते.

30) विभागीय कार्यालयाकडून घरपटटी व पाणीपटटी वसूली संगणीकृत करण्यात आली आहे, पंरतू विविध कर वसूली हस्तलिखीत पध्दतीने सुरू आहे, विविध कर वसूली विभाग देखील संगणीकृत करणे आवश्यक आहे.

31) उदयान विभागात खेळणी बसविणे व वाहनावरील खर्च यासाठी सन 2008 -2009 मध्ये मंजूर असलेल्या जुन्याच दराने खर्च करण्यात आलेला आहे.

32) उदयानांची संख्या मोठया प्रमाणावर असून उदयान निहाय दुरूस्ती देखभाल, दुरूस्ती, खेळणी, ट्री गार्ड, जडसंग्रह इत्यादीबाबत उदयाननिहाय नोदंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे उदयानांवर होणारा खर्च व तेथील साहित्याबाबत कोणाचेही नियंत्रण नसल्याबाबत दिसून येते.

33) नगररचना विभागात विविध शुल्कांचा भरणा मोठया प्रमाणावर केला जातो, तेथील सर्व व्यवहार हस्तलिखित पदध्दतीने केले जातात, सदरील नोंदींची, बेरीजांची तपासणी केली जात नसून त्यावर सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. रोखशाखेतील काममाकाज संगणक प्रणालीवर केले जात नाही.

अनुपालन व पोहोच

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम कलम 10(1) मधील तरतुदींनुसार, हा अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिन्यांचे आत, मा. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांच्या स्वाक्षरीने पाठवावे.तत्पुर्वी हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद करुन पोहोच पाठवावी.

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप),
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रत अग्रेषित -

1) मा. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) एक, 101 महर्षी कर्वे रोड, मुंबई. (ई-मेल व्दारे)
2) मा. प्रधान सचिव-2, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32. (ई-मेल व्दारे)
3) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. (ई-मेल व्दारे)
4) मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
(महानगरपालिका अहवाल व पुर्नविलोकन शाखा प्रत्येकी 1 प्रत)
5) मा. उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद उपविभाग-3,.
6) कार्यालयीन प्रत.

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप),
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

नाव	परिच्छेद क्रमांक
दिपक तुळशीराम बिरारी, सहाय्यक संचालक	1, 110, 111, 114, 116, 117, 118, 13, 14, 166, 167, 170, 171, 172, 2, 24, 25, 26, 27, 28, 29, 3, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 4, 40, 41, 42, 43, 44, 45, 5, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 6, 62, 76, 77, 78, 79, 85, 92, 93, 94
प्रदिप दिगंबरराव मोंढे, लेखापरिक्षा अधिकारी	124, 125, 126, 81
विजय अविनाश जेऊरकर, लेखापरिक्षा अधिकारी	100, 127, 128, 129, 130, 131, 132, 133, 134, 135, 136, 137, 138, 139, 140, 141, 152, 153, 154, 155, 156, 157, 158, 159, 160, 161, 162, 163, 164, 165, 69, 72, 73, 74, 75, 99
निलेश कमलाकर केदारे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	10, 11, 142, 143, 144, 145, 168, 169
संदिप वामनराव पारनेरकर, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23
वैभव जनार्दन ठाकूर, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	101, 102, 103, 104, 105, 106, 115, 119, 12, 120, 121, 122, 64, 65, 66, 67, 68, 70, 71, 82, 83, 84, 86, 87, 88, 89, 9, 90, 91, 95
रविंद्र कामान्ना नाईक, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	123, 146, 147, 148, 149, 150, 151, 96, 97, 98
मंगेश गणेश घोलप, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	107, 108, 109, 112, 113, 46, 47, 48, 49, 59, 60, 61, 63, 7, 8, 80

विवरणपत्रे व जोडपत्रे

अ.क्र.	परिच्छेद क्र.	आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम	गुंतलेली रक्कम
1	4	84261982.00	167242.00	----	----	84429224.00
2	5	129220128.00	----	----	----	129220128.00
3	6	49738133.00	----	----	----	49738133.00
4	7	15889716.00	48810.00	----	----	15938526.00
5	8	4195912.00	----	----	----	4195912.00
6	9	----	935235.00	----	----	935235.00
7	10	4047424.00	----	----	----	4047424.00
8	13	2100000.00	----	----	----	2100000.00
9	14	4900000.00	----	----	----	4900000.00
10	15	108837123.00	2346622.00	----	----	111183745.00
11	16	78241955.00	2865920.00	----	----	81107875.00
12	17	3440662.00	174774.00	----	----	3615436.00
13	18	3607053.00	100917.00	----	----	3707970.00
14	19	93953660.00	134605.00	----	----	94088265.00
15	20	33444850.00	23163.00	----	----	33468013.00
16	21	32567305.00	1048340.00	----	----	33615645.00
17	22	34033460.00	573030.00	----	----	34606490.00
18	23	133791331.00	178723.00	----	----	133970054.00
19	24	121060362.00	216494.00	----	----	121276856.00
20	25	106164720.00	2319732.00	----	----	108484452.00
21	26	19558949.00	327618.00	----	----	19886567.00
22	27	143206271.00	1311854.00	----	----	144518125.00
23	28	328644801.00	3060855.00	----	----	331705656.00
24	29	76790193.00	404788.00	----	----	77194981.00
25	30	43918429.00	150775.00	----	----	44069204.00
26	31	75193232.00	152176.00	----	----	75345408.00
27	32	182235672.00	555325.00	----	----	182790997.00
28	33	9689539.00	16395.00	----	----	9705934.00
29	34	35311095.00	116681.00	----	----	35427776.00
30	35	42580603.00	258687.00	----	----	42839290.00
31	36	82090645.00	327982.00	----	----	82418627.00

अ.क्र.	परिच्छेद क्र.	आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम	गुंतलेली रक्कम
32	37	129837937.00	1882648.00	----	----	131720585.00
33	38	35832495.00	567305.00	----	----	36399800.00
34	39	121012120.00	559797.00	----	----	121571917.00
35	40	88986783.00	4424252.00	----	----	93411035.00
36	41	248662495.00	2918137.00	----	----	251580632.00
37	42	310225140.00	734533.00	----	----	310959673.00
38	43	9890787.00	385283.00	----	----	10276070.00
39	44	39114102.00	1058549.00	----	----	40172651.00
40	45	228803411.00	1065590.00	----	----	229869001.00
41	46	2114546.00	78407.00	----	----	2192953.00
42	47	3401025.00	152948.00	----	----	3553973.00
43	48	1896076.00	88400.00	----	----	1984476.00
44	49	2709269.00	53005.00	----	----	2762274.00
45	50	1888878.00	159860.00	----	----	2048738.00
46	51	----	254808.00	----	----	254808.00
47	52	33221571.00	859359.00	----	----	34080930.00
48	53	21055650.00	109213.00	----	----	21164863.00
49	54	3796460.00	104226.00	----	----	3900686.00
50	55	10579232.00	199610.00	----	----	10778842.00
51	56	8554652.00	210410.00	----	----	8765062.00
52	57	677472.00	252300.00	----	----	929772.00
53	58	2982199.00	249410.00	----	----	3231609.00
54	59	8156643.00	72573.00	----	----	8229216.00
55	60	1369672.00	14456.00	----	----	1384128.00
56	61	4168842.00	211185.00	----	----	4380027.00
57	62	10010189.00	126711.00	----	----	10136900.00
58	63	1873572.00	43047.00	----	----	1916619.00
59	64	----	1808197.00	----	----	1808197.00
60	65	----	----	----	----	117114334.00
61	66	----	----	----	----	778300.00
62	67	----	----	----	----	19005707.00
63	68	----	----	----	----	53836342.00
64	69	----	186990.00	----	----	186990.00
65	70	----	----	----	----	81923284.00
66	71	----	----	----	----	140908505.00

अ.क्र.	परिच्छेद क्र.	आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम	गुंतलेली रक्कम
67	72	3638485.00	81581.00	----	----	3720066.00
68	73	863018.00	8718.00	----	----	871736.00
69	74	10605503.00	107130.00	----	----	10712633.00
70	75	----	3213386.00	----	----	3213386.00
71	76	----	130000.00	----	----	130000.00
72	77	----	8568.00	----	----	8568.00
73	78	----	----	----	----	560763000.00
74	79	----	----	----	----	470517162.00
75	81	188930878.00	----	----	----	188930878.00
76	82	1072937.00	----	----	----	1072937.00
77	83	475370.00	----	----	----	475370.00
78	84	1586335.00	----	----	----	1586335.00
79	87	198900.00	----	----	----	198900.00
80	104	127050.00	----	----	----	127050.00
81	105	1162451.00	----	----	----	1162451.00
82	107	7709800.00	----	----	----	7709800.00
83	108	6205450.00	----	----	----	6205450.00
84	109	4800494.00	----	----	----	4800494.00
85	112	881536.00	----	----	----	881536.00
86	113	3915311.00	----	----	----	3915311.00
87	115	186766.00	----	----	----	686766.00
88	116	43519115.00	----	----	----	43519115.00
89	117	9401905.00	----	----	----	9401905.00
90	120	2257313.00	----	----	----	2257313.00
91	122	20175000.00	----	----	----	20175000.00
92	123	13489085.00	----	----	----	13489085.00
93	124	6122700.00	----	----	----	6122700.00
94	125	80000.00	----	----	----	80000.00
95	128	1705540.00	----	----	----	1705540.00
96	130	987624.00	----	----	----	987624.00
97	134	63850.00	----	----	----	63850.00
98	135	199500.00	----	----	----	199500.00
99	137	2436213.00	----	----	----	2436213.00
100	138	493812.00	----	----	----	493812.00
101	139	1489808.00	----	----	----	1489808.00

अ.क्र.	परिच्छेद क्र.	आक्षेपाधीन रक्कम	वसूलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम	गुंतलेली रक्कम
102	140	62969.00	----	----	----	62969.00
103	141	7282505.00	----	----	----	7282505.00
104	147	1500000.00	----	----	----	1500000.00
105	148	1033871.00	----	----	----	1033871.00
106	150	18064.00	----	----	----	18064.00
107	155	1700000.00	----	----	----	1700000.00
108	159	511715.00	----	----	----	511715.00

2014-2015

(1)

नाशिक महानगरपालिका,नाशिक

विवरणपत्र क 1 (अ)

सन 2014-15 या वित्तिय वर्षाचे महानगरपालिका जमा बाजू

अ क	तपशिल	लेखापरिक्षण वित्तिय वर्षाचे सुधारीत अंदाज	लेखापरिक्षण वित्तिय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा
1	प्रारंभिक शिल्लक	5551.33	5551.33
2	महसुली जमा	91666.20	85133.11
3	भांडवली जमा	1705.89	773.15
4	इतर उचल रकमा	10131.72	5246.09
एकुण		109055.14	96703.68

उपमुख्यलेखाधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

नाशिक महानगरपालिका,नाशिक

विवरणपत्र क 1 (ब)

सन 2014-15 या वित्तिय वर्षाचे महानगरपालिका खर्च बाजू

अ क	तपशिल	लेखापरिक्षण वित्तिय वर्षाचे सुधारीत अंदाज	लेखापरिक्षण वित्तिय वर्षाचे प्रत्यक्ष आकडा
1	महसुली खर्च	60209.95	55989.75
2	भांडवली खर्च	39315.58	30140.16
3	इतर उचल रकमा	3806.36	3646.8
4	19% महसुली	1343.07	3.65
5	19% भांडवली	4029.22	4.67
एकुण		108704.18	89785.03

उपमुख्यलेखाधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

नाशिक महानगरपालिका, नाशिक

विवरणपत्र क्र. 1 (क)

महानगरपालिकेचे दि. 31/03/15 अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्र

आकडे रक्कम रू. (लाखात)

अ.क्र.	मत्ता	रक्कम (रू.)	अ.क्र.	दायित्व	रक्कम (रू.)
	एकुण			एकुण	

मत्तेपेक्षा दायित्व रू. ...../- ने जास्त / कमी आहे.

मुख्य संचालक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

विवरण पत्र क्र. २

सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र (आकडे कोटीत)

अ.क्र	योजनेचे नांव	मंजुर करणारे प्रधिकारी	सन १३-१४ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची शिल्लक अनुदान र. रु.	सन १३-१४ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची प्राप्त अनुदान र. रु.	एकुण उपलब्ध अनुदान र. रु	सन १३-१४ वित्तीय वर्षामध्ये केलेला खर्च	शिल्लक अनुदान रक्कम रु	सन १४-१५ मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची र.र.	शासनास परत करावयाची अनुदानाची र.रु.	उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही.	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	

विवरण पत्र क्र. २

सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र (आकडे कोटीत)

अ.क्र	योजनेचे नांव	मंजुर करणारे प्रधिकारी	सन १४-१५ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची शिल्लक अनुदान र. रु.	सन १४-१५ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची प्राप्त अनुदान र. रु.	एकुण उपलब्ध अनुदान र. रु.	सन १४-१५ वित्तीय वर्षामध्ये केलेला खर्च	शिल्लक अनुदान रक्कम रु कोटीत	सन १५-१६ मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची र.र.	शासनास परत करावयाची अनुदानाची र.रु.	उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही.	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	मुकणे पाणी पुरवठा योजना	अ) केंद्रशासन ५० टक्के		२७.५५	२७.५५	निरंक	३८.५७	३८.५७	निरंक	नाही	कार्यादेश देणेवर
		ब) राज्यशासन २० टक्के		११.०२	११.०२						
		क) मनपा हिस्सा ३० टक्के									
	एकुण र.रु.(कोटीत)			३८.५७	३८.५७	निरंक	३८.५७	३८.५७	निरंक	नाही	

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका,नाशिक

विवरणपत्र क्र.२

सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

(र.रु. लाखात)

अ.क्र.	योजनेचे नाव	मंजुर करणारे प्राधिकारी	सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची शिल्लक अनुदान र.रु.	सन १४-१५ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची प्राप्त अनुदान र.रु.	एकुण उपलब्ध अनुदान र.रु.	सन १४-१५ वित्तीय वर्षामध्ये केलेला खर्च	शिल्लक अनुदान र.रु.	सन २०१४-१५ मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची र.रु.	शासनास परत करावयाची अनुदान र.रु.	उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल किंवा नाही	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	फायर प्रोटेक्शन फंड	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक

उप मुख्यलेखाधिकारी
नाशिक महानगरपालिका,नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्थानिक संस्था कर विभाग

विवरणपत्र क्र.२

सन २०१४-२०१५ या वित्तिय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

(रक्कम रुपये लाखात)

अ.क्र.	योजनेचे नांव	मंजूर करणारे प्राधिकारी	सन १४-१५ या वित्तिय वर्षाच्या आरंभिची शिल्लक अनुदान रक्कम रु.	सन १४-१५ या वित्तिय वर्षाच्या आरंभिची प्राप्त अनुदान रक्कम रु.	एकूण उपलब्ध अनुदान रक्कम रु.	सन १४-१५ वित्तिय वर्षामध्ये केलेला खर्च	शिल्लक अनुदान रक्कम रु.	सन १५-१६ मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची रक्कम रु.	शासनास परत करावयाची अनुदानाची रक्कम रु.	उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१)	१ टक्का अधिभार (नोंदणी शुल्क एलबीटी सरचार्ज)	महाराष्ट्र शासन	निरंक	निरंक	५९५३.१४	निरंक	निरंक	निरंक	निरंक	स्थानिक संस्था कर विभागाचे अखत्यारित नाही	१४-१५ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेली अधिभाराची रक्कम स्तंभ कॉलम नं.६ मध्ये दर्शविलेली आहे.

नाशिक महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभाग

उपआयुक्त(स्था.सं.क.)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका,नाशिक.

विवरण पत्र क्र.२

सन २०१४-१५ या वित्तिय वर्षाचे शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

र.रू.लाखात

अ.क्र.	योजनेचे नाव	मंजुर करणारे प्राधिकारी	सन १४-१५ या वित्तीय वर्षाच्या आरंभिची शिल्लक अनुदान र.रु.	सन १४-१५ या वित्तिय वर्षाच्या आरंभिची प्राप्त अनुदान र.रु.	एकुण उपलब्ध अनुदान र.रु.	सन १४-१५ वित्तिय वर्षामध्ये केलेला खर्च	शिल्लक अनुदान र.रु.	सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास अनुमती असलेली अनुदानाची र.रु	शासनास परत करावयाची अनुदान रक्कम रु.	उपयोगिता प्रमाण पत्र सादर केले किंवा नाही	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
१	मनपा आमदार निधी	जिल्हा नियोजन अधिकारी	२५६.३२	१६३.१७ + ८९.७८(व्याज व इतर जमा) २५२.९५	५०९.२७	२६३.१६	२४६.११	२४६.११	निरंक	संबधीत कार्यकारी विभागामार्फत	---

मुख्य लेखाधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

नाशिक महानगरपालिका, नाशिक

विवरणपत्र क्र. 2

सन 2014-2015 या वित्तिय वर्षाचे शासकिय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरणपत्र

